त्यानुसार दि.१४/०४/२०१६ रोजी वरीलप्रमाणे प्राप्त २६ सिलबंद तांत्रिक निविदा उघडण्यात आलेल्या असून त्यापैकी अ.नं.११ M/s. Johnson & Johnson, Mumbai यांची निविदा ही औषधे/ सर्जिकल साहित्यासाठी नसून Sterrad आयटमसाठी कोटेशन प्राप्त झालेले आहे, तसेच अ.नं.२ M/s. Balaji Drugs & Chemicals Agencies, Nashik व अ.नं. १० M/s. Indu Pharma, Pune यांच्या निविदा हया उशिरा प्राप्त झालेल्या आहेत, त्यामुळे सदर तीनही निविदा वगळून प्रत्यक्षात १५ सिलबंद तांत्रिक निविदा प्राप्त झालेल्या आहेत, तसेच PART “A” खरेदीकामी प्रत्यक्षात Online १९ निविदा प्राप्त झालेल्या आहेत, म्हणजेच दोन

निविदाधारकांच्या सिलबंद तांत्रिक निविदा प्राप्त झालेल्या नाहीत, त्यामुळे त्यांनी Online दिलेल्या निविदा स्विकारता येणार नाही. तसेच PART "B" करीता प्राप्त झालेल्या ८ सिलबंद निविदांपैकी अनं.२३- M/s. Gurukrupa Enterprises, Nashik यांनी Online निविदा दिलेली नाही, तसेच त्यांची निविदा उशिरा प्राप्त झालेली आहे व Document देखील सादर केलेले नाहीत त्यामुळे त्यांची निविदा रद्द करावी लागेल.

PART "A" खरेदीकामी पात्र असलेल्या १५ ऑनलाईन कमर्शियल निविदा व PART "B" करीता पात्र असलेल्या ७ ऑनलाईन कमर्शियल निविदा अशा एकुण २२ ऑनलाईन कमर्शियल ई-निविदा आजचे उपसमिती सभेसमोर, उपस्थित निविदाधारकांसमक्ष उघडणेत येऊन, त्यामधील मुळ दरांचा तुलनात्मक तक्ता तयार करणेत येऊन, तो परिशिष्ट अ म्हणून सोबत सादर करणेत आला.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा व साईनाथ रुग्णालयातील वार्षिक (सन- 2015-16) या वर्षाकरिता लागणारी औषधे व सर्जिकल साहित्य (Part- A) तसेच On Consignment basis (Part- B) खरेदीकामी सोबत परिशिष्ट अ म्हणून सादर केलेल्या तुलनात्मक तक्त्याची नोंद घेण्यात येऊन, त्यामधील निम्नतम दरधारकास मा.कार्यकारी अधिकारी यांचे मान्यतेने पुरवठा आदेश देण्यात यावा. तसेच ज्यासाठी समान निम्नतम दर प्राप्त झालेले आहेत, अशा पुरवठाधारकांना समप्रमाणात विभागून पुरवठा आदेश देण्यात यावा व ज्यासाठी दर आलेले नाहीत किंवा तीनपेक्षा कमी पुरवठाधारकांचे दर प्राप्त झालेले आहेत अशा खरेदी करीता नव्याने ई-निविदांची मागणी करणेत यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

०६ **श्री साईबाबा व साईनाथ रुग्णालयातील कर्मचाऱ्यांसाठी ओ.टी. ड्रेस कापड खरेदीबाबतच्या प्राप्त ई-निविदा उघडून निर्णय होणेबाबत.**

मा.त्रिसदस्य समिती सभा दि.२७/१०/२०१५ नि.क्र.४०३ अन्वये श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयातील कर्मचा-यांना लागणारे ओ.टी.तील ड्रेसकरीता कापड मे.महाराष्ट्र राज्य पॉवरलुम्स यंत्रमाग महामंडळ मर्या.मुंबई या एकाच ठराविक कंपनीकडून खरेदी करणे ऐवजी याकामी विहीत पध्दतीने ई-निविदांची मागणी करणेत यावी तसेच कापड प्राप्त झाल्यानंतर शिलाईकामी विहीत पध्दतीने निविदांची मागणी करणेस व त्याकामी येणा-या अपेक्षीत खर्चास मान्यता मिळालेली होती.

त्यानुसार सदर कापड खरेदीकामी वर्तमानपत्रात जाहीरात देऊन त्यानुसार दि.१५/०२/२०१६ ते ०८/०३/२०१६ अखेर ई-निविदा मागविण्यात आल्या होत्या तसेच सदर जाहीरत www. mahatenders.gov.in या संकेतस्थळावर देखील उपलब्ध होते तर दि.१२/०३/२०१६ अखेर तांत्रिक सिलबंद निविदा स्विकारणेची मुदत होती. त्यास अनुसरुन एकुण०८ सिलबंद निविदा संकेत स्थळावर प्राप्त झालेल्या आहेत त्याचा तपशील खालीलप्रमाणे.

| अ.नं. | निविदाधारकाचे नाव | प्राप्त दिनांक |
|---|---|---|
| १ | मे.आशा, नाशिक | ०८/०३/२०१६ |
| २ | मे.आर.के.कलेक्शन, नाशिक | ०८/०३/२०१६ |
| ३ | मे.बांठीया एन्टरप्रायजेस, पुणे | १०/०३/२०१६ |
| ४ | मे.क्रिटीकल केअर सिस्टीम, पुणे | ०८/०३/२०१६ |
| ५ | मे.एम.बी.ट्रेडींग कंपनी, नाशिक | ०८/०३/२०१६ |
| ६ | मे.महाराष्ट्र स्टेट पॉवरलुम कार्पोरेशन लि., नवी मुंबई | ०८/०३/२०१६ |
| ७ | मे.लक्ष्मी चव्हाण एजन्सी, सटाणा | ०८/०३/२०१६ |
| ८ | मे.खादी ग्रामोदयोग विकास समिती, दिल्ली | ०१/०३/२०१६ |

**संस्थान अधिनियम/ठराव यानुसार छाननी,शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय छाननी करुन अनुमान-** अधिनियमातील समितीचे कर्तव्ये व अधिकार क्र.१७-२(ण)अन्वये मानवजातीच्या कल्याण करणा-या किंवा आपत्तीमध्ये साहय करणा-या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल असा आहे,त्यानुसार संस्थानतर्फे ०२ धर्मादाय रुग्णालये चालविण्यात येतात.

**शासकीय विभागानी करावयाच्या कार्यालयीन खरेदीसाठी कार्यपध्दतीची नियमावली नुसार शासन निर्णय क्र.भांखस-२०१४/प्र.क्र.८२/भाग-३/उद्योग-४, दि.३०ऑक्टोबर २०१५ अन्वये- परिच्छेद ३.२.३-** खरेदी जर रु.५००० ते ३ लाखापर्यंत असेल तेव्हा दरपत्रके मागवून खरेदी करण्याची खरेदीदान्वर विभागांना मुभा देण्यात आली आहे. एका आर्थिक वर्षात एकाच वस्तूच्या दरपत्रकाच्या माध्यमातून करण्यात

आलेल्या खरेदीचे एकूण मुल्य रु.३ लाखापेक्षा जास्त नसावे. रु.३ लाखापर्यंतची कोणत्याही वस्तूंची खरेदी DGS &D कडील दरकराराच्या आधारे करण्याची संबंधीत खरेदीदार विभागांना मुभा देण्यात आली आहे.

सदरच्या सर्व तांत्रिक बंद निविदा दि१८/०३/२०१६ रोजी खरेदी समिती समक्ष उघडण्यात आले असुन निविदाधारकांनी सादर केलेल्या कागदपत्रांची तपासणी करण्यात आली असुन त्यांनी निविदेसोबत मागणी केलेली सर्व कागदपत्रे सादर केलेली असुन त्या सर्व निविदा पात्र आहे.

उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेल्या एकुण ८ ई-कमर्शियल निविदा आजचे उपसमिती सभेसमोर, उपस्थित निविदाधारकांसमक्ष उघडणेत येऊन, त्यामधील मुळ दरांचा खालीलप्रमाणे तुलनात्मक तक्ता तयार करणेत आला.

| Sr. no. | Name of tenderer | Sky Blue 67% Polyister+ 33 % Cotton & width 58 Inch/ 38 Inch/ 36 Inch 4756 metre | Nevy Blue 67% Polyister+ 33 % Cotton & width 58 Inch/ 38 Inch/ 36 Inch 3944 metre | Marron 67% Polyister+ 33 % Cotton & width 58 Inch/ 38 Inch/ 36 Inch 1600 metre |
|---|---|---|---|---|
| | | निविदेमधील मुळ प्रती मिटर दर रु. | | |
| १ | मे.बांठीया एन्टरप्रायजेस, पुणे | ६५/- | ६५/- | ६५/- |
| २ | मे.आशा, नाशिक | **४५/-** | **४५/-** | **४५/-** |
| ३ | मे.एम.बी.ट्रेडींग कंपनी, नाशिक | ९७.२० | ९७.२० | ९७.२० |
| ४ | मे.लक्ष्मी चव्हाण एजन्सी, सटाणा | ५३/- | ५६/- | ५७/- |
| ५ | मे.खादी ग्रामोदयोग विकास समिती, दिल्ली | ६३.८० | ६३.८० | ६३.८० |
| ६ | मे.महाराष्ट्र स्टेट पॉवरलुम कार्पोरेशन लि., नवी मुंबई | ७३.१० | ८३.७० | ८३.७० |
| ७ | मे.क्रिटीकल केअर सिस्टीम, पुणे | ६६/- | ६६/- | ६८/- |
| ८ | मे.आर.के.कलेक्शन, नाशिक | ५८/- | ५८/- | ५८/- |

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा व साईनाथ रुग्णालयातील कर्मचाऱ्यांसाठी ओ.टी. ड्रेस कापड खरेदी करणेकामी उपसमितीने खालीलप्रमाणे शिफारशी केल्या, त्या मान्य करण्यात आल्या.**

**उपरोक्त तुलनात्मक तक्त्यामधील निम्नतम दरधारक मे.आशा, नाशिक व द्वितीय निम्नतम दरधारक मे.लक्ष्मी चव्हाण एजन्सी, सटाणा तसेच मे.महाराष्ट्र स्टेट पॉवरलुम कार्पोरेशन लि., नवी मुंबई या तीनही पुरवठाधारकांच्या कापडाच्या नमुन्यांची शासन मान्य कापड तपासणी प्रयोगशाळा मे.टेक्सटाईल कमिटी, मुंबई यांचेकडे संस्थानमार्फत पाठविणेत यावेव कापड तपासणी अहवालानुसार आपले मागणीप्रमाणे कापड असेल तरच निम्नतम अथवा द्वितीय निम्नतम दरधारकास संस्थान मागणीच्या ७०% कापड खरेदीसाठीचा पुरवठा आदेश देण्यात यावा.**

**मे.महाराष्ट्र स्टेट पॉवरलुम कार्पोरेशन लि., नवी मुंबई हे शासनमान्य पुरवठाधारकअसून त्यांनी सदरहू निविदेप्रक्रियेमध्ये भाग घेतलेला असल्यामुळे शासन निर्णयास अनुसरुन एकूण खरेदीच्या३०% कापड खरेदीसाठीचा पुरवठा आदेश तुलनात्मक तक्त्यामधील निम्नतम दराने त्यांना देण्यात यावा.**

**तसेच कापड तपासणीकामी येणाऱ्या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देण्यात यावी.**

(कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

०७ **श्री साईबाबा संस्थानमधील एल ॲन्ड टी कंपनीच्या एअर सर्कीट ब्रेकरचे वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्टबाबत मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाने दिलेल्या आदेशाप्रमाणे एअर सर्कीट ब्रेकरची उत्पादक कंपनी मे.एल.ॲन्ड टी.मुंबई यांचे अधिकृत डिलर मे.टेक इंडिया इंजिनिअर्स प्रा.लि.मुंबई यांचेकडून प्राप्त झालेली निविदा उघडून निर्णय होणेबाबत.**

श्री साईबाबा संस्थानचे मंदिर परीसर, श्री साईबाबा हॉस्पीटल + साईनगर, श्री साईनाथ रुग्णालय + व्दारावती भक्तनिवास, साईबाबा भक्तनिवासस्थान (५०० रुम), श्री साई प्रसादालय, साईआश्रम भक्तनिवास तसेच श्री साईधर्मशाळा याठिकाणीच्या इमारतींना वीजपुरवठयाकरीता स्वतंत्र आठ ठिकाणी सबस्टेशन उभारुन

विद्युतपुरवठा करण्यात आलेला आहे. महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीचा वीजपुरवठा खंडीत झाल्यानंतर करावयाच्या तातडीच्या वीजपुरवठयासाठी प्रत्येक ठिकाणी जनरेटरसेट बसविण्यात आलेले आहेत. सदरचे जनरेटर सेट ऑपरेटींग करणेकरीता स्वतंत्र ए.एम.एफ.पॅनेल बसविण्यात आलेले आहे. प्रत्येक सबस्टेशन मध्ये महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीचा वीजपुरवठा व जनरेटरचा वीजपुरवठा वरील इमारतींना पुरविणेकरिता मेन डिस्ट्रिब्युशन पॅनेल बसविण्यात आलेले आहेत. संस्थानमध्ये आजपर्यंत विविध ठिकाणच्या ए.एम.एफ.पॅनेल व मेन डिस्ट्रिब्युशन पॅनेलमध्ये ८०० ॲम्पीअर ते २००० ॲम्पीअर कॅपॅसिटीचे एल.अँड.टी.कंपनीचे व सिमेन्स कंपनीचे प्रत्येकी रु. १,३०,०००/- ते रु. ४,५०,०००/- किंमतीचे एकुण ९२ नग एअर सर्कीट ब्रेकर बसविण्यात आलेले आहेत.

संस्थानमधील काही ठिकाणचे एअर सर्किट ब्रेकर हे २२ वर्षापुर्वी बसविलेले आहेत. एअर सर्किट ब्रेकरमार्फत वीजपुरवठा करण्यास काही अडथळा येऊन नये, याकरीता सदरच्या एअर सर्किट ब्रेकरची नियमित सर्व्हिसिंग करावी लागते. सर्व्हिसिंगचे वेळेस खराब झालेले कॉन्टॅक्ट व ब्रेकरच्या आतील मेकॅनिझमचे सदोष पार्ट बदलून एअर सर्किट ब्रेकरची सर्व्हिसिंग करण्यात येते. हे सर्व एअर सर्कीट ब्रेकर सुस्थितीत कार्यान्वित असणे गरजेचे असल्याने त्याकरीता एअर सर्कीट ब्रेकरची काही ठराविक कालावधीत सर्व्हिसिंग करणे गरजेचे असते. याकरीता वापरण्यात येणारे मटेरीयल हे त्या त्या एअर सर्कीट ब्रेकरच्या उत्पादक कंपनीचे ओरीजिनल मटेरीयल वापरणे फायदेशिर असते. हे सर्व मटेरीयल मार्केटमध्ये उपलब्ध होत नाही. म्हणून सदरच्या एअर सर्कीट ब्रेकरची सर्व्हिसिंग हे त्या त्या एअर सर्कीट ब्रेकरच्या उत्पादक कंपनीकडून करुन घेणे गरजेचे आहे.

तसेच मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाचे समोर C.A.NO.9219 OF 2014 PIL NO.18 OF 2011 दिनांक २६-०९-२०१४ अन्वये झालेल्या सुनवणीत "वार्षिक मेंन्टेनन्स सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट अथवा रिस्क प्रोटेक्शन टाईप सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट हे त्या त्या मशिनरीच्या उत्पादक कंपनीला अथवा संबंधीत मशिनरीच्या उत्पादक कंपनीने निर्देशित केलेल्या त्यांच्या अधिकृत सर्व्हीस डिलरला पुर्वीच्या अटी व शर्तीवर देण्यात यावे " असा आदेश मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाने दिलेला आहे

त्यानुसार संस्थानमधील सर्व ठिकाणच्या एअर सर्कीट ब्रेकरच्या वार्षिक सर्व्हीस कॉन्ट्रक्टबाबत उत्पादक कंपनी मे.एल.अँड टी. तसेच मे.सिमेन्स यांचेकडून दरपत्रक मागविणेकरीता पत्रव्यवहार करणेबाबत मा.व्यवस्थापन समितीची मान्यता घेणेकरीता विद्युत विभागामार्फत दिनांक ०७-०३-२०१६ रोजी प्रस्ताव सादर करण्यात आलेला होता.

मा.व्यवस्थापन त्रीसदस्य समितीच्या दिनांक ०२-०४-२०१६ रोजीचे सभेतील विषय क्र.४७ निर्णय क्र.२४६ अन्वये यावर सविस्तर चर्चा होऊन असे ठरले की, प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे एअर सर्कीट ब्रेकरची उत्पादक कंपनी मे.एल.अँड टी. तसेच मे.सिमेन्स यांना पत्र पाठवून त्यांचेकडून दरपत्रक मागविणेस मान्यता देण्यात येत आहे, असा निर्णय झालेला आहे.

त्यानुसार सन २०१६-२०१७ करीता श्री साईबाबा संस्थानचे एअर सर्कीट ब्रेकरच्या वार्षिक सर्व्हीस कॉन्ट्रॅक्टबाबत उत्पादक कंपनी मे.एल.अँड टी., मुंबई यांचेकडून दिनांक२७-०६-२०१६ पर्यंत दरपत्रक सादर करणेकरीता जा.क्र.एसएसएसटी/ विद्युत/ ११६३/ २०१६ दि.१०-०६-२०१६ अन्वये पत्र पाठविणेत आलेले होते.

परंतु एल.अँड टी मेक एअर सर्कीट ब्रेकरची उत्पादक कंपनी मे.एल.अँड टी., मुंबई यांनी दिनांक१४-०६-२०१६ रोजी पत्र पाठवून श्री साईबाबा संस्थानमधील एल.अँड टी. कंपनीच्या एअर सर्कीट ब्रेकरचे वार्षिक सर्व्हीस कॉन्ट्रॅक्टकरीता दरपत्रक सादर करण्याकरीता पाठविण्यात आलेल्या पत्राबाबत आभार मानलेले आहे. तसेच एल.अँड टी.कंपनी यांचेमार्फत एअर सर्कीट ब्रेकर पुरविण्यात आल्यानंतर सदरच्या एअर सर्कीट ब्रेकरच्या पुढील सर्व्हिसिंगकरीता कंपनीमार्फत प्रत्येक वर्षी सर्व्हीस डिलरची नेमणूक करण्यात येत असून सन २०१६-२०१७ करीता मे.टेक इंडिया इंजिनिअर्स प्रा.लि., मुंबई यांची अधिकृत सर्व्हीस डिलर म्हणून नेमणूक करण्यात आलेली असून एल.अँड टी.कंपनीमार्फत पुरविण्यात आलेल्या एअर सर्कीट ब्रेकरचे मेन्टेनन्सचे काम हे मे.टेक इंडिया इंजिनिअर्स प्रा.लि., मुंबई करत असल्याने श्री साईबाबा संस्थानमधील एल.अँड टी.मेक एअर सर्कीट ब्रेकरचे वार्षिक सर्व्हीस कॉन्ट्रॅक्टरीता मे.टेक इंडिया इंजिनिअर्स प्रा.लि., मुंबई हे दरपत्रक सादर करणार असल्याचेही मे.एल.अँड टी., मुंबई यांनी सदरच्या पत्रामध्ये कळविलेले आहे

त्यानुसार एल.अँड टी.मेक एअर सर्कीट ब्रेकरची उत्पादक कंपनी मे.एल.अँड टी., मुंबई यांचे सन २०१६-२०१७ चे अधिकृत सर्व्हीस डिलर मे.टेक इंडिया इंजिनिअर्स प्रा.लि., मुंबई यांचेकडून दिनांक२७-०६-२०१६ रोजी सिलबंद निविदा प्राप्त झालेली आहे.

उपरोक्तप्रमाणे एल.अँड टी. मेक एअर सर्कीट ब्रेकरची उत्पादक कंपनी मे.एल.अँड टी., मुंबई यांचे सन २०१६-२०१७ चे अधिकृत सर्व्हीस डिलर मे.टेक इंडिया इंजिनिअर्स प्रा.लि., मुंबई यांचेकडून दिनांक२७-०६-२०१६ रोजी प्राप्त झालेली सिलबंद निविदा आजचे उपसमिती सभेसमोर, उपस्थित निविदाधारकासमक्ष उघडणेत आला व याकामी एकच निविदाधारक असल्यामुळे उपसमितीने दरामध्ये आणखी सवलत मिळणेबाबत मे.टेक इंडिया इंजिनिअर्स प्रा.लि., मुंबई यांचे प्रतिनिधीशी चर्चा केली असता, त्यांनी खालीलप्रमाणे अंतीम दर देऊ केले

| अ.नं. | निविदाधारकांचे नांव | निविदेमधील मुळ दर रु. | चर्चेअंती देऊ केलेले अंतीम दर रु. |
|---|---|---|---|
| 1. | मे.टेक इंडिया इंजिनिअर्स प्रा.लि., मुंबई | १०,५३,१५०.२९९ | **१०,००,००१/-** |

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा संस्थानमधील ६८ नग एल.अँड टी.मेक एअर सर्कीट ब्रेकरचे वार्षिक सर्व्हीस कॉन्ट्रक्ट देणेकामी मे.टेक इंडिया इंजिनिअर्स प्रा.लि., मुंबई यांचे एकत्रित रु.१०,००,००१/- मात्र निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- विद्युत विभागप्रमुख)

---

०८ **स्टॅन्डबाय एल.पी.गॅस पाईप लाईन बसविणेकामी प्राप्त ई-निविदांचे कमर्शियल बीड उघडणेबाबत.**

श्री साईप्रसादालयातील एल. पी. गॅस प्लॅन्ट ते मुख्य किचन पर्यत स्टॅन्डबाय एल. पी. गॅस पाईप बसवून घेणेसाठी एक्सप्लोझीव्ह विभागाच्या मान्यता प्राप्त एजन्सीकडून विहीत पध्दतीने ई-निविदांची मागणी करणेस व त्याकामी येणाऱ्या अंदाजे रुपये 3,80,000/- मात्रचे खर्चास मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक 10/11/2015 रोजीचे सभेतील निर्णय क्र.478 अन्वये मान्यता देण्यात आली होती. त्यानुसार ई निविदा दिनांक 21/1/2016 रोजी महाराष्ट्र शासनाच्या www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर अपलोड करण्यात आलेली होती. त्यानुसार मे. ग्लोब गॅस इक्युपमेंट इडस्ट्री प्रा. लि. मुंबई यांची एकमेव ई निविदा प्राप्त झालेली असलेने दिनांक 1/03/2016 रोजी महाराष्ट्र शासनाच्या www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर फेर अपलोड करण्यात आलेली होती. दिनांक 14/03/2016 ई टेंडर भरण्याची अंतिम मुदत होती. त्यानुसार खालील दोन निविदाधारकांच्या ई- निविदा प्राप्त झालेल्या आहेत.

| अ.नं. | निविदाधारकांचे नांव | अ.नं. | निविदाधारकांचे नांव |
|---|---|---|---|
| 1. | मे. ग्लोब गॅस इक्युपमेट इंडस्ट्री प्रा. लि मुंबई | 2. | एच जोशी ब्रदर्स, नाशिक |

महाराष्ट्र शासनाचे नविन खेरदीचे GR मध्ये (शासन निर्णय क्रं. 2014/प्र. क्रं.82/भाग-III/उद्योग -४) तरतुद क्रं. ४.४.३.१ अन्वये रक्कम रु. १० लाखापेक्षा कमी रक्कमेच्या निविदा असलेस फक्त एकच मुदतवाढ देणेत यावी असे नमुद केलेले आहे. त्यानुसार उपरोक्त दोन ई निविदेचे तांत्रिक निविदा दिनांक 17/06/2016 रोजी मा. प्रशासकिय अधिकारी यांचे समक्ष उघडणेत आलेले आहे. तांत्रिक निविदेतेतील VAT, PAN नंबर, कंपनीचा वार्षिक उलाढाल, कंपनी रजिस्टेशन सर्टिफिकेटस, टेडर फी व ई.एम.डी. रकमेचा डि.डी., अंडर टेकींग सर्टिफिकेट व एल. पी. गॅसचे काम करणेसाठी एक्सप्लोझीव्ह विभागाचे मान्यता इत्यादी बाबी चेक केलेल्या असून उपरोक्त दोन्ही तांत्रिक निविदा पात्र आहे. तांत्रिक निविदा उघडल्यानंतर पात्र निविदाधारकांचे कमर्शियल बीड उघडणे आवश्यक आहे.

तरी श्री साईप्रसादालयातील एल. पी. गॅस प्लॅन्ट ते मुख्य किचन पर्यत स्टॅन्डबाय एल. पी. गॅस पाईप बनविणेसाठी पात्र दोन ई निविदाचे कमर्शियल बीड उघडून पुढील निर्णयास्तव प्रस्ताव सादर.

सिलबंद निविदा आजचे उपसमिती सभेसमोर, उपस्थित निविदाधारकांसमक्ष उघडणेत येऊन, त्यामधील मुळ दरांचा खालीलप्रमाणे तक्ता तयार करणेत आला.

| अ.नं. | निविदाधारकाचे नाव | निविदेमधील एकत्रित मुळ दर रु. |
|---|---|---|
| ०१ | मे.ग्लोब गॅस इक्युपमेट इंडस्ट्री प्रा. लि मुंबई | **३,०७,२४०/-** |
| ०२ | एच जोशी ब्रदर्स, नाशिक | ३,१३,२६०/- |

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईप्रसादालयातील एल. पी. गॅस प्लॅन्ट ते मुख्य किचन पर्यत स्टॅन्डबाय एल. पी. गॅस पाईप बसवून घेणेसाठी मे.ग्लोब गॅस इक्युपमेट इंडस्ट्री प्रा. लि मुंबई यांचे एकत्रित रु.३,०७,२४०/- मात्र निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- मेकॅनिकल विभागप्रमुख)

---

**०९ संस्थान वाहनांकरीता नवीन टायर्स खरेदीकामी प्राप्त झालेली दरपत्रके उघडून निर्णय घेणेबाबत.**

दि.२३/०६/२०१६ रोजीचे मा.त्रिसदस्य समितीचे सभेतील निर्णय क्र.४१२ नुसार, ११ वाहनांकरीता वेगवेगळया साईजचे नवीन ३३ टायर्स (ट्युब+ फ्लॅपसह) अपोलो, सीएट व ब्रिजस्टोन कंपनीचे अधिकृत डिलर यांचेकडून दरपत्रके बोलावुन खरेदी करणेस व याकामी येणा-या अंदाजे रु.२,६०,०००/- (अक्षरी रक्कम रु. दोन लाख साठ हजार) पर्यंतचे खर्चास मान्यता देण्यात आलेली आहे.

उपरोक्त निर्णयानुसार ११ वाहनांकरीता अपोलो, सीएट, ब्रिजस्टोन व एमआरएफ कंपनीचे नवीन ३३ टायर्स (ट्युब+ फ्लॅपसह) खरेदी करणे कामी परिसरातील खालील तपशिलाप्रमाणे ११ पुरवठाधारकाकडून इकडील जा.नं.एसएसएस/१५७२/२०१६ दि.०२/०७/२०१६ रोजीचे पत्राने दरपत्रके मागविण्यात आली होती. सदर दरपत्रके सादर करण्याची अंतीम दि.०७/०७/२०१६ अखेर होती.

| अ.नं. | टायर पुरवठाधारकांचे नांव | अ.नं. | टायर पुरवठाधारकांचे नांव |
|---|---|---|---|
| ०१ | ओम साई गणेश ट्रेडर्स, साकुरी | ०७ | वाबळे टायर्स, श्रीरामपुर |
| ०२ | सुदर्शन टायर वर्क्स, साकुरी | ०८ | साई वाबळे टायर्स, राहुरी |
| ०३ | नरेंद्र टायर्स, कोपरगांव | ०९ | भनसाळी ट्रॅक्टर, कोपरगांव |
| ०४ | ओम टायर्स, शिर्डी | १० | चंद्रप्रभा टायर, साकुरी |
| ०५ | राम टायर्स, कोपरगांव | ११ | माऊली टायर्स, पळसे |
| ०६ | श्री बालाजी टायर हाऊस, साकुरी | | |

उपरोक्त प्रमाणे ११ पुरवठाधारकांपैकी खालील प्रमाणे अ.नं.०१ ते ०७ पुरवठाधारकांची दरपत्रके मुदतीत तसेच अ.नं. ०८ चे दरपत्रक मुदतीनंतर ०१ दिवस उशिरा म्हणजे दि.०८/०७/२०१६ रोजी अशी एकुण ०८ दरपत्रके प्राप्त झालेली आहेत.

| अ.नं. | टायर पुरवठाधारकांचे नांव | आवक क्र. / दिनांक |
|---|---|---|
| ०१ | श्री बालाजी टायर हाऊस, साकुरी | ५९१४-०४/०७/२०१६ |
| ०२ | वाबळे टायर्स, श्रीरामपुर | ६१३४-०६/०७/२०१६. |
| ०३ | चंद्रप्रभा टायर, साकुरी | ६१४०-०६/०७/२०१६ |
| ०४ | ओम साई गणेश ट्रेडर्स, साकुरी | ६१४१-०६/०७/२०१६ |
| ०५ | माऊली टायर्स, पळसे | ६१६२-०७/०७/२०१६ |
| ०६ | साई वाबळे टायर्स, राहुरी | ६१६३-०७/०७/२०१६ |
| ०७ | ओम टायर्स, शिर्डी | ६१९९-०७/०७/२०१६ |
| ०८ | नरेंद्र टायर्स, कोपरगांव | ६३०१-०८/०७/२०१६ |

उपरोक्तप्रमाणे नवीन टायर्स खरेदी कामी तुलनात्मक दरामध्ये स्पर्धात्मक दर प्राप्त होणे करीता मुदतीत प्राप्त झालेली ०७ दरपत्रके आजचे उपसमिती सभेसमोर, उपस्थित दरपत्रकधारकांसमक्ष उघडणेत येऊन, त्यामधील मुळ दरांचा खालीलप्रमाणे तुलनात्मक तक्ता तयार करणेत आला

| अ.नं. | दरपत्रकधारकांचे नाव | टायर्सची कंपनी | 07:50:16 (18 नग) | 07:00:16 (2 नग) | 08:25:20 (2 नग) | 10:00:20 (6 नग) | 165:80R:14 (5 नग) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | दर प्रती नग रु. | | | | |
| ०१ | श्री बालाजी टायर हाऊस, साकुरी | CEAT | | | | | |
| | | APPOLO | | | | | |
| | | BRIDGESTONE | | | | | |
| | | MRF | ७,१००/- | ६,५००/- | १०,५००/- | १४,२००/- | २,६७५/- (मागणी प्रमाणे नाही) |
| ०२ | वाबळे टायर्स, श्रीरामपुर | CEAT | | | | | |
| | | APPOLO | | | | | |
| | | BRIDGESTONE | | | | | |
| | | MRF | ७,१००/- | ६,५००/- | १०,५००/- | १४,२००/- | |
| ०३ | चंद्रप्रभा टायर, साकुरी | CEAT | ६,८७०/- | ६,१३९/- | ९,८६०/- | १३,८२८/- | |
| | | APPOLO | ६,९००/- | ५,७७५/- | १०,१२०/- | १४,०४५/- | |
| | | BRIDGESTONE | | | | | ३,२००/- |
| | | MRF | | | | | |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ०४ | ओम साई गणेश ट्रेडर्स, साकुरी | CEAT | ६,६९९/- | ६,०४२/- | ९,६९७/- | १३,३९९/- | |
| | | APPOLO | ६,८३४/- | ६,४००/- | ९,९९९/- | १३,९००/- | |
| | | BRIDGESTONE | | | | | **३,१५०/-** |
| | | MRF | | | | | |
| ०५ | माऊली टायर्स, पळसे | CEAT | | | | | |
| | | APPOLO | ६,८५०/- | ६,२००/- | १०,०००/- | १३,५००/- | |
| | | BRIDGESTONE | | | | | |
| | | MRF | | | | | |
| ०६ | साई वाबळे टायर्स, राहुरी | CEAT | | | | | |
| | | APPOLO | | | | | |
| | | BRIDGESTONE | | | | | |
| | | MRF | ६,९५०/- | ६,३५०/- | १०,२५०/- | १३,९००/- | |
| ०७ | ओम टायर्स, शिर्डी | CEAT | ६,६२१/- | ६,०४३/- | ९,५९६/- | १३,११५/- | |
| | | APPOLO | ६,७८५/- | ६,९००/- | ९,९००/- | १४,३००/- | |
| | | BRIDGESTONE | | | | | ३,२५०/- |
| | | MRF | | | | | |

**यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त तुलनात्मक तक्त्यामधील 165:80R:14 साईजचे ५ नग टायर्स हे टुबलेस असून त्यांची एकच कंपनी असल्यामुळे 165:80R:14 साईजचे ५ नग टायर्स खरेदीकामी ओम साई गणेश ट्रेडर्स, साकुरी यांचे प्रती नग रु.३,१५०/- मात्र निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना पुरवठा आदेश देण्यात यावा.**

**तसेच उर्वरित टायर्स खरेदीकामी एकाच नामांकित टायर्स कंपनीचे वेगवेगळया पुरवठाधारकांकडूनदर मागविणेत यावे, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, वाहन विभाग)

---

**१० संस्थान वाहनांचे जुने टायर्स रिमोल्डींग करुन घेणेकामी प्राप्त झालेली दरपत्रके उघडून निर्णय घेणेबाबत.**

दि.०२/०४/२०१६ रोजीचे मा.त्रिसदस्य समितीचे सभेतील निर्णय क्र.२४१ नुसार, संस्थान वाहनांचे टायर्स रिमोल्डींग करुन घेणेसाठी विहीत पध्दतीने ई-निविदा मागणी करणेत यावी असे ठरले तसेच याकामी येणा-या अंदाजे रु.२,९५,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.

उपरोक्त निर्णयानुसार, संस्थान वाहनांचे टायर रिमोल्डींग करुन घेणे कामी दि.०२/०५/२०१६ ते दि.१९/०५/२०१६ अखेर प्रथम ई-निविदा दि.०६/०६/२०१६ ते ११/०६/२०१६ या कालावधीत दुस-यांदा ई-निविदा तसेच दि.१६/०६/२०१६ ते २२/०६/२०१६ या कालावधीत तिस-यांदा ई-निविदा प्रक्रिया राबविण्यात आली होती. तथापि, या कालावधीत एकही निविदा प्राप्त झालेली नाही.

मा.त्रिसदस्यीय समितीचे दि.२३/०६/२०१६ रोजीचे सभेतील निर्णय क्र.४१३ नुसार, संस्थान वाहनांचे वेगवेगळया साईजचे जुने ७३ टायर्स रिमोल्डींग करुन घेणे कामी परिसरातील टायर रिमोल्डींग वर्क्स यांचा ई-निविदा प्रक्रियेस प्रतिसाद मिळत नसलेने सदर टायर्स रिमोल्डींग करुन घेणे कामी परिसरातील टायर रिमोल्डींग वर्क्स यांचेकडून दरपत्रके मागविणेस व याकामी येणा-या अंदाजे रु.२,९५,०००/- पर्यंतचे खर्चास मान्यता देण्यात आली होती.

उपरोक्त निर्णयानुसार, संस्थान वाहनांचे जुने ७३ टायर्स रिमोल्डींग करुन घेणेकामी इकडील जा.नं.एसएसएस/ १५७१ / २०१६ दि.०२/०७/२०१६ रोजीचे पत्राने परिसरातील खालील तपशिलाप्रमाणे ०४ टायर रिमोल्डींग वर्क्स यांचेकडून दरपत्रके मागविण्यात आली होती.

| अ.नं. | टायर रिमोल्डींग वर्क्सचे नांव |
|---|---|
| ०१ | विश्वजीत टायर रिमोल्डींग वर्क्स, श्रीरामपुर |
| ०२ | श्री गणेश टायर्स रिमोल्डींग, कोपरगांव |
| ०३ | त्रिमुर्ती टायर रिमोल्डींग वर्क्स, राहुरी |
| ०४ | सुरेंद्र टायर रिमोल्डींग वर्क्स, साकुरी |

उपरोक्त प्रमाणे ०४ टायर रिमोल्डींग वर्क्स पैकी खालील प्रमाणे ०३ टायर रिमोल्डींग वर्क्सची दरपत्रके मुदतीत प्राप्त झालेली आहेत.

| अ.नं. | टायर पुरवठाधारकांचे नांव | आवक क्र./ दिनांक |
|---|---|---|
| ०१ | श्री गणेश टायर्स रिमोल्डींग, कोपरगांव | ५९८१-०४/०७/२०१६ |
| ०२ | त्रिमुर्ती टायर रिमोल्डींग वर्क्स, राहुरी | ६०८२-०५/०७/२०१६ |
| ०३ | विश्वजीत टायर रिमोल्डींग वर्क्स, श्रीरामपुर | ६०३६-०५/०७/२०१६ |

उपरोक्तप्रमाणे संस्थान वाहनांचे जुने ७३ टायर्स रिमोल्डींग करुन घेणेकामी प्राप्त झालेली एकुण ०३ दरपत्रके आजचे उपसमिती सभेसमोर, उपस्थित दरपत्रकधारकांसमक्ष उघडणेत येऊन, त्यामधील मुळ दरांचा खालीलप्रमाणे तुलनात्मक तक्ता तयार करणेत आला.

| अ.नं. | तपशील | श्री गणेश टायर्स रिमोल्डींग, कोपरगांव | त्रिमुर्ती टायर रिमोल्डींग वर्क्स, राहुरी | विश्वजीत टायर रिमोल्डींग वर्क्स, श्रीरामपुर |
|---|---|---|---|---|
| | | दर प्रती नग रु. | | |
| ०१ | 09:00:20<br>28 नग<br>(Mids कंपनीचे रबर व उभी नक्षी) | ५,०५०/- | ३,९००/- | **<u>३,७००/-</u>** |
| ०२ | 10:00:20<br>12 नग<br>(Mids कंपनीचे रबर व उभी नक्षी) | ५,५५०/- | ४,५००/- | **<u>४,२५०/-</u>** |
| ०३ | 07:50:16<br>27 नग<br>Mids कंपनीचे रबर व उभी नक्षी | ३,२५०/- | २,७००/- | **<u>२,५००/-</u>** |
| ०४ | 08:25:16<br>4 नग<br>Mids कंपनीचे रबर व आडवी नक्षी | ४,०५०/- | ३,३००/- | **<u>२,७००/-</u>** |
| ०५ | 14:09:28<br>2 नग<br>Teeson कंपनीचे रबर | ११,०००/- | १०,०००/- | **<u>९,७५०/-</u>** |

**यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे संस्थान वाहनांचे जुने ७३ टायर्स रिमोल्डींग करुन घेणेकामी विश्वजीत टायर रिमोल्डींग वर्क्स, श्रीरामपुर यांचे उपरोक्त तुलनात्मक तक्त्यामधील गडद व अधोरेखीत केलेले निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, वाहन विभाग)

---

**११ संस्थान वाहनांचे वापरुन खराब झालेले टायर्स व टयुब उच्चतम दराने विक्री करणेकामी प्राप्त झालेली दरपत्रके उघडून निर्णय घेणेबाबत.**

वाहन विभागाकडील दि.१३/०६/२०१६ रोजीचे मंजुर टिपणीनुसार, वाहन विभागाकडील विविध वाहनांकरीता नवीन टायर्स टाकले नंतर वापरलेले जुने खराब झालेले टायर्स व ट्युब उच्चतम दराने विक्री करणे कामी व्यापा-याकडून दरपत्रके मागविणेस मान्यता देण्यात आली होती.

सदर मान्यतेनुसार, जा.नं.एसएसएस/वाहन/१४८९/२०१६ दि.२९/०६/२०१६ ने खालीलप्रमाणे ०५ व्यापा-याकडून दि.०८/०७/२०१६ अखेर दरपत्रके मागविण्यात आलेली होती.

1) श्री अकबरखॉ सांडेखॉ पठाण, कोपरगांव
2) न्यु इंडिया स्क्रॅप सेंटर,कोपरगांव
3) ओम साई गणेश ऑईल ॲन्ड टायर्स, शिर्डी
4) एस.आय. टायर्स & ट्युबस सेल्स, कोपरगांव
5) ओम टायर्स, शिर्डी

उपरोक्त ०५ व्यापा-यापैकी खालील प्रमाणे ०४ दरपत्रके मुदतीत प्राप्त झालेली आहेत.

| अ.नं. | व्यापा-यांचे नांव, गांव | आवक क्र../ दिनांक |
|---|---|---|
| ०१ | न्यु इंडिया स्क्रॅप सेंटर,कोपरगांव | ६११६-०६/०७/२०१६ |
| ०२ | अकबरखॉ सांडेखॉ पठाण, कोपरगांव | ६१९८-०७/०७/२०१६ |
| ०३ | ओम टायर्स, शिर्डी-साकुरी शिव | ६२८६-०८/०७/२०१६ |
| ०४ | एस.आय. टायर्स, कोपरगांव | ६२८०-०८/०७/२०१६ |

उपरोक्तप्रमाणे संस्थान वाहनाचे जुने खराब झालेले टायर्स व ट्युब उच्चतम दराने विक्री करणेकामी मुदतीत प्राप्त झालेली ०४ दरपत्रके आजचे उपसमिती सभेसमोर, उपस्थित दरपत्रकधारकांसमक्ष उघडणेत येऊन, त्यामधील मुळ दरांचा खालीलप्रमाणे तुलनात्मक तक्ता तयार करणेत आला

| अ.नं. | व्यापा-यांचे नांव, गांव | दरपत्रकामधील एकूण मुळ दर रु. |
|---|---|---|
| ०१ | न्यु इंडिया स्क्रॅप सेंटर,कोपरगांव | १५,७८६/- |
| ०२ | अकबरखॉ सांडेखॉ पठाण, कोपरगांव | **२५,५९०/-** |
| ०३ | ओम टायर्स, शिर्डी-साकुरी शिव | १७,१००/- |
| ०४ | एस.आय. टायर्स, कोपरगांव | ११,०००/- |

**यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे संस्थान वाहनांचे वापरुन खराब झालेले टायर्स व टयुब विक्री करणेकामी अकबरखॉ सांडेखॉ पठाण, कोपरगांव यांचे रु.२५,५९०/- मात्र उच्चतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, वाहन विभाग)

---

१२ **श्री साईसच्चरित- मराठी ग्रंथ छपाईकामी मागविण्यात आलेल्या सिलबंद प्राप्त दरपत्रके उघडणे व निम्नतम निविदाधारकास कार्यादेश देणेबाबत.**

**अधिनियम तरतुद-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम २००४ कलम नं. ठ. मध्ये खालील तरतुद आहे.

"श्री साईबाबांचे जीवन त्यांचे कार्य, त्यांच्या लीला व त्यांची शिकवण याबाबतच्या उपयुक्त माहितीचा प्रचार-प्रसार करील आणि साहित्य ग्रंथालय चालवील व त्याचा विस्तार करील"

**प्रस्तावः-** मा.व्यवस्थापन समिती सभा दि.२३.०६.२०१६ निर्णय क्र.४१६ अन्वये श्री साईसच्चरित मराठी ग्रंथ छपाईकामी रुपये.२,७५,०००/- खर्चास मान्यता मिळालेली आहे.

प्रकाशने विभाग दि०१.०७.२०१६ चा मंजूर प्रस्तावानुसार संस्थान प्रकाशित श्री साईसच्चरित- मराठी ग्रंथ साठा अल्पशा प्रमाणात शिल्लक आहे. श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी व ग्रामस्थ यांचे संयुक्त विघमाने सालाबादाप्रमाणे श्रावण मासात महापाराण सोहळा आयोजित करण्यात येतो यासाठी श्री साईभक्तांना विक्रीकरणे कामी तात्पुरत्या स्वरुपात अल्पशा प्रमाणात तातडीची खरेदी म्हणून २५०० नग छपाईकामी इकडील कार्यालय जा.नं./एसएसएस/वशी/ प्रकाशने/ १६०५/२०१६ दि.०५.०७.२०१६ नुसार शिर्डी परिसरातील प्रेसधारकांकडून दरपत्रकांची मागणी केली होती दि.११.०७.२०१६ अखेर सिलबंद दरपत्रके मागविण्यात आलेले आहे, प्राप्त ०४ सिलबंद दरपत्रकांचा तपशिल खालील प्रमाणे

| अं.नं. | सिलबंद दरपत्रकांचा तपशिल | आवक क्र. |
|---|---|---|
| ०१ | लोमेश्वर प्रिंटिंग प्रेस, लोणी | ६२४१/ दि. ०८.०७.२०१६ |
| ०२ | लक्ष्मी प्रिंटर्स, कोल्हार | ६२४२/ दि. ०८.०७.२०१६ |
| ०३ | प्रवरा प्रिंट हाऊस, लोणी | ६२४३/ दि. ०८.०७.२०१६ |
| ०४ | प्रवरा ऑफसेट, लोणी | ६२६२/ दि. ०८.०७.२०१६ |

श्री साईसच्चरित-मराठी ग्रंथ छपाईकामी मा.व्यवस्थापन समिती निर्णयानुसार मागविण्यात आलेल्या सिलबंद प्राप्त निविदा आजचे उपसमिती सभेसमोर उघडणेत येऊन, त्यामधील मुळ दरांचा खालीलप्रमाणे तुलनात्मक तक्ता तयार करणेत आला.

| अं.नं. | निविदाधारकाचे नाव | निविदेमधील मुळ दर प्रती नग रु. |
|---|---|---|
| ०१ | लोमेश्वर प्रिंटिंग प्रेस, लोणी | ११७/- |
| ०२ | लक्ष्मी प्रिंटर्स, कोल्हार | ११५/- |
| ०३ | प्रवरा प्रिंट हाऊस, लोणी | ११४/- |
| ०४ | प्रवरा ऑफसेट, लोणी | **१०९.८०** |

**यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे २५०० नग श्री साईसच्चरित- मराठी ग्रंथ छपाई करुन घेणेकामी प्रवरा ऑफसेट, लोणी यांचे प्रती नग रु.१०९.८० मात्र निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना छपाई कामाचा कार्यादेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, प्रकाशने विभाग)

---

**विषय नं.०३** **दिनांक २७.०७.२०१६ रोजी शिर्डी येथे झालेल्या उपसमिती सभेने केलेल्या शिफारशींना पुष्टी देणेबाबत.**

**निर्णय क्र.५८४** दिनांक २७.०७.२०१६ रोजी शिर्डी येथे झालेल्या उपसमिती सभेच्या इतिवृत्ताच्या प्रती सर्व मा.सदस्यांना सभेत पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात येऊन, या इतिवृत्तातील खालील शिफारशींना पुष्टी देण्यात आली.

**०१** **श्रावण महिन्यातील श्री साईसच्चरीत पारायण सोहळा- 2016 कार्यक्रमासाठी मंडप व इतर अनुषंगीक व्यवस्था करणेकामी प्राप्त ई-निविदा Commercial Bid उघडणेबाबत.**

**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम,२००४ मधिल तरतूदः-**

अधिनियमाच्या कलम १७ मधील पोट – कलम (२) च्या खंड (ठ) अन्वये श्री साईबाबांचे जीवन, त्यांचे कार्य, त्यांच्या लिला व त्यांची शिकवण याबाबतच्या उपयुक्त माहितीचा प्रचार व प्रसार करील आणि श्री साहित्य ग्रंथालय चालवील व त्याचा विस्तार करील या प्रयोजनासाठी विश्वस्तव्यवस्थेचा निधी समितीकडून खर्च करण्याची तरतूद आहे.

**मा.व्यवस्थापन त्रिसदस्य समितीचा निर्णय:-** दि.१४/०७/२०१६ रोजीचे मा.त्रिसदस्य समितीचे सभेतील निर्णय क्र.४३६ खालील प्रमाणे संमत झालेला आहे.

"श्री साई सच्चरित पारायण सोहळा -२०१६ साजरा करणेकरीता पारायणार्थीच्या सोयीसाठी मंडप व इतर अनुषंगीक व्यवस्था करणेकामी विहीत पध्दतीने ई- निविदा मागविणेस व याकामी येणारे अंदाजे रु.३,८३,१८५/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली"

**प्रस्तावना**: श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी तर्फे सालाबाद प्रमाणे याही वर्षी श्रावणमास निमित्त बुधवार दि.०३/०८/२०१६ ते गुरुवार दि.११/०८/२०१६ या कालावधीत श्री साईसच्चरीत पारायण सोहळा आयोजित केलेला आहे. सदरचे कार्यक्रमाकरीता मंडप, कमानी, स्टेज व इतर अनुषंगीक व्यवस्था करावी लागेल. त्यानुसार सदरहू कार्यक्रमासाठी मंदिर परिसराचे पूर्वेकडील मोकळया जागेत इकडील विभागामार्फत एम.एस. कॉलम व कैच्या वापरुन ताडपत्रीचे छत असलेला डोम टाईप मंडप, पार्टीशन, स्टेज, स्वागत कमानी, मॅटींन, मेकअप रुम, बॅरेकेडींग, कनात इ. व्यवस्था करणेकामी उपरोक्त निर्णयानुसार वर्तमानपत्रात व संस्थानचे संकेत स्थळावर निविदा सुचना प्रसिध्द करण्यात आल्या होत्या. ई- निविदा सुचनेनुसार निविदा पूर्व बैठक दि.१८/०७/२०१६ रोजी सकाळी ११.०० वाजता आयोजित केली होती, परंतू सदर बैठकीस एकही ठेकेदार उपस्थीत राहीले नाहीत. विषयांकीत कामासाठी प्राप्त झालेल्या ई- निविदांमधील टेक्नीकल बीड दि.२५/०७/२०१६ रोजी उघण्यात आले आहेत. त्यावेळी खालीलप्रमाणे उपस्थिती होती.

| अ.नं | नांव | पदनाम |
|---|---|---|
| १ | श्री. डी. टी. उगले | प्रशासकीय अधिकारी |
| २ | श्री. यु.पी. गोंदकर | प्रशासकीय अधिकारी |
| ३ | श्री. ए. आर. औटी | प्रशासकीय अधिकारी |
| ४ | श्री. आर. बी. आहेर | उप कार्यकारी अभियंता |
| ५ | श्री. डी. एम. देसाई | उप अभियंता |
| ६ | श्री. एम.पी. गव्हाणे | कनिष्ठ अभियंता |
| ७ | श्री. एस.सी. गायकवाड | प्र.अधिक्षक, अंतर्गत लेखापरिक्षण, लेखाशाखा |
| ८ | श्री. आर.एस. साबळे | ज्यु. ई डी पी विभाग, प्रतिनिधी |
| ९ | श्री. जी.एम. सुर्वे | ज्यु. ई डी पी विभाग, प्रतिनिधी |

उघडण्यात आलेल्या ई – निविदांचे टेक्नीकल बीडमधील ठेकेदार यांनी सादर केलेल्या कागदपत्रांचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ. नं. | ठेकेदाराचे नांव | कागदपत्रांचा तपशिल | | | | | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | बयाना रक्कमेचा डी.डी व को-या निविदेची किंमत | पॅन कार्डची छायांकीत प्रत | सर्व्हीस टॅक्स रजिस्ट्रेशन | रु.१००/- मात्रचे मुद्रांकावर हमीपत्र. | मंडप उभारणीच्या उलब्ध साहित्याचा तपशिल | |
| १ | न्यु रोशनी मंडप ॲण्ड लाईट डेकोरेटर्स, संक्रापूर ता. राहूरी | State Bank of H.bad Dt.19/07/2016 D.D. No.503746 Rs.500/- State Bank of H.bad Dt.19/07/2016 D.D. No.503747 Rs.3,800/- | जोडली आहे | जोडले आहे | जोडले आहे. | जोडला आहे. | पात्र |
| २ | तन्मय सप्लायर्स, औरंगाबाद | State Bank of H.bad Dt.19/07/2016 D.D. No.661314 Rs.500/- State Bank of H.bad Dt.19/07/2016 D.D. No.661313 Rs.3,800/- | जोडली आहे | जोडले आहे | जोडले आहे. | जोडला आहे. | अपात्र |
| ३ | विजय मंडप साउंड सर्व्हिस, औरंगाबाद | State Bank of H.bad Dt.16/07/2016 D.D. No.661282 Rs.500/- State Bank of H.bad Dt.16/07/2016 D.D. No.161284 Rs.3,800/- | जोडली आहे | जोडले आहे | जोडले आहे. | जोडला आहे. | पात्र |
| ४ | ऋतुजा मंडप डेकोरेटर्स, औरंगाबाद | State Bank of H.bad Dt.16/07/2016 D.D. No.661281 Rs.500/- State Bank of H.bad Dt.16/07/2016 D.D. No.661283 Rs.3,800/- | जोडली आहे | जोडले आहे | जोडले आहे. | जोडला आहे. | पात्र |
| ५ | कलासाधना, नाशिक | Central Bank of India Dt.19/07/2016 D.D. No.009428 Rs.500/- Central Bank of India Dt.19/07/2016 D.D. No.009427 Rs.3,800/- | जोडली आहे | जोडले आहे | जोडले आहे. | जोडला आहे. | पात्र |
| ६ | जाधव मंडप डेकोरेटर्स, औरंगाबाद | State Bank of India Dt.20/07/2016 D.D. No.594618 Rs.500/- State Bank of India Dt.20/07/2016 D.D. No.594647 Rs.3,800/- | जोडली आहे | जोडले आहे | जोडले आहे. | जोडला आहे. | पात्र |

वरील प्रमाणे अ.नं.१ ते ६ चे ठेकेदार यांनी सादर केलेले तांत्रिक लिफाफ्यामधील कागदपत्रांची छाननी केली असता, अ.नं.२ ठेकेदार यांनी फक्त हार्डकॉपी सादर केलेली असून, ई – निविदा अपलोड केलेली नसल्याने ते अपात्र आहे. उर्वरीत अ. १ व ३ ते ६ चे ठेकेदार तांत्रिक दृष्ट्या पात्र असल्याचे आढळून आले.

तरी श्रावण महिन्यातील श्री साई सच्चरित पारायण सोहळा मंडप -२०१६ कार्यक्रमासाठी मंडप व इतर अनुषंगीक व्यवस्था करणेकामी उपरोक्त पात्र ठेकेदारांचे कमर्शियल बीड आजचे उपसमिती सभेसमोर, उपस्थित निविदाधारकासमक्ष उघडणेत येऊन, त्यामधील मुळ दरांचा खालीलप्रमाणे तुलनात्मक तक्ता तयार करणेत आला.

| अ.नं. | निविदाधारकाचे नाव | निविदेमधील मूळ दर रु. |
|---|---|---|
| १ | जाधव मंडप डेकोरेटर्स, औरंगाबाद | ४,३२,४००/- |
| २ | न्यु रोशनी मंडप ॲण्ड लाईट डेकोरेटर्स, संक्रापूर ता. राहूरी | ३,७५,७९५/- |
| ३ | ऋतुजा मंडप डेकोरेटर्स, औरंगाबाद | **३,६८,९५०/-** |
| ४ | कलासाधना, नाशिक | ६,७०,८६०/- |
| ५ | विजय मंडप साउंड सर्व्हिस, औरंगाबाद | ४,०८,७५०/- |

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्रावण महिन्यातील श्री साईसच्चरीत पारायण सोहळा- 2016 कार्यक्रमासाठी प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे मंडप व्यवस्था करणेकामी ऋतुजा मंडप डेकोरेटर्स, औरंगाबाद यांचे रु.३,६८,९५०/- मात्र निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा, तसेच या कालावधीमध्ये इतर वाढीव अनुषंगीक व्यवस्था करावयाची झाल्यास याच मंजुर दराने करणेत यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

०२ **श्री साईनाथ रुग्णालयातील एम.एस.खिडक्यांऐवजी ॲल्युमिनिअम स्लायडींग विडों बसविणे कामासाठी पात्र झालेल्या ठेकेदारांच्या ई-निविदेचा लिफाफा क्र.०२ (Commerical Bid) उघडून त्यावर निर्णय होणेबाबत.**

**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम** २००४ **मधील तरतुद:** अधिनियम कलम २१ (१) अन्वये समितीकडून विश्वस्तव्यवस्था निधीचा विनियोग पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही प्रयोजनांसाठी करणेबाबत तरतुद आहे. त्यातील पोटकलम (क) अन्वये मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन या प्रयोजनांसाठी करण्यात येईल अशी तरतुद आहे.

**मा. त्रीसदस्य समितीचे सभेतील निर्णय:**

१. मा. त्रिसदस्य समितीचे दि. १५/०३/२०१४ रोजीचे सभेत नि. क्र.१९१ खालील प्रमाणे संमत करणेत आलेला आहे.

".. यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईनाथ रुग्णालयातील एम. एस. खिडक्यांऐवजी ॲल्युमिनियम स्लायडींग विंडो बसविणेसाठी विहीत पध्दतीने निविदा मागविणेस व याकामी येणा-या अंदाजे रु.२०,८३,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली. तसेच, याकामी येणा-या खर्चास संस्थान वकिलामार्फत अर्ज सादर करणेत येऊन, मा. मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेण्यात यावी, असे ठरले."

२. मा. त्रिसदस्य समितीचे दि. २४/०६/२०१५ रोजीचे सभेत नि. क्र.१७६ खालील प्रमाणे संमत करणेत आलेला आहे.

"..यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईनाथ रुग्णालयातील एम. एस. खिडक्यांऐवजी ॲल्युमिनियम स्लायडींग विंडो बसविणेसाठी प्रस्तावात नमूद केलेल्या ई-निविदा प्रक्रीयेचे अवलोकन करणेत आले तसेच याकामी C.A. No. 8699 of 2014 In P.I.L. NO. 18 of 2011 dt. 26/09/2014 अन्वये मान्यता मिळालेली असल्याने प्रस्तावीत कामी मगबुल बादशाह शेख अहमदनगर यांचे रु.१६५४५२७/- मात्र हे निम्नतम दर स्विकारणेत येवून त्यांना कार्यादेश देण्यात यावा असे ठरले."

३. मा. त्रिसदस्य समितीचे दि. २८/१२/२०१५ रोजीचे सभेत नि. क्र.६४९ खालील प्रमाणे संमत करणेत आलेला आहे.

".. उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईनाथ रुग्णालयातील एम. एस. खिडक्यांऐवजी ॲल्युमिनियम स्लायडींग विंडो बसविणेकामी विहीत पध्दतीने फेरनिविदा मागविणेत याव्यात, असे ठरले."

**मा. मुंबई उच्च न्यायालय खंडपीठ परवानगी आदेश. :** C.A. No. 8699 of 2014 In P.I.L. NO. 18 of 2011 dt. 26/09/2014 अन्वये परवानगी मिळालेली आहे.

**प्रस्तावना:** श्री साईनाथ रुग्णालय इमारतीस असलेल्या खिडक्यांपैकी ९२ नग खिडक्याना ॲल्युमिनिअम स्लायडींग विंडो बसविण्यात आलेले असून, उर्वरीत २९२ खिडक्या ह्या काचेचे शटर असलेल्या एम. एस. ओपनेबल आहे. सदरचे खिडक्यांमधून डासांचा प्रादुर्भाव होत असल्याने रुग्णालय इमारतीच्या उर्वरीत सर्व खिडक्या ॲल्युमिनिअम स्लायडींग बसविणेकामी मा. मा. त्रिसदस्य समितीचे दि. २४/०६/२०१५ रोजीचे सभेत नि. क्र.१७६ अन्वये ठरल्यानुसार ठेकेदार मे.एम. बी. शेख, अहमदनगर यांना जा.क्र.३४२७/२०१५ दि. १६/०९/२०१५ अन्वये रु.१६,५४,५२७/- मात्र रकमेचा कार्यादेश देणेत आला होता.

विषयांकीत कामाचे निविदेमध्ये सार्वजनिक बांधकाम विभागाचे अहमदनगर जिल्हा दरसूची २०१३-१४ मधील स्पेसिफीकेशननुसार थ्री ट्रॅक ॲल्युमिनीअम खिडक्या तयार करुन बसविणे व याकामी ॲल्युमिनियम मटेरिअल जिंदाल अथवा समकक्ष कंपनीचे व काच मोदीफ्लोट/ सेंट गोबेन अथवा समकक्ष कंपनीची वापरणेची तरतुद होती.

ठेकेदार मे.एम. बी. शेख, अहमदनगर यांनी त्यांचेकडील दि.०२/११/२०१५ व दि.१८/११/२०१५ रोजीचे पत्राने जिंदाल कंपनीचे मटेरिअल उत्पादनाचे वजन व माप कमी अधिक प्रमाणात आढळून आले असल्याचे कळवून निविदेतील सेक्शनचे वजनापेक्षा जादा वजनाचे ॲल्युमिनीअम सेक्शन वापरुन काम करणेस व सदर कामासाठी लागणारे मटेरियल मार्केटमध्ये उपलब्ध नसल्याने काम पूर्ण करण्यासाठी दोन महिने मुदतवाढ मिळणेबाबत विनंती केली होती. सदरचे प्रस्तावावर मा. त्रिसदस्य समितीचे दि. २८/१२/२०१५ रोजीचे सभेत नि. क्र.६४९ खालील प्रमाणे संमत करणेत आलेला आहे.

".. उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईनाथ रुग्णालयातील एम. एस. खिडक्यांऐवजी ॲल्युमिनियम स्लायडींग विंडो बसविणेकामी विहीत पध्दतीने फेरनिविदा मागविणेत याव्यात, असे ठरले."

**प्रस्ताव:** उपरोक्त निर्णयानुसार सदरहू कामी ई-निविदा सूचना वर्तमानपत्रात तसेच संस्थानचे संकेतस्थळावर प्रसिध्द करुन दि.३१/०३/२०१६ पर्यंत ई-निविदा अपलोड करणेची मुदत देणेत आली होती. सदरचे विहीत मुदतीत एकुण ०७ ठेकेदार ई-निविदा अपलोड केल्याचे आढळून आले. सदरहू ई-निविदेचा तांत्रीक माहितीचा लिफाफा क्र. ०१ (Technical Bid) दि.२२/०३/२०१६ रोजी खालील उपस्थित उघडणेत आलेला आहे.

| अनं. | नांव | पदनाम |
|---|---|---|
| १ | श्री.यु. पी. गोंदकर | प्रशासकीय अधिकारी |
| २ | श्री. डी. टी. उगले | प्रशासकीय अधिकारी |
| ३ | श्री. अे. आर. औटी | प्र. प्रशासकिय अधिकारी |
| ४ | श्री. डी. झिरपे | मुख्यलेखाधिकारी |
| ५ | श्री. आर. बी. आहेर | उपकार्यकारी अभियंता (बांधकाम) |
| ६ | श्री. डी. एम. देसाई | उप अभियंता |
| ७ | श्री. जी. एस. जाधव | कनिष्ठ अभियंता |
| ८ | श्री .व्हि. कोते | ज्यु. ई. डी. पी. मॅनेजर |

उघडण्यात आलेल्या ई-निविदांचे लिफाफा क्र.०१ (Technical Bid) मधील ठेकेदार यांनी सादर केलेल्या कागदपत्रांचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ. नं. | ठेकेदाराचे नांव | कागदपत्रांचा तपशिल | | | | | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | **कोऱ्या निविदेची किंमत व बयाना रक्कमेचा डीडी.** | **मागील तीन वर्षात बांधकाम क्षेत्रात केलेल्या कामाचे दाखला** | **सार्वजनिक बांधकाम विभाग व इतर शासकिय विभागाकडे नोंद केल्याचे प्रमाणपत्र.** | **पी. एफ. विभाग नोंदणी प्रमाणपत्र** | **काळ्या यादीत नांव नसलेबाबतचे हमीपत्र** | |
| १. | ओम शिव कन्स्ट्रक्शन, धुळे | जोडले आहे. | जोडले आहे. | जोडले आहे. | जोडले आहे. | जोडले आहे. | पात्र |
| २. | एम. बी. शेख, अहमदनगर | जोडले आहे. | जोडले आहे. | जोडले आहे. | जोडले आहे. | जोडले आहे. | पात्र |
| ३. | गायत्री कन्स्ट्रक्शन, धुळे | जोडले आहे. | जोडले आहे. | जोडले आहे. | जोडले आहे. | जोडले आहे. | पात्र |
| ४. | ॲल्युमिना कन्सेप्ट, नाशिक | जोडले आहे. | जोडले आहे. | जोडले आहे. | जोडले आहे. | जोडले आहे. | पात्र |
| ५. | श्री.एस. जी. गायकवाड, राहाता | जोडले आहे. | नाही. | जोडले आहे. | जोडले आहे. | जोडले आहे. | अपात्र |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ६. | श्री. बी. पी. शिंदे, पढेगांव | जोडले आहे. | नाही. | जोडले आहे. | जोडले आहे. | जोडले आहे. | अपात्र |
| ७. | योगश पांगरकर, पांगरी | जोडले आहे. | जोडले आहे. | जोडले आहे. | नाही. | जोडले आहे. | अपात्र |

विषयांकीत कामासाठी ई-निविदा मागवून प्राप्त झालेल्या ई-निविदा मधील उपरोक्त अ. नं. ०१ ते ०४ चे पात्र ठेकेदार यांचे लिफाफा क्र.०२ (Commercial Bid) आजचे उपसमिती सभेसमोर, उपस्थित निविदाधारकासमक्ष उघडणेत येऊन, त्यामधील मुळ दरांचा खालीलप्रमाणे तुलनात्मक तक्ता तयार करणेत आला.

| अ.नं. | निविदाधारकाचे नाव | निविदेमधील मूळ दर रु. |
|---|---|---|
| १ | ओम शिव कन्स्ट्रक्शन, धुळे | १८,१२,२१०.०७ |
| २ | अॅल्युमिना कन्सेप्ट, नाशिक | **१६,६६,४००.०६** |
| ३ | एम. बी. शेख, अहमदनगर | १७,३८,६८०.१७ |
| ४ | गायत्री कन्स्ट्रक्शन, धुळे | १८,७४,९०८.३७ |

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईनाथ रुग्णालयातील एम.एस.खिडक्यांऐवजी अॅल्युमिनिअम स्लायडींग विडों बसविणेकामी अॅल्युमिना कन्सेप्ट, नाशिक यांचे रु.१६,६६,४००.०६ मात्र निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

०३ **संस्थानचे कॅन्टीन विभागाकरीता चहा पावडर, कॉफी खरेदीकामी ऑनलाईन प्राप्त ई-निविदेतील Commercial Bid उघडणेबाबत.**

संस्थानचे कॅन्टीन विभागाकरीता चहा पावडर, कॉफी व बिस्किटे खरेदीकामी **दुस-यांदा** महाराष्ट्र शासनाचे अधिकृत संकेत स्थळावर दि.२३.०६.२०१६ ते दि.०५.०७.२०१६ या कालावधीत ई-निविदा प्रक्रिया राबविणेत आलेली आहे. तांत्रीक निविदा व नमुने (Technical Bid) स्विकारणेचा कालावधी दि.०६.०७.२०१६ ते दि.०७.०७.२०१६ असा ठेवण्यात आलेला होता. सदर ई-निविदा चहा कॉफी व बिस्किटासाठी राबविण्यात आली होती. यामध्ये चहा व कॉफीसाठी स्वतंत्र BOQ व बिस्किटासाठी स्वतंत्र BOQ तयार करण्यात आली होती. मात्र तांत्रीक कागदपत्रे एकच ठेवण्यात आलेले आहेत.

सदर ई-निविदेमध्ये स्वतंत्र BOQ ठेवण्यात आल्यामुळे बिस्किटासाठी दोनच निविदा प्राप्त झालेल्या होत्या, त्यामुळे (दहा दिवसांची) दि.१२.०७.२०१६ पर्यंत मुदतवाढ देण्यात येऊन, चहा पावडर व कॉफी खरेदीकामी प्राप्त Technical Bid दि. ०९.०७.२०१६ रोजी दुपारी १२.०० वाजता उघडण्यात आलेले आहेत. यामध्ये खालीलप्रमाणे चार निविदाधारकांच्या निविदा प्राप्त झालेल्या आहेत.

१. मे.भाऊराम जोधराम, गुवाहाटी
२. मे.इंडिया सेल्स कार्पोरेशन, पुणे
३. मे.स्टॅंडर्ड एंटरप्रायझेस, अहमदनगर
४. मे.सोलंकी टी कंपनी, मुंबई

वरील चारही निविदा तांत्रीकदृष्टया पात्र ठरलेल्या आहेत. यामध्ये अ.नं. १ व ४ यांनी चहा पावडरचे नमुने दिलेले आहेत, अ.नं.२ आणि ३ यांनी चहा पावडर व कॉफी असे दोन्हीही नमुने दिलेले आहेत. तथापि चहा पावडर व कॉफीचे BOQ एकत्र असल्यामुळे या ई-निविदा उघडाव्या लागतील.

चहा पावडर व कॉफी खरेदीकामी प्राप्त ई-निविदेतील निविदाधारकांचे Commercial Bid आजचे उपसमिती सभेसमोर, उपस्थित निविदाधारकासमक्ष उघडणेत येऊन, त्यामधील मुळ दरांचा खालीलप्रमाणे तुलनात्मक तक्ता तयार करणेत आला.

| **अ.नं.** | **तपशील** | मे.इंडिया सेल्स कार्पोरेशन, पुणे | मे.भाऊराम जोधराम, गुवाहाटी (प्राईम इंडिया इन्शुरन्स ब्रोकर्स, प्रा.लि.) | मे.सोलंकी टी कंपनी, मुंबई | मे.स्टॅंडर्ड एंटरप्रायझेस, अहमदनगर |
|---|---|---|---|---|---|
| | | **दर एकत्रित रु.** | | | |
| १ | चहा पावडर १६० क्विंटल | **२३,८४,०००/-** | २४,१६,०००/- | २५,६०,०००/- | २६,५६,०००/- |
| २ | फिल्टर कॉफी १५ क्विंटल | ८,२५,०००/- | --- | --- | **४,६९,४८५/-** |

**यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानचे कॅन्टीन विभागाकरीता १६० क्विंटल चहा पावडर खरेदी करणेकामी मे.इंडिया सेल्स कार्पोरेशन, पुणे यांचे रु.२३,८४,०००/- मात्र निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना पुरवठा आदेश देण्यात यावा. तसेच कॉफी खरेदीकामी महाराष्ट्र शासनाचे खरेदी नियमावलीनुसार एकदा मुदतवाढ देऊनही दोनच ई-निविदा प्राप्त झालेल्या असल्यामुळे १५ क्विंटल कॉफी खरेदीकामी उपरोक्त तुलनात्मक तक्त्यामधील मे.स्टॅंडर्ड एंटरप्रायझेस, अहमदनगर यांचे रु.४,६९,४८५/- मात्र निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना पुरवठा आदेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, खरेदी विभाग)

---

०४ **विद्युत, मेकॅनिकल व टेलिफोन विभागाचे वार्षिक साहित्य खरेदीकामी प्राप्त ई-निविदेतील व्यापारी निविदा Commercial Bid उघडणेबाबत.**

विद्युत विभागास आवश्यक वार्षिक साहित्य खरेदी करणेस व त्याकामी येणाऱ्या रक्कम रु.१,९२,३९,२०५/- (अक्षरी रु. एक कोटी, ब्याण्णव लाख, एकोणचाळीस हजार, दोनशे पाच) मात्रचे खर्चास मा.त्रिसदस्य समितीचे दि.१५.०३.२०१४ रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक २२५ नुसार मान्यता मिळालेली आहे. तसेच मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ, औरंगाबाद यांचीही मान्यता (सिव्हिल ॲप्ली नं..८६८६) दि.२६.०९.२०१४ रोजी मिळालेली होती.

सदरची खरेदीकामी दुस-यांदा ई-निविदा प्रक्रिया राबविण्यात आलेली होती. सदर ई-निविदा प्रक्रियेमध्ये एकूण ४८५ पैकी ३२३ साहित्यासाठी मा.व्यवस्थापन समितीचे दि.१०.११.२०१५ रोजीचे सभेतील निर्णय क्रं.४९६ अन्वये पुरवठा आदेश देण्यात आलेले होते.

उर्वरीत १६२ साहित्यासाठी महाराष्ट्र सरकारच्या संकेत स्थळावर दि.१५.०६.२०१६ ते २५.०६.२०१६ या कालावधीत ई-निविदा राबविण्यात आलेली होती.

याकामी ऑनलाईन प्राप्त तीन निविदाधारकांच्या निविदा प्राप्त झालेल्या होत्या. त्यांचा तपशिल खालीलप्रमाणे –

१. मे. एक्सल ट्रेडींग कंपनी, मुंबई
२. मे. इंटरनॅशनल इलेक्ट्रीकल्स, अहमदनगर
३. मे. युनियन ट्रेडींग, नाशिक

उपरोक्त प्राप्त तीन निविदाधारकांच्या निविदा दि.३०.०६.२०१६ रोजीचे मा.खरेदी समितीचे सभेत उघडण्यात येऊन कागदपत्रांची छाननी केली असता तीनही निविदाधारकांच्या निविदा तांत्रिकदृष्ट्या पात्र ठरलेल्या आहेत.

**सदर पात्र तीनही निविदाधारकांच्या तिसऱ्यांदा प्राप्त झालेल्या व्यापारी निविदा (Commercial Bid) आजचे उपसमिती सभेसमोर, उपस्थित निविदाधारकासमक्ष उघडणेत येऊन त्यामधील मुळ दरांचा तुलनात्मक तक्ता परिशिष्ट म्हणून सोबत सादर करण्यात आला.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, विद्युत, मेकॅनिकल व टेलिफोन विभागाचे वार्षिक साहित्य खरेदीकामी सोबत परिशिष्ट म्हणून सादर करण्यात आलेल्या तुलनात्मक तक्त्यामधील गडद व अधोरेखीत केलेले निम्नतम दर स्विकारणेत येऊन, संबंधीतांना पुरवठा आदेश देण्यात यावा तसेच ज्या साहित्यासाठी दर प्राप्त झालेले नाहीत, अशा साहित्यासाठी नव्याने निविदा प्रक्रिया राबविण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, खरेदी विभाग)

---

०५ **आरोग्य विभागाकरीता आवश्यक हॅन्डग्लोज व गमबुट खरेदीकामी प्राप्त मुळ निविदा (Commercial Bid) उघडणेबाबत.**

आरोग्य विभागाकरीता आवश्यक चांगल्या प्रतीचे हॅन्डग्लोज व आय.एस.आय. मानांकन गमबुटस् खरेदी करणेसाठी विहीत पध्दतीने ई-निविदा मागविणेस व त्याकामी येणाऱ्या रक्कम रु.५,२२,६००/- (अक्षरी रु. पाच लाख बाविस हजार सहाशे) मात्रचे खर्चास मा.त्रिसदस्य समितीचे दि.१६.०२.२०१६ रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक १२६ नुसार मान्यता मिळालेली होती.

त्यास अनुसरुन सदर खरेदीकामी महाराष्ट्र शासनाचे अधिकृत संकेत स्थळावर दि.२७.०४.२०१६ ते दि.०७.०५.२०१६ या कालावधीत ई-निविदा प्रक्रिया राबविणेत आलेली होती.

याकामी ऑनलाईन सहा निविदा प्राप्त झालेल्या होत्या. त्यांचा तपशिल खालीलप्रमाणेः-

१. मे. मगनलाल देवशंकर, नाशिक
२. मे. क्विक सप्लायर्स, नाशिक
३. मे. नवकेतन मार्केटींग, श्रीरामपूर
४. मे. एम.बी.ट्रेडींग कंपनी, नाशिक
५. मे. हितू जितू एंटरप्रायझेस, मुंबई
६. मे. श्री.लक्ष्मी चव्हाण एजन्सीज, सटाणा

सदरच्या ऑनलाईन प्राप्त तांत्रिक निविदा जाहिरातीत नमूद केल्याप्रमाणे दि.१३.०५.२०१६ रोजी खरेदी समितीच्या सभेपुढे उघडण्यात येऊन सदरच्या निविदेतील तांत्रिक कागदपत्रांची छानणी केली असतावरील १ ते ५ निविदाधारकांच्या निविदा तांत्रिकदृष्ट्या पात्र ठरलेल्या आहेत. श्री.लक्ष्मी चव्हाण एजन्सीज, सटाणा यांची निविदा अद्ययावत दुकान नोंदणी दाखला सादर न केल्यामुळे तांत्रिकदृष्ट्या अपात्र ठरलेली होती.

सदर गमबुटचे वरील प्रमाणे पाचही निविदाधारकांनी नमुने दिलेले आहेत. आरोग्य विभागाकडील जा.नं.एसएसएस/ वशी-आरोग्य/६८६/२०१६ दि.२४.०५.२०१६ रोजीचे आदेशाने गमबुट खरेदीचे वेळी नमुने तपासणीकामी खालील अधिकारी व कर्मचारी यांची समिती नेमण्यात आलेली आहे.

१. श्री. एस.व्ही. गमे, प्रशासकीय अधिकारी
२. श्री. डी.टी. उगले, प्रशासकीय अधिकारी
३. श्री. आर.बी. नवले, प्र. कामगार अधिकारी
४. श्री. पी.एस. कवडे, प्र. अधिक्षक (आरोग्य विभाग)
५. श्री. ए.व्ही. कुलकर्णी, प्र. अधिक्षक (खरेदी विभाग)
६. श्री. शशिकांत भास्कर वाघमारे, सफाई कर्मचारी, आरोग्य विभाग
७. सौ. नंदा प्रकाश राऊत, सफाई कर्मचारी, आरोग्य विभाग

उपरोक्त गठीत करण्यात आलेल्या कमेटीची दि.१२.०७.२०१६ रोजी दुपारी ०४.०० वा गमबुट निवड सभा झाली असता निवड समितीने पाचपैकी तीन निविदाधारकांचे नमुने निवडलेले आहेत. त्यांचा तपशिल खालीलप्रमाणे–

१. मे.नवकेतन मार्केटींग, श्रीरामपूर
२. मे. एम.बी.ट्रेडींग कंपनी, नाशिक
३. मे. हितू जितू एंटरप्रायझेस, मुंबई

गमबुट व हॅण्डग्लोज खरेदीसाठी निवड समितीने, निवडलेल्या उपरोक्त ०३ पात्र निविदाधारकांचे Commercial Bid आजचे उपसमिती सभेसमोर, उपस्थित निविदाधारकासमक्ष उघडणेत येऊन, त्यामधील मुळ दरांचा खालीलप्रमाणे तुलनात्मक तक्ता तयार करणेत आला.

| **अ.नं.** | **तपशील** | हितू जितू एंटरप्रायझेस, मुंबई | मे. एम.बी.ट्रेडींग कंपनी, नाशिक | मे.नवकेतन मार्केटींग, श्रीरामपूर |
|---|---|---|---|---|
| | | | **दर एकत्रित रु.** | |
| १ | हॅण्डग्लोज १५०० जोड | १,०८,०००/- | **<u>८१,०००/-</u>** | १,०१,२५०/- |
| २ | गमबुट ३७२ जोड | २,१३,९००/- | १,७०,७४८/- | **<u>१,४६,९४०/-</u>** |

**यावर सविस्तर चर्चा होऊन, आरोग्य विभागाकरीता आवश्यक असलेले हॅन्डग्लोज व गमबुट खरेदीकामी उपरोक्त तुलनात्मक तक्त्यामधील गडद व अधोरेखीत केलेले निम्नतम दर स्विकारणेत येऊन, संबंधीतांना पुरवठा आदेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, खरेदी विभाग)

---

**०६ साईप्रसादालय विभागाकरीता लिक्वीडसोप खरेदीकामी प्राप्त मुळ निविदा (Commercial Bid) उघडणेबाबत.**

साईप्रसादालय विभागाकरीता भांडे धुण्यासाठी लिक्वीडसोपची वार्षिक खरेदी करणेस व त्याकामी येणाऱ्या रक्कम रु.५,४०,०००/- (अक्षरी रु. पाच लाख चाळीस हजार) मात्रचे खर्चास मा.त्रिसदस्य समितीचे दि.२८.१२.२०१५ रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक ६३७ नुसार मान्यता मिळालेली होती.

त्यास अनुसरुन साईप्रसादालय विभागासाठी भांडी धुण्यासाठी लिक्वीडसोप खरेदीकामी महाराष्ट्र शासनाचे अधिकृत संकेतस्थळावर दि.१९.०५.२०१६ ते दि.०२.०६.२०१६ या कालावधीत ई-निविदा प्रक्रिया राबविणेत आलेली होती.

याकामी ऑनलाईन चार तांत्रिक निविदा प्राप्त झालेल्या होत्या. त्यांचा तपशिल खालीलप्रमाणेः-

१. मे.स्टारवींन परफेक्ट मॅन्यु कंपनी, मुंबई

२. मे.ब्ल्यु ओशन क्लिनींग सोल्युशन्स, मुंबई

३. मे.श्री.स्वामी समर्थ एजन्सीज, कोपरगाव

४. मे.सुदर्शन स्पेशालिटी केमसोल्ह प्रा.लि.,मुंबई

सदरच्या ऑनलाईन तांत्रिक निविदा जाहिरातीत नमूद केल्याप्रमाणे दि.०९.०६.२०१६ रोजी खरेदी समितीच्या सभेपुढे उघडण्यात येऊन सदरच्या निविदेतील तांत्रिक कागदपत्रांची छाननी केली असता, चारही निविदाधारकांच्या निविदा तांत्रिकदृष्ट्या पात्र ठरलेल्या आहेत.

सदरच्या पात्र चार निविदाधारकांच्या ऑनलाईन मूळ निविदा (Commercial Bid) आजचे उपसमिती सभेसमोर, उपस्थित निविदाधारकासमक्ष उघडणेत येऊन, त्यामधील मुळ दरांचा खालीलप्रमाणे तुलनात्मक तक्ता तयार करणेत आला.

| **अ.नं.** | **तपशील** | मे.सुदर्शन स्पेशालिटी केमसोल्ह प्रा.लि.,मुंबई | मे.ब्ल्यु ओशन क्लिनींग सोल्युशन्स, मुंबई | मे.श्री.स्वामी समर्थ एजन्सीज, कोपरगाव | मे.स्टारवींन परफेक्ट मॅन्यु कंपनी, मुंबई |
|---|---|---|---|---|---|
| | | **दर एकत्रित रु.** | | | |
| १ | लिक्वीड सोप (हाताने भांडी धुण्यासाठी) ७५०० लिटर | ६,३०,०००/- | ३,७५,०००/- | ७,१२,५००/- | **२,६१,३७५/-** |
| २ | लिक्वीड सोप (मशिनने भांडी धुण्यासाठी) ३००० लिटर | --- | **३०,०००/-** | ६६,०००/- | १,१९,२५०/- |

**यावर सविस्तर चर्चा होऊन, साईप्रसादालय विभागाकरीता आवश्यक असलेले लिक्वीडसोप खरेदीकामी उपरोक्त तुलनात्मक तक्त्यामधील गडद व अधोरेखीत केलेले निम्नतम दर स्विकारणेत येऊन, संबंधीतांना पुरवठा आदेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, खरेदी विभाग)

---

०७ **श्री साईबाबा रुग्णालयातील आर्थोपेडीक ऑपरेशन थिएटर विभागाकरीता राजीव गांधी योजनेअंतर्गत शस्त्रक्रिया करणेकामी दाखल रुग्णांकरीता Surgical Implant खरेदीकामी प्राप्त कमर्शिअल ई-निविदा उघडून मिळणेबाबत.**

श्री साईबाबा रुग्णालयातील आर्थोपेडीक ऑपरेशन थिएटर विभागाने दि.२९/०१/२०१५ रोजीचे मागणीपत्रान्वये Surgical Implant ची मागणी केलेली आहे. सध्या राजीव गांधी जीवनदायी योजनेअंतर्गत गरीब व गरजू रुग्ण शस्त्रक्रिया व उपचारासाठी दाखल होत असतात तसेच योजनेअंतर्गत आपणास रुग्णास सर्व प्रकारचे उपचार हे मोफत करावे लागतात. ऑपरेशन थिएटर विभागाने मागणी केलेल्या Surgical Implant चा वापर रुग्णाचा खांदा निखळल्यानंतर तो जोडण्यासाठी तसेच रुग्णाचा खांदा व्यवस्थित राहण्यासाठी व काही Implant चा वापर रुग्णांच्या गुडघ्यामधील स्नायु तुटल्यावर त्याला व्यवस्थित भक्कम करण्यासाठी होतो. मागणी केलेल्या Surgical Implant चा अंदाजे खर्चासह तपशिल खालीलप्रमाणे-

| **Sr. No.** | **Description** | **Size** | **Qty.** | **Rate Per in Rs.** | **Total Amt. in Rs.** |
|---|---|---|---|---|---|
| 1. | Titanium Enterferance Screw (each 10 pc) | 8 mm (20mm/25mm/30mm)<br>9mm (20mm/25mm/30mm)<br>10mm (20mm/25mm/30mm) | 120 | 1800.00 | 216000.00 |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 2. | Titanium Endobutton (50pc) | Standard | 50 | 1800.00 | 90000.00 |
| 3. | Endobutton CL with Ti-polyster loop Sterile (Insta button) (each 2 pc) | 14mm/16mm/18mm/20mm/ 22mm/24mm/26mm/28mm/ 30mm | 18 | 10500.00 | 189000.00 |
| 4. | Anchor Suture Imported (each 5 pc) | 3.5mm/5mm | 10 | 14300.00 | 143000.00 |
| 5. | Anchor Suture Regular Titanium (each 15 pc) | 3.5mm/5mm | 30 | 1800 | 54000.00 |
| | | | | **Total Amt. in Rs.** | **692000.00** |

वरीलप्रमाणे Implant खरेदीकामी दि.०५/०५/२०१५ रोजीचे मा.त्रिसदस्य समितीचे सभेतील निर्णय क्र.१४४(८) अन्वये विहित पध्दतीने ई-निविदा मागवून खरेदी करणेस व याकामी येणा-या रु.६,९२,०००/- खर्चास मान्यता मिळालेली आहे.

त्यानुसार फ्री प्रेस जनरल– मुंबई, लाईफ ३६५ इंग्लिश– पुणे, दिव्य मराठी– नाशिक, पुण्यनगरी– औरंगाबाद या वर्तमान पत्रात जाहिरात देऊन दि.१५/०६/२०१५ ते ३०/०६/२०१५ या कालावधीत निविदा विक्रीचा कालावधी ठेवण्यात आला होता, निविदा स्विकारण्याची अंतिम मुदत दि.०२/०७/२०१५ अखेर ठेवण्यात आली होती. त्यास अनुसरुन एक निविदा प्राप्त झालेली आहे, त्याचा तपशिल खालीलप्रमाणे-

| Sr.No. | Name of Tenderer | Received Date |
|---|---|---|
| 01 | M/s. Austin Health Care, Pune | 03/07/2015 |

उपरोक्तप्रमाणे खरेदीकामी एकच निविदा प्राप्त झालेली आहे, तसेच खरेदीकामी कमीत कमी तीन निविदांची आवश्यकता असते त्यामुळे सदरचे खरेदीकामी दि.२४/०७/२०१५ रोजीचे मंजुर टिपणीन्वये दुस-यांदा फेर ई-निविदा मागविण्यास मान्यता घेवून दि.१५/१०/२०१५ ते ०२/११/२०१५ या कालावधीत निविदा विक्रीचा कालावधी ठेवण्यात आला होता, निविदा स्विकारण्याची अंतिम मुदत दि.०५/११/२०१५ अखेर ठेवण्यात आली होती. त्यास अनुसरुन दोन निविदा प्राप्त झालेल्या होत्या, परंतु खरेदीकामी कमीत कमी तीन निविदांची आवश्यकता असते.

त्यामुळे दि.२५/११/२०१५ रोजीचे मंजुर टिपणीन्वये तिस-यांदा फेर ई-निविदा मागविण्यास मान्यता घेवून सदरचे खरेदीकामी तिस-यांदा दैनिक सामना – औरंगाबाद, गावकरी – नाशिक या वर्तमान पत्रात जाहिरात देण्यात आली होती. तसेच संस्थानचे संकेत स्थळावर जाहिरात व निविदा देण्यात आली होती. त्यानुसार निविदा विक्रीची मुदत दि.१५/०२/२०१६ ते ०५/०३/२०१६ पर्यंत ठेवण्यात आली होती, तर निविदा स्विकारण्याची अंतिम मुदत दि.०८/०३/२०१६ अखेर ठेवण्यात आली होती. त्यास अनुसरुन ०३ निविदा प्राप्त झालेल्या आहेत, त्याचा तपशिल खालीलप्रमाणे–

| Sr.No. | Name of Tenderer | Received Date |
|---|---|---|
| 1 | M/s. Austin Health Care, Pune | 08/03/2016 |
| 2 | M/s. Med Plus India, Ahmedabad | 05/03/2016 |
| 3 | M/s. Stryker India Pvt.Ltd., Gurgaon | 08/03/2016 |

वरीलप्रमाणे खरेदीकामी तिस-यांदा वर्तमान पत्रात दिलेल्या जाहिरातीस अनुसरुन प्राप्त झालेल्या ०३ तांत्रिक निविदा दि.१८/०३/२०१६ रोजीचे मा.उपसमिती सभेपुढे उघडण्यात आलेली असून तांत्रिक बाबींचा तक्ता तयार करण्यात आलेला असून त्यावर संबंधित वापर करणाऱ्या डॉक्टरांची शिफारस घेण्यात आलेली असून त्यांनी M/s. Med Plus India, Ahmedabad यांचे Implant घेणेबाबत शिफारस केलेली आहे. परंतु प्राप्त निविदांपैकी M/s. Stryker India Pvt.Ltd., Gurgaon यांनी Online ई-निविदा upload केलेली नाही, तसेच M/s. Med Plus India, Ahmedabad यांनी Online Technical Comply upload केलेला नाही, त्यामुळे दोन्हीही निविदा अपात्र होत आहेत.

तरी उपरोक्तप्रमाणे पात्र असलेली ०१ कमर्शियल ऑनलाईन ई-निविदा मा. उपसमिती सभेपुढे संबंधीत निविदाधारकांचे समक्ष उघडून मिळण्यास मान्यता असावी, तसेच सदरहू Surgical Implant ची सन २०१६-१७ चे वार्षिक औषधे खरेदीमध्ये मागणी करण्यात आलेली आहे, परंतु वार्षिक खरेदीमधील औषधे / सर्जिकल साहित्य उपलब्ध होण्यास बराच कालावधी लागेल त्यामुळे वरील मागणी केलेली नगसंख्या संपल्यानंतर विभागाचे मागणीनुसार मंजुर दराने आवश्यक नगसंख्या खरेदीस मान्यता असावी ही विनंती.

उपरोक्तप्रमाणे पात्र असलेली M/s. Austin Health Care, Pune यांची एकमेव ई-निविदा आजचे उपसमिती सभेसमोर, उपस्थित निविदाधारकासमक्ष उघडणेत येऊन, त्यामधील मुळ दरांचा खालीलप्रमाणे तक्ता तयार करणेत आला.

| Sr. No. | Name of Items | No.of Qty. | Rate per in Rs. | Total Amt.in Rs. |
|---|---|---|---|---|
| 1 | Titanium Enterferance Screw (Each 10 pc) Size: Width 8 mm - Length - 20mm / 25mm / 30mm) Width -9mm - Length - 20mm / 25mm / 30mm) Width 10mm - Length - 20mm / 25mm / 30mm) | 90 | 600.00 | 54000.00 |
| 2 | Titanium Endobutton Standard | 50 | 350.00 | 17500.00 |
| 3 | Endobutton CL with Ti-polyster loop Sterile (Insta button) (Each 2 pc) 14mm / 16mm / 18mm / 20mm / 22mm / 24mm / 26mm / 28mm / 30mm | 18 | 3600 | 64800.00 |
| 4 | Anchor Suture Imported (Each 5 pc) 3.5mm / 5mm | 10 | 38650.00 | 386500.00 |
| 5 | Anchor Suture Regular Titanium (Each 15 pc) 3.5mm / 5mm | 30 | 1800.00 | 54000.00 |
| | | **Total Amt.in Rs.** | | **576800.000** |

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा रुग्णालयातील आर्थोपेडीक ऑपरेशन थिएटर विभागाकरीता राजीव गांधी योजनेअंतर्गत शस्त्रक्रिया करणेकामी दाखल रुग्णांकरीता Surgical Implant खरेदीकामी M/s. Austin Health Care, Pune यांचे रु.५,७६,८००/- मात्र दर स्विकारणेत येऊन, त्यांना पुरवठा आदेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

(कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

०८ **श्री साईबाबा रुग्णालयातील न्युरो ऑपरेशन थिएटर विभागाकरीता राजीव गांधी योजनेअंतर्गत शस्त्रक्रिया करणेकामी दाखल रुग्णांकरीता Surgical Implant खरेदीकामी प्राप्त कमर्शिअल ई-निविदा उघडून मिळणेबाबत.**

श्री साईबाबा रुग्णालयातील आर्थोपेडीक ऑपरेशन थिएटर विभागाने दि.२८/०१/२०१५ रोजीचे मागणीपत्रान्वये Surgical Implant ची मागणी केलेली आहे. सध्या राजीव गांधी जीवनदायी योजनेअंतर्गत गरीब व गरजू रुग्ण शस्त्रक्रिया व उपचारासाठी दाखल होत असतात तसेच योजनेअंतर्गत आपणास रुग्णास सर्व प्रकारचे उपचार हे मोफत करावे लागतात. ऑपरेशन थिएटर विभागाने मागणी केलेल्या Surgical Implant चा वापर रुग्णांचे पाठ व मणक्यांमधील अंतर भरुन काढण्यासाठी होतो, तसेच सदर Implant वापरल्यामुळे रुग्णांना पॅरेलेसीस होण्याची शक्यता टाळता येऊ शकते. मागणी केलेल्या Surgical Implant चा अंदाजे खर्चासह तपशिल खालीलप्रमाणे-

| Sr. No. | Description | Size | Rate Per in Rs. | Qty. | Total Amt. in Rs. |
|---|---|---|---|---|---|
| 1. | Titanium Polyaxial Pedicle screw 4.5mm (each 05) | 25mm/30mm/35mm/40mm/ 45mm/50mm | 3850.00 | 30 | 115500.00 |
| 2. | Titanium Polyaxial Pedicle screw 5.5mm (each 05) | 25mm/30mm/35mm/40mm/ 45mm/50mm | 3850.00 | 30 | 115500.00 |
| 3. | Titanium Polyaxial Pedicle screw 6.5mm (each 05) | 25mm/30mm/35mm/40mm/ 45mm/50mm | 3850.00 | 30 | 115500.00 |
| 4. | Titanium Anterior Cervical Plate (each 01) | 21.5mm/23/25/27.5/30/32.5/35/ 37.5/40/42.5/45/47.5/50/52.5/ 55/57.5/60/62.5/65/67.5/70 | 11500.00 | 21 | 241500.00 |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 5. | Bone Screw for cervical plate 4mm (each 10) | 10mm/12/14/16/18/20/22/24 | 950.00 | 80 | 76000.00 |
| 6. | Lock screw for cervical plate | Standard | 950.00 | 10 | 9500.00 |
| 7. | Connecting rod 6mm width for Mono/poly screw (each 04) | 60mm/70mm/80mm/100mm/ 120mm/140mm/160mm/ 180mm/200mm | 2250.00 | 36 | 81000.00 |
| 8. | Titanium cage Kidney Type (each 02) | 7mm/8mm/9mm/10mm/11mm/ 12mm | 7500.00 | 12 | 90000.00 |
| 9. | Plif cage (each 02) | 20mm/22mm/24mm/28mm/ 30mm | 7500.00 | 10 | 75000.00 |
| 10. | Mesh cage (each 02) | 10mm | 4500.00 | 02 | 9000.00 |
| 11. | Transverce connector (each 10) | Standard | 2250.00 | 10 | 22500.00 |
| | | | | **Total Amt. in Rs.** | **951000.00** |

वरीलप्रमाणे Implant खरेदीकामी दि.०५/०५/२०१५ रोजीचे मा.त्रिसदस्य समितीचे सभेतील निर्णय क्र.१४४(२३) अन्वये विहित पध्दतीने ई-निविदा मागवून खरेदी करणेस व याकामी येणा-या रु.९,५१,०००/- खर्चास मान्यता मिळालेली आहे.

त्यानुसार फ्री प्रेस जनरल– मुंबई, लाईफ ३६५ इंग्लिश– पुणे, दिव्य मराठी– नाशिक, पुण्यनगरी– औरंगाबाद या वर्तमान पत्रात जाहिरात देऊन दि.१५/०६/२०१५ ते ३०/०६/२०१५ या कालावधीत निविदा विक्रीचा कालावधी ठेवण्यात आला होता, निविदा स्विकारण्याची अंतिम मुदत दि.०२/०७/२०१५ अखेर ठेवण्यात आली होती. त्यास अनुसरुन एक निविदा प्राप्त झालेली आहे, त्याचा तपशिल खालीलप्रमाणे-

| Sr.No. | Name of Tenderer | Received Date |
|---|---|---|
| 01 | M/s. Austin Health Care, Pune | 03/07/2015 |

उपरोक्तप्रमाणे खरेदीकामी एकच निविदा प्राप्त झालेली आहे, तसेच खरेदीकामी कमीत कमी तीन निविदांची आवश्यकता असते त्यामुळे सदरचे खरेदीकामी दि.२४/०७/२०१५ रोजीचे मंजुर टिपणीन्वये दुस-यांदा फेर ई-निविदा मागविण्यास मान्यता घेवून दि.१५/१०/२०१५ ते ०२/११/२०१५ या कालावधीत निविदा विक्रीचा कालावधी ठेवण्यात आला होता, निविदा स्विकारण्याची अंतिम मुदत दि.०५/११/२०१५ अखेर ठेवण्यात आली होती. त्यास अनुसरुन दोन निविदा प्राप्त झालेल्या होत्या, परंतु खरेदीकामी कमीत कमी तीन निविदांची आवश्यकता असते, त्यामुळे दि.२५/११/२०१५ रोजीचे मंजुर टिपणीन्वये तिस-यांदा फेर ई-निविदा मागविण्यास मान्यता घेवून सदरचे खरेदीकामी तिस-यांदा दैनिक सामना – औरंगाबाद, गावकरी – नाशिक या वर्तमान पत्रात जाहिरात देण्यात आली होती. तसेच संस्थानचे संकेत स्थळावर जाहिरात व निविदा देण्यात आली होती. त्यानुसार निविदा विक्रीची मुदत दि.१५/०२/२०१६ ते ०५/०३/२०१६ पर्यंत ठेवण्यात आली होती, तर निविदा स्विकारण्याची अंतिम मुदत दि.०८/०३/२०१६ अखेर ठेवण्यात आली होती. त्यास अनुसरुन ०३ निविदा प्राप्त झालेल्या आहेत, त्याचा तपशिल खालीलप्रमाणे -

| Sr.No. | Name of Tenderer | Received Date |
|---|---|---|
| 1 | M/s. Austin Health Care, Pune | 08/03/2016 |
| 2 | M/s. Med Plus India, Ahmedabad | 05/03/2016 |
| 3 | M/s. General Surgical Company, Chennai | 08/03/2016 |

वरीलप्रमाणे खरेदीकामी तिस-यांदा वर्तमान पत्रात दिलेल्या जाहिरातीस अनुसरुन प्राप्त झालेल्या ०३ तांत्रिक निविदा दि.१८/०३/२०१६ रोजीचे मा.उपसमिती सभेपुढे उघडण्यात आलेली असून तांत्रिक बाबींचा तुलनात्मक तक्ता तयार करण्यात आलेला असून त्यावर संबंधित वापर करणाऱ्या डॉक्टरांची शिफारस घेणेकामी न्युरो ओ.टी.विभागात पाठविण्यात आला होता, परंतु त्यावर डॉ. टिंगरे यांनी कुठल्यही प्रकारचे Opinion दिलेले नाही, परंतु नविन Neuro Surgeon उपलब्ध झाल्यानंतर सदर Implant वापरता येतील. तसेच उपरोक्त प्राप्त निविदांपैकी M/s. Med Plus India, Ahmedabad यांनी Online Technical Comply upload केलेला

नाही, त्यामुळे सदरहू निविदा अपात्र होत आहे. त्यामुळे त्यांनी निविदेसोबत दिलेली त्यांची अनामत रक्कम त्यांना परत करावी लागणार आहे.

तरी उपरोक्तप्रमाणे पात्र असलेल्या ०२ कमर्शियल ऑनलाईन ई-निविदा मा.उपसमिती सभेपुढे संबंधीत निविदाधारकांचे समक्ष उघडून मिळण्यास, तसेच अपात्र निविदाधारक M/s. Med Plus India, Ahmedabad यांची अनामत रक्कम वित्त विभागामार्फत परत करणेस मान्यता असावी, तसेच सदरहू Surgical Implant ची सन २०१६-१७ चे वार्षिक औषधे खरेदीमध्ये मागणी करण्यात आलेली आहे, परंतु वार्षिक खरेदीमधील औषधे/ सर्जिकल साहित्य उपलब्ध होण्यास बराच कालावधी लागेल त्यामुळे वरील मागणी केलेली नगसंख्या संपल्यानंतर विभागाचे मागणीनुसार मंजुर दराने आवश्यक नगसंख्या खरेदीस मान्यता असावी.

उपरोक्तप्रमाणे पात्र ०२ ई-निविदा आजचे उपसमिती सभेसमोर, उपस्थित निविदाधारकांसमक्ष उघडणेत येऊन, त्यामधील मुळ दरांचा खालीलप्रमाणे तुलनात्मक तक्ता तयार करणेत आला.

| अ.नं. | निविदाधारकाचे नाव | निविदेमधील मुळ दर रु. |
|---|---|---|
| १ | M/s. Austin Health Care, Pune | **७,७७,९२५/-** |
| २ | M/s. General Surgical Company, Chennai | १४,४९,५७७.५० |

**यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे श्री साईबाबा रुग्णालयातील न्युरो ऑपरेशन थिएटर विभागाकरीता राजीव गांधी योजनेअंतर्गत शस्त्रक्रिया करणेकामी दाखल रुग्णांकरीता Surgical Implant खरेदीकामी M/s. Austin Health Care, Pune यांचे रु.७,७७,९२५/- मात्र निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना पुरवठा आदेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**०९ 5 MBPS Lease line साठी प्राप्त निविदा (Commercial Bid) उघडून मिळणेबाबत.**

सदरहू विषय वेळेत प्राप्त न झाल्यामुळे त्यावरील चर्चा पुढे ढकलणेत आली.

(कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**१० श्री साईनाथ माध्यमिक विद्यालयाचे इमारतीत रंगकाम करणे व संरक्षक भिंतीचे बांधकाम करणेकामी प्राप्त झालेल्या ई-निविदांचा लिफाफा क्र.०२ (Commercial Bid) उघडून त्यावर निर्णय होणेबाबत.**

**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम 2004 मधील तरतुद:** अधिनियम कलम 21 (1) अन्वये समितीकडून विश्वस्तव्यवस्था निधीचा विनियोग पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही प्रयोजनांसाठी करणेबाबत तरतुद आहे. त्यातील पोटकलम (क) अन्वये मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन या प्रयोजनांसाठी करण्यात येईल अशी तरतुद आहे.

**मा.त्रीसदस्य समितीचे सभेतील निर्णय:** मा.त्रिसदस्य समितीचे दिनांक 25/08/2012 रोजीचे सभेत निर्णय क्र. 668 खालील प्रमाणे संमत करणेत आलेला आहे.

“.. यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईनाथ माध्यमिक विद्यालयाचे इमारतीस रंगकाम करणे व संरक्षक भिंतीचे बांधकाम करणेस व याकामी येणाऱ्या अंदाजे रु.12,42,775/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली. याकामी विहीत पध्दतीने जाहिरात देऊन निविदा मागविण्यात याव्यात असे ठरले.

तसेच श्री साईनाथ माध्यमिक विद्यालय ही शाळा संस्थानकडे वर्ग करण्यासंदर्भात चर्चा करणेसाठी शाळेचे समिती सदस्य् यांना समक्ष चर्चेसाठी आमंत्रित करण्यात यावे, असे ठरले.”

**मा. मुंबई उच्च न्यायालय खंडपीठ परवानगी आदेश. :** C.A. No. 13280 of 2013 In P.I.L. NO. 18 of 2011 dt. 26/09/2014 अन्वये परवानगी मिळालेली आहे.

**प्रस्तावना:** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचे मालकीचे मौजे शिर्डी येथील सर्व्हे नं. 125 (नगरपंचायत मिळकत नं. 1666) क्षेत्र 40 आर मध्ये संस्थानमार्फत उभारणेत आलेल्या खालील इमारती अहमदनगर एज्युकेशन सोसायटी, अहमदनगर यांचे श्री साईनाथ माध्यमीक व उच्च् माध्यमीक विद्यालय, शिर्डी यांचे वापरासाठी देणेत आलेल्या आहेत.

| अ.नं. | इमारतीचे नांव | बांधकामाचा प्रकार | वर्ग खोल्या | बांधकामाचे क्षेत्रफळ (चौ. मी.) |
|---|---|---|---|---|
| 01. | जुनी यु टाईप इमारत | पत्रा छत | 11 वर्ग खोल्या | 0720.08 |
| 02. | न्यु स्कुल इमारत (तळ+1ला मजला) | आर.सी.सी. | 06 वर्ग खोल्या | 0375.14 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 03. | साई सरस्वती इमारत (तळ+1ला मजला) | आर. सी. सी. | 17 हॉल / खोल्या व 03 स्वच्छतागृहे | 1441.78 |
| | | | **एकुण.** | **2537.00** |

वरील प्रमाणेच्या इमारतीचे आतिल व बाहेरील बाजूचे रंगकाम निघून गेलेले असल्याने, सदरहू इमारतींना रंगकाम करुन मिळणेबाबत तसेच संरक्षणाचे दृष्टीने सदरहू इमारतीचे बाजूने संरक्षक भिंतीचे बांधकाम करुन मिळणेबाबत उपमुख्याध्यापक यांनी त्यांचेकडील दि.15 मे, 2012 रोजीचे पत्राने विनंती केली आहे.

**प्रस्ताव:** विषयांकीत कामासाठी मा. त्रिसदस्य समितीचे उपरोक्त निर्णयानुसार व मा. मुंबई उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद यांचे मान्यतेनुसार सदरहू कामासाठी इकडील विभागामार्फत निविदा तयार करुन संस्थानचे संकेतस्थळावर व वर्तमानपत्रात जाहिरात प्रसिध्द करून ई-निविदा मागविण्यात आल्या आहेत. त्याचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

| **अ. क्र.** | **तपशिल** | **ई-निविदा कालावधी** | **निविदा सादर करण्याची मुदत** | **प्राप्त ई-निविदांची संख्या** | **पात्र ई-निविदा संख्या** |
|---|---|---|---|---|---|
| 01. | प्रथम निविदा मागणी (दि.03/12/2014 रोजीचे टिपणी नुसार) | 12/01/2015 ते 27/01/2015 | 27/01/2015 | 03 | 01 |
| 02. | व्दितीय निविदा मागणी (दि.21/10/2015 रोजीचे टिपणी नुसार) | 03/12/2015 ते 17/12/2015 | 17/12/2015 | 02 | -- |
| 03 | तृतीय निविदा मागणी (दि.18/01/2016 रोजीचे टिपणी नुसार) | 24/02/2016 ते 05/03/2016 | 05/03/2016 | 03 | 01 |

उपरोक्त विषयांकीत कामासाठी तिसऱ्यांदा ई-निविदा सूचना प्रसिध्द करुन याकामी तिन ई-निविदा प्राप्त झाल्या असून, प्राप्त ई-निविदांचा लिफाफा क्र.01 (Technical bid) दि.09/03/2016 रोजी उघण्यात आले त्यावेळी खालीलप्रमाणे उपस्थिती होती.

| **अनं.** | **नांव** | **पदनाम** |
|---|---|---|
| 1. | श्री. यु. पी. गोंदकर | प्रशासकीय अधिकारी |
| 2. | श्री. ए. आर. औटी | प्रशासकीय अधिकारी |
| 3. | श्री. आर. बी. आहेर | उपकार्यकारी अभियंता |
| 4. | श्री. डी. एम. देसाई | उप अभियंता |
| 5. | श्री .व्हि. एन. जेजुरकर | लेखाधिकारी |
| 6. | श्री. जी. एस. जाधव | कनिष्ठ अभियंता |
| 7. | श्री. एस. आर. साबळे | ज्यु. ई. डी. पी. विभाग प्रतीनिधी |

उघडण्यात आलेल्या ई-निविदांचा लिफाफा क्र.01 (Technical Bid) मधील ठेकेदार यांनी सादर केलेल्या कागदपत्रांचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

| **अ. नं.** | **ठेकेदाराचे नांव** | **कागदपत्रांचा तपशिल** | | | | | **शेरा** |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | **बयाना रक्कमेचा व को-या ई-निविदा किमतीचे डी. डी.** | **सार्वजनिक बांधकाम विभागाकडे नोंद केल्याचे प्रमाणपत्र.** | **मागील तीन वर्षात बांधकाम क्षेत्रात केलेल्या कामाचा दाखला** | **कर्मचारी भविष्य निर्वाह निधी विभागाकडे नोंद आहे/ नाही.** | **काळ्या यादीत नांव समाविष्ट नसलेबाबत चे पत्र** | |
| ०१ | जय डेव्हलपर्स, शिर्डी | जोडले आहे. | जोडले आहे. | नाही. | जोडले आहे. | विना तारखेचे | अपात्र |
| ०२ | श्री. बी. पी. शिंदे, पढेगांव | जोडले आहे. | जोडले आहे. | नाही. | जोडले आहे. | विना तारखेचे | अपात्र |
| ०३ | एस. ए. पांडोळे, कर्जत | जोडले आहे. | जोडले आहे. | जोडला आहे. | जोडले आहे. | जोडले आहे. | पात्र |

वरीलप्रमाणे प्राप्त ई-निविदेचा तांत्रीक माहितीचा अहवाल सादर केला असता, त्यावर मुख्यलेखाधिकारी यांनी *"There shold be at least three competitive biders for competition so time extension / retender is recommended Or this third call if one bid has to accept then rate should be negotiated at below estimated cost."* असा अभिप्राय दिलेला आहे.

तरी वरीलप्रमाणे मुख्यलेखाधिकारी यांचे अभिप्रायानुसार सदरहू कामी तिस्ऱ्यांदा ई-निविदा मागविणेत आलेली असल्याने, प्राप्त झालेल्या निविदांपैकी पात्र (एस.अे.पांडोळे, कर्जत) निविदाधारकाचे ई-निविदेचा लिफाफा क्र.०२ (Commercial Bid) आजचे उपसमिती सभेसमोर, उपस्थित निविदाधारकासमक्ष उघडणेत येऊन, त्यामधील मुळ दरांचा खालीलप्रमाणे तुलनात्मक तक्ता तयार करणेत आला.

| अ.नं. | निविदाधारकाचे नाव | निविदेमधील मूळ दर रु. |
|---|---|---|
| १ | एस.अे.पांडोळे, कर्जत | ११,२६,८२४.१३ |

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईनाथ माध्यमिक विद्यालयाचे इमारतीत रंगकाम करणे व संरक्षक भिंतीचे बांधकाम करणेकामी एस.अे.पांडोळे, कर्जत यांचे रु.११,२६,८२४.१३ मात्र दर स्विकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

११ **साईनगर कर्मचारी वसाहत परिसरात साईनगर, समर्पण व साईध्यान इमारतींचे भोवती पेव्हिंग ब्लॉक बसविणेकामी प्राप्त झालेल्या ई-निविदांचा लिफाफा क्र.०२ (Commercial Bid) उघडून त्यावर निर्णय होणेबाबत.**

**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतुद :** अधिनियम कलम २१(१) अन्वये समितीकडून विश्वस्तव्यवस्था निधीचा विनियोग पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही प्रयोजनांसाठी करणेबाबत तरतुद आहे. त्यातील पोटकलम (क) अन्वये मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन या प्रयोजनांसाठी करण्यात येईल अशी तरतुद आहे.

**मा.त्रीसदस्य समितीचे सभेतील निर्णय :**

१. मा.त्रिसदस्य समितीचे दिनांक ०८/१०/२०१२ रोजीचे सभेत निर्णय क्र. ८११ खालील प्रमाणे संमत झालेला आहे.

*".. यावर सविस्तर चर्चा होऊन, साईनगर कर्मचारी वसाहत परिसरात साईचिंतन, समर्पण व साईध्यान इमारतीचे भोवती पेव्हिंग ब्लॉक बसविणेस व त्याकामी येणा-या रु.१४,३१,५००/- मात्रचे खर्चास तसेच सदरचे काम विहीत पध्दतीने निविदा मागवून करुन घेणेस मान्यता देणेत आली."*

२. मा. त्रिसदस्य समितीचे दिनांक १०/११/२०१५ रोजीचे सभेत निर्णय क्र. ४६८ खालील प्रमाणे संमत झालेला आहे.

*".. यावर सविस्तर चर्चा होऊन, साईनगर कर्मचारी वसाहत परिसरात साईनगर, समर्पन व साईध्यान इमारतीचे भोवती पेव्हींग ब्लॉक बसविणेकामी राबविणेत आलेल्या ई-निविदा प्रक्रीयेचे अवलोकन करणेत येऊन, त्यास मान्यता देण्यात आली. परंतू सदरहू निविदा प्रक्रियेला सहा महिन्यिपेक्षा जास्त कालावधी झालेला असल्यामुळे याकामीचे निम्नतम दरधारक चंद्रगुप्त कन्स्ट्रक्शन, साकुरी यांना कार्यादेश देणेपूर्वी लेखापरिक्षणाच्या दृष्टीकोनातून लेखाशाखा विभागाचा अभिप्राय घेण्यात यावा व त्यांचे अभिप्रायानुसार कार्यादेश देता येत नसेल तर सदरहूकामी फेर ई-निविदा प्रक्रीया राबविणेत यावी, असे ठरले."*

**मा. मुंबई उच्च न्यायालय खंडपीठ परवानगी आदेश:** C.A. No.13281 of 2013 in P.I.L. NO. 18 of 2011 dt. 26/09/2014

**प्रस्ताव:** साईनगर कर्मचारी वसाहत परिसरातील समर्पण, साईनगर, साईध्यान नं. ०१ व ०२ या इमारतींचे मागील भागात पेव्हिंग ब्लॉक बसविणेकामी मा. व्यवस्थापन समितीचे दि.१०/११/२०१५ रोजीचे सभेतील निर्णयानुसार लेखाशाखा विभागाकडून अभिप्राय मागविणेत आला असता, मुख्यलेखाधिकारी यांनी दि.२७/०१/२०१६ रोजीचे पत्रावर "..अंदाजपत्रकीय रक्कम (दर) कमी झाली असल्याने नव्याने निविदा प्रक्रीया राबविणे योग्य होईल. " असा अभिप्राय दिला होता.

वरील अभिप्रायानुसार विषयांकीत कामासाठी दि१६/०४/२०१६ अखेर दुस-यांदा फेर ई-निविदा मागविण्यात आल्या होत्या. विहीत मुदतीत एकुण पाच निविदासादरकर्त्यांनी ई-निविदा अपलोड केल्या होत्या. त्यामध्ये श्री.बी.बी. मोरे घुलेवाडी हे एकच ठेकेदार पूर्व पात्रता निकषांची पुर्तता करत असल्याने पात्र होत असल्याने, सदरहू कामी फेर ई-निविदा सूचना वर्तमानपत्रात व संस्थानचे संकेतस्थळावर प्रसिध्द करुन दि.०८/०६/२०१६ पर्यंत ई-निविदा अपलोड करणेची मुदत देणेत येऊन, हार्ड कॉपी सादर करणेसाठी दि.११/०६/२०१६ पर्यंत मुदत देणेत आली होती. सदरचे विहीत मुदतीत एकुण ०४ ठेकेदार ई-निविदा अपलोड केल्याचे आढळून आले. सदरहू ई-निविदेचा तांत्रीक माहितीचा लिफाफा क्र.०१ (Technical Bid) दि.१४/०६/२०१६ रोजी प्रशासकिय अधिकारी यांचे उपस्थित उघडणेत आलेला आहे.

उघडण्यात आलेल्या ई-निविदांचे लिफाफा क्र.०१ (Technical Bid) मधील ठेकेदार यांनी सादर केलेल्या कागदपत्रांचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ. नं. | ठेकेदाराचे नांव | कागदपत्रांचा तपशिल | | | | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| | | **को-या निविदेची किंमत व बयाना रकमेचा डी. डी.** | **मागील तीन वर्षात बांधकाम क्षेत्रात केलेल्या कामाचे दाखला अथवा सार्वजनिक बांधकाम विभाग व इतर शासकिय विभागाकडे नोंद केल्याचे प्रमाणपत्र.** | **पी. एफ. विभाग नोंदणी प्रमाणपत्र** | **काळ्या यादीत नांव नसलेबाबतचे हमीपत्र** | |
| १. | श्री.निखील अजित गुजराथी, कोपरगांव | जोडले आहे. | जोडले आहे. | जोडले आहे. | जोडले आहे. | पात्र |
| २. | मे.बनकर पाटील ॲण्ड कंपनी, श्रीरामपूर | जोडले आहे. | जोडले आहे. | जोडले आहे. | जोडले आहे. | पात्र |
| ३. | ओम साई सिव्हील कॉन्ट्रक्टर, (एस. एम. टेंभुरकर) नागपूर | जोडले नाही. | जोडले आहे. | जोडले नाही. | जोडले नाही. | अपात्र |
| ४. | श्री.रविंद्र साहेबराव शिंदे, कोल्हार | जोडले नाही. | जोडले आहे. | जोडले आहे. | जोडले नाही. | अपात्र |

विषयांकीत कामासाठी तिस-यांदा ई-निविदा मागवून प्राप्त झालेल्या ई-निविदा मधील उपरोक्त अ. नं.०१ व ०२ चे पात्र ठेकेदार यांचे लिफाफा क्र.०२ (Commercial Bid) आजचे उपसमिती सभेसमोर, उपस्थित निविदाधारकासमक्ष उघडणेत येऊन, त्यामधील मुळ दरांचा खालीलप्रमाणे तुलनात्मक तक्ता तयार करणेत आला.

| अ.नं. | निविदाधारकाचे नाव | निविदेमधील मूळ दर रु. |
|---|---|---|
| १ | श्री.निखील अजित गुजराथी, कोपरगांव | १२,५५,४२५.०२ |
| २ | मे.बनकर पाटील ॲण्ड कंपनी, श्रीरामपूर | **१२,१८,२०६.०४** |

**यावर सविस्तर चर्चा होऊन, साईनगर कर्मचारी वसाहत परिसरात साईनगर, समर्पण व साईध्यान इमारतींचे भोवती पेव्हिंग ब्लॉक बसविणेकामी मे.बनकर पाटील ॲण्ड कंपनी, श्रीरामपूर यांचे रु.१२,१८,२०६.०४ मात्र निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**विषय नं.०४** **दिनांक ०७.०८.२०१६ रोजी शिर्डी येथे झालेल्या व्यवस्थापन समिती सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.**

**निर्णय क्र.५८५** दिनांक ०७.०८.२०१६ रोजी शिर्डी येथे झालेल्या व्यवस्थापन समिती सभेच्या इतिवृत्ताच्या प्रती सर्व मा.सदस्यांना सभेत पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात येऊन, सदरहू इतिवृत्त वाचून कायम करण्यात आले.

---

**विषय नं.०५** **श्री साईबाबा महासमाधी शताब्दी महोत्सवानिमीत्त शिर्डी व परिसरात उपलब्ध करावाच्या सोयी-सुविधांबाबतप्रकल्प अहवाल शासनास सादर करणेबाबत.**

**प्रस्ताव-** थोर संत श्री साईबाबा यांच्या महासमाधीस दि.१८ ऑक्टोबर, २०१८ रोजी १०० वर्षे पूर्ण होणार आहेत. त्यानिमित्त श्री साईबाबा संस्थानमार्फत श्री साईबाबा महासमाधी शताब्दी वर्ष दि.०१ ऑक्टोबर २०१७ ते दि.१८

ऑक्टोबर २०१८ (विजयादशमी) अखेर साजरे करण्यात येणार आहे. त्यासाठी शिर्डी शहर व परिसरातील पायाभूत सुविधांमध्ये मोठया प्रमाणावर सुधारणा करणे व नविन प्रकल्प उभारणे आवश्यक आहे. याकरीता महाराष्ट्र शासन, विधी व न्याय विभाग, शासन निर्णय क्र. सासंवि २०१३/प्र.क्र.०१/का.१६ दि.२२/१०/२०१३ अन्वये मा. मुख्यमंत्री महोदय, महाराष्ट्र राज्य यांचे अध्यक्षतेखाली कृती आराखडा समिती गठीत केलेली आहे. या समितीची बैठक शुक्रवार दि.११/१२/२०१५ रोजी विधान भवन, नागपूर येथे मा. ना. श्री देवेंद्र फडवणीस, मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे अध्यक्षतेखाली संपन्न झाली आहे.

सदर बैठकीतील चर्चेअंती सन २०१७-१८ मध्ये आयोजित करण्यात आलेल्या श्री साईबाबा महासमाधी शताब्दी वर्षाच्या तयारीकरीता संस्थानव्दारे नियोजित प्रकल्पांची रुपरेषा आणि वित्तीय भार यांची व्याप्ती पाहता सदर महोत्सवाच्या तयारीसाठी आवश्यक असणारा निधी केंद्र शासनाकडे मागणी करणारा प्रस्ताव सादर करण्यात यावा, श्री साईबाबा महासमाधी शताब्दी वर्षाच्या पूर्वतयारीकरीता मा. मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली उपसमिती गठीत करण्यात यावी, दि. ११/१२/२०१५ रोजीच्या बैठकीमध्ये देण्यात आलेल्या सुचनेनुसार कृती अराखडयामध्ये उचित बदल करुन सुधारित प्रारुप कृती आराखडयास मा. मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखालील उपसमितीची मान्यता घेण्यात यावी, मा. मुख्य सचिव उपसमितीने प्रारुप कृती आराखडयास मान्यता प्रदान केल्यानंतर अंतीम मान्यतेकरीता प्रारुप कृती आराखडा मा. मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखालील कृती आराखडा समितीसमोर सादर करणेत यावा व प्रस्ताव केंद्र शासनास सादर करणेत यावा असे ठरले आहे.

याप्रमाणे हाती घ्यावयाच्या प्रकल्पाचे स्वरुप ठरविणेसाठी सर्वांगीण अभ्यास व सर्वेक्षण करुन सविस्तर प्रकल्प अहवाल (Detailed Project Report) तयार करणेकामी मा.त्रिसदस्य समितीचे दि.२७/१०/२०१५ रोजीचे सभेतील निर्णय क्र.४०८ अन्वये Tata Consulting Engineers Limited यांची सल्लागार म्हणून रु.८७,३०,०००/- मात्र फी वर नेमणूक करण्यात आली आहे. सदर निर्णयानुसार मा. उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोरीलPIL No.18/2011 मध्ये Tata Consulting Engineers Limited यांची सल्लागार म्हणून नेमणूक करणेसाठी अदा करावयाचे रु.८७,३०,०००/- चे खर्चास परवानगी मिळणेबाबतचा सिव्हील अर्ज क्र.१६०८६/२०१५ दाखल करणेत आला. सदरहु सिव्हील अर्जावर मा. उच्च न्यायालयाने दि.१५/०१/२०१६ रोजी खालील प्रमाणे आदेश पारीत केला आहे.

*".. .. The present application is seeking permission to appoint Tata Consulting Engineers Ltd., Noida, for submitting Project Report on development of Shirdi and adjoining villages in connection with Shri Saibaba Maha Samadhi Shatabdi Mahotsav (01-10-2017 to 19-10-2018). Naturally, if the funds are received from the central Government, the applicant would spend the said funds for the said development activities as would be proposed in the Project Report. It is also submitted that the said Tata Consulting Engineers Limited has given lowest tender.*

*Considering the above, the Civil Application is allowed in terms of prayer clause "B" and the same is accordingly disposed of."*

तसेच महाराष्ट्र शासन विधी व न्याय विभाग यांनी दि. १८/०१/२०१६ रोजीचे पत्रान्वये श्री साईबाबा महासमाधी शताब्दी वर्षानिमित्त शिर्डी व लगतच्या परिसराच्या विकासाकरीता कृती आराखडा तयार करण्यासाठी सल्लागार संस्था नियुक्त केल्यानंतर त्यांना अदा करावयाची फी रक्कम रु. ८७,८३,०००/- मात्र श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डी यांच्याव्दारे अदा करणेस मान्यता दिली आहे.

त्यानुसार याकामी Tata Consulting Engineers Limited, यांना संस्थानचे जा. क्र. ५९४०/२०१६, दि.२७/०१/२०१६ रोजीचे पत्रान्वये नेमणूक आदेश देण्यात आला. तसेच याबाबत महाराष्ट्र शासन विधी व न्याय विभाग शासन निर्णय क्र. सासंवि-१०१६/२७५/प्र. क्र.४४/का.१६, दि.१६/०४/२०१६ रोजी खालीलप्रमाणे शासन निर्णय पारीत झालेला आहे.

*"श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी येथील व्यवस्थापन समितीच्या निर्णयानुसार श्री साईबाबा महासमाधी शताब्दी महोत्सव सन २०१७-१८ च्या पूर्वतयारीसाठी शिर्डी व लगतच्या परिसराच्या विकासाकरीता एकत्रित कृती आराखडा तयार करण्यासाठी सर्वात कमी देकार असलेल्या टाटा कन्सल्टींग इंजिनिअर्स लि.नोएडा यांची रु.८७,३०,०००/- इतक्या देकारावर सल्लागार म्हणून नियुक्ती करण्यास व त्यावरील खर्चास प्रशासकिय मान्यता देण्यात येत आहे. टाटा कन्सल्टींग इंजिनिअर्स लि. नोएडा यांची नियुक्ती संस्थानव्दारे*

*राबविण्यात आलेल्या निविदा प्रक्रियेतील अटी व शर्तींच्या अधीन राहून करण्यात येत असून, सदर सल्लागार यांची फी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांच्याव्दारे अनुज्ञेय राहील".*

शताब्दी महोत्सवानिमित्त उपलब्ध करावयाच्या आवश्यक सोयी-सुविधांची उभारणी करणेसाठी करावयाच्या नियोजनाबाबत मा.श्री.बाजीराव शिंदे, कार्यकारी अधिकारी यांचे अध्यक्षतेखाली दि.२१/०१/२०१६ रोजी संस्थानचे सर्व विभागांची तसेच दि. २२/०१/२०१६ रोजी सर्व शासकिय व निमशासकिय विभागांची बैठक आयोजित करुन सर्व संबंधीत विभागांना व सल्लाागार संस्थेच्या प्रतिनिधींना माहिती देण्यात आली.

तदनंतर दि.२२/०४/२०१६ रोजी मा. जिल्हाधिकारी, अहमदनगर तथा सदस्य श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचे समोर जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर येथे टाटा कन्सल्टींग इंजिनिअर्स, लि.या संस्थेचे प्रतिनिधींनी प्रारुप प्रकल्प अहवाल (Draft DPR) सादर केला. सदरचा प्रारुप प्रकल्प अहवाल संस्थानचे दि.२५/०४/२०१६ रोजीचे पत्रासोबत मा. प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग यांचेकडे सादर करणेत आला.

महाराष्ट्र शासन निर्णय क्रं. सासंवि-२०१६/प्र.क्र.३५/का.१६,दि.२०/०२/२०१६ अन्वये मा. मुख्य सचिव यांचे अध्यक्षतेखाली श्री साईबाबा महासमाधी शताब्दी महोत्सवाच्या पूर्वतयारीकरीता कृती आराखडा उप समिती गठीत करणेत आलेली आहे. या समितीचे दि.२६/०५/२०१६ रोजीचे बैठकीत प्रारुप प्रकल्प अहवालाचे सादरीकरण करणेत आले आहे.

मा.मुख्य सचिव यांचे अध्यक्षतेखालील कृती आराखडा उपसमितीचे बैठकीत ठरलेप्रमाणे नियोजित प्रस्तावांची वर्गवारी अल्प मुदतीचे प्रस्ताव व दिर्घ मुदतीचे प्रस्ताव अशा दोन घटकांत करणेत येऊन संस्थान व संबंधीत शासकिय विभागांमार्फत प्रारुप प्रकल्प अहवालामध्ये दुरुस्त्या/सुधारणा करण्यात आल्या. तसेच सदरहू सुधारित प्रकल्प अहवाल-तथा-प्रस्तावाचे सादरीकरण मा.विभागीय आयुक्त, नाशिक व मा.जिल्हाधिकारी, अहमदनगर यांचेकडे करणेत आले व त्यांचे सुचनेनुसार सदर प्रस्तावात सुधारणा करणेत आल्या आहेत. त्यानुसार सदर सुधारीत प्रस्तावाचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

**प्रकल्प अहवाल अंदाजपत्रक**

प्रथम प्राधान्य गटः-

१) श्री साईबाबा संस्थान मार्फत प्रस्तावित प्रकल्प - रु. ३००.०४ कोटी
२) विविध शासकिय विभगामार्फत प्रस्तावित प्रकल्प – रु. ३१७.४७ कोटी
एकूणः- रु. ६१७.५१ कोटी

व्दितीय प्राधान्य गटः-

१) श्री साईबाबा संस्थान मार्फत प्रस्तावित प्रकल्प - रु. १६२५.७६ कोटी
२) विविध शासकिय विभगामार्फत प्रस्तावित प्रकल्प – रु. ९४२.९० कोटी
एकूणः- रु. २५६८.६६ कोटी

प्रथम व व्दितीय प्राधान्य गट एकूण रक्कमः- रु. ३१८६.१७ कोटी

उपरोक्त प्रमाणे तयार केलेला सुधारीत प्रारुप प्रकल्प अहवाल-तथा-प्रस्तावाची प्रत सोबत अवलोकनार्थ जोडली आहे. तसेच त्याचे सादरीकरण आजचे सभेपुढे करणेत येत आहे.

तरी सदरहू प्रारुप प्रकल्प अहवाल (Draft DPR) राज्य शासनास सादर करणेस मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.५८६** **आजचे सभेसमोर प्रारुप प्रकल्प अहवाल (Draft DPR) चे सादरीकरण करणेसाठी टाटा कन्सल्टींग इंजिनिअर्स, लि. या संस्थेचे प्रतिनिधी उपस्थित होते. त्यांनी सदरहू सादरीकरण सभेस दाखविले व माहिती दिली. तसेच समितीने विचारलेल्या प्रश्नांची समर्पक उत्तरे दिली.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, तत्कालीन त्रीसदस्य समिती सभेने मंजूर केलेला प्रारुप प्रकल्प अहवाल (Draft DPR) महाराष्ट्र शासनास सादर करणेस मान्यता देण्यात आली.**

**तसेच दि.१६.१०.२०१६ रोजी मुंबई येथे मा.मुख्यमंत्री महोदय व प्रमुख पाहुण्यांचे उपस्थितीत श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सवाच्या लोगोचे अनावरण करणेत यावे. तसेच या समारंभास जगभरातील सर्व साईमंदिरांनही बोलविणेत येऊन, त्यांचे ग्लोबल सम्मीट घेण्यात यावे. या ग्लोबल सम्मीटच्या नियोजनासाठी व्यवस्थापन समितीचे उपाध्यक्ष श्री.चंद्रशेखर कदम यांचे अध्यक्षतेखाली सर्वश्री भाऊसाहेब वाकचौरे, मोहन जयकर, बिपीनदादा कोल्हे, प्रताप भोसले, सचिन तांबे या सदस्यांची ग्लोबल समिती तयार करणेत आली. तसेच संस्थानचे जनसंपर्क अधिकारी हे या समितीमध्ये असतील. या समितीने उपरोक्त कार्यक्रम पार पाडणेसाठी अनुषंगीकसर्व कामकाज पहावे, असे ठरले.**

(कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख/ जनसंपर्क अधिकारी)

---

**विषय नं.०६** **मौजे नांदुर्खी बु. ता.राहाता गट नं.३३१ व ४४६ पैकी मधील जागेत संस्थान रुग्णालयाचे नियोजीत बांधकामाबाबत.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतूद-**

१. अधिनियमाचे कलम २१ मधील पोटकलम (१) च्या खंड (क) अन्वये,मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन करण्याचे प्रयोजनासाठी समितीकडून विश्वस्तव्यवस्थेच्या निधीचा विनियोग करणे, अशी तदतूद आहे.

२. अधिनियमाचे कलम २१ मधील पोटकलम (१) च्या खंड (झ) अन्वये विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांचा विकास करणे आणि विश्वस्तव्यवस्थेच्या प्रयोजनांसाठी स्थावर किंवा जंगम मालमत्तांचे संपादन करणे.

**मा. व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णयः.**

१) मा. व्यवस्थापन समितीचे दि.१८/१०/२००८ रोजीचे सभेतील निर्णय क्र.७४८ अन्वये विषयांकीत कामाबाबत खालील प्रमाणे निर्णय झालेला आहे.

*"यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रकल्पाची व्याप्ती लक्षात घेता त्याचे कार्यान्वियन सुनियोजित पध्दतीने व सुलभरित्या होणेसाठी सर्वसाधारण खालील प्रमाणे कृती कार्यक्रम राबविण्यात यावा असे ठरले.*

*१) मौजे नांदुर्खी, राहाता येथील उपरोक्त जागा संस्थानचे नावावर करुन त्याचा ताबा घेणे, सरकारी मोजणी करणे, इ. आवश्यक ती पुर्तता करण्यात यावी.*

*२) सदर प्रकल्पाकरीता आर्किटेक्ट नेमणुकीसाठी मोठया हॉस्पीटल बांधकामातील अनुभवी व नामांकीत अशा आर्किटेक्ट सोबत माहिती घेऊन प्रस्ताव सादर करावा."*

२) मा. व्यवस्थापन समितीचे दि.०७/११/२००९ रोजीचे सभेतील निर्णय क्र.८१० अन्वये विषयांकीत कामाबाबत खालील प्रमाणे निर्णय झालेला आहे.

*"यावर सविस्तर चर्चा होऊन, TCE Consulting Engineers Ltd., New Delhi व Hosmac India Pvt. Ltd, हे उपरोक्त प्रकल्पासाठी सयुक्तरित्या सल्ला सेवा देणार आहेत. त्यांचेपैकी TCE Consulting Engineers Ltd., New Delhi हे Consortium चे Lead Member आहेत तरी त्यांचे निम्नतम दराचे फीचा प्रस्ताव स्विकारणेत येऊन, त्यांना नियुक्ती देण्यात यावी, असे ठरले."*

**प्रस्तावना**: मौजे नांदुर्खी बु. ता. राहाता येथील गट नं. ३३१ पैकी क्षेत्र १३ हे. ७३ आर व गट नं. ४४६ मधील क्षेत्र १ हे. ८७ आर असे एकूण क्षेत्र १५ हे. ६० आर इतके क्षेत्र साईबाबा संस्थानला विनामुल्य देणेचा निर्णय मौजे नादुर्खी बु. येथील समस्त ग्रामस्थांनी घेवून याबाबत ग्रामस्थांच्या वतीने श्री. अर्जुनराव विष्णू चौधरी व इतर ११ ग्रामस्थांनी सदरची जमीन संस्थानकडे हस्तांतरणाबाबत पुढील कार्यवाही करणेबाबत मा.ना.श्री.राधाकृष्ण विखे पाटील यांना निवेदन सादर केले. त्या अनुषंगाने मा. ना. श्री. विखे पाटील यांनी पत्र क्र.१९०८/८५/२००६ दि.११/०६/२००६ अन्वये पुढील कार्यवाही करणेबाबत कळविले. त्या अनुषंगाने संस्थानचे मा. व्यवस्थापन समितीचे दि.१८/०८/२००८ रोजीचे सभेतील निर्णय क्र.७४८ अन्वये मौजे नांदुर्खी बु. ता. राहाता येथील जमीनीमध्ये सुसज्ज व अद्ययावत असे सुपर स्पेशालिटी रुग्णालय उभारणे करीता कृती कार्यक्रम राबविणेत यावा असे ठरले.

त्या अनुषंगाने प्रस्तुत जमीन संस्थानला मिळणेबाबतचा प्रस्ताव मा. जिल्हाधिकारी, अहमदनगर यांनी शासनाचे मान्यतेसाठी सादर करणेकामी मा. विभागीय आयुक्त, नाशिक विभाग, नाशिक यांचेकडेस सादर केलेला असून मा. विभागीय आयुक्त, नाशिक यांनी प्रस्तुतचा प्रस्ताव त्यांचेकडील जा.क्र.मशा/कार्या-२/जमीन/१/प्रकरण क्र.४८७३१/ जा.नं.५०८८०/२०११, दि.०३/११/२०११ अन्वये महसूल व वन विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई यांचेकडे सादर करणेत आलेला आहे.

प्रस्तुत कामी मा. प्रधान सचिव, महसूल व वन विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई यांना संस्थान मालमत्ता विभागामार्फत जा.नं.४०६३/२०१५ दि.२१/१०/२०१५ अन्वये पत्र देऊन सदरचे क्षेत्र संस्थानला प्रस्तावित रुग्णालय (हॉस्पीटल) उभारणीकामी विनामुल्य उपलब्ध करुन देणेबाबत पुनःश्च विनंती केलेली आहे.

तसेच मा. प्रधान सचिव, नगर विकास, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई यांना सदरहू क्षेत्र हे हरीत क्षेत्रातुन ( ग्रीन झोन) वगळून रहिवाशी क्षेत्रात समाविष्ट करणेबाबत कार्यवाही करणेकामी संस्थान मालमत्ता विभागाने जा.नं.४०६४/ २०१५ दि.२१/१०/२०१५ अन्वये विनंती केली आहे.

तसेच मा. संचालय, आरोग्य सेवा संचानालय, मुंबई यांचेकडेस सदरहू क्षेत्राचे संबंधात सकारात्मक अभिप्राय यथोचित अहवालासह सादर करणेकामी मा. जिल्हा शल्य चिकित्सक, सामान्य रुग्णालय, अहमदनगर यांना संस्थान मालमत्ता विभागाने जा.नं.४०६५/२०१५ दि.२१/१०/२०१५ अन्वये विनंती करण्यात आलेली आहे.

तसेच याकामी मा. कार्यासन अधिकारी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई यांना देखील मालमत्ता विभागाने जा. नं.६२१६/२०१६ दि.१०/०२/२०१६ अन्वये त्यांचेमार्फत महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडे लेखी पत्रव्यवहार करणेकामी विनंती करण्यात आलेली आहे.

विषयांकीत प्रकल्पाचे बांधकाम मौजे नांदुर्खी ता. राहाता येथील गट नं. ३३१ व ४४६ मधिल सुमारे ४२ एक क्षेत्रात करणेकामी नियोजित रुग्णालयाची क्षमता, स्वरुप, रुग्णांसाठी उपलब्ध करावयाच्या विविध प्रकारच्या सेवा इत्यादी अनुषंगिक गरजा निश्चीत करुन त्यासाठी नामांकीत व अनुभवी अशा तज्ञ हॉस्पीटल कन्सल्टंटची नेमणूक करणेसाठी सदरहू प्रकल्पाचे नकाशे तयार करणेसाठी प्रोजेक्ट मॅनेजमेंट कन्सल्टंटची नेमणूक करणे बाबतचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे दि. १८ ऑक्टोबर, २००८ रोजीचे सभेत सादर करणेत आला होता. सदरहू सभेत मौजे नांदुर्खी येथील जागा संस्थानचे नावावर करुन त्याचा ताबा घेणे, सरकारी मोजणी करणे, तसेच याकामी या क्षेत्रातील अनुभव असणा-या आर्किटेक्ट / सल्लागाराची नेमणूक करणेस मान्यता देण्यात आली होती.

मा. व्यवस्थापन समितीचे वर नमूद निर्णयानुसार मौजे नांदुर्खी ता. राहाता येथील गट नं. ३३१ व ४४६ मधिल १५ हे ६० आर क्षेत्रात नियोजित रुग्णालयाचे बांधकाम करणेकामी मा. व्यवस्थापन समितीचे दि.०७/११/२००९ रोजीचे सभेतील निर्णय क्र.८१० अन्वये सदरहू प्रकल्पासाठी TCE Consulting Engineers Ltd., New Delhi यांना इकडील जा.नं.१४८५७/२००९, दि.०३/१२/२००९ अन्वये सल्लागार म्हणून नेमणूक आदेश देण्यात आलेला आहे.

त्यानुसार सल्लागार यांनी ६०० बेड सुपरस्पेशालिटी हॉस्पीटल व नर्सिंग कॉलेज करणेचा प्रस्ताव तयार केला नियोजित रुग्णालयात प्रामुख्याने खालील सुविधा उपलब्ध करुन देण्यात येणार आहे.

- Super spciality services like plastic surgey, pediatric surgery, Neurology, chest medicine, Cardiology, Trauma, Nephraology, etc.
- Multispecialty like general medicine, General surgery, Obst.& Gynaec, paediatrics, ENT, Ophtalmic, general Orthopaedics, Allieded Systems like Ayurveda & Homeopathy, etc.
- Nursing college for 100 Seats per year.
- Residential facilities for doctors and staffs.
- Dormitory for patients relatives.

वरीलप्रमाणे सुविधा निर्माण करणेसाठी एकूण ४,१४,५२३ चौ. फुट क्षेत्रफळाचे बांधकाम प्रस्तावीत आहे. उपरोक्तप्रमाणे हॉस्पीटल उभारणेसाठी सल्लागार यांनी सन २०११ -२०१२ मध्ये रक्कम रु.२४५ कोटी मात्रचे ढोबळ अंदाजपत्रक सादर केले होते.

"आता उपरोक्त संदर्भीय पत्रान्वये श्री संजय भास्करराव काळे, यांनी मा. अध्यक्ष व जिल्हाधिकारी सो. यांना अग्रेषित केलेल्या पत्रात नमूद केले आहे की, संस्थानचे रुग्णालयाचे विस्तारीकरण शिर्डी गावातच श्री. साईबाबा रुग्णालय, श्री साईनाथ रुग्णालय, श्री साईधर्मशाळा, श्री द्वारावती भक्त निवास हया सर्व इमारती बहुमजली करुन १००० बेडचे हॉस्पीटल आ.क्र.३९ सह वरील सर्व जागांमध्ये निर्माण करावे. श्री साई बाबांच्या आकरा वचनातील पहिले वचनाचे स्मरण करुन शिर्डीतच दवाखान्याचे विस्तारीकरणे करावे. दवाखाना शिर्डी बाहेर नेऊन बाबांच्या वचनाला, भक्तांच्या / रुग्णाच्या श्रध्देला तडा देऊ नये. तसेच महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाचा शासन निर्णय क्र. टि.पी.एस. १८१४/सं/प्र.क्र.१२०/१४ नवि.१३ दि.०५/०३/२०१५ चा फायदा घ्यावा" असे कळविले आहे.

संस्थान मालकीचे मौजे शिर्डी येथील आरक्षण क्र.३४ व ३९ बाबत माहीतीचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ.नं. | आरक्षण क्रं. | क्षेत्रफळ | प्रयोजन | प्रकरणाची सद्यस्थिती |
|---|---|---|---|---|
| १ | ३४ (सर्व्हे | ६.०० हे. (एकूण | रुग्णालय विस्तारी | याप्रकरणी भुसंपादनाची कार्यवाही पूर्ण झालेली असून भुसंपादन निवाडा क्र १४/२००० अन्वये दि.२४/०४/२०१५ रोजी उपविभागीय अधिकारी, शिर्डी |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | नं.१२४, १२५, १२६ पैकी) | आरक्षीत क्षेत्रफळ) पैकी भुसंपादन करावयाचे क्षेत्र ६९ आर ०३ चौ.मी. | करणासाठी | यांनी निवाडा घोषीत केलेला असून, संबंधित खातेदारांना ताबा देणेबाबत भुसंपादन कायदा कलम १६ खालील नोटीसा त्यांचेमार्फत बजाविण्यात येऊन ताबा देणे घेणेची तारीख दि.२९/०४/२०१५ ही निश्चीत करणेत आली होती. त्याप्रमाणे सदर तारखेस भुमि अभिलेख, राहाता यांचे परिरक्षण भुमापक यांनी त्यांचेकडील संयुक्त मोजणी नकाशाप्रमाणे हद्दी खुणा निश्चीत केल्याची कार्यवाही केल्यानंतर मा. उप विभागीय अधिकारी, शिर्डी यांनी सदर तारखेस एकतर्फी ताबा घेतलेला आहे. मात्र उपविभागीय अधिकारी, शिर्डी यांचेकडून संस्थानला अद्यापपावेतो भूसंपादीत क्षेत्राचा ताबा मिळालेला नाही. |
| २ | ३९ | ४ हे ५४ आर १८ चौ.मी. | संस्थानचे विविध उपक्रमांसाठी | मा.उप विभागीय अधिकारी, शिर्डी यांनी दि.३१/१०/२०१४ रोजीचे पत्रान्वये सदरहू क्षेत्र भूसंपादीत करणेकामी रक्कम रु.१५.९७,११,५९१/- मात्रची मागणी केली होती. मा. व्यवस्थापन समितीचे दि.१८/०२/२०१५ व मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांचे दि.०७/०८/२०१५ रोजीचे आदेशान्वये सदरहू रक्कम उपविभागीय अधिकारी, शिर्डी यांचेकडे जमा करणेस मान्यता दिली आहे. त्यानुसार दि.२९/०९/२०१५ रोजी सदरहू रक्कम उपविभागीय अधिकारी यांचेकडे जमा करणेत आली आहे.<br>प्रस्तुत प्रकरणात मा. उपविभागीय अधिकारी, शिर्डी यांनी प्रारुप निवाडा तयार केला असून, मा.जिल्हाधिकारी, अहमदनगर यांचेकडेस मान्यतेसाठी त्यांचेमार्फत पाठविण्यात येणार आहे. तथापी डॉ. संतोषकुमार मानकचंद लोढा यांनी मा. उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांचे कोर्टात रिट पिटीशन नं.२०४०/२०१४ अन्वये दाखल केले असून, मा. उच्च न्यायालयाने निवाडा घोषित करणेवर मनाई आदेश दिला आहे. |

वर नमूद केले प्रमाणे शिर्डी नगरपंचायत हद्दीतील आरक्षण क्र.३४ हे संस्थान रुग्णालय विस्तारीकरणासाठी आरक्षीत आहे. सदरहू आरक्षीत क्षेत्रफळापैकी ०३ हे ६० आर क्षेत्रफळ सध्या संस्थानचे ताब्यात आहे. तसेच उर्वरीत ६९ आर ०३ चौ. मी. क्षेत्रफळ भुसंपादनाची कार्यवाही सुरु आहे. श्री संजय काळे, यांचे मागणीप्रमाणे संस्थानचे नियोजीत रुग्णालय शिर्डी मधील जमीनीत विकसीत करणेबाबत धोरणात्मक निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.५८७** **यावर सविस्तर चर्चा होऊन असे ठरले की, संस्थान रुग्णालय १००० बेडचे करावे असे समितीचे मत आहे. त्यासाठीचा सविस्तर प्रस्ताव प्रथमत: रुग्णालय उपसमिती सभेसमोर विचारार्थ सादर करणेत यावा.** (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**विषय नं.०७** **शिर्डी विकास योजना, प्रादेशिक विकास योजना (सुधारीत) बाबत.**

**प्रस्ताव-** नगररचना अधिकारी, शिर्डी विकास योजना (सुधारीत) तथा प्र.सहायक संचालक, नगररचना अहमदनगर यांनी दि.१०/१२/२०१५ व दि.२९/१२/२०१५ रोजीचे पत्रान्वये खालील प्रमाणे कळविले आहे.

*"...शिर्डी नगरपंचायतीने उक्त अधिनियमाचे कलम ३८ सह कलम २३(१) अन्वये तिच्या क्षेत्राधिकारातील प्रदेशासाठी सुधारीत विकास योजना तयार करण्याचा इरादा जाहिर केला आहे. शिर्डी नगरपंचायतीने सदर विकास योजना तयार करण्यासाठी खाली सही करणार यांची नियुक्ती दि.१५/०७/२०१५ च्या आदेशाने केलेली आहे. ....*

*... शिर्डी क्षेत्राच्या विकास योजनेमध्ये आपल्या विभागास जागेची आवश्यकता असल्यास आपल्या विभागाची पुढील २० वर्षात होणारी वाढ विचारात घेवून आवश्यक क्षेत्र सर्व्हे नंबर इत्यादिंसह प्रस्ताव नकाशांसह या कार्यालयास पाठवावा. नमूद करण्यात येते की, आपल्या विनंतीनुसार विकास योजनेत सार्वजनिक प्रयोजनांसाठी नामोनिर्दिष्ट केलेली जागा मंजूर झालेली विकासयोजना अंमलात आल्याचे तारखेपासुन १० वर्षाचे आत संपादन करणेची संपुर्ण जबाबदारी आपणावर राहील. तसेच अशा आशयाचे रु.१००/- च्या स्टॅम्पपेपरवर बंधपत्र करून देणे आवश्यक राहील..*

सबब, आपल्या विभागास जागेची आवश्यकता असल्यास तसा प्रस्ताव आवश्यक त्या कागदपत्रांसह १५ दिवसात या कार्यालयास पाठविण्यात यावा. अन्यथा आपली काही एक सुचना नाही, असे गृहीत धरून पुढील कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी. "

संस्थानला भविष्यात भक्तोपयोगी विविध विकासकामे करणेसाठी जागेची आवश्यकता असल्याने उपरोक्त पत्राचे अनुषंगाने नगररचना अधिकारी, शिर्डी विकास योजना (सुधारीत) तथा प्र.सहायक संचालक, नगररचना अहमदनगर यांचेकडे जागांचे आवश्यक्तेबाबत प्रस्ताव सादर करणे आवश्यक आहे. तसेच विकास योजना अंमलात आल्याचे तारखेपासुन १० वर्षाचे आत जागा संपादन करणेची संपुर्ण जबाबदारी संस्थानची असलेबाबतचे स्टॅम्पपेपरवर बंधपत्र करून द्यावे लागणार आहे. याकामी संस्थानचे मालमत्ता विभागाकडून दि.१२/०१/२०१६ रोजीचे पत्राने माहिती मागविली असता त्यांनी खालीलप्रमाणे माहिती सादर केली आहे.

१.शिर्डी नगरपंचायत हद्दीतील संस्थान मालकीच्या जमिनींचा तपिशल – सर्वे नं. , क्षेत्र ,७/१२ उतारे.

२. संस्थानमार्फत सादर करणेत आलेले भूसंपादनाबाबतची माहिती व सद्यस्थिती

३. संस्थानमार्फत नियोजित भूसंपादन/खरेदी प्रस्ताव याबाबत संस्थानकरिता आरक्षित क्षेत्राची माहिती

४. संस्थानला भविष्यात लोगणा-या जागेची आवश्यकता – (अ.नं.३ प्रमाणे)

५. विद्यमान शिर्डी विकास योजनेतील संस्थानने विकसित करावयाच्या आरक्षित जमिनींचे सद्यस्थितीबाबतचा तपशिल-

(अ.नं.३ मध्ये नमूद केलेला आहे.)

अ) श्री साईबाबा संस्थान शिर्डी यांचेकरिता चालू असलेली भूसंपादन प्रकरणे खालीलप्रमाणे आहेत

| अ. क्र. | एलएक्यु/ एसआर | सर्वे नं./गाव | क्षेत्र हे.आर | भूसंपादन | सद्यस्थिती |
|---|---|---|---|---|---|
| १ | १०/२००० | १४८/१ पै – शिर्डी | ४.५९.५० पो.ख. ०.१६ एकूण ०४.७५.५० | धर्मशाळा विविध उपक्रमांसाठी भूसंपादन | उपविभागिय अधिकारी, शिर्डी यांचेकडे रु.८,४२,४९,३७५/- रक्कम जमा करणेत आली असुन कलम ६ ची दुरुस्त अधिसुचना मंजुरी व प्रसिद्धीसाठी विभागीय आयुक्त, नाशिक यांचेकडे दि.२८/०१/२०१५ रोजी उपविभागिय अधिकारी, शिर्डी यांचेमार्फत अहवाल सादर करणेत आला आहे. दि.१३/०८/२०१५ रोजी अंतिम निवाडा घोषित करणेत आला आहे. प्रकरणी दि.२७/०८/२०१५ रोजी शासनाने एकतर्फा ताबा घेतला आहे. भूसंपादन संस्थेस ताबा दिलेला नाही. क.जा.प. केलेले आहे. प्रकरणी सर्वोच्च न्यायालयात दावा प्रलंबित आहे. |
| २ | १४/२००० | १२५/१२६ पै – शिर्डी | ६९०३ चौ.मी | दवाखाना विस्तारीकरणा साठी भूसंपादन आ.क्र.३४ | यापुर्वी आ.क्र.३९ मध्ये जमा करणेत आलेली रक्कम रु.५,६०,५८,२५२/- आ.क्र.३४ मधील भूसंपादनाकरिता वर्ग करणेत आली निवाडा दि.२४/०४/२०१५ रोजी घोषित करणेत आलेला आहे. संस्थानला अद्यापपर्यंत ताबा दिलेला नाही. क.जा.प. केलेले आहे. |
| ३ | १६/२००० | १२४/१२६ पै – शिर्डी | ०४.५४.१८ | विविध मांसाठी भूसंपादन | उपविभागिय अधिकारी, शिर्डी यांचेकडे रु.१५,९७,११,५९१/- रक्कम जमा करणेत आली. सुधारीत प्रारुप निविडा करुन मान्यतेसाठी मा.जिल्हाधिकारी, अहमदनगर यांचेकडे १६/०१/२०१६ रोजी सादर केलेला आहे. मा. उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद येथे रिट पिटीशन क्र.२०४०/२०१४ अन्वये केस चालू आहे. दि.१०/०३/२०१४ रोजीच्या नोटीशीत नमूद केले आहे की, जर निवाडा घोषीत केलेला नसेल तर पुढील आदेश होईपर्यंत निवाडा घोषीत करुन नये तसेच रिट पिटीशन क्र.२०८४/२०१६ अन्वये व रिट पिटीशन क्र.३३०/२०१५ अन्वये मा. उच्च न्यायालयात दावा प्रलंबित आहे. |

ब) शिर्डी शहर हद्दीत संस्थान करिता विद्यमान विकास योजनेत आरक्षीत असलेल्या क्षेत्राची माहिती-

| अ. क्र. | आरक्षण क्रमांक | आरक्षणाचा हेतू | सर्वे नं./गाव | क्षेत्र हे. आर | सद्यस्थिती |
|---|---|---|---|---|---|

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १ | ८ | प्राथमिक शाळा व क्रीडांगण | स.नं.६ पै. सि.स.नं.९००पै. सि.स.नं.९०१पै. सि.स.नं.९०२पै. | ०.५८ | भूसंपादन कार्यवाही पूर्ण |
| २ | ११ | मंदिर विस्तारीकरण | सि.स.नं.५,६ ,७ सरकारी जागा | ०.००३२ | उपसंचालक, नगररचना, नाशिक यांनी दि. २७/१२/२००१ चे पत्राने आ.क्र.११ मंदिर विस्तारीकरणसाठी आरक्षित असलेली सदर जागा प्रत्यक्षात रस्त्यापैकी असल्याचे विकास योजना नकाशावरून दिसून येते. या ३२ चौ.मी. इतक्या अत्यल्प क्षेत्राची संस्थानला आवश्यकता असल्यास मालकी हक्काबाबत खातरजमा करून सदर जागा हस्तांतरीत करून घ्यावी. सदर आरक्षण सि.स.नं.५,६,७ विकास योजना अहवालात चुकीने दर्शविले असून विकास योजना अहवालात दुरुस्ती करणेबाबत त्यांनी नगरपंचायतीस कळविले आहे. |
| ३ | १२ | मंदिर विस्तारीकरण | मंदिराचे उत्तरेकडील बाजू | ०.०१४ | |
| ४ | १३ | उद्यान १३ अ - उद्यान १३ ब – शॉपिंग सेंटर | स.नं.१/२ | ०.२० | मा. सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली यांचे आदेशानुसार उपविभागीय अधिकारी यांचेमार्फत कार्यवाही करणेत येत आहे. |
| ५ | २३ | बेघरांसाठी घरे | स.नं.५४/५५ पै. | १.८९ | स.नं.५४/५५ पै. एकूण २ हे. संस्थानने खरेदी केले आहे. |
| ६ | ३४ | रुग्णालय विस्तारीकरण | स.नं.१२५, १२६,१२४ पै. | ६.०० | भूसंपादन क्षेत्राच्या हद्दीखुणा निश्चित करणेत आल्या असुन अद्याप ताबा मिळणे बाकी आहे. |
| ७ | ३९ | संस्थान कामांकरिता | स.नं.१२४,१२५, १२६ पै. सि.स.नं.९३८, ९३१ ते ९३४ | ५.८१ | आ.क्र.३९मधिल क्षेत्र ४.५४.१८ चौ.मी क्षेत्र भूसंपादन करणेकामी उपविभागिय अधिकारी, शिर्डी यांचेकडे रु.१५,९७,११,५९१/-रक्कम जमा करणेत आली. |
| ८ | ४० | धर्मशाळा इमारत | स.नं.१४८,१५०, १४९ पै. सि.स.नं. ९३३,९३४ ते ९३१ | १.५१ | -- |
| ९ | ४१ | टपरीधारकांचे पुनर्वसन | स.नं.१४९ ते, १५०पै. सि.स.नं. ९३३, ९३४,९३१ | ०.४५ | श्री साईबाबा संस्थान व शिर्डी नगरपंचायत विकसन संस्था असलेने भूसंपादन प्रस्ताव दाखल करणेस विनाशर्त मान्यता देणेबाबत शिर्डी नगरपंचायत यांना दि२३/०६/२०१५ चे पत्राने कळविण्यात आले आहे. |

ब) शिर्डी (बिरेगांव) सुधारीत विकास आराखड्यात संस्थान करिता आरक्षित असलेल्या क्षेत्राची माहिती-

| अ.क्र. | आरक्षण क्रमांक | आरक्षणाचा हेतू | सर्वे नं./गाव | क्षेत्र हे.आर | सद्यस्थिती |
|---|---|---|---|---|---|
| १ | १ | पार्कींग | २०७ पै.,२०८पै., २१५ ते २१९ पै. | ०२.५९.०० | -- |
| २ | २ | मनोरंजन पार्क | २०५ पै., २०६पै., | ०२.९७.०० | -- |
| ३ | ४ | वृद्धाश्रम | २२१पै. ते २२३ पै., | ०१.००.०० | -- |
| ४ | ७ | संस्थान हेतू | २०२ पै. २०३ पै., | ०२.००.०० | स.नं.२०३ पै. क्षेत्र १.२० आर इतके क्षेत्र दि.३१/१२/२०१५ रोजी संस्थानने खरदी केले आहे. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ५ | २२ | शैक्षणिक कारणांसाठी | १९५ पै. १९६ पै., २१२ पै. २१३ पै., | ०६.५५.०० | स.नं.२१२ पै. क्षेत्र १.४०आर इतके क्षेत्र दि.३१/१२/२०१५ रोजी संस्थानने खरेदी केले आहे. तसेच स.नं.२१३ पै. क्षेत्र ०.७७ आर इतके क्षेत्र दि.३१/१२/२०१५ रोजी संस्थानने खरेदी केले आहे. |

उपरोक्तप्रमाणे संस्थानचे विविध उपक्रमासाठी असलेले आरक्षण सुधारीत विकास योजनेतही कायम ठेवणे आवश्यक असून खालील प्रयोजनांसाठी आणखी काही नवीन क्षेत्रांसाठी आरक्षण प्रस्तावीत करणे गरजेचे आहे.

| अ.क्र. | आरक्षणाचा हेतू | क्षेत्र | अपेक्षित अंतर/ परिसर |
|---|---|---|---|
| १ | श्री साईदर्शनासाठी वेगवेगळया भागातून पायी येणारे साईभक्तांचे निवास व इतर अनुषंगिक व्यवस्था करणेकामी पालखीग्राम साठी क्षेत्र आरक्षित करणे. | ५.०० हेक्टर | शिर्डी – समाधी मंदिरापासून अंदाजे १ कि.मी. अंतरापर्यंत |
| २ | वाहनतळांसाठी ठराविक अंतरावर वेगवेगळया ठिकाणी क्षेत्र आरक्षित करणे. तसेच मल्टीलेव्हल पार्कींगसाठी वेगवेगळया ठिकाणी क्षेत्र आरक्षित करणे. | प्रत्येकी २.०० हेक्टर | शिर्डी – समाधी मंदिरापासून अंदाजे १ कि.मी. अंतरापर्यंत पाच ठिकाणी रस्त्यालगत |
| ३ | सध्या होणारी गर्दी, त्यामुळे येणाऱ्या अडचणी तसेच सुरक्षेच्या दृष्टीने गुरुस्थान, द्वारकामाई, श्री समाधी मंदीर व चावडी या मंदिरांचे सुलभ दर्शनासाठी एकत्रित दर्शन रांगेचे नियोजनासाठी तसेच रथपालखी मिरवणूकीचे गर्दीचे नियोजनासाठी दक्षिणेकडील बाजूस अतिरिक्त जागा उपलब्ध करणेसाठी क्षेत्र आरक्षित करणे. | - | शिर्डी – समाधी मंदिर दक्षिण बाजू. |
| ४ | मंदिर परिसरालगत संभाव्य दुर्घटना टाळणे व गर्दीसाठी (Refuge area) अतिरिक्त जागा उपलब्ध करणे. | - | शिर्डी – समाधी मंदिर परिसरालगत |
| ५ | सर्व्हे नं.५४/५५ मधील आरक्षित क्षेत्राचा संस्थानचे विविध उपक्रमांसाठी भूसंपादन असा हेतू बदल करणं | - | - |
| ६ | शिर्डी परिसरात वेगवेगळ्या ठिकाणी गार्डनसाठी क्षेत्र आरक्षित करणे. | प्रत्येकी २.०० हेक्टर | शिर्डी- समाधी मंदिरापासून अंदाजे २ कि. मी. अंतरापर्यंत |
| ७ | शिर्डी परिसरात वेगवेगळ्या ठिकाणी भक्तनिवाससाठी क्षेत्र आरक्षित करणे. | प्रत्येकी २.०० हेक्टर | शिर्डी- समाधी मंदिरापासून अंदाजे २ कि. मी. अंतरापर्यंत |
| ८ | शिर्डी परिसरात वेगवेगळ्या ठिकाणी संस्थानचे बससेवेचे बस थांब्यासाठी क्षेत्र आरक्षित करणे. | प्रत्येकी ५.०० आर | शिर्डी- समाधी मंदिरापासून अंदाजे २ कि. मी. अंतरापर्यंत पाच ठिकाणी |
| ९ | माहिती व सुविधा केंद्रासाठी शिर्डी शहराचे चारही बाजूने मुख्य रस्त्यालगत क्षेत्र आरक्षित करणे. | प्रत्येकी ५.०० आर | शिर्डी- समाधी मंदिरापासून अंदाजे २ कि. मी. अंतरापर्यंत पाच ठिकाणी |
| १० | प्राथमिक व माध्यमिक शाळांसाठी शहरात किमान दोन ठिकाणी क्षेत्र आरक्षित करणे. | प्रत्येकी २.०० हेक्टर | शिर्डी- समाधी मंदिरापासून अंदाजे २ कि. मी. अंतरापर्यंत |
| ११ | संस्थानचे प्रस्तावीत पाणीपुरवठा, वितरणव्यवस्था, शुद्धीकरण यंत्रणा घनकचरा व्यवस्थापन वॉटर रिसायक्लींग इत्यादी साठी क्षेत्र आरक्षित करणे. | प्रत्येकी २.०० हेक्टर | शिर्डी – समाधी मंदिरापासून अंदाजे २ कि.मी. अंतरापर्यंत दोन ठिकाणी |
| १२ | संस्थानमार्फत खरेदी करणेत आलेल्या क्षेत्रांचे संस्थानचे विविध उपक्रमांसाठी आरक्षण करणे व झोनबदल करणे. | - | - |

तरी पुर्वीचे आरक्षणांसह वर नमूद नवीन क्षेत्रांसाठी संस्थान करीता आरक्षण प्रस्तावीत करणेबाबत नगररचना अधिकारी, शिर्डी विकास योजना (सुधारीत) तथा प्र.सहायक संचालक, नगररचना, अहमदनगर यांना कळविणेस मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.५८८** **शिर्डी विकास योजना, प्रादेशिक विकास योजना (सुधारीत) बाबतच्या उपरोक्त प्रस्तावामधील आरक्षणाचे समितीने अवलोकन केले व आरक्षण आणि भू-संपादन याबाबतची माहिती घेतली तसेच कायदेविषयक बाबी समजून घेतल्या.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, पुर्वीचे आरक्षणांसह उपरोक्त नमूद नवीन क्षेत्रांसाठी संस्थान करीता आरक्षण प्रस्तावीत करणेबाबत नगररचना अधिकारी, शिर्डी विकास योजना (सुधारीत) तथा प्र.सहायक संचालक, नगररचना, अहमदनगर यांना कळविणेस मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**विषय नं.०८** **मा.कार्यकारी अधिकारी यांचे दालनात कॉम्प्युटर टेबल तयार करणेबाबत.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम, २००४ मधिल तरतूद:**

अधिनियमाचे कलम-२१ (१) मधिल पोटकलम (क) अन्वये, "मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन करणे" अशी तरतूद आहे.

**प्रस्तावना:** मा.कार्यकारी अधिकारी यांचे दालनात स्वीय सहाय्यक व क्लार्क यांची बसण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. सदर टेबल लोखंडी व त्यावर लॅमिनेटेड प्लाय टॉप बसविलेला आहे. मा.कार्यालयात विविध विभागाचे प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांचे मान्यतेसाठी येत असतात. सदर ठिकाणी व्यवस्थित नोंदणी काउंटर व टेबल नसल्याचे, इतर कर्मचारी त्याठिकाणी पॅड उचकतात. त्यामुळे सदर ठिकाणी नकाशात दर्शविले प्रमाणे सेमी हाईटचे काउंटर तयार करणे गरजेचे आहे. स्वीय सहाय्यक व क्लार्क यांचे करीता टेबल व सेमी हाईट काउंटर तयार करण्याची मा. कार्यकारी अधिकारी यांनी कळविले आहे.

**प्रस्ताव–** उपरोक्त विषयांकीतकामी खालील तपशिलाप्रमाणे मटेरीअलची आवश्यकता आहे.

| Sr.No | Description | Qty | Unit | Rate | Amount |
|---|---|---|---|---|---|
| 01 | 18 mm Commercial plywood (Anchor, Century) Size- 8'x4' | 07 | No | 2700/- | 18,900/- |
| 02 | 8 mm Commercial ploywood (Anchor, Century) Size- 8'x4' | 01 | No | 1500/- | 1500/- |
| 03 | S.S. Handle – 4" | 15 | No | 60/- | 900/- |
| 04 | Drawer Lock (Computer key) Godrej | 07 | No | 250/- | 1750/- |
| 05 | White Laminate – 1.0 mm thk (Merino, Century, Green lam etc.) | 03 | No | 1200/- | 3600/- |
| 06 | Laminate -1.5 mm thk (Merino, Century, Green lam etc.) | 04 | No | 1400/- | 5600/- |
| 07 | 1"x1/4" B.T.C patti | 150 | RFT | 10/- | 1500/- |
| 08 | S.S. But Bijagiri – 4 ½"x3/4" | 12 | No | 50/- | 600/- |
| 09 | Fevicoal | 05 | Kg | 250/- | 1250/- |
| 10 | S.R. Fevicol | 01 | Lit | 450/- | 450/- |
| 11 | Abro Tape | 05 | No | 40/- | 200/- |
| 12 | 19 No Takes | 01 | Kg | 100/- | 100/- |
| 13 | 1 ½" & 2" Tar chuk | 04 | Kg | 100/- | 400/- |
| 14 | 19x6 screw (S S) | 200 | No | 0.50 | 100/- |
| 15 | Drawer Runner 12", = 08 Nos<br>24" = 02 Nos | 288 | Inch | 20/- | 5760/- |
| 16 | 12 mm thk Table Glass with Moulding | 24 | Sq. ft | 190/- | 4560/- |
| 17 | 12 mm thk Counter Glass (Front Elevation) with moulding | 11.25 | Sq.ft | 190/- | 2137/- |
| | | | | **Total Rs.** | **49,307/-** |

उपरोक्त तपशिलाप्रमाणे सदरकामी मटेरीअल खरेदीकामी रु.49,307/- मात्र इतका खर्च अपेक्षीत आहे. तरी येणा-या खर्चास व सदरचे मटेरीअल विहीत पध्दतीने कोटेशन मागवून खरेदी करणेस व सदरचे काम इकडील विभागामार्फत करण्यास मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.५८९** **यावर सविस्तर चर्चा होऊन, मा.कार्यकारी अधिकारी यांचे दालनात कॉम्प्युटर टेबल तयार करणेकामी प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे साहित्य विहीत पध्दतीने कोटेशन मागवून खरेदी करणेस व त्याकामी येणाऱ्या अंदाजे रु.४९,३०७/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**विषय नं.०९** **सभाकामकाज विभागाकरीता ॲल्युमिनीअम पार्टीशनमध्ये कॅबीन तयार करणेबाबत.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतूदः-**

अधिनियमाच्या कलम २१ मधिल पोटकलम (१) च्या खंड (क) अन्वये, "मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन करणे" या प्रयोजनासाठी विश्वस्तव्यवस्थेचा निधी समितीकडून खर्च करण्याची तरतुद आहे.

**प्रस्तावनाः-** शांतीनिवास इमारतीचे रुम नं.५३ मध्ये सभा कामकाज विभागाचे कार्यालय कार्यरत आहे. सभाकामकाज विभागाचे महत्त्वाचे कागदपत्रे ऑफीसमध्ये असतात, सदरची महत्त्वाची कागदपत्रे अधिक्षक यांचेसाठी स्वतंत्र केबीन तयार केल्यास त्यामध्ये ठेवता येतील. त्यासाठी स्वतंत्र केबीन तयार करुन मिळणेबाबत अधिक्षक, सभाकामकाज विभाग यांनी दि.२३/०७/२०१६ रोजीचे पत्रान्वये कळविले आहे.

प्रस्तावः- उपरोक्त बाबींचा विचार करता सदर कार्यालयाचे पश्चिम दक्षिण कोपऱ्यात दोन बाजूस ॲल्युमिनीअम पार्टीशन तयार करुन त्यास दरवाज्या बसविता येईल. याकामी खालीलप्रमाणे खर्च अपेक्षित आहे.

| Sr. No. | Description | Qty. | Unit | Rate | Amount |
|---|---|---|---|---|---|
| 01 | Providing and fixing in position powder coating extruded alluminium partition having frame made out of alluminium extruded tubular section of size 65mm *40mm with 12mm thk. Three layered flat pressed T.W. particle board bonded with BWP type exterior grade phenol formaldehyde synthetic resin confirming to IS 12823-1990. Laminated on both sides, novateak or equivalent or equivalent, as per approved detailed drawings etc. complete. | 11.41 | Sqm. | 2576/- | 29392.16 |
| 02 | Providing and fixing in position single shuttered alluminium extruded power coating door with alluminium door frame of powder coated section 101.6mmx44.75mm,3.18mm tk. and shutter comprising of powder coated section having bottom and lock rail of size 150mmx44.45mm, 2.9mm tk. top rail 47.62mm x 44.45mm, 3.18mm tk.vertical styles 47.62x 44.45mm, 3.0mm tk. and 12mm tk. both side laminated phenol bonded particle board panels for shutter, tubular door closer or heavy duty having I.S.I. mark, heavy duty concealed lock, necessary beading glazing clips, pvc gaskets, tower bolts etc. complete as per design & drawing. | 1.782 | Sqm. | 3000/- | 5346.00 |
| 03 | Tubular door Closer of heavy duty having I.S. Mark. | 01 | Nos. | 1700/- | 1700.00 |
| | | | | Total | 36,438.16 |
| | | | | **R/O – Total Amount** | **36,438.00** |

सदर कामासाठी उपरोक्त तपशिलाप्रमाणे अंदाजे रु. ३६,४३८/- मात्र इतका खर्च अपेक्षीत आहे. सदरचे काम स्थानिक पुरवठाधारक यांचेकडून दरपत्रके मागवून करता येईल.

तरी विषयांकीत कामासाठी उपरोक्त अंदाजपत्रकात नमूद केलेप्रमाणे अंदाजे रु.३६,४३८/- मात्रचे अपेक्षीत खर्चास मंजूरी मिळणेस व सदरचे काम करणेसाठी स्थानिक पुरवठाधारक यांचेकडून विहीत पध्दतीने सिलबंद कोटेशन्स / दरपत्रके मागविणेस मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.५९०** **यावर सविस्तर चर्चा होऊन, सभाकामकाज विभागाकरीता ॲल्युमिनीअम पार्टीशनमध्ये कॅबीन तयार करणेकामी प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे साहित्य विहीत पध्दतीने कोटेशन मागवून खरेदी करणेस व त्याकामी येणाऱ्या अंदाजे रु.३६,४३८/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**विषय नं.१०** **राज्य शासनाकडील कर्मचा-यांप्रमाणे संस्थान कर्मचाऱ्यांना पदाचे वर्गीकरण करणेबाबत.**

**प्रस्ताव-** शासनाचे विधी व न्याय विभाग, शासन निर्णय क्र.सासंवि-२००९/४३३/(३७/०९) का.सोळा, मंत्रालय, मुंबई-३२ दि.०७ ऑगस्ट, २००९ चे आदेशान्वये श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीचे आस्थापनेवरील ४८२६ (स्थायी व कंत्राटी) पदांना मान्यता दिलेली आहे. त्यात विविध हुद्यांची व वेतनश्रेणीतील पदे मंजुर आहेत.

तसेच शासनाचे विधी व न्याय विभागाकडील शासन निर्णय क्र.सासंवि-२०१२/प्र.क्र.१९/पुनर्बांधणी-७/का.सोळा, मंत्रालय, मुंबई-३२ दि.२८ ऑक्टोबर, २०१३ नुसार शासनाने संस्थान अधिनियम, २००४ मधील तरतुदीनुसार संस्थानचे विविध विनियमांना मान्यता दिलेली आहे. सदरचे विनियम संस्थानसाठी जा.नं.एसएसएस/साप्रशा/ आस्था/ ४४६०/२०१४ दि.२७ डिसेंबर, २०१४ चे आदेशान्वये दि.०१/०१/२०१५ पासून लागू करणेत आलेले आहेत. त्यातील सर्वसाधारण सेवा अटी विनियम, २०१३ मधील कलम नं.८ (१) नुसार शासनाने संस्थान कर्मचा-यांचे पाचव्या वेतन आयोगानुसार खालीलप्रमाणे पदांचे वर्गिकरण निश्चित केलेले आहे.

**अ) संस्थान विनियम, २०१३ मधील तरतुदीनुसार पदांचे वर्गीकरण:-**

| अ.नं. | पदांचे वर्गीकरण | पाचव्या वेतन आयोगानुसार वेतनश्रेणी |
|---|---|---|
| ०१ | **गट 'अ'** अधिकारी, ज्यांची किमान वेतनश्रेणी १०,००० रुपये किंवा त्यापेक्षा जास्त असेल. | रु. १००००-३२५-१५२००<br>रु. १०६५०-३२५-१५८५०<br>रु. १२०००-३७५-१६५००<br>रु. १४३००-४००-१८३००<br>रु. १५१००-४००-१८३००<br>रु. १६४००-४५०-२००००<br>रु. १६४००-४५०-२०९००<br>रु. १८४००-५००-२२४००<br>रु. २२४००-५२५-२४५०० |
| ०२ | **गट 'ब'** अधिकारी, ज्यांची किमान वेतनश्रेणी ५००० रुपये किंवा त्यापेक्षा जास्त, परंतु १०,००० रुपयापेक्षा कमी असेल, अपवाद-कोणत्याही श्रेणीतील लघुलेखक. | रु. ५०००-१५०-८०००<br>रु. ५५००-१७५-९०००<br>रु. ६०००-१७५-९८५०-१५०-१००००<br>रु. ६५००-२००-१०५००<br>रु. ७२२५-२२५-११०५०<br>रु. ७४५०-२२५-११०५०<br>रु. ७४५०-२२५-११५००<br>रु. ७५००-२५०-१२०००<br>रु. ८०००-२७५-१३५००<br>रु. ९१२५-२७५-१४०७५ |
| ०३ | **गट 'क'** मधील संस्थानाचे कर्मचारी, ज्यांची वेतनश्रेणी २६०० रुपये किंवा त्यापेक्षा जास्त परंतु ५००० रुपयापेक्षा कमी असेल, त्यामध्ये कोणत्याही श्रेणीतील लघुलेखकांचा समावेश असेल. | रु. २६१०-६०-२९१०-६५-३३००-७०-४०००<br>रु. २६५०-६५-३३००-७०-४०००<br>रु. २७५०-७०-३८००-७५-४४००<br>रु. ३०५०-७५-३९५०-८०-४५९०<br>रु. ३२००-८५-४९००<br>रु. ४०००-१००-६०००<br>रु. ४५००-१२५-७००० |
| ०४ | **गट 'ड'** आणि संस्थानाचे इतर कर्मचारी ज्यांची किमान वेतनश्रेणी २६०० रुपयापेक्षा कमी असेल. | रु. २५५० (Fixed)<br>रु. २५५०-५५-२६६०-६०-३२०० |

**ब)** सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.एसआरव्ही-१०९८/१६४४/प्र.क्र.२/९९/बारा, मंत्रालय, मुंबई-३२ दि.२ जुलै, २००२ व सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.एसआरव्ही-२०१५/ प्र.क्र.४७०/ कार्या.१२, मंत्रालय, मुंबई-३२ दि.२७ मे, २०१६ नुसार शासनाने राज्य शासन सेवेतील निरनिराळया वेतनश्रेणीतील पदांचे पाचव्या वेतन आयोगानुसार वर्गीकरण खालीलप्रमाणे केले आहे.

| अ.नं. | पदांचे वर्गीकरण | पाचव्या वेतन आयोगानुसार वेतनश्रेणी |
|---|---|---|
| ०१ | **गट 'अ'**<br>ज्या वेतनश्रेणीची कमाल मर्यादा रु.११५०० व त्यापेक्षा अधिक आहे अशी पदे | रु. ७४५०-२२५-११५००<br>रु. ७५००-२५०-१२०००<br>रु. ८०००-२७५-१३५००<br>रु. ९१२५-२७५-१४०७५<br>रु. १००००-३२५-१५२००<br>रु. १०६५०-३२५-१५८५०<br>रु. १२०००-३७५-१६५००<br>रु. १४३००-४००-१८३००<br>रु. १५१००-४००-१८३००<br>रु. १६४००-४५०-२००००<br>रु. १६४००-४५०-२०९००<br>रु. १८४००-५००-२२४००<br>रु. २२४००-५२५-२४५०० |
| ०२ | **गट 'ब'**<br>ज्या वेतनश्रेणीची कमाल मर्यादा रु.९००० ते रु.११४९९ या दरम्यान आहे अशी पदे. | रु. ५५००-१७५-९०००<br>रु. ६०००-१७५-९८५०-१५०-१००००<br>रु. ६५००-२००-१०५००<br>रु. ७२२५-२२५-११०५०<br>रु. ७४५०-२२५-११०५० |
| ०३ | **गट 'क'**<br>ज्या वेतनश्रेणीची कमाल मर्यादा रु.४४०० ते रु.८९९९ या दरम्यान आहे अशी पदे | रु. २७५०-७०-३८००-७५-४४००<br>रु. ३०५०-७५-३९५०-८०-४५९०<br>रु. ३२००-८५-४९००<br>रु. ४०००-१००-६०००<br>रु. ४५००-१२५-७०००<br>रु. ५०००-१५०-८००० |
| ०४ | **गट 'ड'**<br>ज्या वेतनश्रेणीची कमाल मर्यादा रु.४३९९ व त्यापेक्षा कमी आहे अशी पदे | रु. २५५० (Fixed)<br>रु. २५५०-५५-२६६०-६०-३२००<br>रु. २६१०-६०-२९१०-६५-३३००-७०-४०००<br>रु. २६५०-६५-३३००-७०-४००० |

शासनाने संस्थानसाठी मंजूरी दिलेल्या विनियमातील पदांचे वर्गीकरणे व राज्य शासन सेवेतील निरनिराळया वेतनश्रेणीतील पदांचे वर्गीकरण हे पाचव्या वेतन आयोगानुसार केलेले आहे. सहाव्या वेतन आयोगानुसार शासनाने पदांचे वर्गीकरण केलेले नाही.

राज्य शासन सेवेतील कर्मचा-यांप्रमाणे संस्थान कर्मचा-यांना वेळोवेळी वेतन आयोगानुसार वेतन लागू केला जातो. संस्थान कर्मचा-यांना राज्य शासन सेवेतील कर्मचा-यांप्रमाणे सहाव्या वेतन आयोगानुसार वेतन दिले जाते. राज्य शासनाकडील कर्मचा-यांचे व संस्थानकडील कर्मचा-यांचे पदांचे वर्गीकरणात वरीलप्रमाणे तफावत असल्याचे दिसून येते. राज्य शासनाकडील कर्मचा-यांचे व संस्थान कर्मचा-यांचे पदाचे वर्गीकरण एक सारखे असणे आवश्यक आहे.

सबब, राज्य शासन सेवेतील कर्मचा-यांचे पदांचे वर्गीकरणाप्रमाणे संस्थान कर्मचा-यांचे पदाचे वर्गीकरणात बदल करणेकामी प्रस्ताव मा.प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडे दुरूस्तीसाठी पाठविणेचे विषयावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.५९१** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे राज्य शासन सेवेतील कर्मचा-यांचे पदांच्या वर्गीकरणाप्रमाणे संस्थान कर्मचा-यांचे पदांच्या वर्गीकरणात बदल करणेस मा.प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडे प्रस्ताव पाठविणेत यावा, असे ठरले.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, सामान्य प्रशासन)

---

**विषय नं.११** **संस्थान ॲडव्होकेट पॅनलवर कायदा सल्लागार म्हणून फेर नियुक्ती करणेबाबत.**

**प्रस्ताव-** ॲडव्होकेट श्री अे. बी. रोहोम यांनी दि.२६/६/२०१६ रोजीचे अर्जान्वये खालील प्रमाणे विनंती केली आहे.

"श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था, शिर्डी यांच्या ॲडव्होकेट पॅनलवर कायदा सल्लागार (Legal Advisor) म्हणुन ३ वर्षाकरिता त्यांची नेमणुक होती. सदरचा कालावधी पुर्ण झालेला त्यांना पुन्हा श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था, शिर्डी चे ॲडव्होकेट पॅनलवर यापुढे काम करण्याची इच्छा आहे. त्यांना त्यापुर्वी २२ जुन २०१३ व २ डीसेंबर २०१५ रोजीचे अर्जाने फेरनियुक्त होणेसाठी संस्थानकडे अर्ज सादर केलेला आहे. तरी त्यांची श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था, शिर्डी चे ॲडव्होकेट पॅनलवर कायदा सल्लागार (Legal Advisor) म्हणुन फेरनियुक्ती करावी, अशी विनंती केलेली आहे.

श्री साईबाबा संस्थानच्या ॲडव्होकेट पॅनलवर जा. नं. एसएसएस/ वशी-०१/२०१०, दि.२१/४/२०१० रोजीचे आदेशाने ॲड अे. बी. रोहोम यांना संस्थान ॲडव्होकेट ३ वर्षाकरीता नेमणुक संस्थानचे राहाता कोपरगाव न्यायालयीन कामकाजाकरीता केलेली होती. त्याची मुदत दि.२०/४/२०१३ रोजी संपुष्टात आलेली आहे.

सध्य परिस्थीतीत मे. सिव्हील जज्ज ज्युनिअर डिव्हीजन राहाता यांचे कोर्टातील दाव्यांची संख्या व इतर कामकाज वाढलेले आहे. तरी ॲडव्होकेट श्री अे. बी. रोहोम यांची संस्थानचे ॲडव्होकेट पॅनलवर कायदा सल्लागार (Legal Advisor) म्हणुन फेरनियुक्ती करणे बाबतचे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.५९२** **यावर सविस्तर चर्चा होऊन असे ठरले की, वेगवेगळया न्यायालयांमध्ये असलेल्या संस्थानच्या ॲडव्होकेट पॅनल अद्ययावत करणे प्रस्तावित असल्यामुळे संस्थान ॲडव्होकेट पॅनलवर कायदा सल्लागार म्हणून फेर नियुक्ती करणेबाबतचा उपरोक्त प्रस्ताव अमान्य करणेत आला.**

(कार्यवाही- विधी अधिकारी)

---

**विषय नं.१२** **संस्थानचे विविध विभागाचे मागणीनुसार दैनंदिन कामकाजासाठी संगणक संच ई-निविदा प्रक्रियाव्दारे खरेदी करणेस व याकामी येणा-या खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** **अधिनियम 2004 मधील तरतुद :** कलम 17 (1) नुसार.

**व्यवस्थापन समितीचा ठराव क्रं.:** 1) मा.व्यवस्थापन समितीचे दि. 02/04/2016 रोजीचे रोजीचे सभेतील निर्णय क्रं. 235

**प्रास्ताविक:** माहिती तंत्रज्ञान विभागासाठी अत्यावश्यक सेवेकरीता 25 नग संगणक संच खरेदीकामी विविध पुरवठा धारकांकडुन ई-निविदा मागवुन खरेदीकामी येणाऱ्या रक्कम रुपये 9,95,000/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेकामी प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे दि. 02/04/2016 रोजीचे सभेत सादर करण्यात आला होता त्यावर निर्णय क्रं. 235 अन्वये सविस्तर चर्चा होऊन असे ठरले की, संस्थानच्या सर्व विभागाकडुन संगणकाची मागणी घेण्यात यावी व त्यानुसार येणाऱ्या अपेक्षीत खर्चास संस्थान वकीलामार्फत अर्ज करण्यात येऊन मा. मान्यता घेण्यात यावी व ई-टेंडरीग करुन मा. खंडपीठाच्या आदेशानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

परंतु, दि. 02/08/2016 रोजीचे पत्रान्वये विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय मुंबई यांचे दि. 28/07/2016 रोजीच्या अधिसुचनेनुसार श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिरडी अधिनियम -2014 नुसार श्री साईबाबा संस्थान व्यवस्थापन समितीचे गठन करण्यात आलेले आहे त्यानुसार समितीने कामकाज सुरु केले असुन दि. 31/07/2016 रोजी नवनियुक्त समितीने श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्थेचा कार्यभार स्विकारलेला आहे.

त्यानुसार मा. व्यवस्थापन समितीचे दि. 02/04/2016 रोजीचे सभेतील निर्णय क्रं. 235 रद्द करणेसाठी व नवीन निर्णय होणेसाठी तसेच सर्व विभागांचे संगणकाची मागणीचा विचार करता खालील तक्त्यातील तपशिलानुसार 25 नग संगणक संच व 10 नग लॅपटॉप खरेदी करणेस अंदाजे रक्कम रु. 14,90,000/- + टॅक्सचे खर्चास प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर करण्यात येईल.

**संगणक संच व लॅपटॉप यांचा तपशिल खालीलप्रमाणे.**

| अ.नं. | संगणक संच तपशिल | नग | अंदाजे दर | एकुण |
|---|---|---|---|---|
| 01 | All In One Intel Core i5- Processor, 3rd generation or above, onboard Integrated Graphics, 10/1000 LAN, onboard USB, 8 GB DDR3 RAM, 01 TB Hard Drive, No Optical Drive, 18.5" Monitor with LED Back Light, USB Optical Mouse and Keyboard Windows 10 professional 64 bit 3 Yr Next business day onsite service. (Make Dell/HP/Lenovo) | 25 Nos. | 42,000/- | 10,50,000/- |
| **अ.नं.** | **लॅपटॉप संच तपशिल** | **नग** | **अंदाजे दर** | **एकुण** |
| 02 | Ultra Book Core i5 With 14छ Display 500 GB HDD/4 GB RAM Windows 10 Pro Carry case 3 Yr Next business day onsite service. (Make Dell/ HP/ Lenovo) | 10 Nos. | 44,000/- | 4,40,000/- |
| | | | **Round of Total** | **14,90,000/- + टॅक्स** |

**मागणी :** प्रास्ताविकेत नमुद केलेप्रमाणे प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे मान्यतेस्तव सादर करता येईल, असे नम्र मत आहे.

**संस्थान अधिनियम/ ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान:** शासन निर्देश व तांत्रिक

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत:** उपरोक्त प्रास्ताविकेत नमुद केल्याप्रमाणे विभागांचे संगणकाची मागणीचा विचार करता वरिल तपशिलानुसार 25 नग संगणक संच व 10 नग लॅपटॉप खरेदीकामी विविध पुरवठा धारकांकडुन ईनिविदा मागवुन व सदरकामी येणाऱ्या अंदाजे रक्कम रुपये रु. 14,90,000/- + टॅक्स मात्रचे खर्चास मान्यता मिळणेकामी तसेच पुर्वीचा मा. व्यवस्थापन समितीचे दि. 02/04/2016 रोजीचे सभेतील निर्णय क्रं. 235 रद्द होऊन नवीन निर्णय होणेसाठी प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सविनय सादर.

**निर्णय क्र.५९३** **यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानसाठी संगणक संच खरेदी करणेबाबत दि.०२.०४.२०१६ रोजीचे सभेतील निर्णय क्र.२३५ रद्द करणेत आला. तसेच संस्थानचे तांत्रिक सल्लागार श्री.विजय नायडू, कोपरगाव यांचे मार्गदर्शनाखाली संस्थानच्या सर्व विभागांमधील संगणकांची आवश्यकता तपासून सर्व विभागांसाठी नामांकित कंपनीचे संगणक व प्रिंटर्स खरेदीबाबतचा प्रस्ताव तातडीने सभेसमोर सादर करणेत यावा, असे ठरले.** (कार्यवाही- माहिती तंत्रज्ञान विभागप्रमुख)

---

**विषय नं.१३** **सीसीटीव्ही कंन्ट्रोल सेलकडील लाईव्ह दर्शन व इतर उपकरणांकरीता ॲल्युमिनीअम पार्टीशन व दोन टनाचे ०२ नग एअर कंडीशनर खरेदी करणेस व त्याकामी येणा-या खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** जा.नं.एसएसएस/साप्रशा/आस्था/४२६०/२०१६, दि.११/०२/२०१६ रोजीचे आदेशान्वये ध्वनीक्षेपण विभागाकडील फोटोग्राफी, व्हिडीओ शुटींग, लाईव्ह दर्शन (समाधी मंदिर), एलईडी स्क्रिन व टिव्हीबाबत कामकाज सीसीटीव्ही कंट्रोल सेलप्रमुख यांचे नियंत्रणा खाली अतिरीक्त कार्यभार देण्यात आलेला आहे. त्यास अनुसरुन सदर ठिकाणाहुन संस्थानचे मंदिर परिसर, साईबाबा भक्तनिवासस्थान (५००रुम), साईनिवास अतिथीगृह, टाटास्काय लाईव्ह दर्शन, द्वारावती भक्तनिवासस्थान, श्री साईआश्रम -१, श्री साईनाथ रुग्णालय, श्री साईबाबा हॉस्पीटल, श्री साई प्रसादालय, टी.व्ही.९, या सर्व ठिकाणी श्रीं चे समाधी मंदिरातील लाईव्ह दर्शन प्रक्षेपण केले जाते. तसेच सदर ठिकाणी एन.व्ही.आर., डी.व्ही.आर., डी. मॉडयुलेटर, स्वीचेस, ट्रान्समिटर, मिडीया कन्व्हरटर, कंट्रोल पॅनल, फोटोग्राफी कॅमेरे, व्हिडीओ शुटींग कॅमेरे इ. उपकरणे ठेवण्यात आलेली आहेत. सदरची उपकरणे हे २४ तास कार्यान्वित असतात.

तथापी, सीसीटीव्ही कंट्रोल सेलकडील ऑनलाईन, लाईव्ह दर्शन, व्हिडीओ शुटींग व फोटोग्राफी कक्षामध्ये बंदीस्त कॅबीन नसल्यामुळे वारंवार सदर उपकरणे बंद होत आहेत. तसेच उपकरणांवर धुळ, घाण साचत असल्यामुळे सदर उपकरणांची कार्यक्षमता कमी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे सदर उपकरणांकरीता ११ X १२ X १२ फुटाचे ॲल्युमिनीअम पार्टीशन व ०२ नग एअर कंडीशनर गरजेचे आहेत. सदर

अॅल्युमिनीअम पार्टीशनकरीता अंदाजे किंमत रु. १,७०,०००/- (अक्षरी रुपये एक लाख सत्तर हजार मात्र) व ०२ नग एअर कंडीशनरकरीता अंदाजे रक्कम रु. १,१०,०००/- (अक्षरी रुपये एक लाख दहा हजार मात्र) असे एकत्रित रक्कम रु.२,८०,०००/- (अक्षरी रुपये दोन लाख ऐंशी हजार) मात्र अंदाजे खर्च अपेक्षित आहे.

तरी, सीसीटीव्ही कंट्रोल सेलकडील व्हिडीओ शुटींग व फोटोग्राफी कक्षामधील उपरोक्तप्रमाणे नमुद केलेल्या उपकरणांकरीता ११ X १२ X १२ फुटाचे अल्युमिनीअम पार्टेशनबाबतची कार्यवाही बांधकाम विभागामार्फत करणेस व सदर उपकरणांकरीता दोन टनाचे ०२ नग एअर कंडीशनर मेकॅनिकल विभागामार्फत खरेदी करणेस व त्याकामी येणारे एकत्रित रक्कम रु.२,८०,०००/- (अक्षरी दोन लाख ऐंशी हजार) मात्रचे अंदाजे खर्चास मान्यता मिळणेस्तव सदरचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सविनय सादर.

**निर्णय क्र.५९४** **यावर सविस्तर चर्चा होऊन, सीसीटीव्ही कंट्रोल सेलकडील व्हिडीओ शुटींग व फोटोग्राफी कक्षामधील उपकरणांकरीता ११ X १२ X १२ फुटाचे अल्युमिनीअम पार्टेशन व दोन टनाचे ०२ नग एअर कंडीशनर विहीत पध्दतीने खरेदी करुन बसविणेस तसेच त्याकामी येणाऱ्या एकत्रित रु.२,८०,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- सी.सी.टी.व्ही. कंट्रोल सेलप्रमुख)

---

**विषय नं.१४** **साईनिवास अतिथीगृह येथील दि.१६/०८/२०१६ ते दि.१५/०८/२०१७ अखेर पुढील वर्षाचे कालावधीचे टाटास्कॉय कनेक्शन फी बाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईभक्तांचे सुविधेसाठी संस्थानचे साईनिवास अतिथीगृहातील २५ रुमसाठी टाटा स्टाय डिशचे कनेक्शन सन २००९ मध्ये घेतेलेले आहे. सदर टाटास्काय कनेक्शनचे रिचार्ज फी ची मुदत दि. १५/०८/२०१६ रोजी संपत आहे. पुढील दि.१६/०८/२०१६ ते दि.१५/०८/२०१७ या एक वर्षाकरीता भरावयाची रिचार्ज फी चा तपशील खालीलप्रमाणे-

| अ.नं. | रिचार्ज फी चा तपशील | एकुण कनेक्शन | प्रतिवर्ष | रक्कम रु. |
|---|---|---|---|---|
| १. | टाटास्काय स्पोटर्स धमाका पॅक मुख्य कनेक्शन प्रतिमाह प्रतिनग रु. ३६०/- X ११ महिने (११ महिन्याचे रिचार्ज केल्यावर १ महिना जास्त मिळेल) | ७ | ३९६०/- | २७,७२०/- |
| २. | मल्टी कनेक्शनसाठी रिचार्ज प्रतिमहा प्रति नग रु. २४०/- X ११ महिने (११ महिन्याचे रिचार्ज केल्यावर १ महिना जास्त मिळेल) | १८ | २६४०/- | ४७,५२०/- |
| | | | **एकुण रुपये** | **७५,२४०/-** |

उपरोक्त तपशीलात नमुद केलेप्रमाणे एकुण २५ कनेक्शनची पुढील दि.१६/०८/२०१६ ते दि.१५/०८/२०१७ या एक वर्षाकरीता भरावयाची रिचार्ज फी अंदाजे रक्कम रु. ७५, २४०/- इतकी होत आहे. तसेच वरिल रिचार्जेसचे दर टाटास्काय कंपनीचे आज रोजीचे असुन कंपनीने रिचार्ज करतेवेळी दर वाढल्यास वाढीव रक्कम द्यावी लागेल, असे टाटास्काय कनेक्शनचे अधिकृत डिस्ट्रीब्युटर श्री रुपचंद भागचंद कासलीवाल श्रीरामपुर यांनी दि. ०२/०७/२०१६ रोजीचे पत्राद्वारे कळविलेले आहे.

सबब,

**अ)** साईभक्तांचे सुविधेकरीता साईनिवास अतिथीगृहातील एकुण २५ टाटास्काय कनेक्शनची पुढील दि.१६/०८/२०१६ ते दि.१५/०८/२०१७ या एक वर्षाकरीता रिचार्ज फी चे अंदाजे रक्कम रु.७५,२४०/- मात्रचे खर्चास व सदरचे रिचार्ज टाटास्काय कंपनीचे अधिकृत ISP (Installstion service porovider) डिस्ट्रीब्युटर यांचेकडुन करणेस तसेच रिचार्जेसचे दर हे सतत बदलते असल्यमे वरिल रिचार्जेसचे दर टाटास्काय कंपनीचे आज रोजीचे असुन कंपनीचे रिचार्ज करतेवेळी दर वाढल्यास वाढीव रक्कम देणेस मान्यता असावी, ही नम्र विनंती.

**ब)** दि. २०/११/२०१६ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेत "टाटास्काय कनेक्शनची रिचार्ज फी कंपनीने निश्चित केलेली असते. त्यामुळे यापुढे मा. कार्यकारी अधिकारी महोदय यांचे मान्यतेने प्रचलीत दराप्रमाणे वेळेवेळी प्रतिवर्षास रिचार्ज करुन घेण्यात यावे" असा द्वारावती भक्तनिवास विभागाकडील कनेक्शनकरीता निर्णय घेण्यात आलेला आहे. त्याचप्रमाणे संस्थानमधील सर्व टाटास्काय कनेक्शन फी ही मा. कार्यकारी अधिकारी महोदय यांचे मान्यतेने प्रचलीत दराप्रमाणे वेळेवेळी प्रतिवर्षास रिचार्ज करुन घेणेस मान्यता असावी, ही नम्र विनंती.

तरी, उपरोक्त उपरोक्त **"अ "** व **" ब"** मध्ये नमुद केल्याप्रमाणे सदरचा प्रस्ताव मान्यतेस्तव मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सविनय सादर.

**निर्णय क्र.५९५** **यावर सविस्तर चर्चा होऊन, साईनिवास अतिथीगृहामध्ये साईभक्तांच्या सुविधेकरीता बसविणेत आलेल्या एकुण २५ टाटास्काय कनेक्शनचे पुढील दि.१६/०८/२०१६ ते दि.१५/०८/२०१७ या कालावधीसाठी प्रस्तावामध्ये नमुद केलेनुसार प्रतिमहा प्रति नग रु.२४०/- मात्र याप्रमाणे ११ महिन्यासाठीचे एकत्रित रिचार्ज करणेस व त्याकामी येणाऱ्या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- सी.सी.टी.व्ही. कंट्रोल सेलप्रमुख)

---

**विषय नं.१५** **श्री साई प्रसादालयात संपुर्णदिवस मोफत भोजन योजना सुरु करणेबाबत.**

**प्रस्ताव-** **अधिनियम 2004 मधील तरतुद:-** सन 2004 चा महाराष्ट्र अधिनियम क्रं.14 (भाग-4) मध्ये महाराष्ट्र विधान मंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रस्थापीत केलेले अध्यादेश व केलेले विनीयम मधील 14 (2-घ) नूसार भक्तांना सोयीसाठी आवश्यक ते तातडीचे दुरुस्तीचे काम किंवा उपाययोजना हाती घेण्याचे. तसेच 21 (1-घ) नूसार भक्तांना जेवण पुरवणे आणि अन्नछत्र चालवणे.

**मा.व्यवस्थापन समितीचा ठराव क्रं. :-** संदर्भ क्रं.2 ते 7

**प्रस्ताविक:- अ)** श्री संजय भास्कराव काळे, कोपरगांव यांचे विषयांकितकामी संदर्भिय अं.नं.1 नूसार इकडील विभागाकडे पत्र प्राप्त झालेले आहे. त्यांनी पत्रात पान क्रं.1 वर म्हटले आहे की, "दि.27/04/2013 रोजी झालेल्या व्यवस्थापन समिती सभेत विषय नं.15 (आयत्या वेळेचा) व निर्णय क्रं.428 प्रमाणे आपण संस्थानने मोफत प्रसादभोजन चालू करण्याचे संकल्पनेवर चर्चा केली. सदर सभेत व्यवस्थापन समिती भोजन पुरवणेसाठी आवश्यक असलेल्या सर्व बाबींवर चर्चा करुन हया निर्णया पर्यंत पोहचली कि सर्व दिवस मोफत प्रसादभोजन देण्यात हरकत नाही. सदरचे प्रसादभोजन मोफत दिल्यास अंदाजे 9.96 कोटी रुपयांची प्राप्त होणारी रक्कम बंद होणार. सदरहु बाब मेजर फायानान्शीयल असल्याने मा.उच्च न्यायालय याची परवानगी घ्यावी असे ठरले. संस्थानने आज अखेर मा.उच्च न्यायालयात मोफत प्रसादभोजनाचा प्रस्ताव सादर केलेला नाही. ही खेदाची बाब."

**तसेच पान क्रं.2 वर म्हटले आहे की-** "शेतकरी संपला, बाजार पेठ संपली. हया वर्षी शेतकऱ्याने दिवाळी केली नाही. गरीब शेतकरी, शेतमजुराला काम नाही, अन्न धान्य नाही. यामुळे दि.27/04/2013 रोजी प्रलंबीत ठेवलेला मोफत प्रसादभोजनाचा निर्णय संस्थानने त्वरीत अमलात आणावा."यापुर्वी याबाबत असे म्हटले आहे.

**ब)** साईभक्तांना विनामुल्य मोफत प्रसादभोजन सुरु करणेबाबत मा.व्यवस्थापन समितीचे सभेत वेळोवेळी चर्चा व निर्णय झालेले आहे. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे.

1) **संदर्भिय अं.नं.2** मा.व्यवस्थापन (त्रिसदस्य) समिती दि.12/06/2012 रोजीचे सभेतील निर्णय क्रं.446 नूसार साईभक्तांसाठी मोफत प्रसादभोजन व्यवस्था सुरु करणेबाबत खालीलप्रमाणे सुचना झालेल्या आहेत. - हा निर्णय आर्थिकदृष्टया अत्यंत महत्वाचा असल्याने या बाबत सर्व बाबींचा सर्वांगीण दृष्टया सांगोपांगविचार करुन प्रस्ताव मा.व्यवस्थापन समिती सभेपुढे सादर करणेत यावा, असे ठरले.
2) **त्यानूसार सदरचा प्रस्ताव संदर्भिय अ.नं.3** ने मा.व्यवस्थापन त्रिसदस्य समिती दि.08/10/2012 रोजीचे सभेपुढे सादर केला असता निर्णय क्रं.831 अन्वये - सदरहु विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली मात्र याबाबत सर्व माहीती तपशीलासह सविस्तर प्रस्ताव तयार करुन तो पुढील सभेपुढे सादर करावा असे, ठरले.
3) त्यानूसार सदरचा प्रस्ताव पुन्हा संदर्भिय अ.नं.4 नूसार मा.व्यवस्थापन त्रिसदस्य समिती दि.27/04/2013 रोजीचे सभेपुढे सादर केला असता निर्णय क्रं.428 नूसार - या विषयावर सविस्तर चर्चा होऊन, साईबाबा संस्थानचे अन्नदान निधीमध्ये दिवसेंदिवस वाढ होत आहे.

अन्नदान निधीमध्ये जमा होणारा निधी त्याच कारणासाठी खर्च होणे आवश्यक आहे. हा खर्च न केल्यास व ही रक्कम वाढीव प्रमाणात शिल्लक राहील्यास त्यावर टॅक्सेस लागण्याची शक्यता आहे. संस्थानने सुरु केलेल्या अन्नदान योजनेतून सद्य परिस्थितीत 125 ते 150 दिवस दानशूर साईभक्तांनी दिलेल्या देणगीमधून मोफत प्रसाद भोजन देण्यात येत आहे व या योजनेला भक्तांचा उत्स्फुर्त प्रतिसाद मिळत असल्यामुळे साईभक्तांतर्फे भविष्यात जास्त दिवस मोफत प्रसादभोजन प्रसादालयामध्ये दिले जाईल असे वाटते. एक दिवशी प्रसादालयामध्ये सरासरी 30,000 साईभक्त प्रसादभोजन घेतात. यावरुन उर्वरीत 200 ते 240 दिवसही मोफत प्रसादभोजन दिल्यास

प्रती साईभक्तांकडून रु.10/- याप्रमाणे वार्षिक अंदाजे रु.6 ते 7 कोटी मात्र येणारा संस्थानचा निधी बंद होईल. सन 2012-2013 या आर्थिक वर्षामध्ये प्रसादालयामध्ये साईभक्तांनी रु.10/- प्रती व्यक्ती याप्रमाणे सशुल्क प्रसादभोजन घेवून रु.9.96 कोटी जमा झालेले आहेत. हा निधी बंद होईल परंतू या बंद होणाऱ्या निधीची भरपाई मा.उच्च न्यायालयाने मान्यता दिल्यास संस्थानचे जनसंपर्क कार्यालयामार्फत देण्यात येणारे व्ही.आय.पी.दर्शन पास ऑनलाईन दर्शन सुविधेसारखे विनाशिफारस सर्वांसाठी देणगी आकारुन सुरु केल्यास येणाऱ्या अपेक्षीत रु.11 कोटी मात्र रक्कमेमधून करता येईल.

मोफत प्रसादभोजन योजना सुरु केल्यास अधिनियमातील तरतुदींची अधिकाधीक उद्दीष्ट पुर्ती होईल. प्रसादालयामध्ये दक्षिणा पेट्टयांची संख्या वाढविल्यास संस्थानचे उत्पादनात भर पडेल व दर्रोजन प्रसादभोजन मोफत केल्यास सध्याची मोफत प्रसादभोजन योजनेऐवजी ठराविक दिवशी मोफत प्रसादभोजनासाठी देणगी देणाऱ्या दानशूर भक्तांची नांवे त्या ठराविक दिवशी प्रसादालयामध्ये दर्शविता येईल. यामधून अनेक साईभक्तांना प्रेरणा मिळेल. तसेच व्ही.आय.पी.भोजनाचा दर आहे तोच ठेवण्यात येवून यामधूनही काही प्रमाणात निधी संस्थानला मिळणार आहे. सर्व दिवस मोफत प्रसादभोजन दिल्यास भक्तांना समाधान मिळेल व भारतातच नाही तर संपुर्ण जगामध्ये साईबाबा संस्थानचा नावलौकीक होईल.

मोफत प्रसादभोजन दिल्यास रु.10/- मात्र माफ होत आहेत म्हणून परिसरातील नागरीक प्रवास करुन अथवा प्रवासासाठी पैसे खर्च करुन मोफत प्रसादभोजनासाठी प्रसादालयामध्ये येतील आणि गर्दी वाढेल व प्रसादालयाची क्षमता वाढवावी लागेल असे वाटत नाही. या योजनेचा लाभ हा दुरवरुन बाबांचे दर्शनासाठी येणाऱ्या साईभक्तांनाच होईल. यावरुन प्रसादालय विभाग प्रमुख व मुख्य लेखाधिकारी यांनी प्रस्तावामध्ये नमूद केलेल्या अभिप्रायामध्ये तथ्य वाटत नाही.

तसेच श्रींचे दर्शन घेऊन मंदिरामधून बाहेर येताना प्रत्येक साईभक्तांस बाबांचा प्रसाद म्हणून एक लाडू प्रसाद पाकीट, मा.उच्च न्यायालयाची मान्यता मिळाल्यास देण्याचा विचार आहे. त्यामुळे भक्तांना लाडू प्रसाद घेण्यासाठी पुन्हा रांगेमध्ये उभे राहण्याची आवश्यकता राहणार नाही व त्यांचा वेळी वाचेल आणि लाडू विक्री काऊंटर बंद करणेत येवून तेथील कर्मचारी इतरत्र वापरता येतील.

साईभक्तांना विनामुल्य लाडू प्रसाद दिल्यास अंदाजे रु.18 कोटी मात्र व विनामुल्य प्रसादभोजन दिल्यास अंदाजे 9.96 कोटी मात्र ही संस्थानला प्राप्त होणारी रक्कम बंद होवून तो भार संस्थानला सहन करावा लागणार आहे. सदरहु बाब मेजर फायनान्शीयल असल्याने याकामी मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाचे मार्गदर्शन घेणेसाठी, विनामुल्य प्रसादभोजन व विनामुल्य लाडू प्रसाद पाकीट दिल्यास संस्थानला वार्षिक किती खर्च येईल. यांच्या आकडेवारीसह सविस्तर प्रस्ताव सादर करुन, तो पुढील सभेपुढे सादर करणेत यावा असे ठरले.

4) त्यानूसार सदरचा प्रस्ताव संदर्भिय अ.नं.5 ने मा.व्यवस्थापन त्रिसदस्य समिती दि.21/06/2013 रोजीचे सभेपुढे सादर केला असता त्यावर निर्णय क्रं.436 अन्वये - सदरहु विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.

5) **संदर्भिय अं.नं.5 नूसार** मा.व्यवस्थापन त्रिसदस्य समिती दि.26/07/2013 रोजीचे सभेत विषयांकितकामी फेर प्रस्ताव सादर करणेत आला. त्यानूसार निर्णय क्रं.538 अन्वये- यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साई प्रसादालयामार्फत ज्या गरीब व्यक्तींकडे प्रसादभोजनासाठी पैसे नाहीत, असे गरीब गरजू व्यक्ती, परिसरातील अंध, अपंग, मुकबधीर, मतीमंद शाळेतील मुले, वारकरी संप्रदायाचे शिक्षण घेणारे विद्यार्थी, वृध्दाश्रम, श्री साईबाबा/श्री साईनाथ रुग्णालयातील रुग्ण यांना मोफत प्रसादभोजन देण्यात येत आहे.

तसेच, देणगीदार साईभक्तांचे इच्छेनूसार सन-2008 पासून साईभक्तांसाठी मोफत प्रसादभोजन योजना सुरु असून, या योजनेमध्ये मोफत भोजन देणाऱ्या साईभक्तांचे संख्येमध्ये दिवसेंदिवस वाढ होताना दिसत आहे. उदा. 2008-2009 - 23 दिवस, 2009-10- 42 दिवस, 2010-2011- 65 दिवस, 2011-2012- 138 दिवस, 2012-2013 - 184 दिवस. सन 2013-14 मध्ये याचा विचार करता, श्री साई प्रसादालयामध्ये संस्थानमार्फत साईभक्तांना मोफत प्रसादभोजन देणेऐवजी, मोफत प्रसादभोजनासाठी देणगी देणाऱ्या देणगीदार साईभक्तांमध्ये वाढ होवून वर्षातील जास्तीत-जास्त दिवस सामान्य साईभक्तांना मोफत प्रसादभोजन मिळेल यासाठी देणगीदार साईभक्तांना प्रोत्साहीत करावे. मोफत प्रसादभोजन योजनेबाबतची माहीती व या योजनेमध्ये दान देणाऱ्या भक्तांची नावे प्रसादालय व मंदिर परिसरामध्ये फलक उभारुन किंवा डिस्प्ले बोर्डद्वारे प्रदर्शित करणेत यावी, असे ठरले .

6) **त्यानूसार सदरचा प्रस्ताव संदर्भिय अ.नं.7** ने मा.व्यवस्थापन त्रिसदस्य समिती दि.16/02/2016 रोजीचे सभेपुढे सादर केला असता, त्यावर निर्णय क्रं.113 अन्वये - यावर सविस्तर चर्चा होऊन असे

ठरले की, श्री साई प्रसादालयात संपुर्ण दिवस मोफत प्रसादभोजन योजना सुरु करणेकामी श्री संजय काळे यांनी त्यांचे पत्रामध्ये उल्लेख केलेल्या दि.27/04/2013 रोजीचे सभेतील निर्णय क्रं.428 तसेच व्यवस्थापन समिती सभेमध्ये यापुर्वी वेळावेळी झालेल्या निर्णयांसह सविस्तर प्रस्ताव फेरसादर करणेत यावा.

**अशाप्रकारे ब) मध्ये नमूद करणेत आलेल्या अं.नं.2 ते 7 नूसार मा.व्यवस्थापन समिती सभेत साईभक्तांना विनामुल्य प्रसादभोजन व्यवस्था सुरु करणेबाबतचे विषयावर चर्चा झालेली आहे.**

**क)** मा.व्यवस्थापन समिती सभा दि.27/04/2013 रोजीचे सभेतील निर्णय क्रं.428 नूसार साईभक्तांना दर्शन रांगेत मोफत लाडू प्रसाद देणेबाबतचा प्रस्ताव मा.मुंबई उच्च न्यायालय औरंगाबाद खंडपीठ यांचेकडे मान्यतेसाठी पाठविणेत आलेला होता. त्यास मा.मुंबई उच्च न्यायालय औरंगाबाद खंडपीठ यांनी मान्यताही दिलेली आहे. त्यानूसार 50 ग्रॅम वजनाचे प्रत्येकी दोन लाडूचे एक पाकीट दर्शनरांगेमध्ये प्रत्येकी दि.15 ऑगस्ट -2013 रोजीपासून साईभक्तांना मोफत देण्यात येत आहेत. लाडूचे मोफत पाकीट वाटप व खर्चाचा तपशिल खालीलप्रमाणे.

| **कालावधी** | **लाडू पाकीटे वाटप संख्या** | **प्रत्यक्ष उत्पादन खर्च** |
|---|---|---|
| माहे.ऑगस्ट-2013 ते जुलै-2014 | 1,84,82,400 | रु.24,47,86,974/- |
| माहे.ऑगस्ट-2014 ते जुलै-2015 | 1,74,80,650 | रु.21,24,01,229/- |

मोफत लाडू/बुंदी वाटपबाबत संस्थानला कुठलाही निधी/फंड मिळत नाही. मोफत लाडू/बुंदी वाटप करणेत येणाऱ्या खर्चाची रक्कम ही अन्नदान निधीत मिळणाऱ्या रक्कमेमधून करणेत येते. त्यामुळे दर्शनरांगेत मोफत वाटप करणेत येणाऱ्या लाडू/बुंदी पाकीटाचा संस्थानवर अंदाजे वार्षिक रु.24 ते 25 कोटी इतक्या रकमेचा बोजा पडत आहे. त्यामुळे भक्तांना विनामुल्य प्रसादभोजन देणे आर्थिक दृष्टीने अडचणीचे आहे असे इकडील कार्यालयाचे मत आहे.

मा.व्यवस्थापन समिती सभेच्या मान्यतेने सन 2007-2008 पासून देणगीदार साईभक्तांचे इच्छेनूसार साईभक्तांसाठी मोफत प्रसादभोजन योजना सुरु झालेली आहे. सदर योजनेमध्ये सन 2007-2008 पासून आजपावेतो खालीलप्रमाणे रक्कम जमा झालेली असून ज्या-त्या वर्षात जमा तारखेनूसार खर्च होत आहे.

| | |
|---|---|
| सन 2007-2008 | रु.20,29,600/- |
| सन 2008-2009 | रु.31,93,515/- |
| सन 2009-2010 | रु.1,02,31,004/- |
| सन 2010-2011 | रु.1,60,44,191/- |
| सन 2011-2012 | रु.3,22,20,135/- |
| सन 2012-2013 | रु.4,33,61,344/- |
| सन 2013-2014 | रु.5,38,46,887/- |
| सन 2014-2015 | रु.7,42,48,986/- |

वरीलआकडेवारी पाहता उपरोक्त मोफत प्रसादभोजन योजनेत दरवर्षी 30 ते 35 टक्क्यांनी वाढ झालेली दिसून येत आहे. 01 एप्रिल-2014 ते 31 मार्च 2015 अखेर या वित्तीय वर्षात 590 देणगीदार साईभक्तांनी 287 दिवसांसाठी मोफत प्रसादभोजन योजनेअंतर्गत भक्तांना विनामुल्य प्रसादभोजन देणेसाठी रक्कम रु.7,42,48,986/- इतकी रक्कम जमा केलेली आहे. या वर्षामध्ये एकूण 1,29,46,618 इतक्या साईभक्तांनी प्रसादभोजनाचा लाभ घेतलेला असून दैनंदीन सरासरी 35470 इतके भक्त दर्रोज प्रसादभोजन घेत होते. म्हणजेच वर्षामध्ये जवळपास सरासरी 210 दिवस भक्तांच्या देणगीतून मोफत प्रसादभोजन सुरु होते. म्हणजेच सध्य स्थितीत 58% भोजन हे मोफतच देण्यात येत आहे व भविष्यात ती वाढण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे श्री काळे यांचे पत्रातील मोफत योजना ही संकल्पना भक्तांच्या देणगीतून मोठया प्रमाणात चालू आहे.

तसेच 'साईभक्तांना विनामुल्य प्रसादभोजन' सुरु केल्यास मोफत प्रसादभोजन योजना ही भक्तांचे इच्छेनूसार सुरु झालेली योजना असल्यामुळे सदर योजनेमध्ये येणारी देणगी बंद होण्याचा धोका असून भक्तांच्या भावना दुखावल्या जाण्याची शक्यता नाकारता येत नाही. सदर योजनेत मिळणारा निधी हा मोठया स्वरुपात मिळत आहेत. त्याचा विनीयोग चांगल्या कार्यासाठी होत आहे. तसेच सध्या साईभक्तांना पुरविणेत येणारी प्रसादभोजन व्यवस्था प्रौढ व्यक्तीस रु.10/- या अत्यल्प दरात पुरविणेत येते. प्रसादभोजनाचे प्रती ताटास अंदाजे रु.24/- ते 25/- इतका खर्च येतो. म्हणजेच प्रसादभोजनाचे प्रती ताटामागे रु.14/- ते 15/- इतकी चारीटी संस्थान देत आहे.

तसेच कॅन्टीन विभागामार्फत भक्तांना पुरविणेत येणारा चहा-रु.2/-, कॉफी-रु.2/-, व दुध-रु.3/- या अत्यल्प दरात विक्री करणेत येत असून यामध्ये देखील संस्थान चहाचे प्रती कपास रु.0.91 पैसे, कॉफी प्रती कप रु.1.33 पैसे व दुधास प्रती कपी रु.1.34 पैसे याप्रमाणे चारिटी देत आहे. भक्तांना पुरविणेत येणाऱ्या प्रसादभोजनाचा खर्च, चहा, कॉफी, दुध व दर्शन रांगेत मोफत लाडू/बुंदी प्रसाद हा सर्व खर्च अन्नदान फंडात जमा होणाऱ्या रक्कमेमधूनच करणेत येतो. त्यामुळे श्री काळे यांची मागणीही फारशी रास्त नाही असे या कार्यालयाचे नम्र मत आहे.

साईभक्तांना विनामुल्य प्रसादभोजन व्यवस्था सुरु केल्यास बाबांचे प्रसादाचे महत्व कमी होवून, शिरडीमध्ये बेरोजगारी, पाकीटमारी, गुंडगिरी प्रवृत्ती वाढून, परिसरातील लोकांची काम करण्याची तयारी राहणार नाही. तसेच मोफत प्रसादभोजन योजना ही साईभक्तांचे इच्छेनूसार सुरु करणेत आलेली योजना आहे. भक्तांना विनामुल्य प्रसादभोजन सुरु केल्यास सदर योजनेत भक्त देणगी देण्याची शाश्वती नाही. त्यामुळे संस्थानला विनाकारण साधारण: 9 ते 10 कोटीच्या वार्षिक नुकसान होणे नाकारता येत नाही.

**मागणी:-** प्रस्तावित केलेप्रमाणे साईभक्तांना विनामुल्य प्रसादभोजन देणेबाबतचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समिती सभेत साधारणत: पाच वेळेस सादर करणेत आलेला आहे. सदर बाब आर्थिक दृष्टया अत्यंत महत्वाची असल्याने संस्थानमार्फत साईभक्तांना मोफत प्रसादभोजन देणेऐवजी, मोफत प्रसादभोजनासाठी देणगी देणाऱ्या देणगीदार साईभक्तांमध्ये वाढ होऊन वर्षातील जास्तीत-जास्त दिवस सामान्य साईभक्तांना मोफत प्रसादभोजन मिळेल यासाठी देणगीदार साईभक्तांना प्रोत्साहीत करावे.

या योजनेमध्ये दान देणाऱ्या भक्तांची नांवे प्रसादालय व मंदिर परिसरामध्ये फलक उभारुन डिस्प्ले बोर्डद्वारे प्रदर्शित करणेत यावे. असे निर्णय घेतलेले आहे. सदर निर्णयान्वये श्री साई प्रसादालयात देणगीदार भक्तांचे डिस्प्ले बोर्ड बनिवणेत येत असून त्यास उत्स्फुर्त प्रतिसाद मिळत आहे. सदर देणगीमधूनच 58% प्रसादभोजन हे मोफत दिले जात आहे. त्यात वाढ होऊन संपुर्ण वर्षभर प्रसादभोजन मोफत होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

त्यामुळे संदर्भिय अं.नं.1 नूसार विषयांकितकामी प्राप्त झालेला श्री संजय भास्कराराव काळे, कोपरगांव यांच्या अर्जातील छावणी बाबतचा विषय यापुर्वी बांधकाम विभागाकडून चालू होता व पुर्वी छावण्या केल्याही होत्या त्याची सर्व कार्यवाही बांधकाम विभागामार्फत चालू होती त्यामुळे याबाबतची कार्यवाही बांधकाम विभागामार्फत होणेस मान्यता असावी.

**विभागाचा अभिप्राय/स्पष्ट मत**:- उपरोक्त प्रास्तविक व मागणीनूसार साईभक्तांना विनामुल्य प्रसादभोजन व्यवस्था सुरु करणेबाबत मा.व्यवस्थापन समितीने सदरचा प्रस्ताव मा.मुंबई उच्च न्यायालय औरंगाबाद खंडपीठ यांचेकडे पाठविणेत यावा, असा कोणताही निर्णय झालेला नाही. त्यामुळे विषयांकित कामी असलेले अर्जदार श्री संजय भास्करराव काळे, कोपरगांव यांचे अर्जात विनामुल्य्य प्रसादभोजन सुरु करणेबाबत, जे त्यांनी अर्जात म्हटले आहे, त्यामध्ये स्पष्टता वाटत नाही.

श्री काळे यांचे विनंती अर्जानूसार, "चालू वर्षी दुष्काळ पडलेला आहे, खरीप हंगाम मोकळा गेलेला आहे, शेतात पीक आले नाही, शेतकऱ्याने दिवाळी केली नाही, शेतमजुराला काम नाही याकरीता संस्थानने मोफत प्रसादभोजनाचा निर्णय त्वरीत अंमलात आणावा." असे म्हटले आहे. परंतू सध्याचे परिस्थितीचा विचार करता संस्थानमध्ये भक्तांना सकाळी अल्पोपहारसाठी पुरविणेत येणार अन्नपाकीट फक्त रु.4/- मध्ये देवून त्यामागे रु.6/- चरिटी देण्यात येत आहे. प्रसादभोजन हे फक्त रु.10/- म्हणजेच प्रती ताटामागे रु.14/- ते 15/- चारीटी देण्यात येत आहेत. तसेच चहा, कॉफी व दुध व दर्शन रांगेतील मोफत बुंदी प्रसाद हे देखील चारिटी देवून पुरविणेत येत आहे.

अशाप्रकारे साईभक्तांना पुरविणेत येणाऱ्या महत्वाच्या सुविधा उदा.अल्पोपहार, प्रसादभोजन, चहा, कॉफी व दुध व दर्शन रांगेत मोफत बुंदी प्रसाद या सर्व सुविधा चारिटी देवून पुरविणेत येत आहे.

दुष्काळी परिस्थिती ही चिरकाल टिकत नसते, परंतू संस्थानमध्ये एकदा सुरु झालेली योजना ही पुन्हा बंद करणे संस्थानचे दृष्टीने अत्यंत महत्वाची बाब असून सदर निर्णय हा धोरणात्मक असल्यामुळे तसेच सदर बाब मेजर फायनान्शीयल असल्याने, विनामुल्य प्रसादभोजन दिल्यास संस्थानला वार्षिक किती खर्च येईल, याची लेखाशाखा विभागामार्फत सविस्तर आकडेवारी घेतली असता, मुख्यलेखाधिकारी यांनी "सद्यस्थितीत मोफत भोजन दिल्यास सर्व साधारणपणे वार्षिक 16 कोटी पर्यंत आर्थिक बोजा संस्थानवर पडेल. मोफत भोजन सुविधा व्यवहार्य वाटत नाही." असा अभिप्राय दिलेला आहे.

मुख्यलेखाधिकारी यांचा अभिप्राय व उपरोक्त परिस्थिती विचारात घेता, सदरचा प्रस्ताव हा आर्थिक व धोरणात्मक असल्यामुळे मा.व्यवस्थापन समिती सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.५९६** **यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानचे अन्नदान निधीच्या बाबतीतील सर्व अनुशंगीक माहिती सभेसमोर सादर करणेत यावी, असे ठरले.** (कार्यवाही- प्रसादालय विभागप्रमुख/ मुख्यलेखाधिकारी)

---

**विषय नं.१६** **प्रिंटेड बेडशिट उशिकव्हरसह खरेदी करणेबाबत.**

**प्रस्ताव-** **अधिनियम २००४-मधील तरतुद-** १) २१-१ चा (ग)-भक्तांना मंदिरात देवतेच्या दर्शनासाठी व प्रार्थनेसाठी किंवा कोणतीही धार्मिक सेवा किंवा समारंभ करण्यासाठी सोयी सुविधा पुरविणे.

२) २१ चा (२) भक्तांना राहाण्यासाठी व वापरण्याकरीता विश्रामगृहे बांधणे व त्यांची देखभालकरणे.

**प्रस्तावीक-** साईबाबा भक्तनिवासस्थान इमारतीमध्ये एकूण ४८४ खोल्या भक्तांचे वापरासाठी उपलब्ध आहेत.सदर खोल्यांमध्ये एकूण १७२७ लोखंडी कॉट आहे. खोल्यांच्या कॉटसाठी ०१ याप्रमाणे एकूण १७२७ नग बेडशिट, उशिकव्हर दैनंदिन वापरले जातात १००० नग धुण्यासाठी देण्यात येतात, असे एकूण २७२७ नग बेडशिट उशिकव्हरसह एका वेळी लागतात. खोली खाली झाल्यावर लगेचच बेडशिट /उशिकव्हर बदलले जातात. चेकींग टाईम २४ तासांचा असल्याने ज्याप्रमाणात खोल्या खाली होतात त्याप्रमाणात बेडशिट/उशिकव्हर बदलली जातात. साईबाबा भक्तनिवासस्थान विभागामध्ये भक्तांची मोठया प्रमाणात गर्दी असते, ९० ते ९५ टक्के खोल्या भक्तांना निवासासांठी दिलेल्या असतात. त्यामुळे बेडशीट दररोज बदलले जातात व धुवून इस्त्री केले जातात. वारंवार धुतल्याने होणा-या रासायनीक प्रक्रीयेमुळे तथा काही साईभक्त कॉटवर बसुन चहा नाष्टा करतात त्यामुळे बेडशीटवर चहा व खाद्यपदार्थांचे डाग पडतात सदर डाग धुवून सुध्दा जात नाही त्यामुळे असे बेडशीट साईभक्तांना न देता निरुपयोगी म्हणुन बाजुला ठेवली जातात व इतर विभागांचे मागणीनुसार ते स्वच्छतेकामी वापरासाठी दिली जातात, त्यासाठी २७३ नग बेडशीट उशीकव्हरसह हिशोबात धरुन एकूण ३००० नगाची पहिल्या टप्पयासाठी व ३००० नगांची दुस-या टप्पयासाठी आवश्यकता असते.

दि.२७/०४/२०१३रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेमधील निर्णयानुसार दि.२०/१०/२०१४ रोजी नविन ६००० नग बॉम्बेडांईग बेडशिट /उशीकव्हर खरेदी करुन पहिल्या टप्प्यातील ३००० नग वापरात घेतले,संदर्भिय ठरावानुसार कापडी वस्तूचे वयोमान १८ महिने निश्चित केले आहे. सन २०१४/२०१५ मध्ये ६००० नग बेडशीट उशीकव्हरसह खरेदीकामी(प्रती नगास रु.३२४/- प्रमाणे) १९,४४,०००/- इतका खर्च आलेला आहे.

पहिल्या टप्प्यातील बेडशिट उशिकव्हरचा सतत वापर झालेला असल्याने खराब झाले आहेत. ब-याच बेडशिटवर डाग पडले आहेत.धुऊन सुध्दा जात नाहीत, त्यामुळे साईभक्त नाराजी व्यक्त करतात, दुस-या टप्यातील ३००० नग बेडशिट/उशिकव्हर दि.२५/०६/२०१६ पासुन वापरात घेतले आहेत.

सध्या विभागाकडे नविन बेडशिटचा साठा शिल्लक नाही, तसेच श्रीं चा महाशताब्दी सोहळा नजीक आलेला आहे व साईभक्तांचे सोयी सुविधेसाठी पुढील १८ महिन्या नंतरच्या कालावधीसाठी नविन ६००० नग बेडशिट/उशिकव्हर खरेदी करणे क्रमप्राप्त आहे. जेणेकरुन साईभक्तांची बेडशिट/उशिकव्हर अभावी गैरसोय होणार नाही.

**विभागाची मागणी-** विभागाचे पुढील कालावधीसाठी नविन बेडशिट साठा शिल्लक नसल्याने नविन बेडशिट/उशिकव्हर खरेदी करावे लागतील, खरेदी प्रक्रियेस वेळ लागणार असल्याने सदर खरेदी प्रक्रिया सुरु करणे आवश्यक आहे.

**छाणनी करुन अनुमान-** महाराष्ट्र शासनाने पारीत केलेला अधिनियम व मा.व्यवस्थापन समितीचा संमंत ठरावानुसार नविन बेडशिट/उशिकव्हर खरेदी करता येतील.

**विभागाची मागणी-** दोन टप्यासाठी आवश्यक ६००० नग प्रिंटेड बेडशिट/उशिकव्हर खालील स्पेशिफीकेशन प्रमाणे खरेदी करावे लागणार आहेत.

| अ.नं. | तपशिल | नग |
|---|---|---|
| १. | प्रिंटेड बेडशिट /उशिकव्हरसह<br>(ब्रॅन्डेड कंपनीचे उदा.बॉम्बे डाईंग, मफतलाल, प्रकाश कॉटन मिल इ.)<br>साईज (इंचामध्ये) - बेडशिट - ६०X ९०,<br>उशिकव्हर - १८ X२४ | ६००० |

**Technical Specification**

| Sr.No | Bed Sheet | Pillow Cover |
|---|---|---|
| 1 | Cotton 100 % | Cotton 100 % |
| 2 | EPI – 56 | EPI – 56 |
| 3 | PPI – 60 | PPI – 60 |
| 4 | Warp Count – 30S | Warp Count – 30S |
| 5 | Waft Count – 30S | Waft Count – 30S |
| 6 | Washing Fastness – above 3 | Washing Fastness – above 3 |
| 7 | Light Fastness – above 3 | Light Fastness – above 3 |
| 8 | Weight – 350 grams/no. | Weight – 55 grams/no. |

वरीलप्रमाणे प्राप्त बेडशीट वस्त्र समिती, वस्त्र मंत्रालय, भारत सरकार, वस्त्र प्रयोग शाळा व अनुसंधान केंद्र, पी बालु रोड, प्रभादेवी चौक, प्रभादेवी मुंबई – ४०० ०२५ यांचेकडून तपासणी करता येईल.

तरी

१) नमुदप्रमाणे ६००० नग प्रिंटेड बेडशिट/उशिकव्हर खरेदीकामी येणा-या अपेक्षित खर्चास

२) जनसंपर्क विभागामार्फत वर्तमानपत्रात जाहीर निविदा प्रसिध्द करणेस

३) सदरील खरेदी, खरेदी विभागामार्फत ई-टेंडर पध्दतीने करण्यास सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.५९७** **यावर सविस्तर चर्चा होऊन, साईबाबा भक्तनिवासस्थान विभागासाठी आवश्यक असलेले ६००० नग प्रिंटेड बेडशिट/ उशिकव्हर विहीत पध्दतीने ई-निविदा मागवून खरेदी करणेस व त्याकामी येणाऱ्या खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, साईबाबा भक्तनिवासस्थान)

---

**विषय नं.१७** **प्रिंटेड बेडशिट उशिकव्हरसह खरेदी करणेबाबत.**

**प्रस्ताव-** अधिनियम २००४-मधील तरतुद- १) २१-१ चा (ग)-भक्तांना मंदिरात देवतेच्या दर्शनासाठी व प्रार्थनेसाठी किंवा कोणतीही धार्मिक सेवा किंवा समारंभ करण्यासाठी सोयी सुविधा पुरविणे २) २१ चा (२) भक्तांना राहाण्यासाठी व वापरण्याकरीता विश्रामगृहे बांधणे व त्यांची देखभाल करणे.

प्रस्ताविक- व्दारावती भक्तनिवास इमारत दि.१५/०८/२००९ पासुन साईभक्तांना निवासासाठी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. सदर इमारतीमध्ये ८० एसी खोल्या व २३६ नॉन एसी खोल्या अशा एकुण ३१६ खोल्या आहेत. एसी खोल्यांमध्ये एक डबल कॉट, एक सिंगल कॉट व नॉन एसी खोल्यामध्ये प्रत्येकी ३ सिंगल कॉट आहेत. व्दारावती इमारतीत ९० % ऑनलाईन बुकींग असल्याने तसेच पी.आर.ओ मार्फत आलेल्या व्ही.आय.पी. यांची १० % खोलीची मागणी असते त्यामुळे नेहमी भक्तांची गर्दी असून इमारतीतील खोल्या कायम भरलेल्या असतात. त्यामुळे बेडशिट, उशिकव्हर यांचा दैनंदिन वापर होत आहे नित्याच्या वापरामुळे बेडशिट, उशिकव्हर खराब होत आहे. सध्या व्दारावती इमारतीत नविन बेडशिट, उशिकव्हर शिल्लक नाहीत. साईभक्तांना खराब व डाग पडलेले फाटके, खराब बेडशिट व उशिकव्हर देणे योग्य नाही. भक्तांचे सोयी सुविधा पुरविण्याकरीता सिंगल बेडशिट उशिकव्हरसह साईज ६०" × ९०" चे एकुण ४,३०० नग व डबल बेडशिट उशिकव्हरसह साईज ९०" X १००" एकुण २५० नग असे दोन्ही मिळून एकुण बेडशिट उशिकव्हरसह ४,५५० नग खरेदी करणे गरजेचे आहे.

यापुर्वी मा.व्यवस्थापन समितीचे दि.०८/०१/२०१४ रोजीचे सभेतील विषय नं.३२, निर्णय क्र.३१ अन्वये बेडशीट खरेदी करण्यात आलेले आहेत. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे -

| अ. नं. | तपशिल | वापरात घेतलेली दिनांक | नग | दर | रक्कम रुपये | वापर केलेले महिने |
|---|---|---|---|---|---|---|
| १) | बॉम्बे डाईंग प्लेन बेडशिट ६०" × ९०" | ०७/०१/२०१५ | २,४५० | २८४/- | ६,९४,८००/- | १९ |
| २) | बॉम्बे डाईंग प्लेन बेडशिट ९०" × १००" | ०७/०१/२०१५ | २५० | ३८०/- | ९४,०००/- | १९ |
| ३) | बॉम्बे डाईंग प्लेन उशिकव्हर १८" ×२७" | ०७/०१/२०१५ | २,९५० | ८०/- | २,३६,०००/- | १९ |
| | एकुण रुपये - | | ५,६५० | | १०,२६,८००/- | |

दि.२५/०९/२०१४ रोजी उपरोक्त २,४५० नग बॉम्बे डाईंग बेडशिट व २,९५० उशिकव्हर खरेदी करुन दैनंदिन वापरासाठी दि.०७/०१/२०१५ रोजी वापरात घेतलेले आहे.

मा.व्यवस्थापन समितीचे दि.२७/०४/२०१३ रोजीचे सभेतील विषय नं.५८, निर्णय क्र.४०१ अन्वये कापडी वस्तुचे वयोमान १८ महिने निश्चित केलेले आहे. दैनंदिन बेडशिट वापराने खराब झालेले आहे. त्यामुळे साईभक्त नाराजी व्यक्त करतात. साईभक्तांच्या सुविधेसाठी पुढील १८ महिने कालावधीसाठी ४,५५० नग बेडशिट, उशिकव्हर खरेदी करणे क्रमप्राप्त आहे. जेणेकरुन साईभक्तांची बेडशिट, उशिकव्हर अभावी गैरसोय होणार नाही.

विभागाची मागणी- विभागाचे पुढील कालावधीसाठी नविन बेडशिट साठा शिल्लक नसल्याने नविन बेडशिट/उशिकव्हर खरेदी करावे लागतील.

छाणनी करुन अनुमान-महाराष्ट्र शासनाने पारीत केलेला अधिनियम व मा.व्यवस्थापन समितीचा संमत ठरावानुसार नविन बेडशिट /उशिकव्हर खरेदी करता येतील.

विभागाचे स्पष्ट मत- आवश्यक ४,५५० नग प्रिंटेड बेडशिट/उशिकव्हर खरेदीकामी खालीलप्रमाणे खरेदी करावयाचे अपेक्षित आहे.

| अ.नं. | तपशिल | नग |
|---|---|---|
| १ | प्रिंटेड बेडशिट / उशिकव्हरसह<br>(ब्रॅन्डेड कंपनीचे उदा.बॉम्बे डाईंग, मफतलाल, प्रकाश कॉटन मिल इ.) | |
| | साईज – सिंगल बेडशिट – ६०" X ९०" | ४,३०० |
| | डबल बेडशिट – ९०" X १००" | २५० |
| | उशिकव्हर - १८" X २७" | |
| | एकुण सिंगल, डबल बेडशिट | ४,५५० |

उपरोक्त तपशिलाप्रमाणे आवश्यक ४,५५० नग प्रिंटेड बेडशिट / उशिकव्हर खरेदी करावे लागतील. सदर खर्चाची तरतुद सन- २०१६/२०१७ चे सुधारीत अंदाजपत्रकात करता येईल. भक्तोपयोगी सेवा सुविधा प्रदान करण्यासाठीचा असल्याने त्यास शासनाची मान्यता घेणे आवश्यक नाही.

०१) उपरोक्त तपशिलात नमुद केलेप्रमाणे ४,५५० नग प्रिंटेड बेडशिट/उशिकव्हर खरेदी करणेस व त्याकामी येणारे अंदाजे खर्चास मान्यता मिळणेस विनंती.

०२) जनसंपर्क विभागामार्फत वर्तमानपत्रात जाहीर निविदा प्रसिध्द करणेस

०३) सदरील प्रिंटेड बेडशिट/उशिकव्हर खरेदी विभागामार्फत ई-टेंडर पध्दतीने करण्यास तसेच प्रिंटेड बेडशिट, उशिकव्हर खरेदीच्या प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.५९८** **यावर सविस्तर चर्चा होऊन, द्वारावती भक्तनिवास विभागासाठी आवश्यक असलेले ४५५० नग प्रिंटेड बेडशिट/ उशीकव्हर विहीत पध्दतीने ई-निविदा मागवून खरेदी करणेस व त्याकामी येणाऱ्या खर्चास मान्यता देण्यात आली. तसेच उपरोक्त निर्णय क्र.५९७ अन्वये साईबाबा भक्तनिवासस्थान विभागासाठीही बेडशीट व उशीकव्हर खरेदीस मान्यता देण्यात आलेली आहे, या दोन्हीची खरेदीप्रक्रिया एकत्रित करणेत यावे, असे ठरले.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, द्वारावती भक्तनिवास/ प्र.अधिक्षक, साईबाबा भक्तनिवासस्थान)

---

**विषय नं.१८** **संस्थानकडे देणगी रुपाने प्राप्त झालेल्या/जमा असलेल्या सोने-चांदीच्या वस्तू वितळवून उपलब्ध होणारे शुध्द सोने-चांदीपासून श्री साई प्रतिमेची नाणी बनविणेबाबत.**

**प्रस्ताव-** **विषयाची पूर्वपीठीका-**

**(अ)** श्री क्षेत्र शिर्डी येथे श्री साईबाबांचे समाधी दर्शनासाठी देश-विदेशातून हजारो भक्त दररोज येत असतात, हीच भक्तांची संख्या सलग सुट्टयांचे कालावधीत लाखोंच्या घरात जाते. शिर्डी येथे येणा-या या हजारो भक्तांपैकी बहुतांशी भक्त श्री साईंचे चरणी रोख रक्कम, सोने-चांदी व इतर मौल्यवान वस्तू देणगी रुपाने अर्पण करीत असतात. या देणगी रुपाने प्राप्त होणा-या सोने-चांदी व मौल्यवान वस्तूंची विहित पध्दतीने नोंदी घेऊन, सदरच्या वस्तू लेखाशाखेकडे जमा करणेत येत असतात. सध्या अशा प्रकारच्या सोने-चांदी वस्तू कापडी पिशवीत सिलबंद करुन लेखाशाखेकडील स्ट्रॉंगरुममध्ये ठेवणेत येतात.

अशा रितीने देणगी रुपाने प्राप्त झालेल्या सोने-चांदीच्या वस्तू तत्कालीन मा. व्यवस्थापन मंडळ व मा. व्यवस्थापन समितीमार्फत घेणेत आलेल्या निर्णयांनुसार व त्यांनी दिलेल्या मान्यतेनुसार मा. शासन अधिकृत रिफायनरीमध्ये वितळवून, त्यापासून प्राप्त झालेल्या शुध्द सोने-चांदीपासून श्री साईंच्या प्रतिमा असलेली २.५ ग्रॅम, ५ ग्रॅम, १० ग्रॅम वजनाची सोन्याची व २० ग्रॅम वजनाची चांदीची नाणी / पेडंटस् बनविणेत येऊन, ती भक्तांना आजचे (चालू) बाजारभावाने प्रसादरुपाने खरेदीसाठी उपलब्ध करुन देणेत आलेली आहेत. सध्या या नाणी विक्रीस भक्तांचा चांगला प्रतिसाद आहे.

**(ब)** वर नमुद केलेप्रमाणे संस्थानकडे देणगी रुपाने जमा झालेल्या सोने-चांदी वस्तू वितळवून त्यांचे शुध्द सोने-चांदीत रुपांतरीत करणेसाठी तत्कालीन मा. व्यवस्थापन समितीने दिनांक २७ डिसेंबर, २००४ रोजीचे निर्णयानुसार काही मार्गदर्शक तत्वे निश्चित केलेली आहेत, तसेच दिनांक ३१ मे, २००७ रोजीचे शासन निर्णयानुसार, मा. शासनाने अटी-शर्तीस अनुसरुन खालीलप्रमाणे स्थायी मान्यता दिलेली आहे. त्याचा थोडक्यात तपशील खालीलप्रमाणे-

*.. .. श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांच्या व्यवस्थापन समितीच्या दि. २७.१२.२००४ च्या बैठकीतील निर्णय क्र. १४१ नुसार, श्री साईबाबांच्या चरणी देणगीरुपाने वा दक्षिणा पेटीत जमा होणा-या सोने-चांदी इत्यादी मौल्यवान वस्तूंविषयी व्यवस्थापन समितीने घेतलेल्या पुढे नमुद केलेल्या कार्यपध्दतीस, संस्थानकडे कमीत कमी १० किलो एवढ्या वजनाचे सोने अलंकार साठतील, त्यावेळी शासनाच्या (विधी व न्याय विभागाच्या) संबंधीत प्रतिनिधी समक्ष व प्रत्येकवेळी शासनास विहितरित्या कळवून कार्यवाही करण्यास शासनाची* ***स्थायी मान्यता*** *देण्यात येत आहे.*

*(०१) देणगी रुपाने, दक्षिणा पेटीत प्राप्त होणा-या सोने-चांदी वस्तू अलंकारापैकी जे अलंकार अतिउत्कृष्ट व असामान्य कलाकसुरीचे असतील, असे अलंकार सदैव जतन ठेवण्यात यावे. विशेष प्रसंगी या वस्तूंचा वापर, मंदिरात अथवा इतर संस्थान कार्यक्रमात करण्यात यावा.*

*(०२) देणगीरुपाने अगर दक्षिणा पेटीत प्राप्त होणारे सोने-चांदी वस्तू अलंकारापैकी, जे अलंकार सुबक, उत्कृष्ट व मूळ किंमतीपेक्षा लिलावाव्दारे अधिक किंमत निश्चितपणे प्राप्त होणारे असतील, असे अलंकार लेखाशाखा अंतर्गत असलेल्या कापडकोठी विभागामार्फत तीनही उत्सवाच्या प्रत्येक दिवशी तसेच दर गुरुवारी व रविवारी, उन्हाळ्याच्या सुटीत, दिपावली व नाताळच्या सुटीत, किमान दोन मा. समिती सदस्यांच्या उपस्थितीत त्यांच्या मान्यतेने जाहिर लिलाव पध्दतीने विक्री करण्यात यावे. प्रचलीतकार्यपध्दतीनुसार विक्रीच्या रितसर नोंदी ठेवाव्यात.*

*(०३) वस्तुंची अपेक्षित (किमान १० टक्के अधिक्यासह मूळ किंमत) किंमत न आल्यास, त्या वस्तूंचा लिलाव पुन्हा एकदा गर्दीच्या काळात करण्यात यावा. त्यावेळीही अपेक्षित किंमत न आल्यास सदर वस्तू वितळविण्यासाठी घेण्यात यावी.*

*(०४) लिलावासाठी पात्र नसलेले सोने-अलंकार कमीत कमी १० किलो एवढ्या वजनाचे साठतील, तेव्हा सदरहू सोने वस्तु अलंकार व त्यावेळेसउपलब्ध असणारे वितळविण्यास योग्य चांदी वस्तू अलंकार यांच्या वितळविण्यासाठीची कार्यवाही हाती घ्यावी.*

*(०५) वस्तू वितळविण्यापूर्वी व्यवस्थापन समितीच्या किमान सदस्यांनी त्याची पाहणी करावी व शासनाच्या अधिका-यांच्या उपस्थितीत मा. सदस्यांसमक्ष त्यांचे वजन करुन त्या सिलबंद करण्यात याव्यात. वजन करण्यापुर्वी त्यावर खडे बसविलेले असल्यास ते काळजीपूर्वक प्रथम काढून विहित कार्यपध्दतीनुसार, त्यांची संख्या / विगतवारी नमुद केलेल्या चिठ्ठीसह, कापडी पिशवीत मोहरबंद (सील) करुन ते वेगळे ठेवून घ्यावेत.*

*(०६) या वस्तुंची वाहतुक करण्यापुर्वी तृया वस्तुंच्या आवश्यक तो वाहतुक विमा उतरविण्यात यावा व पोलीस संरक्षणाची व्यवस्था करण्यात यावी.*

*(०७) या वस्तुंच्या सिलबंद पेटया / ट्रंक / पोती वाहनात बंदिस्त जागेत ठेवण्यात याव्यात व ती बंदिस्त जागाही मोहोरबंद (सील) करण्यात यावी.*

*(०८) रिफायनरीत पोहचल्यावर मा. समिती सदस्य व मा. कार्यकारी अधिकारी तसेच शासनाचे अधिकारी यांच्या समक्ष सर्व पेट्र्या / ट्रंका / पोती वाहनातून काढून त्यातील वस्तू बाहेर काढून त्यांचे रिफायनरीत पुनःश्च वजन करण्यात यावे व त्या वितळविण्याकरीता रिफायनरीच्या ताब्यात देण्यात याव्यात.*

*(०९) वितळविल्यानंतर आलेल्या अशुध्द धातूंच्या (Sample after melting) नमुन्यादाखल दोन नमुने (तुकडे) काढून त्यापैकीएक नमुना (तुकडा) ताब्यात घ्यावा, या नमुन्याच्या शुध्दतेची तपासणी इंडिया गव्हर्नमेंट मिंट, मुंबई यांचेकडून करुन घेण्यात यावी.*

*(१०) शुध्दीकरणानंतरच्या शुध्द लगडीपासून वेळोवेळी आवश्यकतेनुसार, मा. व्यवस्थापन समितीच्या मान्यतेने, योग्य वजनाची श्री साईंची प्रतिमा असलेली चांदीची, सोन्याची नाणी अगर लॉकेटस् साईभक्तांना योग्य किंमतीत उपलबध करुन द्यावीत. त्याविषयी प्रचलीत पध्दतीनेनोंदी ठेवण्यात याव्यात.*

*(११) शुध्द सोने-चांदीपासून रिफायनरीमध्ये पाडलेली नाणीवा लॉकेटस् ताब्यात घेतल्यानंतर साधारणतः दोनशे पैकी एक नाणे वा लॉकेटस् इंडिया गव्हर्नमेंटमिंट, मुंबई यांचेकडून पाठवून त्याची शुध्दता मिंटकडून प्रमाणित करुन घेण्यात यावी.*

*(१२) बाजारभावातील चढ-उतारानुसार या नाणी / लॉकेटसच्या विक्री किंमतीत वेळोवेळी बदल करुन या विषयीचा प्रस्ताव कार्योतर मान्यतेसाठी नियमितपणे मा. व्यवस्थापन समिती सभेपुढे सादर करण्यात यावा.*

**(क)** तसेच, दरम्यानचे कालावधीत, मा. उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांचेकडील माहे मार्च, २०१२ मधील आदेशानुसार, सध्या श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी चे दैनंदिन व्यवस्थापन, नियंत्रण व कामकाज पाहणेसाठी मा. प्रधान व सत्र जिल्हा न्यायाधिश, अहमदनगर यांचे अध्यक्षतेखाली मा. त्रिसदस्यीय समितीची नेमणूक केलेली होती. मा. जिल्हाधिकारी, अहमदनगर व मा. कार्यकारी अधिकारी, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी हे या समितीचे सदस्य होते. सदरची मा. त्रिसदस्यीय समिती दिनांक २९ जुलै, २०१६ अखेर कामकाज पहात होती.

या मा. त्रिसदस्यीय समितीचे कार्यकाळात, मा. उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांनी मूळ जनहित याचिका क्रमांक १८/२०११ मधील दिवाणी अर्ज क्रमांक १२०५६/२०१२ मध्ये **दिनांक १६ ऑक्टोबर, २०१२** रोजी मा. समितीचे कामकाजासंदर्भात जे निर्देश दिलेले आहेत, त्यामध्ये सोने-चांदी वस्तूबाबत ***(e)***मध्ये खालीलप्रमाणे नमूद केलेले आहे –

*.. .. 6. We direct that, without prior permission of this Court, the Committee, -*

***(a)*** *shall not take any steps in creating third party interest in the movable or immovable properties of the Respondent No.2 – trust;*

***(b)*** *shall not enter into an agreement, contract for purchase of any immovable property on behalf of the Respondent No.2 – trust;*

***(c)*** *shall not take any major financial decision of whatsoever nature;*

***(d)*** *shall not take steps to recruit staff, employees in regular vacancies;*

***(e)*** ***<u>shall not convert precious metals in any form nor melt it in any form.</u>***

याव्यतिरिक्त, मा. उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांनी मूळ जनहित याचिका क्रमांक १८/२०११ मधील संस्थानमार्फत सोने-चांदी वस्तू वितळवून, तयार करावयाचे नाणी / पेडंटस् संदर्भात सादर करणेत आलेल्या दिवाणी अर्ज क्रमांक ९४२४/२०१३ मध्ये **दिनांक १३ ऑगष्ट, २०१३** रोजी दिलेल्या निर्देशात खालीलप्रमाणे नमूद केलेले आहे -

*.. .. 6. We permit the applicant Sansthan to place the appropriate orders with India Government Mint, Mumbai and Refinery Private Limited Mumbai for making gold and silver coins respectively out of the stock of gold and silver lying with the aforementioned agencies in accordance with the prescribed procedure.*

*7. It is clarified that we do not express any opinion on the allegations made by the Respondents in respect of violation of procedure enlisted under the Government Resolution dated 31st May, 2007.*

*8. The Civil Application is allowed to the above extent.*

यापुर्वी, सन २०१२ मध्ये दिनांक ३१ मार्च, २०१० अखेर वितळविणे योग्य असलेले सोने व दिनांक ३१ मार्च, २००८ अखेर वितळविणे योग्य असलेली चांदी अनुक्रमे मा. शासनाच्या अंगीकृत गव्हर्नमेंट मिंट ऑफ इंडिया, मुंबई व नॅशनल रिफायनरी, मुंबई यांचेकडेस विहित कार्यपध्दतीनुसार वितळवून, प्राप्त झालेल्या शुध्दसोने-चांदीपासून नाणी / पेडंटस् तयार करण्याची कार्यवाही पार पाडणेत आलेली आहे.

**सद्यःस्थिती– (ड)** सध्या संस्थानचे लेखाशाखा विभागाकडे दि. ३१ मार्च, २०१६ अखेर देणगी रुपाने प्राप्त झालेले खालीलप्रमाणे सोने-चांदीच्या वस्तू / अलंकार शिलकीत (जमा) असून, त्याचा थोडक्यात तपशील-

| अ.नं. | तपशील | सोने(GOLD) | चांदी(SILVER) |
| --- | --- | --- | --- |
| | | वजन ग्रॅम मध्ये | वजन ग्रॅम मध्ये |

| | | | |
|---|---|---|---|
| ०१ | लिलावासाठी स्वतंत्र ठेवणेत आलेले अलंकार | १८५०७.५४० | ५९४१५.०९० |
| ०२ | समाधी मंदिराकडे दैनंदिन वापरात असणारे अलंकार | १७३३७९.४०१ | ११५००९६.४२७ |
| ०३ | इतर विभागाकडे दैनंदिन वापरात असणारे अलंकार | ०००.००० | ७९७२.००० |
| ०४ | समाधी मंदिरामार्फत वापरुन पुन्हा लेखाशाखेकडे जमा झालेले अलंकार | ५९३७.२०० | १०५४२०.००० |
| ०५ | लेखाशाखेकडे जमा असलेल्या वस्तू / अलंकार | १५०९००.९७० | २७१२१२०.११० |
| ०६ | किरकोळ स्वरुपातील वस्तू | १२५१.९०३ | २१०५.८७० |
| | **एकुण -** | ३४९९७७.०१४ | ४०३७१२९.४९७ |
| | **म्हणजेच, एकुण वजन किलोग्रॅम मध्ये -** | **३४९.९७७** | **४०३७.१२९** |
| | **वितळविणे योग्य अलंकार / वस्तू किलोग्रॅममध्ये (अ.नं.०५+०६) -** | **१५२.१५३** | **२७१४.२२६** |

वर परिशिष्टात नमुद केलेप्रमाणे, दिनांक ३१ मार्च, २०१६ अखेर खाली नमूद केलेप्रमाणे सोने-चांदी वस्तू / अलंकार वितळविणेकामी उपलब्ध होऊ शकणार आहे –

**०१. सोने - ०१५२.१५३ किलोग्रॅम**

**०२. चांदी - २७१४.२२६ किलोग्रॅम**

**प्रस्ताव–**

**(इ)** सध्या संस्थान व्यवस्थापनाकडे लेखाशाखा विभागांतर्गत जे एकमेव स्ट्रॉंगरुम उपलब्ध आहे, त्यामध्येसदरचे अलंकार / वस्तू मोठी जोखीम स्वीकारुन ठेवणेत आलेल्या आहेत. भविष्यात भक्तांकडून देणगी रुपाने प्राप्त होणा-या सोने-चांदी, मौल्यवान वस्तू स्ट्रॉंग रुममध्ये ठेवणेकामी पुरेशी जागा उपलब्ध नाही. तसेच सुरक्षिततेच्या दृष्टिने मोठया जोखमीचे आहे.

त्यामुळे वर नमुद केलेली विषयाची पूर्वपीठीका , सद्यःस्थिती यांचा विचार करुन, वितळविण्याजोगे सोने / चांदी यांच्याशुध्द सोने / चांदीच्या लगडीमध्ये रुपांतर करुन यातील शुद्ध १०० किलो सोने सुवर्ण ठेव योजनेत गुंतवुन उर्वरित शुद्ध सोने व चांदी यांचे सन २०१७-१८ मध्ये साजरे होणारे श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सवासाठी भक्तांना मोठया प्रमाणावर शताब्दी महोत्सव सोने-चांदीची नाणी / पेडंटस् उपलब्ध करुनदेणे आवश्यक आहे.

मा.पंतप्रधान श्री नरेंद्र मोदी यांच्या कल्पनेतुन साकार झालेली सुवर्ण ठेव योजना थोडक्यात खालील प्रमाणे आहे.

१. आपल्या देशात मोठयाप्रमाणात सोन्याचा साठा असुनही देशामध्ये आयात मोठयाप्रमाणात होत आहे. यावर उपाय म्हणुन देशात शिल्लक असलेला सोन्याचा साठा वापरात आणुन त्यावर आकर्षक व्याज देउन देशाचा व गुंतवणुकदार देश बांधवांचा विकास होण्याच्या उदांत्त दृष्टीकोण ठेवुन ही योजना साकार करण्यात आलेली आहे.

२. सुवर्ण ठेव योजना रिजर्व बॅंकेच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रीयकृत बॅंकेच्या ठरावीक शाखामध्येच सुरु करण्यात आली आहे. या योजनेत फक्त शुद्ध स्वरुपातील ( ९९५ शुद्धतेचे सोने ) स्वीकारले जाते.

३. स्टेट बॅंक ऑफ इंडियाच्या मुंबई येथील बुलीयन शाखेमध्येसुवर्ण ठेव योजना सुरु आहे.

४. सुवर्ण ठेव योजनेत अल्प मुदत १ ते ३ वर्ष व्याज दर ०.५० % ते ०.५५ % वार्षिक असा आहे. मध्यम मुदत योजना ५ ते ७ वर्ष व्याज दर २.२५ % वार्षिक तर दिर्घ मुदत योजना १२ ते १५ वर्ष व्याज दर २.५० % असा आहे. ठेव योजना मध्येच बंद करावयाची झाल्यास ती बंद करता येते. परंतु व्याज दरावर दंड म्हणुन काही रक्कम आकारली जाते.

५. सुवर्ण ठेव योजनेमध्ये गुंतवणुकीच्या वेळेस असलेला सोन्याचा सर्वसाधारण दर गृहितधरुन त्याचे सर्टीफिकेट अदा केले जाते.

६. सुवर्ण ठेव योजनेची मुदत संपल्या नंतर गुंतवणूकदारास त्याचे सोने ( ९९५ शुद्धतेचे सोने ) परत दिले जाते.

**संस्थानला या योजनेव्दारे होणारा फायदा :**

**१.** सध्या संस्थानकडे वितळविण्याजोगे सोने १५२.१५३ किलो ग्रॅम असुन त्यांचे शुद्ध रुपांतरीत केलेल्या सोन्यामधुन १०० किलो शुद्ध सोने या योजनेत मध्यम कालीन मुदतीस ठेवल्यास संस्थानला या ठेवीवर सध्याच्या सरासरी बाजारभावाने साधारणपणे वार्षिक २.२५ % दराने व्याज मिळेल. हे व्याज साधारणपणे ६७.५० लाख एवढे वार्षिक व्याज मिळेल.

**२.** संस्थानच्या स्ट्रॉंग रुममध्ये ठेवण्याची जोखीम कमी होऊन नवीन येणारे मौल्यवान वस्तु ठेवण्यास जागा उपलब्ध होईल.

३. सुरक्षितेची जोखीम कमी होईल.

४. देशाच्या विकास कार्यात सहभागी होण्याचे उदिष्ट साध्य होईल.

उपरोक्त प्रक्रिया राबविण्यासाठी वर परिच्छेद क मध्ये नमुद केलेप्रमाणे मा. उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांनी दिनांक१६ ऑक्टोबर, २०१२ रोजी मा. न्यायालयानेच नेमलेल्या मा. त्रिसदस्यीय समितीस, कोणताही मौल्यवान धातू रुपांतरीत अथवा वितळवू नये म्हणून जे निर्देश दिलेले आहेत, त्याबाबत संस्थानचे विधी विभागामार्फत मा. उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांचेकडेस परवानगीसाठी दिवाणी अर्ज दाखल करावा लागेल.

तसेच,परिच्छेद ड मधील परिशिष्टात नमुद केलेप्रमाणे,लिलावासाठी स्वतंत्र ठेवणेत आलेले अलंकारांचे लिलावाबाबतही कार्यपध्दती निश्चित होऊन, त्याबाबत उचित निर्णय होणे आवश्यक आहे.

या सर्व बाबींचा विचार करुन, तत्कालीन मा.व्यवस्थापन समितीने व मा.शासनाने निश्चित केलेल्या मार्गदर्शक तत्वे – वजा – अटीशर्तीनुसार विहित कार्यपध्दती राबवून, आवश्यकता भासल्यास याकामी मा. उच्च न्यायालय, मुंबई यांचे खंडपीठ औरंगाबाद यांचेकडेस परवानगीसाठी संस्थानचे विधी विभागामार्फत दिवाणी अर्ज करुन, वितळविणे योग्य सोने – चांदी वस्तु/ अलंकार मा. शासनाचे अंगीकृत गव्हर्नमेंट मिंट ऑफ इंडिया, मुंबई व नॅशनल रिफायनरी, मुंबई यांचेकडेस वितळवून, सर्वप्रथम त्यापासून शुध्द सोने-चांदीच्या लगडी / चिपा तयार करुन घेणेस व तद्नंतर या शुध्द केलेल्या सोन्यामधुन १०० किलो सोने सुवर्णठेव योजनेत गुंतवुण उर्वरित सोने-चांदीपासून शताब्दी महोत्सवाकरीता श्री साईंची प्रतिमा असलेली सोन्याची नाणी / पेडंटस् (प्रत्येकी २.५ ग्रॅम, ५ ग्रॅम व १० ग्रॅम वजनाची) व चांदीची नाणी (प्रत्येकी २० ग्रॅम वजनाची) तयार करुन घेणेकामी सदरचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे विचारार्थ सादर.

**निर्णय क्र.५९९** **यावर सविस्तर चर्चा होऊन, स्ट्राँगरुममध्ये जागेअभावी निर्माण झालेल्या सुरक्षिततेच्या दृष्टीने मा.उच्च न्यायालयाच्या आदेशास अधीन राहून तसेच महाराष्ट्र शासनाच्या मार्गदर्शक तत्वानुसार संस्थानकडे देणगी रुपाने प्राप्त् झालेल्या/जमा असलेल्या सोने-चांदीच्या वस्तूंपैकी कलाकुसरीचे नक्षीकाम असलेल्या सोन्या/ चांदीच्या वस्तूंची लिलावाद्वारे विक्री करणेत यावी, असे ठरले व उर्वरित सोने-चांदीच्या वस्तुंबाबत प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे कार्यवाही करणेस मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- मुख्यलेखाधिकारी)

---

**विषय नं.१९** **सन २०१३-१४ या आर्थिक वर्षाच्या वैधानिक लेखापरिक्षण अहवालाचा दोष-दुरुस्ती अहवाल सादर करणेबाबत.**

**प्रस्ताव-** सन २०१३-१४ या आर्थिक वर्षाकरीता संस्थानचे वैधानिक लेखापरिक्षक म्हणुन मे.कोचर ॲण्ड असोसिएटस्, चार्टर्ड अकौंटंट, मुंबई यांची महाराष्ट्र शासन विधीव न्याय विभागामार्फत महाराष्ट्र शासन विधी व न्याय विभाग, जा.क.लेखाप-२०१४/३२०/प्र.क्र.५०/का-१६ दि.१ सप्टेंबर,२०१४अन्वये नियुक्ती करण्यात आली होती. त्यास अनुसरून त्यांनी सदर कामकाज पूर्ण केलेले असून, वैधानिक लेखापरिक्षण अहवाल दि.२६/०९/२०१४ रोजी संस्थानकडे सादर केला आहे. अधिनियम २००४ मधिल तरतुद १७(२) क आणि २९(२) अनुसार सदर अहवालाची एक प्रत मा.धर्मादाय आयुक्त, मुंबई व एक प्रत मा.प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई. यांना दि.२७ नोव्हेंबर,२०१४ रोजी पाठविण्यात आली आहे. तसेच सदर अहवाल माहे डिसेंबर २०१४ मध्ये नागपूर येथे झालेल्या हिवाळी अधिवेशनात सभागृहाच्या पटलावर सादर झालेला आहे.

सदर अहवालात नमुद केलेले आक्षेप/त्रुटी यांचा दोष दुरूस्ती अहवाल मा. प्रधान सचिव न्याय व विधी विभाग, महाराष्ट्र शासन यांना पाठवावा लागतो, त्या अनुषंगाने दोष दुरूस्ती अहवाल तयार करण्यासाठी सन २०१३-१४ या आर्थिक वर्षासाठीचे संस्थान व रुग्णालयाचे अंतर्गत लेखापरिक्षक श्री.सुरेश डौले ॲन्ड कं. चार्टर्ड अकौटंट, मे.एस.एल.कुलकर्णी ॲन्ड कं. चार्टर्ड अकौटंट,कोपरगाव व पुर्व लेखापरिक्षक मे.अभय शास्त्री ॲण्ड असो. चार्टर्ड अकौटंट, मे.व्ही.व्ही. कोठारी, चार्टर्ड अकौटंट यांना अहवालाच्या प्रती पाठविण्यात आल्या होत्या.

उपरोक्त चारही लेखापरिक्षण संस्थाच्या मार्गदर्शनानुसार सदर दोष दुरुस्ती अहवाल तयार करण्यात आलेला असुन, सदरचा दोषदुरुस्ती अहवालाची नोंद घेऊन मा.प्रधान सचिव विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांना सादर करण्यास मान्यता मिळणेकामी मा. समितीचे सभेपुढे सविनय सादर.

**निर्णय क्र.६००** **यावर सविस्तर चर्चा होऊन, सन २०१३-१४ या आर्थिक वर्षाच्या वैधानिक लेखापरिक्षण अहवालाचा दोष-दुरुस्ती अहवालाच्या प्रती सर्व विश्वस्तांना पुरविणेत याव्यात, तोपर्यंत सदरहू विषय स्थगित ठेवणेत यावा, असे ठरले.** (कार्यवाही- मुख्यलेखाधिकारी)

---

**विषय नं.२०** **श्री साईनाथ रुग्णालय, श्री साईआश्रम भक्तनिवास व श्री साईधर्मशाळा येथील पाणी शुध्दीकरण (STP) प्लॅन्टचे टाकीवर ग्रील कंपाऊंड तसेच द्वारावती व श्री साईनाथ रुग्णालय येथील पाणी हौदाचे कडेने जाळीचे कंपाऊंड करणेकामी येणाऱ्या खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** **अधिनियम 2004 मधील तरतूद** : अधिनियम कलम 17(2) (झ) सर्व साधारणपणे, विश्वस्तव्यवस्थेची मालमत्ता तिचे कामकाज यांचे योग्य प्रकारे व्यवस्थापन, देखभाल व प्रशासन करण्याच्या प्रयोजनांसाठी आवश्यक असतील अशा गोष्टी करील.

**प्रस्तावना–** वैदयकीय संचालक, श्री साईबाबा रुग्णालय यांचेकडील दिनांक 15/07/2016 रोजीचे पत्राव्दारे श्री साईनाथ रुग्णालय येथील पश्चिम बाजुस असलेल्या पाणी शुध्दीकरणाच्या प्लॅन्टच्या सिमेंट टाकीवर सुरक्षिततेच्यादृष्टीने जाळी बसवून मिळणेबाबत कळविले आहे. तसेच पाणी पुरवठा विभाग प्रमुख यांचेकडील दिनांक 03/07/2016 रोजीचे पत्राने साईआश्रम भक्तनिवास व साई धर्मशाळा येथे पाणी शुध्दीकरण (STP) प्लॅन्टची उभारणी केलेल्या ठिकाणी असलेल्या टाक्यामध्ये उघडया असल्याने, त्यात मैला एकत्र होत आहे. सदर ठिकाणी प्लॅन्टचे ऑपरेटींग करणारे कर्मचा-यांचे पाय घसवून जिवित हानी होऊ शकत यासाठी टाकीवर हेवी जाळी बसवून मिळणेबाबत कळविले आहे. तसेच प्लॅन्टचे कडेने सुरक्षिततेसाठी कंपाऊंड करुन मिळणेबाबतही कळविले आहे. त्याचप्रमाणे संस्थानचे व्दारावती व श्री साईनाथ रुग्णालय इमारतीसाठी पाणी पुरवठा करणेसाठी हौद असून, तेथेही सुरक्षिततेसाठी हौदाच्या भोवती कंपाऊंड तयार करुन मिळणेबाबत कळविले आहे.

**मागणी –** उपरोक्तप्रमाणे कळविलेनुसार सर्व ठिकाणी इकडील विभागामार्फत पाहणी करुन मोजमापे घेणेत आलेली असून, सदरची कामे बाहेरील फॅब्रिकेटर्स / वर्कशॉपधारक यांचेकडून ई-निविदा मागवून करावे लागणार आहे. याकामी खालील तपशीलाप्रमाणे खर्च अपेक्षित आहे :

| अ.नं. | मटेरिअलचा तपशील | परिमाण | मागणी | दर रुपये | अंदाजे रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|---|
| 1. | M.S. Chainling Jali : Size – 40 x 40 x 8 - 8 Swg. | Kg. | 2,875 | 91/- | 2,61,625/- |
| 2. | M.S. Angel : Size – 50 x 50 x 5 mm | Kg. | 1,600 | 50/- | 80,000/- |
| 3. | M.S. Angle : Size – 40 x 40 x 5 mm | Kg. | 3,000 | 50/- | 1,50,000/- |
| 4. | M.S. Square Bar : Size – 8 mm | Kg. | 1,192 | 60/- | 71,520/- |
| 5. | Colour | | | | |
| 5a | Asian Paint – Black | Ltr. | 17. | 200/- | 3,400/- |
| 5b | Asian paint – Silver | Ltr. | 20 | 250/- | 5,000/- |
| 6. | Bijagiri – Heavy Duty : Size – 6” | Nos. | 18 | 150/- | 2,700/- |
| 7. | Stainless Steel Aldrop : Size – 12” | | 6 | 270/- | 1,620/- |
| | | | | **एकूण रुपये:** | **5,75,865/-** |

**विभागाचा स्पष्ट अभिप्राय** : श्री साईनाथ रुग्णालय, श्री साईआश्रम भक्तनिवास व श्री साई धर्मशाळा येथील पाणी शुध्दीकरण (STP) प्लॅटचे टाकीवर ग्रील तसेच व्दारावती व श्री साईनाथ रुग्णालय येथील पाणी हौदाचे कडेने जाळीचे कंपाऊंड करणेकामी अंदाजे रुपये 5,75,865/- मात्रचा खर्च अपेक्षित आहे. मेकॅनिकल विभागाचे सन 2016-17 चे अंदाजपत्रकात ‘मटेरिअल खरेदी खर्च’ या शिर्षाखाली रक्कम रु. 25,00,000/- मात्रची तरतुद करणेत आलेली असून, आज अखेर या शिर्षाखाली रक्कम रुपये 24,15,308/- मात्र शिल्लक असून, या रकमेतुन सदरचे फॅब्रिकेशनचे काम करता येईल. याकामी येणा-या खर्चास मा. व्यवस्थापन समितीची मान्यता घेणे आवश्यक आहे.

तरी श्री साईनाथ रुग्णालय, श्री साईआश्रम भक्तनिवास व श्री साई धर्मशाळा येथील पाणी शुध्दीकरण (STP) प्लॅटचे टाकीवर ग्रील तसेच व्दारावती व श्री साईनाथ रुग्णालय येथील पाणी हौदाचे कडेने जाळीचे कंपाऊंड करणेकामी महाराष्ट्र शासनाचे www//mahatenders.gov.in या संकेतस्थळावर जाहीरात नोटीस अपलोड करुन फॅब्रिकेटर्स/ वर्कशॉपधारक ई-निविदा मागविणेस व याकामी येणा-या अपेक्षित खर्चास मान्यता मिळणेसाठी प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीची सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.६०१** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईनाथ रुग्णालय, श्री साईआश्रम भक्तनिवास व श्री साई धर्मशाळा येथील पाणी शुध्दीकरण (STP) प्लॅटचे टाकीवर ग्रील तसेच व्दारावती व श्री साईनाथ रुग्णालय येथील पाणी हौदाचे कडेने जाळीचे कंपाऊंड करणेकामी विहीत पध्दतीने ई-निविदा मागविणेस व याकामी येणाऱ्या अपेक्षित खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- मेकॅनिकल विभागप्रमुख)

---

**विषय नं.२१** **अपारंपारीक उर्जा अंतर्गत संस्थानकरिता ८ मेगावॅट क्षमतेची सोलर पी.व्ही. सिस्टीम बसविणेबाबत.**

**प्रस्ताव-** अधिनियम २००४ मधील तरतूद क्र.२१-१ (क) नुसार समितीकडून विश्वस्तव्यवस्था निधीचा नियोग पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही एक प्रयोजनासाठी करण्यात येईल :-

(क). मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन.

वरील अधिनियमास अनुसरुन खालीलप्रमाणे प्रस्ताव सादर करीत आहोत.

दिनांक ०७-०८-२०१६ रोजी झालेल्या मा.व्यवस्थापन समितीच्या सभेमध्ये मा.विश्वस्तांनी केलेल्या सुचनेनुसार श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीमार्फत अपारंपारीक ऊर्जा निर्मिती अंतर्गत सोलर ऊर्जा यांच्या निर्मितीला प्राधान्य देण्याचे ठरविण्यात आलेले आहे.

माणसाच्या दैनंदिन जीवनात वीजेचा वापर दिवसेंदिवस वाढत आहे. नैसर्गिक स्त्रोताच्या माध्यमातून जसे जल, वायु, कोळसा यांच्या अपुऱ्या साठयामुळे वीज निर्मितीसाठी अपारंपारीक पर्याय शोधण्याची व विकसित करण्याची गरज बनली आहे. सध्या संपुर्ण भारतात वीजेची कमतरता जाणवत असून या वीज टंचाईवर मात करणेसाठी एक प्रयत्न म्हणून केंद्र शासनाच्या अपारंपारिक ऊर्जा मंत्रालयामार्फत अपारंपारिक ऊर्जा निर्मिती अंतर्गत पवन ऊर्जा, सोलर ऊर्जा यांच्या निर्मितीला प्राधान्य दिलेले आहे. त्याच धर्तीवर महाराष्ट्र शासनानेही अपारंपारिक ऊर्जा निर्मितीस प्राधान्य देण्याचे धोरण अवलंबिले आहे. त्या अंतर्गत नविन व नवीकरणीय उर्जा स्त्रोत (अपारंपारिक ऊर्जा स्त्रोत) यापासून वीजनिर्मितीच्या पारेषन संलग्न प्रकल्पांसाठी एकत्रित धोरण-२०१५ च्या अंतर्गत ७५०० मेगावॅट क्षमतेचे सौर ऊर्जा प्रकल्प उभारणीचे उद्दीष्ट निश्चित केलेले आहे.

शासकीय धोरणास प्रतिसाद म्हणुन श्री साईबाबा संस्थानमार्फत सन २००७ मध्ये भोयरे पठार ता.अहमदनगर येथे २.५ मेगावॅट क्षमतेच्या पवनचक्की प्रकल्पाची उभारणी करण्यात आलेली आहे. सदरचा पवनचक्की प्रकल्प उभारण्याचे वेळी संस्थानची वीजेची गरज सरासरी ४० लाख युनिट प्रती वर्ष इतकी होती. त्यानुसार त्यावेळी मेडा, पुणे यांचे सल्ल्यानुसार २ X १.२५ मेगावॅट क्षमतेचा रु. १५ कोटी ४० लाख मात्र इतक्या एकुण खर्चाचा पवनचक्की प्रकल्प उभारण्यात आलेला होता.

यातुन वार्षिक सरासरी ४५ लाख युनिट वीज निर्मिती होते. संस्थानमार्फत उभारण्यात आलेल्या पवनचक्की प्रकल्पातुन ऑगस्ट-२००७ ते जुलै-२०१६ पर्यंत ४,२२,२९,४९५ वीजेच्या युनिटची निर्मिती झालेली आहे. ही निर्मित झालेली वीज ही महाराष्ट्र राज्य वीज वितरण् कंपनीस पुरविण्यात येत असून त्यापासुन संस्थानला जुलै-२०१६ पर्यंत रु.१७,२५,९४,४३६/- (रु.सतरा कोटी पंचवीस लाख चौऱ्यान्नव हजार चारशे छत्तीस मात्र इतके उत्पन्न मिळालेले आहे.

सन २००७ पर्यंत संस्थानची वीजेची गरज वार्षिक ४० लाख युनिट होती. परंतू त्यानंतर संस्थानमार्फत व्दारावती भक्तनिवास ही ३१६ रुम असलेली इमारत साईभक्तांकरीता सुरु करण्यात आलेली आहे. या ३१६ रुम पैकी ८० रुम वातानुकुलीत करण्यात आलेल्या आहेत. तसेच साई आश्रम भक्तनिवास भाग-०१ येथे १५३६ रुम असलेल्या १२ इमारती साईभक्तांकरीता सुरु करण्यात आलेल्या असून या १२ इमारतीं पैकी ३ इमारतीमध्ये एकुण ३८४ रुम वातानुकुलीत करण्यात आलेल्या आहेत. तसेच साईधर्मशाळा येथे १९६ हॉल असलेल्या ०६ इमारतीही साईभक्तांकरीता सुरु करण्यात आलेल्या आहेत. त्यामुळे आता संस्थानची वीजेची गरज वार्षिक ९६ लाख युनिटपर्यंत वाढलेली आहे. सन-२००६ साली वीजेच्या युनिटचा दर सरासरी रु.४.५० प्रति युनिट इतका होता तो आता सन-२०१६ साली रु. १२.५० प्रति युनिट (ही वाढ २७७ % इतकी आहे) इतका झाला असुन भविष्यात तो अजूनही वाढण्याची शक्यता आहे. संस्थानला दरवर्षी सरासरी रु.१२ कोटीपेक्षा जास्त वीजबील येत आहे. या वीजबीलाला पर्याय म्हणून अपारंपारिक ऊर्जेव्दारे वीज निर्मिती करुन स्वयंभू होणे गरजेचे आहे.

जगातील शास्त्रज्ञ जगातील पारंपारीक इंधन संपुष्टात येत असताना पर्यायी ऊर्जेवर भर देत आहेत. यावरुन सौर ऊर्जेच्या वापराचे महत्व लक्षात येऊन त्याचा वापर वाढविणे किती महत्वाचे आहे हे आपल्या लक्षात येते. म्हणुन सौर ऊर्जेचा वापर करुन वीज टंचाईवर मात करणेकरीता संस्थानमार्फत ८ मेगवॉट क्षमतेचा वीज निर्मिती प्रकल्प राबविणे गरजेचे आहे.

**सदरच्या सौर ऊर्जेचे फायदे पुढीलप्रमाणे :-**

०१). ही ऊर्जा विनामुल्य आहे.

०२). ध्वनी वायु व प्रदुषणमुक्त आहे .

०३). याची उपकरणे देखभाल विरहीत आहेत.

०४). शॉक लागण्याची भिती नाही.

०५). खुप मोठया परकीय चलनाची बचत होऊ शकते.

०६). ट्रान्समिशन व डिस्ट्रीब्युशन यामध्ये तुटवडा होण्याची शक्यता नाही.

०७). ही ऊर्जा प्रत्यावर्ती व अप्रत्यावर्ती या दोन्ही विद्युत धारेमध्ये वापरता येईल.

सोलर पी.व्ही.सिस्टीमच्या यंत्रणेव्दारे दरवर्षी प्रति मेगावॅट क्षमतेव्दारे १६ लाख युनिटसची वीज निर्मिती होते. संस्थानची सध्याची गरज ९६ लाख युनिट असून भविष्यात वाढणारी दर्शनरांग प्रकल्प, साईगार्डन, नविन इमारती विचारात घेता १२५ लाख युनिटसची आवश्यकता राहील. सोलर पी.व्ही.सिस्टीम उभारणीकामी प्रति मेगावॅट जमिनीच्या किंमतीसह रु.८ कोटी इतका खर्च अपेक्षित आहे. संस्थानच्या वीजेची गरज लक्षात घेता ८ मेगावॅट क्षमतेच्या सोलर पी.व्ही.सिस्टीमची उभारणी करणे गरजेचे वाटते. याकामी रक्कम रुपये ६४ कोटी इतका खर्च अपेक्षित आहे.

**अ).** हा प्रकल्प संस्थानमार्फत ई-निविदा मागवून करावयाचे ठरल्यास त्यासाठी महाराष्ट्र ऊर्जा विकास प्राधिकरण (मेडा-महाऊर्जा), पुणे यांच्या अटींची पुर्तता संस्थानला स्वत: करावी लागेल.

**ब).** सदर ८ मेगावॅटचा सोलर पी.व्ही.सिस्टीम हा प्रकल्प खाजगी विकासका मार्फत उभारण्यात आल्यास संपुर्ण भांडवल त्या खाजगी विकासकाचे राहील. तसेच प्रकल्पावर झालेल्या खर्चाचे रकमेवरील बँकेचे व्याज, ऑपरेशन ॲण्ड मेन्टेनन्स चार्जेस, इन्शुरन्स, घसारा, ट्रान्समिशन ॲण्ड डिस्ट्रीब्युशन लॉसेस, महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी यांचेशी करारनामे करण्यासाठी येणारा खर्च, प्लँट उभा करणेसाठी आवश्यक असणा-या सर्व शासकीय यंत्रणेच्या मंजु-या व त्यासाठी येणारा खर्च, जमिनीची किंमत इत्यादि सर्व खर्च हा खाजगी विकासकाचा असतो. याकरीता संस्थानला साधारणत: रु. १०/- प्रति युनिट खाजगी विकासकाला दयावे लागतील. सध्याचा संस्थानचा वीजेच्या युनिटस् चा दर सरासरी रु.१२.५० इतका आहे. परंतू जर हा प्रकल्प खाजगी विकासकामार्फत उभारण्यात आला तर या खाजगी विकासकाला संस्थानमार्फत साधारणत: रु. १०/- प्रति युनिट इतका दर दयावा लागेल. यामध्ये संस्थानचे रु.२.५० प्रति युनिट इतकी बचत होईल. सध्याचा संस्थानचा वीजेच्या युनिटचा दर रु.१२/- इतका आहे. सध्या संस्थानचे वीजेचे वार्षिक बील रुपये १२ कोटी (रु.बारा कोटी) इतके आहे. हा दर भविष्यात वाढतच राहणार आहे. सदरचा महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीचा दर हा भविष्यात कितीही वाढला तरीही संस्थानला त्याची तोषिस लागणार नाही. साधारणत: हा करार १५ वर्षाचा असतो. याव्यतिरिक्त प्रकल्प चालविण्यासाठी लागणारे मनुष्यबळ, ऑपरेशन ॲण्ड मेन्टेनन्स चार्जेस इत्यादि छुपे चार्जेस खाजगी विकासकाला देण्याची गरज नाही. सदरचा प्रकल्प महाराष्ट्रात कोठेही उभा राहिला नाही तरी संस्थानला त्याचा काहीही फरक पडणार नाही आणि सदर वीज बीलाची रक्कम महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीकडून माफ होऊन आल्यानंतरच प्रति युनिट रु. १०/- इतकी रक्कम खाजगी विकासकाला दयावी लागेल.

हा प्रकल्प गुजरात राज्याच्या धर्तीवर श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या कनकुरी शिवारातील साठवण तलावावर उभारता येऊ शकतो किंवा कसे? याबाबत असे निदर्शनास आले आहे की, गुजरातमध्ये असे प्रकल्प हे वाहत्या पाण्याच्या कालव्यांवर उभारण्यात आलेले असून साठवण तलावावर उभारण्यात आलेले नाहीत.

कारण

अ). गुजरात राज्य येथे उभारण्यात आलेला सोलर पी.व्ही.सिस्टीम हा प्रोजेक्ट त्याठिकाणच्या कालव्यांवर उभारण्यात आलेला आहे. या कालव्यांची रुंदी कमी असल्याने त्याचे फाऊंडेशनकरीता जास्त खर्च आलेला नाही. परंतू जर आपण हा प्रोजेक्ट संस्थानचे कनकुरी साठवण तलाव येथे उभारला तर सदरचे फाऊंडेशन करीता जास्त खर्च येणार आहे. तसेच सदरचे फाऊंडेशनकरीता साठवण तलावामध्ये खड्डे खोदवावे लागणार आहे. सदरच्या खड्डे खोदाईमुळे साठवण तलावातील पाण्याची गळती होऊ शकते.

ब). गुजरात राज्य येथे उभारण्यात आलेला सोलर पी.व्ही.सिस्टीम हा प्रोजेक्ट त्याठिकाणच्या कालव्यांवर उभारण्यात आलेला आहे. सदरच्या कालाव्यांमध्ये पाणी हे वाहते असल्यामुळे सोलर पॅनेलवर पक्षी बसून जी विष्ठा पाण्यात पडते ती लगेच वाहून जाते. त्यामुळे वाहते पाणी असल्यामुळे कालव्यातील पाणी दुषित होत नाही. जर आपण हा प्रोजेक्ट संस्थानचे कनकुरी साठवण तलाव येथे उभारला तर या सिस्टीममधील सोलर पॅनेल्सवर पक्षी बसतील. सदरच्या तलावातील पाणी हे वाहते नसल्यामुळे सदरच्या पक्षांची विष्ठा साठवण तलावातील पाण्यात पडून पाणी घाण होऊ शकते. तसेच मेन्टेनन्सच्या वेळीही ही घाण साठवण तलावातील पाण्यात पडून पाणी दुषित होऊ शकते.

क). गुजरात राज्य येथे उभारण्यात आलेला सोलर पी.व्ही.सिस्टीम हा प्रोजेक्ट त्याठिकाणच्या कालव्यांवर उभारण्यात आलेला आहे. सदरच्या कालव्यांमध्ये पाणी हे वाहते असल्यामुळे सोलर पॅनेल्सवर, फाऊंडेशनवर तसेच इलेक्ट्रीकल वायरींगवर साचलेली धूळ पाण्यात पडून ती लगेच वाहून जाते. त्यामुळे वाहते

पाणी असल्यामुळे पाणी दुषित होत नाही. जर आपण हा प्रोजेक्ट संस्थानच्या कनकुरी साठवण तलाव येथे उभारला तर या सिस्टीममधील सोलर पॅनल्सवर, फाऊंडेशनवर तसेच इलेक्ट्रीकल वायरींगवर साचलेली धूळ साठवण तलावातील पाण्यात पडून पाणी दुषित होऊ शकते.

ड). साठवण तलावात उभारण्यात येणा-या सोलर पी.व्ही.सिस्टीम पॅनेल्सचे मेन्टेनन्स करणे अवघड असते.

**या प्रकल्पाकरीता खालीलप्रमाणे जमिनीची आवश्यकता असते.**

अ). उतार असलेली जागा, जास्त खडकाळ किंवा वाळुकामय जागा, खाच खळगीयुक्त जागा इ.मुळे प्रोजेक्टची किंमत वाढत असते. त्यामुळे उतार नसलेली सपाट जागेची सदरच्या प्रोजेक्टकरीता आवश्यकता आहे.

ब). सदरच्या प्रोजेक्टकरीता जास्त धुळीमय जागा, जलमय अथवा जास्त पाऊस पडणारी जागा, जागेची जास्त झीज होणारी जागा इत्यादि जागा असल्यास वीज निर्मितीकरीता मर्यादा येतात. त्यामुळे अशा जागेव्यतिरिक्त इतर जागेची सदरच्या प्रोजेक्टकरीता आवश्यकता आहे.

क). सदर सोलर पी.व्ही.सिस्टीमधून निर्माण होणारी वीज ही महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीस विक्री करावी लागते. परंतू महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीची हाय ट्रान्समिशन लाईन ही जर सदर जागेपासून लांब असेल तर त्यामुळे सदर प्रोजेक्टच्या किंमतीमध्ये बरीच वाढ होऊ शकते. त्यामुळे महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीची हाय ट्रान्समिशन लाईन ही सदर जागेपासून जास्त लांब नसावी.

ड). सदर सोलर पी.व्ही.सिस्टीमधून निर्माण होणा-या वीजेच्या क्षमतेपेक्षा जास्त क्षमतेचे महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीचे सबस्टेशन जवळ असणे आवश्यकता आहे. जर कमी क्षमतेचे सबस्टेशन जवळ असेल तर जादा क्षमतेने निर्माण होणारी वीज अतिरिक्त ठरुन वाया जाते.

फ). सदरची जागा ही मिलिट्री भागातील नसावी तसेच रडार यंत्रणा जवळ नसावी.

च). जेवढी सिस्टीमची क्षमता कमी तेवढी त्या सिस्टीमची किंमत जास्त वाढते. जास्त क्षमतेच्या सिस्टीमसाठी मशिनरी, केबलींग, तसेच मेन्टेनन्समध्ये बचत होत असल्याने कमी खर्च येत असतो.

या प्रकल्पासाठी महाराष्ट्र शासनाची संस्था महाराष्ट्र ऊर्जा विकास प्राधिकरण (मेडा-महाऊर्जा), पुणे यांचे मार्गदर्शन घ्यावे लागणार आहे. कारण केन्द्र सरकारकडे या प्रकल्पाची नोंद करणे, शक्य असल्यास किंवा लागू असल्यास या प्रकल्पास केन्द्र सरकारकडून सबसिडी मिळविणे, याशिवाय याकामी सोलर पी.व्ही.सिस्टीम उभारण्यासाठी प्रस्ताव तयार करणे, निविदा मसूदा तयार करणे, प्राप्त निविदांची छाननी करुन संस्थानला अहवाल सादर करणे, सोलर पी.व्ही.सिस्टीम प्रकल्पा उभारणी चालू असताना किंवा आस्थापित केल्यानंतर वेळोवेळी पाहणी करुन संस्थानला अहवाल सादर करणे, निर्मित झालेली वीज महाराष्ट्र राज्य वीज वितरण / पारेषण कंपनीस पुरविणेसाठी महाराष्ट्र शासनाचे ना हरकत प्रमाणपत्र देणे ही सर्व कामे महाऊर्जामार्फत केली जातात.

सोलर पी.व्ही.सिस्टीम प्रकल्प उभारण्यासाठी निविदा मागविणे व नंतर कार्यादेश देणे यामधील सर्व प्रक्रीया संस्थानमार्फत करावी लागणार आहे.

या प्रकल्पाकरीता महाराष्ट्र शासनाच्या महाराष्ट्र ऊर्जा विकास प्राधिकरण (महा ऊर्जा), पुणे यांची सल्लागार फी (शुल्क) किती असणार आहे. तसेच प्रकल्पाबाबत सध्या शासकीय धोरण काय आहे ? तसेच प्रकल्प कसा असावा याबाबत माहिती घेणेसाठी महाराष्ट्र ऊर्जा विकास प्राधिकरण (महा ऊर्जा), पुणे यांना पत्राव्दारे संस्थानकडे लेखी विचारणा करावी लागणार आहे.

अशा प्रकारचा सोलर पी.व्ही.सिस्टीमचा ८ मेगावॅटचा सोलर पी.व्ही.सिस्टीम प्रकल्प जळगांव येथे मे.जैन इंडस्ट्रीज यांनी उभारलेला असून तो यशस्वी झाल्याचे महाराष्ट्र शासनाच्या महाराष्ट्र ऊर्जा विकास प्राधिकरण (मेडा) तसेच जैन इंडस्ट्रीज अशा दोन्हीकडच्या अधिका-यांनी सांगितलेले आहे तरी सुद्धा संस्थानमार्फत सदर प्रकल्प राबविणेपुर्वी संस्थानच्या मा.व्यवस्थापन मंडळाचे सदस्य व संस्थानच्या अधिका-यांनी जळगांव येथील प्रकल्पाला भेट देऊन समक्ष पाहणी करुन प्रकल्पाची अद्यावत माहिती घेऊन प्रकल्पाची योग्य-अयोग्य बाबत खातरजमा करुन घेणे गरजेचे वाटते.

उपरोक्तप्रमाणे ८ मेगावॅट क्षमतेच्या सोलर पी.व्ही.सिस्टीम उभारणीस मान्यता मिळणेकामी तसेच या प्रकल्पाकरीता महाराष्ट्र शासनाच्या महाराष्ट्र ऊर्जा विकास प्राधिकरण (महा ऊर्जा), पुणे यांची सल्लागार फी (शुल्क) किती असणार आहे. तसेच प्रकल्पाबाबत सध्या शासकीय धोरण काय आहे? तसेच प्रकल्प कसा असावा याबाबत माहिती घेणेसाठी महाराष्ट्र शासनाच्या महाराष्ट्र ऊर्जा विकास प्राधिकरण (महा ऊर्जा), पुणे यांना पत्राव्दारे लेखी विचारणा करणेस तसेच जळगांव येथे उभारण्यात आलेल्या ८ मेगावॅट प्रकल्पाला संस्थान विश्वस्त तसेच संस्थान अधिका-यांनी भेट देणेस मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.६०२** **यावर सविस्तर चर्चा होऊन, अपारंपारीक उर्जा अंतर्गत संस्थानकरिता ८ मेगावॅट क्षमतेची सोलर पी.व्ही. सिस्टीम उभारणेकामी महाराष्ट्र शासनाच्या महाराष्ट्र ऊर्जा विकास प्राधिकरण (मेडा) यांचेबरोबर पत्रव्यवहार करणेत येऊन, त्याचा सर्वांगिन अहवाल समिती समोर सादर करणेत यावा, असे ठरले.**

(कार्यवाही- विद्युत विभागप्रमुख)

---

**विषय नं.२२** **नविन खेळणी व लॉन बसविणेबाबत.**

**प्रस्ताव-** साई सहवास इमारतीच्या पुर्व-उत्तर बाजुकडील कोपऱ्यात (गौरी शेडजवळ) 3 गुंठे जागा मोकळी आहे. सदर जागेत नविन लॉन व खेळणी बसविल्यास ती जागा वापरात येईल. त्यामध्ये 1200 स्के. फुट लॉन लावुन उर्वरीत जागेत खेळणी बसविता येईल. त्यामुळे तेथील परिसरातील लहान मुलांना त्याचा फायदा होईल.

साई सहवास इमारत परिसरातील पुर्व-उत्तर बाजुकडील कोपऱ्यात (गौरी शेडजवळील) मोकळया जागेत नविन खेळणी खरेदी करुन बसवायची आहे. त्या ठिकाणी 1. Merry Go Round, 2.Swing, 3. See - Saw, 4.fiber slide अशी 4 प्रकारची खेळणी खरेदी करुन बसविता येईल. व उर्वरीत जागेत पोयटा टाकुन लॉन लावता येईल. या सर्व कामासाठी अंदाजे खालीलप्रमाणे खर्च अपेक्षीत आहे.

| तपशिल | | रक्कम |
|---|---|---|
| खेळणी (सर्व करासहीत) | 1. Merry go round<br>2. Swing<br>3. See - saw<br>4. Fiber slide | १,२०,००० |
| पोयटा वाहतुक करुन लेव्हल करणे/ पसरविणे | 13 ब्रास X रु.1600 प्रती ब्रास | २०,८०० |
| लॉन वहतुक व लागवड सह | 1200 स्के. फुट X 20 | २४,००० |
| खते, औषधे | - | १०,००० |
| एकुण | | १,७४,८०० |

तरी साई सहवास इमारत परिसरातील पुर्व-उत्तर बाजुकडील कोपऱ्यात (गौरी शेडजवळील) मोकळया जागेत नविन खेळणी, लॉन बसविणेकरीता विविध पुरवठाधारकांकडुन कोटेशन मागवुन न्युनत्तम दराने काम करुन घेता येईल. यासाठी अंदाजे रु. १,७४,८००/- (एक लाख चौऱ्याहत्तर हजार आठशे) मात्र खर्च अपेक्षीत आहे.

तरी उपरोक्त प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.६०३** **यावर सविस्तर चर्चा होऊन, साई सहवास इमारत परिसरातील पुर्व-उत्तर बाजुकडील कोपऱ्यात (गौरी शेडजवळील) मोकळ्या जागेत नविन खेळणी, लॉन बसविणेकरीता विहीत पध्दतीने कोटेशन मागविणेस व त्याकामी येणाऱ्या अंदाजे रु.१,७४,८००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- बगीचा विभागप्रमुख)

---

**विषय नं.२३** **डॉ.कोळपे नर्सिंग कॉलेज (B.Sc. Nursing) व श्री स्वामी समर्थ नर्सिंग कॉलेजच्या प्रशिक्षणार्थ्यांना प्रात्यक्षिक अनुभवासाठी परवानगी बाबत.**

**प्रस्ताव-** मा.अध्यक्ष, ग्रामीण समाजसेवी संस्था, कोळपेवाडी ता. कोपरगांव जि. अहमदनगर यांनी जावक क्रमांक १५८/२०१६ व १८७/२०१६ दिनांक ०८/०२/२०१६ रोजीचे पत्रान्वये डॉ. कोळपे नर्सिंग कॉलेज (B.Sc. Nursing) व श्री स्वामी समर्थ नर्सिंग कॉलेज (RGNM) या संस्थेत प्रशिक्षण घेत असलेल्या प्रशिक्षणार्थ्यांना श्री साईबाबा संस्थानचे रूग्णालयात प्रात्यक्षिक अनुभवासाठी परवानगी मिळणेबाबत विनंती केलेली आहे.

उपरोक्त संस्थेच्या प्रशिक्षणार्थ्यांना श्री साईबाबा संस्थानचे रूग्णालयामध्ये प्रात्यक्षिक अनुभवाकरिता परवानगी दिल्यास ते शिक्षणाबरोबर व्यसायिक कौशल्य प्राप्त करू शकतील आाणि त्यातुन रूग्ण तसेच सामाजिक सेवेचा अंगीकार करतील. श्री साईनाथ रूग्णालयात सध्या दैनंदिन येणा-या रूग्णांची संख्या १००० ते १२०० पर्यंत असुन, अंतर्रूग्णांची संख्या २०० ते २५० चे आसपास असते. रूग्णालयात रूग्णांची संख्या दिवसेंदिवस वाढत आसल्याने, परिचारीकांची कमतरता भासत आहे.

यापुर्वी मा. व्यवस्थापन समितीचे दि.२६/०३/२०११ रोजीचे सभेतील निर्णय क्र.२५६ अन्वये शिवा ट्रस्ट, औरंगाबाद यांचे अंतर्गत महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, श्रीरामपुर येथील नर्सिंग कॉलेजच्या

प्रशिक्षणार्थ्यांना प्रॅक्टीसकरिता विना मोबदला परवानगी देण्यात आली आहे. तसेच मा. व्यस्थापन समितीचे दि.१८/०२/२०१५ रोजीचे सभेतील निर्णय क्र. ७१ अन्वये साई इंस्टीटयुट ऑफ नर्सिंग, बाभळेश्वर येथील RGNM चे प्रथम, व्दितीय व तृतीय वर्षात प्रशिक्षण घेत असलेल्या प्रशिक्षणार्थ्यांना प्रॅक्टीसकरिता विना मोबदला परवानगी देण्यात आली असुन, त्यांनी याकामाकरिता हॉस्पीटलला भेटी दिलेल्या आहेत. त्यामुळे रूग्णालयातील रूग्ण सेवा सुरळीत देणेसाठी नक्कीच हातभार लागत आहे. सदर प्रशिक्षणार्थ्यांचाही श्री साईबाबा संस्थान रूग्णालयात येणा-या रूग्ण सेवेसाठी उपयोग करून घेता येईल.

B.Sc. Nursing कोर्स चार वर्षाचा असुन, RGNM हा कोर्स साडेतीन वर्षाचा आहे. करिता डॉ. कोळपे नर्सिंग कॉलेज (B.Sc. Nursing) व श्री स्वामी समर्थ नर्सिंग कॉलेजच्या (RGNM) प्रशिक्षणार्थीना श्री साईबाबा संस्थानचे रूग्णालयामध्ये प्रात्यक्षिक अनुभवासाठी खालील अटी-शर्तीवर परवानगी देता येईल असे इकडील श्री साईबाबा संस्थान रूग्णालये प्रशासनाचे मत आहे.

१) प्रशिक्षणार्थी विद्यार्थ्यांना प्रशिक्षण कालावधीत संस्थानतर्फे कोणत्याही प्रकाराचे मानधन अथवा विद्यावेतन/वेतन दिले जाणार नाही.

२) प्रशिक्षण कालावधीत विद्यार्थ्यांसोबत विद्यालयाचे शिक्षक वर्ग उपस्थित राहणे आवश्यक आहे.

३) प्रशिक्षणार्थी विद्यार्थ्यांना भविष्यात संस्थानकडे कोणत्याही प्रकारचा नौकरी संदर्भात दावा करता येणार नाही.

४) प्रशिक्षणार्थीची ने-आण करण्याची व्यवस्था त्यांचे संस्थेमार्फत करावी लागेल.

५) प्रशिक्षण कालावधीत विद्यार्थ्यांची काही तक्रार आल्यास त्यांचे निवारण करणेची जबाबदारी नर्सिंग कॉलेजची व संबंधित विद्यार्थ्यांची राहील.

६) प्रशिक्षणार्थी विद्यार्थ्यांना प्रशिक्षण कालावधीत संस्थान नियमाचे पालन करणे बंधनकारक राहील व त्यानी सर्वाशी सौजन्याने वागावे.

तरी डॉ.कोळपे नर्सिंग कॉलेज (B.Sc. Nursing) व श्री स्वामी समर्थ नर्सिंग कॉलेजच्या (RGNM) या संस्थेत प्रशिक्षण घेत असलेल्या प्रशिक्षणार्थ्यांना श्री साईबाबा संस्थानचे रूग्णालयामध्ये प्रात्यक्षिक अनुभवासाठी परवानगी देणेस विनंती.

तरी उपरोक्त प्रस्तावावर निणर्य होणेस विनंती.

**निर्णय क्र.६०४ यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्ताव अमान्य करणेत आला.** (कार्यवाही- वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं.२४ श्री साईबाबा रुग्णालयामध्ये Adhoc basic पध्दतीने कार्डीओलॉजीस्टच्या केलेल्या नेमणूकीस कार्योत्तर मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा रुग्णालयाचे मंजुर आकृतीबंधामध्ये इंटरव्हेंशनल कार्डीओलॉजीस्टचे २ पदे व नॉनइंटरव्हेंशनल कार्डीओलॉजीस्टचे १ पद मंजूर असुन डॉ. बजाज व डॉ. गौरव वर्मा यांची इंटरव्हेंशनल कार्डीओलॉजीस्ट म्हणून नेमणूक करणेत आलेली आहे. तथापि डॉ. बजाज व डॉ. वर्मा यांना त्यांनी केलेल्या गंभीर गैरशिस्त वर्तनाबाबत खातेचौकशी पूर्ण होईपर्यंत दि. ०८/११/२०१४ पासून संस्थान सेवेतून तात्पुरते निलंबित करण्यात आले आहे.

उपरोक्त दोन्ही डॉक्टर्सना निलंबित केल्याने रुग्णालयातील रुग्णांची गैरसोय होऊ नये यासाठी इंटरव्हेंशनल कार्डीओलॉजिस्ट या पदावर ०६ महिने कालावधीसाठी कंत्राटी व व्हिजीटींग पद्धतीने तात्पुरती नेमणूक करणेकरिता सिव्हील ॲप्लीकेशन नं. २७९७/२०१४ वरील मा. उच्च न्यायालयाचा दि. १९/०३/२०१४ रोजीचे आदेशानुसार ०२ कंत्राटी व ०५ व्हिजीटींग पद्धतीने नेमणूक देणेकामी मान्यता देण्यात आली होती. त्यास अनुसरुन हॉस्पिटलकडे उपलब्ध असलेल्या कार्डीओलॉजीस्ट अर्जदारांच्या दि. २३/०३/२०१४ रोजी मुलाखती घेऊन डॉ. मनोहर शिंदे व डॉ. प्रशांत पवार यांना अनुक्रमे रु ३,००,०००/- (रुपये तीन लाख मात्र) व रु. १,५०,०००/- (रुपये एक लाख पन्नास हजार मात्र) एकत्रित मासिक मानधन देऊन कंत्राटी पद्धतीने तर डॉ. बजाज, डॉ. ठेंगे, डॉ. काळे, डॉ. हिरण व डॉ. विजन यांना प्रोत्साहन भत्ता (Incentive) देऊन व्हिजीटींग पद्धतीने तात्पुरते सहा महिन्यांसाठी नेमणूक करण्यात आली होती. त्यापैकी डॉ. शितलकुमार हिरण व डॉ. विनोद विजन हे हजर झालेले नव्हते. सदर नेमणूकांस मा. त्रिसदस्य समितीचे दि. १२/०४/२०१४ रोजीचे सभेतील निर्णय क्र. २७५ नुसार कार्योत्तर मान्यता देण्यात आलेली आहे.

उपरोक्त ०६ महिन्यांसाठीची नेमणूक संपुष्टा त आल्याने मा. त्रिसदस्य समितीचे दि. ११/०९/२०१४ चे सभेतील निर्णय क्र. ७८५ नुसार पुन्हा मुदतवाढ देणेकामी मा. न्यायालयात सिव्हील ॲप्लीकेशन नं. २९०/२०१५ दाखल करणेत आले होते. त्यावर दि. १२/०१/२०१५ रोजीचे आदेशान्वये ०१ वर्ष कालावधीसाठी किंवा डॉ.

बजाज व डॉ. वर्मा यांची चौकशी पुर्ण होईपर्यंत जे आधी घडेल त्या कालावधीपर्यंत पुर्वीच्याच अटीशर्तीवर मुदतवाढ देण्यात आली होती. मा. उच्च न्यायालयाच्या मंजुरीनुसार तात्पुरत्या स्वरुपात Adhoc बेसिसवर डॉ. मनोहर शिंदे व डॉ. प्रशांत पवार यांना नेमणूक देण्यात येऊन त्यांना अनुक्रमे मासिक एकत्रित मानधन रुपये तीन लाख व दीड लाख देण्यात येत होते. त्यानंतर डॉ. प्रशांत पवार यांना व्हिजीटींग पद्धतीने काम करावयाचे असल्याने त्यांनी कंत्राटी पद्धतीच्या कामाचा राजीनामा दिल्याने त्यांचा सदर पदाचा राजीनामा मंजूर करुन व्हिजीटींग पद्धतीने नेमणूक देण्यात आली व त्यांचे जागेवर डॉ. भारत जैन यांना दि. ०३/०३/२०१५ रोजी पासून कंत्राटी पद्धतीने नेमणूक देण्यात आली होती व त्यांना डॉ. प्रशांत पवार यांचेप्रमाणेच रक्कम रुपये एक लाख पन्नास हजार मानधन देण्यात आले मात्र त्यांनीही दि. ३१ मे २०१६ रोजी एक महिना लेखी पूर्व राजीनामा नोटीस सादर केली आहे तथापि त्यांचा राजीनामा अद्यापपर्यंत मंजूर झालेला नाही व ते दि. ०१/०७/२०१६ पासून अनधिकृत गैरहजर आहेत.

मा. व्यवस्थापन समिती दि. ९/१२/२०१४ चे सभेतील निर्णय क्र. १०३५ नुसार ह्दयरोग रुग्णांची संख्या विचारात घेता आणखी चार कार्डीओलॉजीस्टसाठी कार्योत्तर मान्यता आहे. उपरोक्त दोन्ही डॉक्टर्सना (डॉ. बजाज व डॉ. वर्मा) निलंबित केल्याने रुग्णालयातील रुग्णांची गैरसोय होऊ नये यासाठी Ad hoc बेसिसवर तात्पुरत्या स्वरुपात नविन कार्डीओलॉजिस्टची नेमणूक करणेकामी मा. मुंबई उच्च न्यायालयाचे खंडपीठ औरंगाबाद येथे सिव्हील ॲप्लीकेशन नं. ३९३७/२०१५ दाखल करणेत आले होते. त्यावर मा. न्यायालयाचे दि. १०/०४/२०१५ रोजीचे आदेशानुसार चार कार्डीओलॉजिस्ट वैद्यकीय अधिका-यांना Ad hoc बेसिस वर नेमणूक करणेस मान्यता दिलेली आहे.

मा. उच्च न्यायालयाचे उपरोक्त आदेशानुसार एक कार्डीओलॉस्टची (डॉ. धिरज मोरे) नेमणूक करणेत आलेली आहे. दि. ०६/०५/२०१६ रोजीचे मा. त्रिसदस्य समितीचे निर्णय क्र. २७३ नुसार डॉ. धिरज मोरे यांना एकत्रित मासिक रु. १,५०,०००/- (एक लाख पन्नास हजार मात्र) देणेबाबत मान्यता देण्यात आलेली आहे.

सबब, रुग्णालयातील ह्दयरोग रुग्णांची संख्या विचारात घेता तातडीची गरज म्हणून डॉ. संदिप नारायणराव देवरे यांना इंटरव्हेंनल कार्डीओलॉजीस्ट या पदावर इतर कार्डीओलॉजिस्ट प्रमाणेच एकत्रित मासिक रु. १,५०,०००/- मानधनावर तात्पुरत्या स्वरुपात Adhoc Basis पद्धतीने केलेल्या नेमणूकीस कार्योत्तर मान्यता असावी.

मान्यतेस्तव सादर.

**निर्णय क्र.६०५** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा रुग्णालयामध्ये Adhoc basic पध्दतीने कार्डीओलॉजीस्टच्या केलेल्या नेमणूकीस कार्योत्तर मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं.२५** **श्री साईनाथ रुग्णालयातील भुलतज्ञांना त्यांचे डयुटीव्यतिरीक्त संध्याकाळी ६ ते १० या वेळेत दयावयाच्या मानधनाबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईनाथ रूग्णालयमध्ये भुलतज्ञ कमी असल्यामुळे नियोजित ऑपरेशन पुढे ढकलावे लागतात, पर्यायाने अडचण निर्माण होऊन रूग्णांची गैरसोय होते. त्यामुळे तातडीची उपाययोजना म्हणुन श्री साईनाथ रूग्णालयातील भुलतंज्ञाना त्यांचे डयुटी व्यतिरीक्त संध्याकाळी ६ ते १० या वेळेत आवश्यक असलेल्या मेडियम ऑपरेशनसाठी रू.४५०/- व मेजर/तातडीचे ऑपरेशनसाठी रू.८००/- देणेस मा. व्य. स. सभा निर्णय क्रं.५२५ दि.२४/०७/२०११ अन्वये मान्यता मिळाली आहे. त्यानुसार दि.०१/०९/२०११ पासुन श्री साईनाथ रूग्णालयमध्ये कार्यरत असलेले वैद्यकीय अधिकारी (ज्यु. भुलतज्ञ) यांना आदेशा प्रमाणे मानधन देण्यात येत आहे.

आता, डॉ.मनिषा शिरसाठ, डॉ.गोविंद कलाटे, व डॉ.महेंद्र तांबे, वैद्यकीय अधिकारी (ज्यु. भुलतज्ञ) यांनी दि. २९/१२/२०१५ रोजीच्या विनंती अर्जान्वये खालील प्रमाणे मागणी केलेली आहे.

**अ)** तातडीच्या केसेस हया यायंकाळी ४.०० ते दुस-या दिवशी सकाळी ९.०० वाजेपर्यंत होतात. या वेळेत होणा-या सर्व तातडीच्या केसेसचे मानधन मिळावे. माहे सप्टेंबर-२०११ च्या आदेशानुसार संध्याकाळी ६ ते १० या वेळेत आवश्यक असलेल्या मेडियम ऑपरेशनसाठी रू.४५०/- व मेजर/तातडीचे ऑपरेशनसाठी रू.८००/- हे दर चार वर्षापासुन बदलण्यात आलेले नाहीत. तरी सदरचे दर मेडियम ऑपरेशनसाठी रू.१०००/- व मेजर/तातडीचे ऑपरेशनसाठी रू.१६००/- बदलुन मिळावेत अशी मागणी केलेली आहे.

इर्मजन्सी व सिझर या तातडीचे केसेस बाबत तत्कालीन मा. वैद्यकीय संचालक, डॉ.नानासाहेब म्हस्के, श्री साईबाबा संस्थान रूग्णालये यांचेशीचर्चा करून, सदर केसेस ऑनकॉल डयुटीचा भाग असल्यामुळे त्या केसेसचे मानधन बंद करणेत आलेले आहे.

श्री साईनाथ रूग्णालयात एकुण ५ ऑपरेशन टेबल असुन, सध्या ३ वैद्यकीय अधिकारी (ज्यु. भुलतज्ञ) कार्यरत आहेत. सकाळी ९.०० ते ५.०० वाजेपर्यंत साधारण २० ते २५ ऑपरेशन होतात व प्रत्येक भुलतज्ञ दररोज ६-७ रूग्णांना भुल देतात.

सध्या कार्यरत असलेले तिनही भुलतज्ञ यांना माहे एप्रिल-२०१५ ते मार्च-२०१६ अखेर मिळालेले जादा कामाचा आर्थिक मोबदला वरूग्णांची संख्या दर्शविणारा तक्ता खालील प्रमाणे

| अ.नं. | वैद्यकीय अधिका-यांचे (ज्यु. भुलतज्ञ) नांव | एकुण रूग्ण संख्या | आर्थिक मोबदला |
|---|---|---|---|
| १ | डॉ. मनिषा लक्ष्मण शिरसाठ | ३२३ | २,०२,४००/- |
| २ | डॉ. गोविंद श्रीपतराव कलाटे | ३६४ | २,२८,९००/- |
| ३ | डॉ. महेंद्र विलासराव तांबे | ३५८ | २,१३,१५०/- |

उपरोक्त प्रमाणे प्रत्येक ज्यु.भुलतज्ञ सरासरी प्रत्येक महिन्याला २८ ते ३० केसेस करतात. त्यासाठी सध्या प्रत्येक भुलतज्ञांना सरासरी रू.२०,०००/- ते रू.२५,०००/- इतके मानधन द्यावे लागते. यापुर्वी बाहेरील भुलतज्ञ यांना आशा प्रकारे मानधन देण्यात येत होते. परंतु मानधन देऊनही बाहेरील भुलतज्ञ वेळेवर उपलब्ध होत नव्हते. रूग्णालयातील भुलतज्ञांना अशा प्रकारे मानधन दिल्यामुळे दाखल रूग्णांची प्रतिक्षा यादी कमी करणेस नक्कीच फायदा झाला आहे. तसेच त्यामुळे रूग्णांची गैरसोय होत नाही, त्याकरिता डॉ.मनिषा शिरसाठ, डॉ.गोविंद कलाटे, व डॉ.महेंद्र तांबे, वैद्यकीय अधिकारी (ज्यु. भुलतज्ञ) यांचे वरील **" अ "** प्रमाणे मागणी बाबत विचार होणे गरजेचे आहे.

तरी संस्थान नेमणुक भुलतज्ञांना त्यांचे डयुटी व्यतिरीक्त संध्याकाळी ६ ते १० या वेळेत सध्या देत असलेले मानधनात बदल करणे आवश्यक आहे. वरील सर्व परिस्थीतीच विचार करता, संध्याकाळी ६ ते १० या वेळेत होणा-या सर्व केसेसचे व आवश्यक असलेल्या मेडियम ऑपरेशनसाठी रू.६५०/- व मेजर/तातडीचे ऑपरेशनसाठी रू.१२००/- य प्रमाणे दर (प्रत्येक ऑपरेशनसाठी) देणेस मान्यता मिळणेस, विनंती आहे.

तरी उपरोक्त प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.६०६** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावामध्ये नमुद केलेप्रमाणे रुग्णांची गैरसोय होऊ नये, याकरीता श्री साईनाथ रुग्णालयातील भुलतज्ञांना संध्याकाळी ६ ते १० या वेळेत होणाऱ्या सर्व केसेस व आवश्यक असलेल्या मेडियम ऑपरेशनसाठी रू.६५०/- व मेजर/तातडीचे ऑपरेशनसाठी रू.१२००/- य प्रमाणे (प्रत्येक ऑपरेशनसाठी) दर देणेस मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं.२६** **संस्थान रुग्णालयामधील व्हिजीटींग डॉक्टरांच्या मानधन नियमावलीबाबत.**

**निर्णय क्र.६०७** **सदरहु पस्ताव रुगणालय उपसमीती समोर सादर करणेत यावा असे ठरले.**

(कार्यवाही- वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं.२७** **माहे ऑगस्ट- २०१५ ते नोव्हेंबर-२०१५ जमा-खर्च तक्त्यांची नोंद घेणेबाबत.**

**प्रस्ताव-** लेखाशाखा विभागामार्फेत दरमहा संस्थानला सर्व मार्गाने जमा होणा-या व संस्थानकडुन खर्च होणा-या रकमांचा एकत्रित जमा–खर्च तक्ता तयार करण्यात येतो. सदर जमा व खर्चाच्या आकडेवारीचा तक्ता मा.व्यवस्थापन समितीच्या सभेसमोर नोंद घेण्यासाठी सादर करण्यात येत असतो.

त्याअनुषंगाने माहे ऑगस्ट 2015 ते नोव्हेंबर 2015 या कालावधीतील मासिक जमा खर्चाचे तक्ते तयार करण्यात आले असुन ते मा.व्यवस्थापन समिती सभेसमोर नोंद घेणेसाठी सादर करण्यात येत आहेत.

ऑगस्ट-१५ ते नोव्हेंबर-१५ या महिन्यांचा जमा खर्चाचा तपशील खालीलप्रमाणे:-

| महिना | जमा | खर्च |
|---|---|---|
| ऑगस्ट-१५ | ५६,२९,९१,९४७/- | १९,३२,४०,१७१/- |
| सप्टेंबर-१५ | ४२,८७,९६,९३८/- | १९,९१,६८,७७८/- |
| ऑक्टोंबर-१५ | ३५,६४,५०,३९०/- | १२,६३,३९,६४१/- |
| नोव्हेंबर-१५ | ३९,७२,०९,६८१/- | २०,११,१२,६०६/- |

तरी माहे ऑगस्ट 2015 ते नोंव्हेंबर 2015 या कालावधीतील मासिक जमा खर्चाचे तक्ते नोंद घेणेकामी मा.व्यवस्थापन समितीच्या सभेसमोर सादर.

**निर्णय क्र.६०८** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे माहे ऑगस्ट, २०१५ ते नोव्हेंबर, २०१५ या जमा-खर्च तक्तयाची नोंद घेण्यात येऊन, त्यास मान्यता देण्यात आली. तसेच यापुढे जमा व खर्चाचे तक्ते विवरणासहीत सादर करणेत यावे, असे ठरले.** (कार्यवाही- मुख्यलेखाधिकारी)

---

**विषय नं.२८** **माहे एप्रिल- २०१५ ते मार्च- २०१६ अखेर दर्शनरांगेत साईभक्तांना मोफत प्रसाद लाडू/ बुंदी वाटपाकामी झालेल्या खर्चाची नोंद घेणेबाबत.**

**प्रस्ताव-** महाराष्ट्र विधान मंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रस्थापीत केलेले विनियम मधील 17 (1) मध्ये भक्तगणाना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन दयाव्यात अशी तरतूद केलेली आहे.

मा.व्यवस्थापन समितीचे दि.26/07/2013 रोजी झालेल्या सभेतील निर्णय क्रं.537मध्ये दर्शन रांगेतील साईभक्तांना मोफत प्रसाद लाडू/बुंदी वाटप करणेबाबत निर्णय झालेला आहे.

उपरोक्त सभेतील निर्णयानूसार दि.15 ऑगस्ट 2013 पासून दर्शनरांगेतील साईभक्तांना प्रत्येकी 100 ग्रॅमचे एक पाकीट या प्रमाणे प्रसाद लाडू /बूंदि पाकीटांचे वाटप करण्यात येत आहे.मा.मुख्य लेखाधिकारी सो.यांनी संदर्भीय क्रं.1 चे पत्रान्वये मोफत लाडू वाटपाचे स्वतंत्र रजिस्टर ठेवावे .प्रत्येक दिवशी उत्पादित केलेली प्रसादलाडू /बुंदि पाकीटे वाटप केलेली पाकिटे व शिल्ल्क राहीलेली पाकीटे यांचे विवरण् दररोज स्वतंत्र ठेवावे .प्रत्येक महिन्यात वाटप केलेले प्रसाद लाडू /बुंदि पाकीटे व त्यासाठी झालेल्या खर्चाची रक्क्म जमा नावे करणेसाठी प्रत्येक महिन्यात तक्ता तयार करुन लेखाशाखेकडे पाठविण्यात यावा. प्रत्येक महिन्यात प्रसादरुपी वाटप झालेली प्रसाद लाडू /बुंदी पाकीटे व त्यासाठी एकूण निर्धारीत किंमत याबाबत मा.व्यवस्थापन समितीचे सभेमध्ये नोंद घेणेसाठी विष्य ठेवण्यात यावा . प्रत्येक महिन्याचे मोफत प्रसाद लाडू / बुदि पाकीटांचे रेकॉर्ड अंतर्गत लेखापरीक्षका मार्फत तपासून घेण्यात यावे असे निर्देश दिलेले आहेत.

मा.मुख्य लेखाधिकारी यांचे उपरोक्त निर्देशाप्रमाणे कॅन्टीन विभागामार्फत् प्रत्येक महिन्यात प्रसाद लाडू /बुंदि पाकीटांचे वाटप , शिल्लक पाकीटे,मासिक खर्च ,जमा नावे करणे इत्यादी कार्यवाही करण्यात येत आहे.

मा.व्यवस्थापन समितीचे दि.26/06/2014 रोजीचे सभेतील विषय नं.8 निर्णय क्रं. 564 अन्वये दर्शन रांगेतील भक्तांना वाटप केलेला प्रसाद लाडू /बुंदि खर्चाचा मासिक अहवाल मा.कार्यकारी अधिकारी सो.यांचे मान्यतेसाठी सादर करणेत यावा व आर्थिक वर्षाचे शेवटी एकत्रित अहवाल.मा.व्यवस्थापन समीतीसमोर नोंद घेणेसाठी सादर करणेत यावा असा निर्णय झालेला आहे.

कॅन्टिन विभागा मार्फत् प्रसाद लाडू /बुंदि वाटपासाठी झालेल्या खर्चाचा मासिक अहवाल मा.का/अ .यांचे अवलोकनार्थ सादर करणेत येत आहे.संदर्भीय क्रं.2 चे मा.व्यु.समितीचे निर्णया नुसार माहे/एप्रिल -२०१५ ते मार्च -२०१६ या आथिक वर्षामध्ये मोफत प्रसाद बुंदि /लाडू वाटपासाठी झालेला खर्च खालील प्रमाणे-

| अ.नं | महिना | प्रसाद लाडू/बुंदि पाकीटे संख्या | झालेला खर्च |
|---|---|---|---|
| 01 | एप्रिल -२०१५ | 12,86,700 | 1,66,49,898 |
| 02 | में-२०१५ | 15,26,100 | 1,87,55,769 |
| 03 | जून-२०१५ | 15,57,900 | 1,86,01,326 |
| 04 | जूलै-२०१५ | 16,85,100 | 2,26,81,446 |
| 05 | ऑगस्ट-२०१५ | 16,44,300 | 2,53,38,663 |
| 06 | सप्टेंबर-२०१५ | 18,01,650 | 2,45,02,440 |
| 07 | आक्टोंबर-२०१५ | 13,65,150 | 1,69,82,466 |
| 08 | नोव्हेंबर-२०१५ | 14,57,250 | 1,91,19,120 |
| 09 | डींसेबर -२०१५ | 16,94,700 | 2,26,07,298 |
| 10 | जाने-२०१६ | 17,89,950 | 2,33,76,747 |
| 11 | फेंबुवारी-२०१६ | 12,20,700 | 1,53,93,027 |
| 12 | मार्च-२०१६ | 12,76,200 | 1,81,47,564 |
| | एकूण- | **18305700** | **242155764** |

माहे एप्रिल-२०१५ ते मार्च -२०१६ आर्थिक वर्षात १,८३,०५,७०० इतके प्रसाद लाडू /बुंदि पाकीटांचे दर्शन रांगेत वाटप केलेले असून सदरचे आथिक वर्षात याकामी एकूण रु.२४,२१,५५,७६४/- (चोवीस कोटी

एकवीस लाख पचावन्‍ हजार सातशे चौसष्ठ मात्र) इतकी झालेली आहे.तरी उपरोक्ताप्रमाणे दर्शन रांगेत साईभक्तांना वाटप करणेत आलेले मोफत लाडू/बुंदी पाकीटे व त्याचीनिर्धारीतकिमत बाबतची माहीती मा.व्यवस्थापन समितीचे सभेत नोंद घेणे कामी सवीनय सादर.

**निर्णय क्र.६०९** **यावर सविस्तर चर्चा होऊन, दर्शनरांगेतील साईभक्तांना माहे एप्रिल- २०१५ ते मार्च- २०१६ अखेर मोफत प्रसाद लाडू/ बुंदी वाटपाची नोंद घेण्यात येउन, त्याकामी आलेल्या एकूण रु.२४,२१,५५,७६४/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

**तसेच सदरहु बुंदी प्रसादाचे पाकीट उघडल्यानंतर साईभक्ताकडून पुर्ण प्रसाद खाल्ला जात नाही व तो इतरत्र पडून पायाखाली येतो याकरीता, दर्शनरांगेमधील काही भक्तांना ५० ग्रॅम वजनाच्या बुंदी प्रसाद पाकीटाचे वाटप करण्यात यावे.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, कॅन्टीन विभाग)

---

**विषय नं.२९** **सन २०१५- २०१६ या आर्थिक वर्षात देणगी आलेल्या वाहनांची नोंद घेणेबाबत.**

**प्रस्ताव-** सन २०१५-१६ या आर्थिक वर्षात श्री साईभक्तांमार्फत देणगी स्वरुपात विविध प्रकारची खालील तपशिलातील वाहने प्रशासकिय मान्यतेनुसार स्विकारण्यात आलेली आहे. सदर वाहनांचा वापर विविध विभागांचे मागणीनुसार संस्थान कामाकरीता करण्यात येत आहे.

| अ. नं. | संगणक कोड नं. | देणगीदार साईभक्तांचे नांव | देणगी दिलेल्या वाहनांचा तपशिल | पावती नंबर/ दिनांक | रक्कम (रु.) |
|---|---|---|---|---|---|
| 1 | VEH-6121 | Mahindra Two Wheelars Ltd., Chinchwad, pune | Mahindra Gusto (MH.17.BE. 9920 सध्या अभिलेख कक्षाकडे वापर) | 3750-01.05.2015 | 55,766.00 |
| 2 | SUN-V007 | Ozone Envirotech, Bhosri, Pune | Tata ACE (Ex) B-III Load Body | 4883-13.05.2015 | 25,700.00 |
| 3 | VEH-6123 | TVS Motor Co. Ltd. Pune | TVS Scooty Zest 110 (MH-17-BG-8844) | 5578-19.05.2015 | 52,641.00 |
| 4 | VEH-6124 | Mahindra & Mahindra Ltd. Nashik. | Mahindra & Mahindra Scorpio S4 2.2 (MH-17-AZ-5015) | 18613-24.08.2015 | 8,18,232.00 |
| 5 | VEH-6126 | Shri Sudhir Gogia & Family, H-3/15, Delhi. | Tavera Neo-III Ambulance (MH-17-BD-2442) | 28457-21.11.2015 | 7,37,633.00 |
| 6 | VEH-6164 | Shri Kamal Kishore Batra, Mrs. Archana Batra & Family, Panchkula, Hariyana. | Maruti Eeco Petrol Ambulance (MH-17-BD-2249) | 29097-28.11.2015 | 4,00,495.00 |
| 7 | VEH-6163 | Shri Vikas Ahir & Family, Surat, Gujrat | SML Isuzu Truck, Samrat, HD, BS-III (MH-17-BD-2552) | 29098-28.11.2015 | 9,87,500.00 |
| 8 | VEH-6165 | Mahindra & Mahindra Ltd. Nashik. | Mahindra Arjun Novo Tractor-605 DI PS (MH-17-AV-7313) | 29099-28.11.2015 | 5,10,550.00 |
| 9 | VEH-6166 | M/s. Mylan Labratories Ltd., Sinner, MIDC, Nashik. | Force Motor Ltd., Tempo Traveller Ambulance AC/P.S. (MH-15-EF-0596) | 36364-19.01.2016 | 11,90,000.00 |
| 10 | VEH-6167 | Bajaj Clothing Pvt. Ltd., Bangalore, Karnataka | SML Isuzu Ltd, SML TC-III Hearse Van with A.C. Box (MH-17-BD-2248) | 38169,38170-03.02.2016 | 12,58,068.00 |
| 11 | VEH-6123 | M/s. Devi Fire Services, E-79, M.I.D.C., Akkalkot Road, Solapur | Foam CO2-DCP & Water, Fire Tender Body (MH-17-BD-2718) | 43380-24.03.2016 | 9,60,000.00 |
| 12 | VEH-6168 | Shri K. Satyanarayana Goud, Nizambad, Telangana | Eicher School Bus, 10.90 L Bus AB-BS-III (MH-17-BD- | 43387, 43389 | 15,04,778.00 |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | 3240) | 24.03.2016 | |
| 13 | VEH-6169 | M/s. Hetro Group of company C/o. Dr.B.P.S. Reddy, Santh - nagar, Hydrabad, Telengana | Tata Xenon Rx Pick up Mini Water Fire Tender (MH-02-CE-6723) | 24-31.03.2016 | 13,53,610.00 |

उपरोक्त प्रमाणे अ.नं. ०१ ते १३ प्रमाणे देणगी स्वरुपात प्राप्त झालेल्या वाहनांची देणगी पावती करुन संबंधीत श्री साईभक्तांना देणगी पावती, पुष्प, शॉल, उदी व प्रसाद देण्यात आलेली आहे. तसेच सदर वाहनांची नोंद वाहन विभागाचे डेडस्टॉक रजिस्टर मध्ये घेवुन अंतर्गत लेखापरिक्षण विभागाकडे संगणकीय नोंदी घेण्यात आलेल्या आहे.

तरी उपरोक्त प्रमाणे सन २०१५-१६ या आर्थिक वर्षात श्री साईभक्तांमार्फत देणगी स्वरुपात प्राप्त झालेल्या वाहनांची नोंद घेणे बाबतचा प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**निर्णय क्र.६१० यावर सविस्तर चर्चा होऊन, सन २०१५- २०१६ या आर्थिक वर्षामध्ये प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे देणगी आलेल्या १३ वाहनांची नोंद घेण्यात येऊन, त्यास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, वाहन विभाग)

---

**विषय नं.३० श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये एप्रिल-२०१५ ते मार्च-२०१६ अखेर कालावधीत वैद्यकिय बीलात देण्यात आलेल्या सवलतींची नोंद घेणेबाबत.**

**प्रस्ताव-** मा.व्य.स.निर्णय क्र.५१९/दि.२४.०७.२०११ अन्वये श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये माहे एप्रिल २०१५ मार्च २०१६ मध्ये एकुण ओपीडी रुग्ण १,२७,६८१ पैकी ४४,२५१ व एकुण आयपीडी रुग्ण १०,४५४ पैकी ६,०२९ रुग्णांना एकुण रु.७,००,८०,४२९/- इतकी वैद्यकिय बिलात सवलत दिली आहे. रुग्णांच्या गटवारीनुसार विवरण खालीलप्रमाणे-

**एप्रिल २०१५**

| अ.नं. | रुग्णांची गटवारी | रुग्ण संख्या | एकुण बिल रक्कम | बिलापोटी मिळालेली रक्कम | वैद्यकिय बिलात दिलेली सवलत |
|---|---|---|---|---|---|
| १ | दारिद्रय रेषेखालील रुग्णांना दिलेली सवलत रक्कम | २१३ | ३३,८८,३३४/- | १६,६८,७५७/- | १७,१९,५७७/- |
| २ | विकर सेक्शन रुग्णांना दिलेली सवलत रक्कम | ०७ | ६९,०२६/- | ३२,५३२/- | ३६,४९४/- |
| ३ | सकृत दर्शनी गरीब रुग्णांना दिलेली सवलत रक्कम | ०८ | १६,०९२/- | १,१००/- | १४,९९२/- |
| ४ | कुत्रा, साप, माकड चावलेले रुग्ण, साई भक्त, साध्वी कन्या कुमारी, आश्रम, डायलेसिस, हिमोफिलीया, शालेय पोशन आरोग्य योजना इ. | १९७ | २,११,८९१/- | --- | २,११,८९१/- |
| ५ | राजीवगांधी आरोग्य योजना आयपीडी रुग्णांना दिलेली सवलत | ३५६ | १,९८,६१,६३०/- | १,७१,१९,७८३/- | २७,४१,८४७/- |
| ६ | राजीवगांधी आरोग्य योजना ओपीडी रुग्णांना दिलेली सवलत | ३१३७ | १७,६७,०७०/- | - | १७,६७,०७०/- |
| | **एकुण** | **३,९१८** | **२,५३,१४,०४३/-** | **१,८८,२२,१७२/-** | **६४,९१,८७१/-** |

**मे- २०१५**

| अ.नं. | रुग्णांची गटवारी | रुग्ण संख्या | एकुण बिल रक्कम | बिलापोटी मिळालेली रक्कम | वैद्यकिय बिलात दिलेली सवलत |
|---|---|---|---|---|---|
| १ | दारिद्रय रेषेखालील रुग्णांना दिलेली सवलत रक्कम | २०१ | २७,६२,७७२/- | १३,३०,७९९/- | १४,३१,९७३/- |
| २ | विकर सेक्शन रुग्णांना दिलेली सवलत रक्कम | ०२ | १८,४७५/- | १०,१३६/- | ८,३३९/- |
| ३ | सकृत दर्शनी गरीब रुग्णांना दिलेली सवलत रक्कम | ०५ | १,००,७२८/- | २३,०००/- | ७७,७२८/- |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ४ | कुत्रा, साप, माकड चावलेले रुग्ण, साई भक्त, साध्वी कन्या कुमारी, आश्रम, डायलेसिस, हिमोफिलीया, शालेय पोशन आरोग्य योजना इ. | १२२ | २,१९,६९३/- | --- | २,१९,६९३/- |
| ५ | राजीवगांधी आरोग्य योजना आयपीडी रुग्णांना दिलेली सवलत | ४१६ | २,४०,३२,८७१/- | २,१२,५६,४६६/- | २७,७६,४०५/- |
| ६ | राजीवगांधी आरोग्य योजना ओपीडी रुग्णांना दिलेली सवलत | ३३५५ | १७,४७,८६५/- | --- | १७,४७,८६५/- |
| | **एकुण** | **४,१०१** | **२,८८,८२,४०४/-** | **२,२६,२०,४०१/-** | **६२,६२,००३/-** |

## जुन २०१५

| अ.नं. | रुग्णांची गटवारी | रुग्ण संख्या | एकुण बिल रक्कम | बिलापोटी मिळालेली रक्कम | वैद्यकिय बिलात दिलेली सवलत |
|---|---|---|---|---|---|
| १ | दारिद्रय रेषेखालील रुग्णांना दिलेली सवलत रक्कम | २१८ | २८,९३,१५४/- | १४,८८,६३४/- | १४,०४,५२०/- |
| २ | विकर सेक्शन रुग्णांना दिलेली सवलत रक्कम | ०२ | १३,३८१/- | ६,०००/- | ७,३८१/- |
| ३ | सकृत दर्शनी गरीब रुग्णांना दिलेली सवलत रक्कम | १८ | ४१,८७५/- | --- | ४१,८७५/- |
| ४ | कुत्रा, साप, माकड चावलेले रुग्ण, साई भक्त, साध्वी कन्या कुमारी, आश्रम, हिमोफिलीया, शालेय पोशन आरोग्य योजना इ. | १५ | २,०५,१८५/- | १,५००/- | २,०३,६८५/- |
| ५ | राजीवगांधी आरोग्य योजना आयपीडी रुग्णांना दिलेली सवलत | ३९८ | २,२५,४५,८३९/- | १,९३,९५,६९०/- | ३१,५०,१४९/- |
| ६ | राजीवगांधी आरोग्य योजना ओपीडी रुग्णांना दिलेली सवलत, डायलेसिस | ३६३९ | १८,५५,३७०/- | --- | १८,५५,३७०/- |
| | **एकुण** | **४,२९०** | **२,७५,५४,८०४/-** | **२,०८,९१,८२४/-** | **६६,६२,९८०/-** |

## जुलै २०१५

| अ.नं. | रुग्णांची गटवारी | रुग्ण संख्या | एकुण बिल रक्कम | बिलापोटी मिळालेली रक्कम | वैद्यकिय बिलात दिलेली सवलत |
|---|---|---|---|---|---|
| १ | दारिद्रय रेषेखालील रुग्णांना दिलेली सवलत रक्कम | २०६ | २३,९२,३००/- | १३,५५,७०३/- | १०,३६,५९७/- |
| २ | विकर सेक्शन रुग्णांना दिलेली सवलत रक्कम | ०३ | ४३,८२१/- | २९,३७५/- | १४,४४६/- |
| ३ | सकृत दर्शनी गरीब रुग्णांना दिलेली सवलत रक्कम | ०१ | १,०३३/- | --- | १,०३३/- |
| ४ | कुत्रा, साप, माकड चावलेले रुग्ण, साई भक्त, साध्वी कन्या कुमारी, आश्रम, हिमोफिलीया, शालेय पोशन आरोग्य योजना इ. | १८ | २,२४,१२६/- | --- | २,२४,१२६/- |
| ५ | राजीवगांधी आरोग्य योजना आयपीडी रुग्णांना दिलेली सवलत | ४५४ | २,४९,१९,५४८/- | २,१९,७०,७५९/- | २९,४८,७८९/- |
| ६ | राजीवगांधी आरोग्य योजना ओपीडी रुग्णांना दिलेली सवलत, डायलेसिस | ३६६० | १८,४१,५५०/- | --- | १८,४१,५५०/- |
| | **एकुण** | **४,३४२** | **२,९४,२२,३७८/-** | **२,३३,५५,८३७/-** | **६०,६६,५४१/-** |

## ऑगस्ट २०१५

| अ.नं. | रुग्णांची गटवारी | रुग्ण संख्या | एकुण बिल रक्कम | बिलापोटी मिळालेली रक्कम | वैद्यकिय बिलात दिलेली सवलत |
|---|---|---|---|---|---|
| १ | दारिद्रय रेषेखालील रुग्णांना दिलेली सवलत रक्कम | २०४ | २५,७६,०६६/- | १४,९५,४४५/- | १०,८०,६२१/- |
| २ | विकर सेक्शन रुग्णांना दिलेली सवलत रक्कम | ०३ | २०,६३५/- | १०,२००/- | १०,४३५/- |
| ३ | सकृत दर्शनी गरीब रुग्णांना दिलेली सवलत रक्कम | ०७ | १६,९०७/- | --- | १६,९०७/- |
| ४ | कुत्रा, साप, माकड चावलेले रुग्ण, साई भक्त, साध्वी कन्या कुमारी, आश्रम, हिमोफिलीया, शालेय पोशन आरोग्य योजना इ. | १९ | ३,३७,३७७/- | २,०००/- | ३,३५,३७७/- |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ५ | राजीवगांधी आरोग्य योजना आयपीडी रुग्णांना दिलेली सवलत | ४०८ | २,२५,७०,१११/- | १,९८,९४,६१४/- | २६,७५,४९७/- |
| ६ | राजीवगांधी आरोग्य योजना ओपीडी रुग्णांना दिलेली सवलत, डायलेसिस | ३७६० | १८,०७,१६५/- | --- | १८,०७,१६५/- |
| | **एकुण** | **४,४०१** | **२,७३,२८,२६१/-** | **२,१४,०२,२५९/-** | **५९,२६,००२/-** |

**सप्टेंबर २०१५**

| अ.नं. | रुग्णांची गटवारी | रुग्ण संख्या | एकुण बिल रक्कम | बिलापोटी मिळालेली रक्कम | वैद्यकिय बिलात दिलेली सवलत |
|---|---|---|---|---|---|
| १ | दारिद्र्य रेषेखालील रुग्णांना दिलेली सवलत रक्कम | १८९ | २०,७१,०६८/- | १२,०१,३८०/- | ८,६९,६८८/- |
| २ | विकर सेक्शन रुग्णांना दिलेली सवलत रक्कम | ०७ | ४८,१६१/- | १७,८०९/- | ३०,३५२/- |
| ३ | सकृत दर्शनी गरीब रुग्णांना दिलेली सवलत रक्कम | ०६ | १,१२,६१८/- | ६४,७६०/- | ४७,८५८/- |
| ४ | कुत्रा, साप, माकड चावलेले रुग्ण, साई भक्त, साध्वी कन्या कुमारी, आश्रम, हिमोफिलीया, शालेय पोशन आरोग्य योजना इ. | ३५ | ४,२८,७०१/- | ४१,३३७/- | ३,८७,३६४/- |
| ५ | राजीवगांधी आरोग्य योजना आयपीडी रुग्णांना दिलेली सवलत | ३५३ | १,७०,८५,८०९/- | १,४९,५५,९९१/- | २१,२९,८१८/- |
| ६ | राजीवगांधी आरोग्य योजना ओपीडी रुग्णांना दिलेली सवलत, डायलेसिस | ३६८२ | १८,२७,२८५/- | --- | १८,२७,२८५/- |
| | **एकुण** | **४२७२** | **२,१५,७३,६४२/-** | **१,६२,८१,२७७/-** | **५२,९२,३६५/-** |

**ऑक्टोबर २०१५**

| अ. नं. | रुग्णांची गटवारी | रुग्ण संख्या | एकुण बिल रक्कम | बिलापोटी मिळालेली रक्कम | वैद्यकिय बिलात दिलेली सवलत |
|---|---|---|---|---|---|
| १ | दारिद्र्य रेषेखालील रुग्णांना दिलेली सवलत रक्कम | २०१ | २१,०६,०००/- | ११,०८,२१७/- | ९,९७,७८३/- |
| २ | विकर सेक्शन रुग्णांना दिलेली सवलत रक्कम | ०८ | ४१,६०५/- | २६,०२४/- | १५,५८१/- |
| ३ | सकृत दर्शनी गरीब रुग्णांना दिलेली सवलत रक्कम | ०५ | ११,८६७/- | --- | ११,८६७/- |
| ४ | कुत्रा, साप, माकड चावलेले रुग्ण, साई भक्त, साध्वी कन्या कुमारी, आश्रम, हिमोफिलीया, शालेय पोशन आरोग्य योजना इ. | ३५ | २,९५,१४३/- | २,१३०/- | २,९३,०१३/- |
| ५ | राजीवगांधी आरोग्य योजना आयपीडी रुग्णांना दिलेली सवलत | ३२१ | १,५७,०३,३३०/- | १,३७,२४,०६८/- | १९,७९,२६२/- |
| ६ | राजीवगांधी आरोग्य योजना ओपीडी रुग्णांना दिलेली सवलत, डायलेसिस | ३६८३ | १७,८१,५६५/- | --- | १७,८१,५६५/- |
| | **एकुण** | **४२५३** | **१,९९,३९,५१०/-** | **१,४८,६०,४३९/-** | **५०,७९,०७१/-** |

**नोव्हेंबर २०१५**

| अ.नं. | रुग्णांची गटवारी | रुग्ण संख्या | एकुण बिल रक्कम | बिलापोटी मिळालेली रक्कम | वैद्यकिय बिलात दिलेली सवलत |
|---|---|---|---|---|---|
| १ | दारिद्र्य रेषेखालील रुग्णांना दिलेली सवलत रक्कम | १९० | २६,५०,५९०/- | १५,२५,१२३/- | ११,२५,४६७/- |
| २ | विकर सेक्शन रुग्णांना दिलेली सवलत रक्कम | १० | १,२४,४१८/- | ४०,१८४/- | ८४,२३४/- |
| ३ | सकृत दर्शनी गरीब रुग्णांना दिलेली सवलत रक्कम | ०४ | ७,११४/- | --- | ७,११४/- |
| ४ | कुत्रा, साप, माकड चावलेले रुग्ण, साई भक्त, साध्वी कन्या कुमारी, आश्रम, हिमोफिलीया, शालेय पोशन आरोग्य योजना इ. | १८ | ७४,४२३/- | ५,०००/- | ६९,४२३/- |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ५ | राजीवगांधी आरोग्य योजना आयपीडी रुग्णांना दिलेली सवलत | २८१ | १,३९,८३,२७६/- | १,२१,२५,७९९/- | १८,५७,४७७/- |
| ६ | राजीवगांधी आरोग्य योजना ओपीडी रुग्णांना दिलेली सवलत, डायलेसिस | ३४८० | १७,०८,९४०/- | --- | १७,०८,९४०/- |
| | **एकुण** | **३९८३** | **१,८५,४८,७६१/-** | **१,३६,९६,१०६/-** | **४८,५२,६५५/-** |

**डिसेंबर २०१५**

| अ. नं. | रुग्णांची गटवारी | रुग्ण संख्या | एकुण बिल रक्कम | बिलापोटी मिळालेली रक्कम | वैद्यकिय बिलात दिलेली सवलत |
|---|---|---|---|---|---|
| १ | दारिद्रय रेषेखालील रुग्णांना दिलेली सवलत रक्कम | २१४ | २८,३०,४०९/- | १५,०५,४३५/- | १३,२४,९७४/- |
| २ | विकर सेक्शन रुग्णांना दिलेली सवलत रक्कम | ४५ | ४,०८,३३६/- | २,९८,३०८/- | १,१०,०२८/- |
| ३ | सकृत दर्शनी गरीब रुग्णांना दिलेली सवलत रक्कम | ०४ | ५०,१५५/- | १०,४७२/- | ३९,६८३/- |
| ४ | कुत्रा, साप, माकड चावलेले रुग्ण, साई भक्त, साध्वी कन्या कुमारी, आश्रम, हिमोफिलीया, शालेय पोशन आरोग्य योजना इ. | ३५ | २,०४,६२५/- | २,०००/- | २,०२,६२५/- |
| ५ | राजीवगांधी आरोग्य योजना आयपीडी रुग्णांना दिलेली सवलत | ३७९ | १,७९,१८,०१०/- | १,५३,९१,२२१/- | २५,२६,७८९/- |
| ६ | राजीवगांधी आरोग्य योजना ओपीडी रुग्णांना दिलेली सवलत, डायलेसिस | ३,८९२ | १८,६८,८७५/- | --- | १८,६८,८७५/- |
| | **एकुण** | **४,५६९** | **२,३२,८०,४१०/-** | **१,७२,०७,४३६/-** | **६०,७२,९७४/-** |

**जानेवारी २०१६**

| अ. नं. | रुग्णांची गटवारी | रुग्ण संख्या | एकुण बिल रक्कम | बिलापोटी मिळालेली रक्कम | वैद्यकिय बिलात दिलेली सवलत |
|---|---|---|---|---|---|
| १ | दारिद्रय रेषेखालील रुग्णांना दिलेली सवलत रक्कम | २३३ | २८,९५,१६१/- | १२,९४,६४२/- | १६,००,५१९/- |
| २ | विकर सेक्शन रुग्णांना दिलेली सवलत रक्कम | १०५ | ९,९७,८४४/- | ६,६९,४९९/- | ३,२८,३४५/- |
| ३ | सकृत दर्शनी गरीब रुग्णांना दिलेली सवलत रक्कम | ०८ | ४१,१८८/- | १५,२१२/- | २५,९७६/- |
| ४ | कुत्रा, साप, माकड चावलेले रुग्ण, साई भक्त, साध्वी कन्या कुमारी, आश्रम, हिमोफिलीया, शालेय पोशन आरोग्य योजना इ. | ४० | २,७५,८१६/- | १०,०००/- | २,६५,८१६/- |
| ५ | राजीवगांधी आरोग्य योजना आयपीडी रुग्णांना दिलेली सवलत | ३०९ | १,५७,६१,२५७/- | १,३८,६०,३१६/- | १९,००,९४१/- |
| ६ | राजीवगांधी आरोग्य योजना ओपीडी रुग्णांना दिलेली सवलत, डायलेसिस | ४,०८७ | २०,४९,१५०/- | --- | २०,४९,१५०/- |
| | **एकुण** | **४,७८२** | **२,२०,२०,४१६/-** | **१,५८,४९,६६९/-** | **६१,७०,७४७/-** |

**फेब्रुवारी २०१६**

| अ. नं. | रुग्णांची गटवारी | रुग्ण संख्या | एकुण बिल रक्कम | बिलापोटी मिळालेली रक्कम | वैद्यकिय बिलात दिलेली सवलत |
|---|---|---|---|---|---|
| १ | दारिद्रय रेषेखालील रुग्णांना दिलेली सवलत रक्कम | २५१ | ३१,८१,५००/- | १४,६९,६५६/- | १७,११,८४४/- |
| २ | विकर सेक्शन रुग्णांना दिलेली सवलत रक्कम | १३३ | १०,२१,३२१/- | ६,९२,९५३/- | ३,२८,३६८/- |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ३ | सकृत दर्शनी गरीब रुग्णांना दिलेली सवलत रक्कम | १२ | १,१०,९९६/- | ६०,१४०/- | ५०,८५६/- |
| ४ | कुत्रा, साप, माकड चावलेले रुग्ण, साई भक्त, साध्वी कन्या कुमारी, आश्रम, हिमोफिलीया, शालेय पोशन आरोग्य योजना इ. | ३३ | २,११,२४५/- | ४६,००९/- | १,६५,२३६/- |
| ५ | राजीवगांधी आरोग्य योजना आयपीडी रुग्णांना दिलेली सवलत | ३६८ | १,५६,८०,५२८/- | १,३३,३४,७११/- | २३,४५,८१७/- |
| ६ | राजीवगांधी आरोग्य योजना ओपीडी रुग्णांना दिलेली सवलत, डायलेसिस | ३,३४५ | १६,२४,०९०/- | --- | १६,२४,०९०/- |
| | **एकुण** | **४,१४२** | **२,१८,२९,६८०/-** | **१,५६,०३,४६९/-** | **६२,२६,२११/-** |

<u>**मार्च २०१६**</u>

| **अ. नं.** | **रुग्णांची गटवारी** | **रुग्ण संख्या** | **एकुण बिल रक्कम** | **बिलापोटी मिळालेली रक्कम** | **वैद्यकिय बिलात दिलेली सवलत** |
|---|---|---|---|---|---|
| १ | दारिद्रय रेषेखालील रुग्णांना दिलेली सवलत रक्कम | २७२ | २६,६०,२५८/- | १४,४९,८५५/- | १२,१०,४०३/- |
| २ | विकर सेक्शन रुग्णांना दिलेली सवलत रक्कम | १७९ | १४,०९,४८४/- | १०,११,५३६/- | ३,९७,९४८/- |
| ३ | सकृत दर्शनी गरीब रुग्णांना दिलेली सवलत रक्कम | ०७ | ३२,४९३/- | ४,५००/- | २७,९९३/- |
| ४ | कुत्रा, साप, माकड चावलेले रुग्ण, साई भक्त, साध्वी कन्या कुमारी, आश्रम, हिमोफिलीया, शालेय पोशन आरोग्य योजना इ. | ४५ | २,२०,५०१/- | १,५५०/- | २,१८,९११/- |
| ५ | राजीवगांधी आरोग्य योजना आयपीडी रुग्णांना दिलेली सवलत | ३४१ | १,६६,७९,०८६/- | १,४५,४६,१८२/- | २१,३२,९०४/- |
| ६ | राजीवगांधी आरोग्य योजना ओपीडी रुग्णांना दिलेली सवलत, डायलेसिस | २,३८५ | ९,८८,८१०/- | --- | ९,८८,८१०/- |
| | **एकुण** | **३,२२९** | **२,१९,९०,६३२/-** | **१,७०,१३,६२३/-** | **४९,७७,००९/-** |

माहे एप्रिल २०१५ ते मार्च २०१६ मध्ये वैद्यकिय बिलात सवलत दिलेल्या एकुण रुग्णांचा तक्ता यासोबत अवलोकनार्थ सादर केला आहे, तरी वैद्यकिय बिलात दिलेल्या सवलतीची नोंद घेण्यासाठी सदरचा विषय मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर करणेस मान्यता असावी.

**निर्णय क्र.६११** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये एप्रिल-२०१५ ते मार्च-२०१६ अखेर कालावधीत प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे वैद्यकिय बीलात देण्यात आलेल्या सवलतींची नोंद घेणेत येऊन, त्यास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं.३१** **श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये अपोलो मेडीकल्स यांना चालविण्यासाठी दिलेल्या मेडिकल स्टोअरच्या व्यवहारात माहे एप्रिल २०१५ ते मार्च २०१६ कालावधीतील उत्पन्नाची नोंद घेणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये अपोलो फार्मसी एन्टरप्राईजेस लि. चेन्नई या कंपनीस ना नफा ना तोटा तत्वावर मेडीकल स्टोअर चालविणेसाठी देण्यात आले आहे. मेडीकल स्टोअर्सच्या व्यवहारांमध्ये झालेल्या उत्पन्नातुन

प्रत्यक्ष खर्च व मा.व्य.स. चे निर्णयास अनुसरुन काही निवडक औषधांवर मंजुर करणेत आलेली सवलत वजा जाता मिळालेले उत्पन्न मे.अपोलो फार्मसी एन्टरप्राईजेस लि.चेन्नई हे संस्थानला देणगी स्वरुपात देत आहे. निर्णय क्र.५६४/दि.२६.०६.२०१४ अन्वये देणगी रकमेचा प्रस्ताव प्रत्येक महिन्यास मा.कार्यकारी यांचे मान्यतेसाठी सादर करण्यात येऊन, आर्थिक वर्षाच्या शेवटी एकत्रित अहवाल मा.व्यवस्थापन समितीसामोर नोंद घेणेसाठी सादर करण्यात यावा असे ठरले आहे. माहे एप्रिल २०१५ ते मार्च २०१६ या कालावधीत श्री साईबाबा हॉस्पिटलमधील मे.अपोलो मेडीकल स्टोअर पासुन मिळालेल्या देणगीचा अहवाल खालीलप्रमाणे:-

| Month | Sales of Medicine | Gross Profit after VAT | Operating Charges | Charity/ Discount on Medicine | Net Profit as Donation | % of Profit |
|---|---|---|---|---|---|---|
| **Apr-15** | 32,46,494 | 8,93,226 | 3,46,586 | 76,074 | 5,46,640 | 17% |
| **May-15** | 36,12,751 | 10,38,256 | 3,55,431 | 91,902 | 6,82,825 | 19% |
| **Jun-15** | 36,63,453 | 10,73,692 | 3,58,829 | 1,37,249 | 7,14,863 | 20% |
| **Jul-15** | 40,44,184 | 12,03,685 | 3,59,677 | 2,28,771 | 8,44,008 | 21% |
| **Aug-15** | 32,33,661 | 9,43,666 | 3,61,819 | 1,31,234 | 5,81,847 | 18% |
| **Sep-15** | 32,71,551 | 9,88,257 | 3,62,592 | 1,59,412 | 6,25,625 | 19% |
| **Oct-15** | 36,26,547 | 11,09,390 | 3,43,378 | 1,91,138 | 7,66,012 | 21% |
| **Nov-15** | 33,15,253 | 10,02,991 | 3,90,318 | 1,71,641 | 6,12,673 | 18% |
| **Dec-15** | 35,14,163 | 10,47,052 | 3,34,353 | 1,95,317 | 7,12,699 | 20% |
| **Jan-16** | 33,61,820 | 9,99,288 | 3,26,273 | 3,01,036 | 6,73,015 | 21% |
| **Feb-16** | 30,37,090 | 8,74,868 | 3,35,038 | 2,22,843 | 5,39,830 | 18% |
| **Mar-16** | 30,72,300 | 8,95,767 | 3,38,631 | 2,25,496 | 5,57,136 | 18% |
| **Total** | **4,09,99,267** | **1,20,70,138** | **42,12,925** | **21,32,113** | **78,57,213** | **19%** |

उपरोक्त प्रमाणे प्रत्यक्ष खर्च व दिलेली सवलत वजा जाता मिळालेल्या देणगी रकमेचा विषय मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे नोंद घेणेसाठी सादर.

**निर्णय क्र.६१२** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये अपोलो मेडीकल्स यांना चालविण्यासाठी दिलेल्या मेडिकल स्टोअरच्या व्यवहारात माहे एप्रिल २०१५ ते मार्च २०१६ कालावधीत प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे मिळालेल्या निव्वळ उत्पन्नाची नोंद घेण्यात येऊन, त्यास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं.३२** **श्री साईनाथ रुग्णालयामध्ये अपोलो मेडीकल्स यांना चालविण्यासाठी दिलेल्या मेडिकल स्टोअरच्या व्यवहारात माहे एप्रिल २०१५ ते मार्च २०१६ कालावधीतील उत्पन्नाची नोंद घेणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईनाथ रुग्णालयामध्ये अपोलो फार्मसी एन्टरप्राईजेस लि. चेन्नई या कंपनीस ना नफा ना तोटा तत्वावर मेडीकल स्टोअर चालविणेसाठी देण्यात आले आहे. मेडीकल स्टोअर्सच्या व्यवहारांमध्ये झालेल्या उत्पन्नातुन प्रत्यक्ष खर्च वजा जाता मिळालेले उत्पन्न मे.अपोलो फार्मसी एन्टरप्राईजेस लि.चेन्नई हे संस्थानला देणगी स्वरुपात देत आहे. निर्णय क्र.५६४/दि.२६.०६.२०१४ अन्वये देणगी रकमेचा प्रस्ताव प्रत्येक महिन्यास मा.कार्यकारी यांचे मान्यतेसाठी सादर करण्यात येऊन, आर्थिक वर्षाच्या शेवटी एकत्रित अहवाल मा.व्यवस्थापन समितीसामोर नोंद घेणेसाठी सादर करण्यात यावा असे ठरले आहे. माहे एप्रिल २०१५ ते मार्च २०१६ या कालावधीत श्री साईनाथ रुग्णालयामधील मे.अपोलो मेडीकल स्टोअर पासुन मिळालेल्या देणगीचा अहवाल खालीलप्रमाणे :-

| Month | Sales of Medicine | Gross Profit after VAT | Operating Charges | Net Profit as Donation | Approx% of Sale |
|---|---|---|---|---|---|
| **Apr-15** | 4.64.141. | 91.011 | 93.725 | -2,714 | -1 % |
| **May-15** | 6.02.845 | 1.27.448 | 1.11.583 | 15,865 | 3 % |
| **Jun-15** | 6.35.538 | 1.42.821 | 1.19.417 | 23,404 | 4 % |
| **Jul-15** | 7.06.427 | 1.67.417 | 1.04.630 | 62,787 | 9 % |
| **Aug-15** | 7.15.871 | 1.92.876 | 1.01.070 | 91,806 | 13 % |
| **Sep-15** | 7.74.933 | 1.92.964 | 1.20.778 | 72,186 | 9 % |
| **Oct-15** | 7.59.352 | 1.91.077 | 1.18.346 | 72,731 | 10 % |
| **Nov-15** | 6.06.357 | 1.48.747 | 1.19.765 | 28,982 | 5 % |
| **Dec-15** | 5.35.525 | 1.05.626 | 1.13.436 | -7,810 | -1 % |
| **Jan-16** | 4.77.361 | 1.10.185 | 1.06.964 | 3,221 | 1 % |
| **Feb-16** | 5.32.284 | 1.27.757 | 1.02.894 | 24,863 | 5 % |
| **Mar-16** | 5.17.165 | 1.22.107 | 1.17.854 | 4,253 | 1 % |
| **Total** | 73.27.779 | 17.20.036 | 13.30.462 | 3,89,574 | 5 % |

उपरोक्त प्रमाणे प्रत्यक्ष खर्च व दिलेली सवलत वजा जाता मिळालेल्या देणगी रकमेचा विषय मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे नोंद घेणेसाठी सादर.

**निर्णय क्र.६१३** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईनाथ रुग्णालयामध्ये अपोलो मेडीकल्स यांना चालविण्यासाठी दिलेल्या मेडिकल स्टोअरच्या व्यवहारात माहे एप्रिल २०१५ ते मार्च २०१६ कालावधीत प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे मिळालेल्या निव्वळ उत्पन्नाची नोंद घेण्यात येऊन, त्यास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं.३३** **सन १ एप्रिल-२०१५ ते ३१ मार्च-२०१६ अखेर कालावधीत दिलेले अनुदान व रुग्ण संख्या यांची नोंद घेणेबाबत.**

**प्रस्ताव-** महाराष्ट्र शासन विधी व न्याय विभाग यांचेकडील सार्सवि-२००५/३७६/७६-का.सोळा दि.०५ मे २००६ रोजीचे पत्रान्वये अनुदान नियमावलीस मान्यता देण्यात आलेली आहे. त्यास अनुसरुन श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डी यांचे मार्फत गरीब व गरजु रुग्णांना त्यांचे वैद्यकिय, उपचाराकरीता रुग्ण उपचार घेत असलेल्या रुग्णालयाचे नावे आर्थिक अनुदान देण्यात येते. त्यासाठी संस्थान व्यवस्थापनाने स्वतंत्र नियमावली तयार केलेली आहे. त्यास अनुसरुन सन १ एप्रिल-२०१५ ते ३१ मार्च २०१६ अखेर कालावधीत दिलेले वैद्यकिय आर्थिक अनुदान व लाभार्थी रुग्ण संख्या पुढील प्रमाणे आहे.

| अ.नं. | माहिना | लाभार्थी रुग्ण संख्या | मंजुर अनुदान रक्कम | मंजुर बजेट |
|---|---|---|---|---|
| १ | १ एप्रिल २०१५ | ६३ | १४,५९,४१४/- | १५,००,००,०००/- |
| २ | मे २०१५ | ८० | १७,७६,७२३/- | |
| ३ | जुन २०१५ | ८४ | २०,१६,५०५/- | |
| ४ | जुलै २०१५ | ६९ | १६,५१,०५५/- | |
| ५ | ऑगस्ट २०१५ | ९३ | २१,४७,३६१/- | |
| ६ | सप्टेंबर २०१५ | ८९ | २०,२२,५०३/- | |
| ७ | ऑक्टोबर २०१५ | ७९ | १७,९१,८५६/- | |
| ८ | नोव्हेंबर २०१५ | ५५ | १२,६९,८५०/- | |
| ९ | डिसेंबर २०१५ | ८६ | २०,२६,१३३/- | |
| १० | जानेवारी २०१६ | ६३ | १५,०१,०७२/- | |
| ११ | फेब्रुवारी २०१६ | ६४ | १५,५९,७५०/- | |
| १२ | ३१ मार्च २०१६ | ४६ | १०,८२,९५५/- | |
| **एकुण** | | **८७१** | **२,०३,०५,१७७/-** | |

उपरोक्त प्रमाणे दिलेले वैद्यकिय आर्थिक अनुदान बाबतची माहितीची नोंद घेणेसाठी सदरचा विषय मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर.

**निर्णय क्र.६१४** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईनाथ रुग्णालयामध्ये सन दि.०१ एप्रिल- २०१५ ते दि.३१ मार्च- २०१६ अखेर कालावधीत दिलेले अनुदान व रुग्ण संख्या यांचे अवलोकन करणेत येऊन, त्याची नोंद घेण्यात आली.** (कार्यवाही- वैद्यकीय अधिक्षक)

-----------------------------------------------------------------------------------------------------------------------

**यानंतर मा.अध्यक्ष महोदय यांचे परवानगीने आयत्या वेळेच्या विषयांवर चर्चा सुरु करणेत आली.**

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.०१** **तांत्रिक/ अतांत्रिक विभाग प्रमुखांची पदे सरळसेवेने भरणेकामी आलेल्या अर्जांवर कार्यवाही करणेबाबत.**

**प्रस्ताव-** **अ)** मंजुर आकृतीबंधानुसार कार्यकारी अभियंता, उप कार्यकारी अभियंता (पाणी पुरवठा), यांत्रिकी अभियंता, इलेक्ट्रॉनिक्स अभियंता, प्रसादालय व्यवस्थापक, आय.टी.मॅनेजर या तांत्रिक/ अतांत्रिक विभाग प्रमुखांची पदे सरळसेवेने भरणेकामी प्रस्ताव मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठात मान्यतेसाठी सादर करणेचा विषय मा.त्रिसदस्य समिती दि.०८/०१/२०१४ रोजीचे सभेपुढे सादर करणेत आला होता, त्यावर समितीने निर्णय क्र.७५ नुसार मान्यता दिलेली आहे.

सदर मान्यतेस अनुसरून तांत्रिक/ अतांत्रिक पदे सरळसेवेने भरणेकामी मा.मुंबई उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे सिव्हील ॲप्लीकेशन नं.८८४६/२०१४ दाखल करणेत आलेले होते. त्यास मा.उच्च न्यायालयाने दि.२६ सप्टेंबर, २०१४ रोजी मान्यता दिलेली आहे. त्यानंतर सदरची पदे सरळसेवेने भरणेकामी संस्थानचे अधिकृत संकेतस्थळावर तसेच दिव्य मराठी दि.०४/११/२०१४, ईपेपर दि.०३/११/२०१४, सामना दि.०३/११/२०१४ व पुण्य नगरी दि.०१/११/२०१४ इत्यादी विविध वर्तमान पत्रात जाहीरात प्रसिध्द करुन दि.१५/११/२०१४ अखेर अर्ज मागविणेत आलेले होते. सदर जाहीरातीस अनुसरून सर्व पदांसाठी मुदतीत २२९ व मुदतीनंतर १३ असे एकूण २४२ अर्ज संस्थानला प्राप्त झाले होते.

जाहीरातीनुसार अर्जदाराने अर्जासोबत जोडलेल्या शैक्षणिक व व्यवसायिक पात्रता प्रमाणपत्रांची तसेच संबंधीत कामाचा अनुभव याबाबत पडताळणी करुन पात्र/ अपात्र उमेदवार निश्चिती करुन परिक्षेचे तसेच मुलाखतीचे आयोजन करणेकामी व तज्ञ सेवा देणेकामी मा.संचालक, कॉलेज ऑफ इंजिनिअरींग पुणे व महाराष्ट्र ज्ञान महामंडळ, पुणे यांचेकडून व्यवसायिक प्रस्ताव मागविणेत आले होते. सदरचे दोन्ही प्रस्ताव मा.त्रिसदस्य समिती दि.३०/०१/२०१५ रोजीचे सभेपुढे विचारार्थ सादर करणेत आले होते. त्यावर समितीने निर्णय क्र.१० खालीलप्रमाणे घेतला.

"मंजुर आकृतीबंधानुसार विविध तांत्रिक/ अतांत्रिक विभाग प्रमुखांची पदे सरळसेवेने भरणेकामी आलेल्या अर्जांची पडताळणी करणे, पात्र उमेदवारांची १०० गुणांची लेखी परीक्षा घेऊन मेरीट नुसार मुलाखतीचे आयोजन करणेकामी मा.संचालक, कॉलेज ऑफ इंजिनिअरींग, पुणे यांचा प्रस्ताव स्वीकारणेत येऊन याकामी येणा-या रक्कम रु.१,२१,०००/- + सेवाकर मात्र आगाऊ मानधन त्यांना आदा करणेस मान्यता देण्यात आली."

वरील मा.त्रिसदस्य समितीचे निर्णयानुसार जा.नं.एसएसएस/साप्रशा/आस्था/५७९५/२०१५ दि.२३ फेब्रुवारी, २०१५ नुसार सदर पदभरतीचे कामकाज मा.संचालक, कॉलेज ऑफ इंजिनिअरींग, पुणे यांना देण्यात आले. त्यानंतर कॉलेज ऑफ इंजिनिअरींग, पुणे यांनी जाहीरातीनुसार आलेल्या २४२ अर्जांची पडताळणी करुन पात्र/ अपात्र उमेदवारांची निश्चिती करुन दि.२५/०४/२०१५ रोजी अहवाल संस्थानला सादर केला. सदर अहवालानुसार खालीलप्रमाणे पदनिहाय पात्र उमेदवारांची संख्या कळविणेत आली.

| अ.नं. | पदनाम | एकूण अर्ज | पात्र उमेदवार संख्या | अपात्र संख्या |
|---|---|---|---|---|
| ०१ | कार्यकारी अभियंता | २३ | ०० | २३ |
| ०२ | उप कार्यकारी अभियंता (पा.पु.) | ११ | ०१ | १० |
| ०३ | मेकॅनिकल इंजिनिअर | ४६ | ०६ | ४० |
| ०४ | आय.टी.मॅनेजर | ७३ | ०२ | ७१ |
| ०५ | इलेक्ट्रॉनिक इंजिनिअर | ४१ | ०४ | ३८ |
| ०६ | प्रसादालय मॅनेजर | ४८ | ०४ | ४४ |

उपरोक्तप्रमाणे कॉलेज ऑफ इंजिनिअरींग, पुणे यांनी सादर केलेला अहवाल मात्रिसदस्य समिती दि.२७/१०/२०१५ रोजीचे सभेपुढे सादर करणेत आला होता, त्यावर समितीने निर्णय क्र.४२६ खालीलप्रमाणे घेतला.

"प्रस्तावात नमुद केलेली वस्तुस्थिती विचारात घेता, पात्र उमेदवारांची संख्या अगदीच कमी असल्याने मंजुर आकृतीबंधानुसार रिक्त तांत्रिक / अतांत्रिक विभाग प्रमुखांची सहा पदे सरळसेवेने भरणेकामी पुनःश्च लोकल तसेच राज्यस्तरीय वर्तमान पत्रात जाहीरात प्रसिध्द करणेस व याकामी येणा-या अपेक्षीत खर्चास मान्यता देण्यात आली."

दरम्यानचे कालावधीत संस्थानचे श्री.किशोर साहेबराव गवळी यांनी आय.टी.मॅनेजर या पदाचे भरतीबाबत संस्थान विरोधात मा.मुंबई उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे सिव्हील अर्ज क्र. १०८/२०१६ दाखल केले. सदर अर्जावर उच्च न्यायालयाने दि.१२ फेब्रुवारी, २०१६ रोजी खालील प्रमाणे आदेश केले.

The learned counsel for the Committee submits that, the meeting of the Committee is proposed to be scheduled on 24.02.2016. The decision in respect of filling in the post of I.T.Manager by promotion or otherwise shall be taken by 24.02.2016. In view of that, the civil application is disposed of.

वरीलप्रमाणे मा.उच्च न्यायालयाचे आदेशास अनुसरून पुनःश्च जाहीरात प्रसिध्द करतांना आय.टी.मॅनेजर हे पद वगळण्यात आलेले आहे.

**ब)** तसेच विधी अधिकारी, कामगार अधिकारी व कनिष्ठ कामगार अधिकारी ही रिक्त पदे सरळसेवेने भरणेकामी प्रस्ताव मा.त्रिसदस्य समिती दि.२७/१०/२०१५ रोजीचे सभेपुढे सादर करणेत आला होता. त्यावर समितीने निर्णय क्र.४२५ खालीलप्रमाणे घेतला.

"विधी अधिकारी, कामगार अधिकारी व कनिष्ठ कामगार अधिकारी ही रिक्त पदे सरळसेवेने भरणेकामीच्या उपरोक्त प्रस्तावास मान्यता घेणेसाठी संस्थान वकिलामार्फत मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठामध्ये सिव्हील अर्ज दाखल करणेत यावा, असे ठरले."

उपरोक्त मा.त्रिसदस्य समितीचे निर्णयास अनुसरून मा.मुंबई उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे सिव्हील अर्ज नं.११८/२०१६ दाखल करणेत आला होता. त्यावर न्यायालयाने दि.०४ मार्च, २०१६ रोजी खालीलप्रमाणे आदेश दिलेले आहेत.

This is an application seeking permission to fill in the posts of Law Officer, Labour Officer and Junior Labour Officer. It is submitted that, the Law Officer and Labour Officer have retired, all these three posts are sanctioned posts.

2. Mr. Talekar, learned counsel for non-applicants submits that, the Law Officer should be experienced person and the selection committee be constituted of experts.

3. The Principal District Judge shall be the Chairman of the Committee in selection process of the Law Officer, Labour Officer and Junior Labour Officer. It will be open for the Principal District Judge to take assistance of other experts, if he so disires. The qualification for all these posts should be as per Rules. The advertisement shall be published in a newspaper having wide circulation, inviting applications for the said posts. The Selection Committee shall decide about the process of selection. The efforts should be made to get the best talent.

उपरोक्त **"अ"** व **"ब"** मधील मा.त्रिसदस्य समितीचे सभेतील निर्णय व मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठ यांचेकडील आदेशास अनुसरून संस्थानचे रिक्त कार्यकारी अभियंता, उप कार्यकारी अभियंता (पाणी पुरवठा), यांत्रिकी अभियंता, इलेक्ट्रॉनिक्स अभियंता, प्रसादालय व्यवस्थापक, विधी अधिकारी, कामगार अधिकारी व कनिष्ठ कामगार अधिकारी या पदांची विविध वर्तमान पत्रात तसेच संस्थानचे अधिकृत संकेतस्थळावर जाहीरात प्रसिध्द करुन **दि.३०/०४/२०१६** अखेर अर्ज मागविणेत आलेले आहेत. त्यांची माहिती खालीलप्रमाणे –

**जाहीरातीनुसार आलेल्या अर्जांची माहिती खालीलप्रमाणे**

| अ.नं. | पदनाम | दि.३०/०४/२०१६ अखेर मुदतीत आलेले अर्ज | मुदतीनंतर आलेले अर्ज | एकूण अर्ज |
|---|---|---|---|---|
| ०१ | कार्यकारी अभियंता | २७ | ०२ | २९ |
| ०२ | उप कार्यकारी अभियंता (पाणी पुरवठा) | २२ | -- | २२ |
| ०३ | यांत्रिकी अभियंता | ३८ | ०१ | ३९ |
| ०४ | इलेक्ट्रॉनिक्स अभियंता (ध्वनीक्षेपन व टेलीफोन) | ४२ | ०१ | ४३ |
| ०५ | प्रसादालय व्यवस्थापक | २८ | ०१ | २९ |
| ०६ | विधी अधिकारी | २५ | ०१ | २६ |
| ०७ | कामगार अधिकारी | ४० | -- | ४० |
| ०८ | कनिष्ठ कामगार अधिकारी | ४४ | ०२ | ४६ |
| | **एकूण-** | **२६६** | **०८** | **२७४** |

उपरोक्तप्रमाणे दि.३०/०४/२०१६ अखेर मुदतीत २६६ व मुदतीनंतर ०८ असे एकूण २७४ अर्ज संस्थानला प्राप्त झालेले आहेत. सदरचे अर्ज संगणकावर फिडींग करुन त्याचे तपशीलवार माहितीचे तक्ते तयार करणेत आले आहेत.

शासनाने दि.०७/०८/२००९ रोजी मान्यता दिलेल्या आकृतीबंधात खालीलप्रमाणे अटी शर्ती नमुद करणेत आलेल्या आहेत.

**अट-शर्त क्र.०३** सदर पदांवर नव्याने नियुक्ती करतांना समितीने सदर पदांची आवश्यकता व अर्हता याबाबत विस्तृत प्रसिध्दी देऊन सदर पदांवर स्पर्धात्मक परिक्षा घेऊन नियुक्ती करावी.

**अट-शर्त क्र.१०** तांत्रिक पदे नव्याने भरतांना त्याच क्षेत्रातील तज्ज्ञांचा निवड प्रक्रियेत समावेश असेल याची दक्षता घ्यावी.

मंजुर आकृतीबंधातील उपरोक्त अटी-शर्तीस तसेच मा.मुंबई उच्च न्यायालयाचे आदेशास अनुसरून जाहीरातीनुसार आलेल्या अर्जांवर खालीलप्रमाणे कार्यवाही करता येईल.

कार्यकारी अभियंता या पदाचे कार्यवाहीसाठी मा.अधीक्षक, अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, अहमदनगर, उप कार्यकारी अभियंता व यांत्रिकी अभियंता या पदाचे कार्यवाहीसाठी माअधीक्षक अभियंता व प्रशासक, अहमदनगर, इलेक्ट्रॉनिक्स अभियंता व प्रसादालय व्यवस्थापक या पदाचे कार्यवाहीसाठी MKCL व कॉलेज ऑफ इंजिनिअरींग, पुणे यांना लेखी पत्र देण्यात आले होते. परंतु मा.अधीक्षक अभियंता व प्रशासक, लाभक्षेत्र विकास प्राधीकरण, अहमदनगर यांनी सदरचे काम करणेस नकार दर्शविलेला आहे. तसेच MKCL, Pune यांनी प्रस्ताव सादर केलेला नाही. मा.संचालक, कॉलेज ऑफ इंजिनिअरींग, पुणे यांनी उपरोक्त अ.०१ ते ०५ पदाचे संपूर्ण कामकाज करणेस सहमती दर्शविलेली आहे.

**(१)** यापुर्वी मा.त्रिसदस्य समितीचे मान्यतेने जाहीरातीनुसार अर्जदाराने अर्जासोबत जोडलेल्या शैक्षणिक व व्यवसायिक पात्रता प्रमाणपत्रांची तसेच संबंधीत कामाचा अनुभव प्रमाणपत्रांची पडताळणी करुन पात्र/ अपात्र उमेदवार निश्चिती करुन, परिक्षेचे तसेच मुलाखतीचे आयोजन करणेचे संपूर्ण कामकाज मा .संचालक, कॉलेज ऑफ इंजिनिअरींग, पुणे यांना देण्यात आलेले होते. त्याच धरतीवर आता, कार्यकारी अभियंता, उप कार्यकारी अभियंता (पा.पु.), यांत्रिकी अभियंता, इलेक्ट्रॉनिक्स अभियंता व प्रसादालय व्यवस्थापक या पदासाठी आलेल्या अर्जांवर कार्यवाही करणेकामी मा.संचालक, कॉलेज ऑफ इंजिनिअरींग, पुणे यांचेकडून किंवा इतर व्यवसायिक संस्थेकडून प्रस्ताव मागवून पदभरतीची कार्यवाही करता येईल.

**(२)** मा.उच्च न्यायालयाचे दि.०४ मार्च, २०१६ रोजीचे आदेशानुसार विधी अधिकारी, कामगार अधिकारी व कनिष्ठ कामगार अधिकारी या पदाचे निवड प्रक्रियेत मा.प्रधान जिल्हा व सत्र न्यायधीश समितीचे अध्यक्ष असतील व ते इतर तज्ज्ञ व्यक्तींची मदत घेतील. सदर आदेशास अनुसरून मा.प्रधान जिल्हा व सत्र न्यायधीश यांचेमार्फत विधी अधिकारी, कामगार अधिकारी व कनिष्ठ कामगार अधिकारी या पदांसाठी आलेल्या अर्जांवर कार्यवाही करता येईल.

तरी उपरोक्त प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.६१५** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावामध्ये नमुद केलेल्या कार्यकारी अभियंता, उप कार्यकारी अभियंता (पा.पु.), यांत्रिकी अभियंता, इलेक्ट्रॉनिक्स अभियंता व प्रसादालय व्यवस्थापक या पदासाठी आलेल्या अर्जांवर पुढील कार्यवाही करणेसाठी मा.संचालक, कॉलेज ऑफ इंजिनिअरींग, पुणे यांचेकडून प्रस्ताव मागविणेत यावा.**

**तसेच विधी अधिकारी, कामगार अधिकारी व कनिष्ठ कामगार अधिकारी या पदासाठी आलेल्या अर्जांवर पुढील कार्यवाही करणेसाठी मा.उच्च न्यायालयाने सदरहू पदांचे निवड प्रक्रियेत मा.प्रधान जिल्हा व सत्र न्यायधीश समितीचे अध्यक्ष असतील व ते इतर तज्ज्ञ व्यक्तींची मदत घेतील, असा आदेश आहे. परंतु मा.प्रधान जिल्हा व सत्र न्यायाधीश हे श्री साईबाबा संस्थान व्यवस्थापन समितीचे तत्कालीन अध्यक्ष होते. सध्या शासन नियुक्त व्यवस्थापन समिती संस्थानचे कामकाज पहात असल्यामुळे आत्ताचे मा.अध्यक्ष महोदय यांचे अधिपत्याखाली विधी अधिकारी, कामगार अधिकारी, कनिष्ठ कामगार अधिकारी या पदांसाठी आलेल्या अर्जांवर पुढील कार्यवाही करता येईल का, याबाबत विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचा अभिप्राय घेण्यात येऊन, पुढील कार्यवाही करणेत यावी, असे ठरले.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, सामान्य प्रशासन)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०२** **गुन्हेगारी रोखण्यासाठी साध्या वेशात सुरक्षा कर्मचारी नेमणुक करणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्रींचे दर्शनासाठी दिवसेंदिवस राज्यातुन, परराज्यातुन तसेच परदेशातुन साईभक्तांची गर्दी मोठया प्रमाणात वाढत आहे. तसेच वाढत्या गर्दीच्या मानाने साईभक्तांचे पैसे, मनिपर्स, दागीने, मोबाईल इ. चोऱ्या होण्याचे प्रमाण प्रमाण वाढत चालले आहे.

पोलीस निरीक्षक, साई मंदिर सुरक्षा यांनी दि.१५/०६/२०१६ चे पत्राने कळविले आहे की, साई मंदिर सुरक्षा यांनी शिर्डी येथे मोठया प्रमाणात साईभक्तांचे चोऱ्या होण्याचे प्रमाण वाढले असुन मौल्यवान दाग-दागिने व पाकीटमारी, भुरटया चोऱ्या होण्याचे प्रमाणही वाढले असुन ते रोखणेकरीता भक्तांच्या सुरक्षेच्या दृष्टीकोनातुन आम्ही स्वत: साई मंदिर सुरक्षा पोलीस कर्मचाऱ्यांतुन ०४ पुरुष पोलीस कर्मचारी व ०२ महिला पोलीस कर्मचारी साध्या गणवेशातील गुन्हेगारी नियंत्रण पथक स्थापन केले असुन आमच्याकडे संख्याबळ कमी असल्याने श्री साईबाबा संस्थान शिर्डी येथील संरक्षण विभागाती ०८ पुरुष व ०२ महिला मंदिर परिसरातील गुन्हेगारी रोखण्यासाठी पोलीस पथकास मदतनीस म्हणुन मिळणेबाबत आपले मार्फत संरक्षण विभागास आदेश होण्यास विनंती. सदरचे नेमलेले कर्मचारी हे गुन्हेगारीची माहिती असलेले नेमावेत व पुर्वी काम केलेले असावेत, असे नमुद केले आहे. तसेच मा.व्यवस्थापन समिती दि.१६/०८/२०१६ रोजीचे सभेमध्ये मा. विश्वस्त श्री सचिन तांबे सो यांनी गुन्हेगारी रोखणेसाठी साध्या गणवेशातील सुरक्षा कर्मचाऱ्यांची नेमणुक करणेबाबत सुचना केलेली आहे.

मंदिर व मंदिर परिसरातील पाकीटमारी / गुन्हेगारी रोखण्यासाठी खालील नमुद केलेल्या ठिकाणी साध्या वेशातील सुरक्षा कर्मचाऱ्यांची नेमणुक करणे आवश्यक आहे.

| अ.नं. | कामाचे ठिकाण | ०४ ते १२ | १२ ते २० | २० ते ०४ | ०६ ते ०२ | ०२ ते १० | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ०१. | समाधी मंदिर गाभारा दोन्ही बाजु | -- | -- | -- | ०२ | ०२ | ०४ |
| ०२. | गुरुस्थान मंदिर परिसर | ०१ | ०१ | ०१ | -- | -- | ०३ |
| ०३. | मुखदर्शन हॉल, दर्शन रांग तळघर व बुंदी वाटप जवळ | -- | -- | -- | ०१ | ०१ | ०२ |
| ०४. | मारुती मंदीर, चावडी, द्वारकामाई परिसर | -- | -- | -- | ०१ | ०१ | ०२ |
| ०५. | दर्शनरांग प्रवेशद्वार क्र.०१ | ०१ | ०१ | ०१ | -- | -- | ०३ |
| ०६. | दर्शनरांग प्रवेशद्वार क्र.०२ | ०१ | ०१ | ०१ | -- | -- | ०३ |
| ०७ | जनसंपर्क कार्यालय व मोबाईल लॉकर, लाडु काऊंटर | ०१ | ०१ | ०१ | -- | -- | ०३ |
| ०८ | श्री साई प्रसादालय बुकींग | -- | -- | -- | ०१ | ०१ | ०२ |
| ०९ | साईउद्यान समोरील रोड व मोबाईल लॉकर | ०१ | ०१ | ०१ | -- | -- | ०३ |
| | **एकुण =** | ०५ | ०५ | ०५ | ०५ | ०५ | २५ |

तरी मंदिर, मंदिर परिसर, लाडू काऊंटर, मोबाईल लॉकर या गर्दीचे ठिकाणी होणाऱ्या चोऱ्या रोखण्यासाठी वरील तपशिलप्रमाणे २५ सिव्हील सुरक्षा कर्मचाऱ्यांची नेमणुक करणेस व त्याकामी संबंधीत कंत्राटी सुरक्षा एजन्सीस कर्मचारी पुरविणेस मंजुरी देणेस मान्यता असावी.

**निर्णय क्र.६१६** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्रींचे मंदिर व मंदिर परिसरामध्ये वाढती पाकिटमारी व गुन्हेगारी रोखण्यासाठी संस्थानमधील, स्थानिक/ परिसरामध्ये निवासी असलेल्या कायम/ कंत्राटी कर्मचाऱ्यांमधून २५ कर्मचाऱ्यांची साध्या वेशातील सुरक्षा कर्मचारी म्हणून नेमणुक करणेत यावी. या कर्मचाऱ्यांच्या चक्रिय पध्दतीने बदल्या करणेत याव्यात. तसेच संरक्षण विभागप्रमुख यांनी सदरहू कर्मचाऱ्यांवर नियंत्रण ठेवावे, असे ठरले.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, सामान्य प्रशासन/ संरक्षण विभागप्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०३** **फायर सल्लागार (Consultant) नेमणुकीबाबत**

**प्रस्ताव-** फायर ॲण्ड सेफ्टी विभागामार्फत संस्थानचे सर्व परीसराचे फायर ऑडीट मे.लाईफलाईन फायर सर्व्हिसेस, वारी व सी.आय.एस.एफ यांचे मार्फत करुन त्याचा सविस्तर अहवाल फायर विभागास प्राप्त झालेला आहे. त्यानुसार शिर्डी नगर पंचायतचे फायर विभागास सदर परिशिष्ट ०१ व ०२ अहवालाची सविस्तर प्रत मा.संचालक महाराष्ट्र राज्य यांना सादर करणेकामी शिर्डी नगरपंचायत यांचे कडे सादर करणेत आलेली आहे

फायर ऑडीट रिपोर्ट परिशिष्ट क्र.०२ तसेच संस्थानचे सर्व इमारतींना NBC 2005 PART – 4 नुसार संस्थानचे सर्व (६४) इमारतींनी आग प्रतिबंधक व जिवसंरक्षक उपाय - योजना करणे आवश्यक आहे.संस्थानचे सर्व इमारतींचे फायर ऑडीट करुन प्रत्येक इमारतीचे स्वतंत्र, ड्रॉईंग, प्लॅन, B.O.M., B.O.Q., मा.व्यवस्थापन समितीची खर्चास मान्यतेकामी एकत्रित प्रस्ताव तयार करणे,मान्यतेनुसार ठेकेदार यांची नियुक्ती कामी मार्गदर्शन करणे, ठेकेदार यांचेकडून ड्रॉईंग व प्लॅन नुसार कामे करुन घेणे, ठेकेदारांचे बीलाचे स्लॅब ठरविणे , ऑडीट पुर्ततेनंतर शासनास सादर करणे कामी सर्व इमारतींचा स्वतंत्र पुर्णत्वाचा दाखला देणे , इतर तद्संबंधीत आवश्यक कामे व फायर विभागाचे इतर कामांसाठी फायर कंन्सल्टंट यांची तात्पुरत्या स्वरुपात नेमणूक करणे आवश्यक आहे.

त्यानुसार फायर ॲण्ड सेफ्टी विभागामार्फत तीन वेळा ई-निविदा प्रक्रिया राबविण्यात आलेली होती. त्यामध्ये तीस-यांदा राबविणेत आलेल्या ई- निविदा प्रक्रियेमध्ये चार निविदा प्राप्त झालेल्या होत्या, सर्व निविदाधारकांची दि.१४.०७.२०१६ रोजी तांत्रीक बीड मध्ये कागदपत्रांची तपासणी केली असता ०२ निविदाधारक पात्र ठरविण्यात आलेले होते.त्यानुसार सदरचे पात्र निविदाधारकांचे कमर्शिअल बीड मा.उपसमितीचे समोर उघडणेकामी सदरचा विषय सभाकामकाज विभागास सादर करण्यात आलेला होता.त्यानुसार दि.२२.०८.२०१६ रोजी मा.उप.समितीचे सभेतील निर्णयानुसार सदर ई – निविदा प्रक्रियास स्थगिती देवुन नव्याने ई– निविदा मागविणेसाठी विस्तृत प्रमाणात फेरजाहिरात देण्यात येऊन नामांकित फायर सल्लागाराची नेमणुक करणेत यावी, जेणेकरुन नवीन प्रस्तावित दर्शनलाईन साठीही त्यांची सेवा उपयोगात येईल, असा निर्णय झालेला आहे.

यानंतर श्री.बाळासाहेब बाबुराव उंडे रा.मातापुर यांचा दि.२३.०८.२०१६ रोजीचा व दि.२८.०८.२०१६ रोजीचा अर्ज इकडील कार्यालयास प्राप्त झाला असुन अर्जामध्ये त्यांनी मी भारतीय हवाई दलात विविध पदांवर २० वर्ष देशसेवा केलेली असुन राष्ट्रीय अग्निशमन सेवा महाविदयालय नागपुर येथुन सब फायर ऑफीसर पदवी संपादन केलेली आहे.माझी हवाई दलात सेवा अनुभव पाहता मला संस्थानचे फायर ॲण्ड सेफ्टी या विभागात सल्लागार म्हणुन विनामुल्य सेवा करण्याची संधी देवुन सदर सेवा विनामुल्य करणार असल्याने आवश्यकतेप्रमाणे निवास, भोजन, दर्शन व येण्या-जाण्यासाठी वाहनाची व्यवस्था संस्थानमार्फत व्हावी असे नमुद केलेले आहे.

तरी संस्थानचे फायर विभागाकडील फायर ॲण्ड सेफ्टी ऑफीसर पद रिक्त असल्याने तसेच नव्याने ई-निविदा प्रक्रिया राबविणेस वेळ लागणार असल्याने फायर ऑडीटमधील त्रूटीची पुर्तता करणेकामी श्री बाळासाहेब बाबुराव उंडे यांची सल्लागार पदी ०२ वर्ष कालावधीकरीता तात्पुरती विनामोबदला नेमणुक करुन त्यांचेमार्फत फायर ऑडीटमध्ये आढळुन आलेल्या त्रूटीची पुर्तता करता येईल असे नम्र मत आहे.

तरी फायर ॲण्ड सेफ्टी विभागाकरीता तात्पुरते स्वरुपात श्री बाळासाहेब बाबुराव उंडे रा.मातापुर यांची सल्लागार पदी विनामुल्य नेमणुक करणेस व त्यांना संस्थानमार्फत आवश्यकतेप्रमाणे मोफत निवास , भोजन ,दर्शन व जाणे –येण्यासाठी वाहन व्यवस्था इत्यादी विनामुल्य पुरविणेबाबत निर्णय होणेस विंनती.

**निर्णय क्र.६१७** **यावर सविस्तर चर्चा होऊन, फायर अ‍ॅण्ड सेफ्टी विभागाकरीता तात्पुरते स्वरुपात सल्लागार म्हणून श्री.बाळासाहेब बाबुराव उंडे, रा.मातापुर यांची विनामुल्य नेमणुक करणेस मान्यता देण्यात आली. आवश्यकतेप्रमाणे त्यांची निवास, भोजन, दर्शन व जाणे– येण्यासाठी वाहन इ.व्यवस्था संस्थानमार्फत विनामुल्य करणेत यावी. तसेच भविष्यामध्ये संस्थानमार्फत मोठमोठे प्रकल्प राबविण्याचे विचाराधीन असल्यामुळे संस्थानसाठी फायर सल्लागार (Consultant) म्हणून नामांकित कंपनीची नेमणूक करणेसंदर्भातील कार्यवाही चालु ठेवणेत यावी, असे ठरले.** (कार्यवाही- फायर अ‍ॅण्ड सेफ्टी विभागप्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०४** **शिर्डी बसस्थानकावरील संस्थान निवासस्थानात लागणारे साहित्य खरेदी करणे व नामांकरणाबाबत.**

**प्रस्ताव-** **०१. अधिनियम २००४ मधील तरतूद-** २१(ग) भक्तांना मंदिरात देवतेच्या दर्शनासाठी व प्रार्थनेसाठी किंवा धार्मिक सेवा किंवा समारंभ करण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे. या अधिनियम व तरतुदी नुसार श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्थे मार्फत भक्तांची निवासव्यवस्था व सुविधा पुरविण्यात येते.

**०२. व्यवस्थापन समितीचा ठराव क्र.–** निरंक

**०३.प्रस्तावीक–** जा.नं.एसएसएस/काअ/४७४४/२०१६ दि.१५/०३/२०१६ अन्वये दि.१३/०३/२०१६ रोजी मा.अध्यक्ष महोदय, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांनी संस्थानचे मालमत्तेची स्थळ पाहणी केली असता नवीन बसस्थानक येथील नव्याने बांधण्यात आलेल्या इमारतीतील खोल्या व हॉल साईभक्तांना निवासासाठी देणेकामी लागणारे आवश्यक साहित्य खरेदीचा प्रस्ताव सादर करणे बाबत सुचना केल्या आहेत.

नवीन बसस्थानक येथे संस्थानचे तळमजल्यावर ०३ गाळे असून पहिल्या व दुस-या मजल्यावर खालील तपशीला प्रमाणे साईभक्तांकरीता रुम्स व हॉल्सची निवासव्यवस्था आहे.

| अ नं | मजला | तपशील | बांधकाम क्षेत्र | संख्या |
|---|---|---|---|---|
| १ | पहिला मजला | निवासी मोठे हॉल्स (संडास-बाथरुम कॉमन) | ११९६ चौ.मी | ०५ |
| | | निवासी लहान हॉल (संडास-बाथरुम कॉमन) | | ०२ |
| | | निवास रुम (संडास-बाथरुम अटयॅच) | | ०७ |
| २ | दुसरा मजला | निवासी मोठे हॉल्स (संडास-बाथरुम कॉमन) | ११९६ चौ.मी | ०५ |
| | | निवासी लहान हॉल (संडास-बाथरुम कॉमन) | | ०२ |
| | | निवासी रुम (संडास-बाथरुम अटयॅच) | | ०७ |
| | **एकूण – मोठे हॉल्स १०, लहान हॉल्स ०४ व रुम्स १४** | | | |

तेथील हॉल्स व रुम्स करीता आवश्यक असणा-या साहित्याची माहिती बांधकाम विभागाने दि.२८/०३/२०१६ रोजीचे पत्रान्वये साईप्रसाद निवासस्थान विभागास कळविली असून त्यानुसार हॉल्स व रुम्स मध्ये खालील प्रमाणे कॉट्सचे नियोजन करुन आवश्यक साहित्याची खरेदी करता येईल.

| **अ.नं.** | **तपशील** | **प्रति हॉल /रुम कॉट संख्या** | **एकूण कॉटची संख्या** |
|---|---|---|---|
| ०१ | निवासी मोठे हॉल्स – १० | १५ | १५० |
| ०२ | निवासी लहान हॉल्स -०४ | ०९ | ३६ |
| ०३ | निवासी खोल्या – १२ | ०३ | ३६ |
| ०४ | निवासी सुट खोल्या – ०२ | ०६ | १२ |
| | | एकूण | २३४ |

**०४. मागणी–** शिर्डी बसस्थानकावरील संस्थान निवासस्थानात खालील तपशीलाप्रमाणे कॉट्स, बॉक्स गाद्या, गादीकव्हर, उशा व उशीकव्हर खरेदी करावे लागतील.

**A) कॉट्स**

| अ.नं. | तपशील | नग |
|---|---|---|
| ०१ | Supplying and Installing M.S. (CRCA) Framed Single Beds. Size 6' – 00" x 3' – 00" | २३४ |

**B) क्वॉयर फोम गादी व वॉटरप्रुफ मॅट्रेस प्रोटेक्टर**

**Nos – 234 Size – 1829 mm x 915 mm (72" x 36") & Waterproof Matterss Protector**

| Sr.no. | Description | Specification |
|---|---|---|
| 01 | Mattresses – 4" Thk | Quilted having from – 12 mm thk, 18 gm/dm 3 |
| 02 | Thickness - mattresses | 4 inch |
| 03 | Dry Rubberized Content (DRC) | 20 to 25 % |
| 04 | Latex Type | Centrifuged |
| 05 | RC pad Density (RC Pad Thickness – 75 mm) | 100 gm/dm 3 |
| 06 | Bonded Foam Thickness | 20 to 22 mm |
| 07 | Nature of Tapestry | Cotton |
| 08 | Tapestry | 120 to 140 GSM |
| 09 | Fabric | Anti Microbial Treatment |
| 10 | Mattress Protector | Waterproof (4 Side) |

प्रमाणे २५० नग क्वॉयर फोम गादी व वॉटर प्रुफ मॅट्रेस प्रोटेक्टर खरेदी कराव्या लागणार आहे.

| अ.नं. | तपशील | नग |
|---|---|---|
| ०१ | ६' – ००" X ३' – ००" मापाच्या क्वॉयर फोम मॅट्रेस<br>ब्रॅन्डेड कंपनी – सेंच्युरी, कर्लान, स्लीपवेल, डनलॉप, गोदरेज | २५० |
| ०२ | ६' – ००" X ३' – ००" मापाच्या क्वॉयर फोम मॅट्रेस प्रोटेक्टर (चार बाजु)<br>ब्रॅन्डेड कंपनी – सेंच्युरी, कर्लान, स्लीपवेल, डनलॉप, गोदरेज | २५० |

**C) फायबर उशी व उशी कव्हर –**

| अ.नं. | तपशील | नग |
|---|---|---|
| ०१ | **FIBRE PILLOWS**<br>610 mm x 410 mm (24" x 16") (+/- 5 mm)<br>**Fibre Type –** Sillconised<br>**Fibre Weight –** Approx, 700 Gms<br>**Fabric/Cloth –** Pastel Cloth (Plain/Printed)<br>**Stitching –** Plain | ३०० |
| ०२ | **PILLOW COVERS** (Printed)<br>18" x 27", 100% Cotton, with Interlock, Mafatlal | १००० |

तसेच साईप्रसाद निवासस्थान विभागाचे दि.१७/०५/२०१६ रोजीचे टिपणीवर मा.कार्यकारी अधिकारी साहेब यांनी सदर निवासस्थानाचे **'साई द्वारकामाई'** असे नामांकरण करणेत यावे असे निर्देश दिलेले आहेत.

**०५. विभागाचा स्पष्ट अभिप्राय / स्पष्ट मत –**

अ) प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे बसस्थानकावरील संस्थान निवासस्थानाचे साई द्वारकामाई असे नामांकरण करणेस,

ब) नमुदप्रमाणे A, B, व C मध्ये नमुद केलेले साहित्य खरेदीकामी येणा-या अपेक्षीत खर्चास,

क) कॉट खरेदी बांधकाम विभाग व इतर साहित्य खरेदी, खरेदी विभागामार्फत वर्तमानपत्रात जाहिरात प्रसिध्द करुन ई- टेंडर पध्दतीने खरेदी करणेस,

तरी उपरोक्त 'अ', 'ब' व 'क' प्रमाणे मंजुरी मिळणेकामी सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेत चर्चा होऊन निर्णय होणेस्तव, सादर.

**निर्णय क्र.६१८** **यावर सविस्तर चर्चा होऊन, जोपर्यंत शिर्डी बसस्थानकाचे काम पुर्ण होऊन त्यामधील संस्थान निवासस्थान संस्थानकडे हस्तांतरीत होत नाही, तोपर्यंत शिर्डी बसस्थानकावरील संस्थान निवासस्थानात लागणारे साहित्य खरेदी करणेत येऊ नये, असे ठरले.**

**तसेच सदरहू बसस्थानकावरील संस्थान निवासस्थानाचे नामांकरण करणेसाठी स्थानिक विश्वस्तांनी पुढील सभेमध्ये नाव सुचित करावे अशा सुचना करणेत आल्या.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, साईप्रसाद निवासस्थान)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०५** **श्री साईबाबा संस्थानच्या जाहिराती महत्वाच्या वर्तमानपत्रात प्रसिध्दीस देणेबाबत.**

**प्रस्ताव-** **अधिनियम २००४ मधील तरतूद-** महाराष्ट्र शासनाने पुनर्घटीत केलेल्या श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) चे अधिनियमात "समितीची कर्तव्य व अधिकारी" या शिर्षकाखाली अधिनियिम नंबर १७ (१) मध्ये "राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधीन राहून संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, मंदिरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मिक विधी पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे, भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे आणि या अधिनियमान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालवावयाचा आहे, ती उद्दिष्टे साध्य करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे, ही समितीची कर्तव्य असतील." अशी तरतूद करण्यात आलेली आहे.

**व्यवस्थापन समितीचा ठराव क्रमांक–** मा.व्यवस्थापन मंडळाचे दिनांक ३०.०३.२०२२ चे सभेतील निर्णय क्रमांक १८६ व मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक १५.०९.२०१२ चे सभेतील निर्णय क्रमांक ७८६.

**प्रस्ताविक–** मा.व्यवस्थापन मंडळाचे दिनांक ३०.०३.२००२ चे सभेतील निर्णय क्रमाक १८६ अन्वये, "संस्थानबाबत स्थानिक सार्वजनिक सदभावना जोपासण्याच्या दृष्टीने संस्थानमार्फत देण्यात येणा-या जाहिरती या खाजगी एजन्सीमार्फत न देता पुर्वीचीच पध्दत चालू ठेवावी." असा निर्णय झालेला होता. त्यानुसार श्री साईबाबा संस्थानमार्फत प्रसिध्दीस देण्यात येणा-या जाहिराती वर्तमान पत्रांच्या स्थानिक प्रतिनिधींमार्फत व्यावसायीक (खाजगी) दराने प्रसिध्दीस देण्यत येत होत्या.

तथापि, श्री.संजय भास्कर काळे, कोपरगांव यांनी दिनांक०२.०७.२०१२ रोजीचे पत्रात, "श्री साईबाबा संस्थान शिर्डी सन २००४ मध्ये राज्य शासनाने अधिनियमाव्दारे आपल्या नियंत्रणात घेतले. शासनाच्या विधी व न्याय विभाग संस्थावर कारभार पहाण्यासाठी, कारभार चालवण्यासाठी विश्वस्त मंडळाची नियुक्ती करते. श्री साईबाबा संस्थान विविध वृत्तपत्रात आपल्या जाहिराती देत असते. सदरच्या जाहिरातीवर लक्षावधी रुपयांचा खर्च होतो. सदर जाहिराती या सरकारी दराने देणे संस्थानवर बंधणकारक आहे." असे कळविले होते. श्री.काळे यांनी दिलेले पत्राचे अनुषंगाने मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक १५.०९.२०१२ रोजीचे सभेत झालेल्या निर्णयानुसार श्री साईबाबा संस्थानच्या जाहिराती शासकीय दराने प्रसिध्दीसाठी देण्यात येतात.

शासकीय दराने जाहिरात प्रसिध्द करणेकामी पारित झालेल्या शासन निर्णय क्र.जाहिरात २००९/ प्र.क्र.१३७/ का-३४ मंत्रालय, मुंबई ३२ दिनांक ३१.०८.२००९ मधील काही महत्वाचे मुद्दे खालीलप्रमाणे आहे.

१) शासनाच्या कोणत्याही विभागांनी शासकीय जाहिराती जाहिरात अभिकरणांमार्फत (एजन्सीमार्फत) देऊ नयेत. शासनाच्या सर्व जाहिरतींचे वितरण शासनमान्य दराने माहिती व जनसंपर्क महासंचालनालयामार्फत चक्रीय पध्दतीने (रोटेशन) करणे सर्व विभागांवर बंधनकारक राहील. फक्त जाहिरात तयार करण्याकरिताच (क्रिएटीव्ही) अभिकरणांची (एजन्सीची) मदत घेता येईल. मात्र अशा अभिकरणांची यादी (एजन्सीचे पॅनल) माहिती व जनसंपर्क महासंचालनालयामार्फत तयार करण्यात यावे.

२) दिनांक १ मे, २००१ च्या शासन निर्णयाच्या जोडपत्र-अ मधील नियम क्र.६ अन्वये शासनाची विविध मंडळे, महामंडळे, जिल्हा परिषदा, महानगरपालिका, नगर परिषदा, शासन पुरस्कृत सहकारी संस्था, आदि स्वायत्त संस्थांना वर्गीकृत तसेच दर्शनी जाहिराती देण्यासंदर्भात शासनाच्या धोरणानुसार काटेकोरपणे कार्यवाही करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. त्याबाबत महासंचालक, माहिती व जनसंपर्क यांनी अमलबजावणी प्रक्रीया व नियमावली निश्चित करुन दिलेली आहे. तथापि सदर मंडळे, महामंडळे, स्वायत्त संस्था त्यांच्या वर्गीकृत तसेच दर्शनी जाहिराती देण्यासंदर्भात, शासनाच्या धोरणाची काटेकोर अंमलबजावणी करित नाहीत असे निदर्शनास आले आहे. म्हणून पून्हा निर्देश देण्यात येत आहेत की, मंडळे, महामंडळे, स्थानिक स्वराज्य संस्था, इत्यादी स्वायत्त संस्था यांनी त्यांच्या वर्गीकृत तसेच दर्शनी जाहिराती देताना शासकीय धोरणाची अंमलबजावणी काटेकोरपणे करावी व त्यांनी त्यांच्या जाहिराती शासनाच्या जाहिरात वितरण धोरणानुसारच देण्यात आल्या असल्याबाबत संबंधितांसमोर स्पष्ट करावे.

३) दिनांक १ मे २००१ च्या शासन निर्णयाच्या जोडपत्र-अ मधील नियम क्र.६ मधील वृत्तपत्रनिहाय प्रसिध्द होणा-या जाहिरातींची मुल्य मार्यादा खलीलप्रमाणे सुधारित करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

| अ.नं. | एका कामाचे मुल्य | जाहिरात वितरण करण्याचे अधिकार | जाहिरात प्रसिध्दीचे वृत्तपत्र |
|---|---|---|---|
| १ | जाहिरातीतील ज्या एका कामाचे मुल्य रु. २० लाखांपर्यंत आहे अशी जाहिरात | जिल्हा माहिती अधिकारी | एक 'क' वर्ग दैनिक व एक साप्ताहिक |
| २ | जाहिरातीतील ज्या एका कामाचे मुल्य रु. २० लाखाच्यावर ते ५५ लाखांपर्यंत आहे अशी जाहिरात | विभागीय माहिती उपसंचालक | एक 'ब' वर्ग दैनिक व एक साप्ताहिक |
| ३ | जाहिरातीतील ज्या एका कामाचे मुल्य रु. ५५ लाखापेक्षा अधिक आहे अशी जाहिरात | मुख्यालय | संबंधीत विभागातील 'अ' वर्ग दैनिकास व त्या विभागातील 'ब' व ज्या जिल्हयाचे काम असेल त्या जिल्हयातील एका 'क' वर्ग दैनिकास आळीपाळीने त्या वर्गातील वृत्तपत्रांचे सें.मी.चे प्रमाणे लक्षात घेऊन जाहिरातीचे वितरण करण्यात येईल. |

शासकीय दराने जाहिरात प्रसिध्दीसाठी देतांना वरीलप्रमाणे नियमाचे पालन करणे आवश्यक आहे. उपरोक्त नियमानुसार संस्थानच्या जाहिराती प्रसिध्दीसाठी देण्यात येतात.

तथापि, श्री साईबाबा संस्थानच्या माहिती व जनसंपर्क महासंचालनालयामार्फत प्रसिध्दीस देण्यात येणा-या जाहिराती टाइम्स ग्रुप, एक्सप्रेस ग्रुप, दै.लोकमत व दै.सकाळ आदि दैनिके प्रसिध्द करीत नसल्याने जाहिरातीस पुरवठादारांचा योग्य प्रतिसाद मिळत नसल्याने बहुतेक जाहिरातींचे रि-टेंडर करावे लागत असल्याचे संस्थानच्या विविध विभागांच्या विभाग प्रमुखांना मौखिक रित्या कळविले आहे.

**संस्थानच्या जाहिराती शासकीय दाराने प्रसिध्दीस देतांना वेळोवेळी आलेल्या अडचणीनुसार खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात आली आहे.**

१) संस्थानचे बरेचसे विभाग जाहिरातीतील ज्या एका कामाचे मुल्य रु. ५५ लाखापेक्षा कमी आहे, परंतु जाहिरातीला जास्त पुरवठादारांचा प्रतिसाद मिळणेसाठी सदरच्या जाहिराती विभागीय स्तरावरील 'ब' दर्जाच्या वर्तमानपत्रात प्रसिध्द न करता संबंधीत विभागाच्या मागणीनुसार राज्यस्तरावरील 'अ' दर्जाच्या वर्तमान पत्रात जाहिरात प्रसिध्द करणेस मागणी करतात याकरीता मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक १३.१२.२०१३ रोजीचे सभेतील निणर्य क्रमांक ९८० अन्वये यास कायमस्वरुपी मान्यता घेण्यात आलेली असून त्याप्रमाणे कार्यवाही चालू आहे.

२) श्री साईबाबा संस्थानच्या जाहिरात प्रसिध्द करणेबाबत मा.सहसंचालक (जाहिरात), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय मुंबई यांना माहिती व जनसंपर्क महासंचालनालय मुंबई यांचेमार्फत वितरीत करण्यात येणा-या संस्थानच्या 'अ' दर्जाच्या जाहिराती दै.टाइम्स ऑफ इंडीया, दै.इंडीयन एक्सप्रेस, दै.महाराष्ट्र टाइम्स, दै.लोकसत्ता, दै.सकाळ व दै.लोकमत आदि दैनिके शासकीय दराने प्रसिध्द करत नाही असे निदर्शनास आले आहे. तरी सदरच्या दैनिकांना श्री साईबाबा संस्थानच्या आपल्यामार्फत देण्यात येणा-या जाहिराती प्रसिध्द करणेबाबत योग्य ते आदेश व्हावेत किंवा सदरच्या जाहिराती दै.टाइम्स ऑफ इंडीया, दै.इंडीयन एक्सप्रेस, दै.महाराष्ट्र टाइम्स, दै.लोकसत्ता, दै.सकाळ व दै.लोकमत आदि दैनिकांना प्रसिध्दीसाठी न देता दै.हिंदुस्थान टाइम्स, दै.द हितवाद, दै.डि.एन.ए., दै.मिड-डे, दै.द फ्रि प्रेस जर्नल दै.दिव्यमराठी, दै.सामना, दै.पुढारी, दै.पुण्यनगरी, दै.प्रहार, दै.सार्वमत आदी दैनिकास प्रसिध्दीसाठी देण्यात याव्यात ही विनंती.असे पत्र दिलेले आहे.

३) तसेच श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) च्या प्रसिध्द करण्यात येणा-या जाहिरातींची माहिती पुरवठादारांना ई-मेलव्दारे पाठविणेबाबत संस्थानच्या सर्व विभागांना जा.न.एसएसएस/ पीआरओ/ ११८३/ २०१६ दिनांक ०२.०७.२०१६ रोजी आदेश पारित केलेला आहे.

जनसंपर्क विभागामार्फत संस्थानच्या प्रसिध्दीस दिलेल्या जाहिरात बीलापोटी वर्ष निहाय झालेला खर्च खालीलप्रमाणे.

| अ.नं. | सन | झालेला खर्च | दर |
|---|---|---|---|
| ०१ | २००९-२०१० | ५६,२१,४५६/- | व्यावसायीक दर (वर्तमान पत्राच्या प्रतिनिधिमार्फत) |
| ०२ | २०१०-२०११ | ४०,६४,६५१/- | व्यावसायीक दर (वर्तमान पत्राच्या प्रतिनिधिमार्फत) |
| ०३ | २०११-२०१२ | ३४,६४,७३५/- | व्यावसायीक दर (वर्तमान पत्राच्या प्रतिनिधिमार्फत) |
| ०४ | २०१२-२०१३ | २२,६३,७७३/- | माहे सप्टेंबर पर्यत व्यावसायीक दर , दिनांक २४.०९.१२ पासून शासकीय |
| ०५ | २०१३-२०१४ | २८,०७,९६५/- | शासकीय (महत्वाच्या जाहिराती मा.व्य. समितीचे मान्यतेने व्यावसायीक दराने) |
| ०६ | २०१४-२०१५ | ४०,२९,२८६/- | शासकीय (महत्वाच्या जाहिराती मा.व्य. समितीचे मान्यतेने व्यावसायीक दराने) |
| ०७ | २०१५-२०१६ | २८,९३,१६४/- | शासकीय (महत्वाच्या जाहिराती मा.व्य. समितीचे मान्यतेने व्यावसायीक दराने) |

**काही महत्वाचे वर्तमानपत्रातील जाहिरात प्रसिध्दीकामी लागु असलेले शासकीय दर व व्यावसायीक दरांचा तक्ता**

उपरोक्त शासकीय दर हे माहिती कार्यालयाकडून प्राप्त झालेल्या दरपत्रकातील असून व्यावसायीक दराबाबतची माहिती अंदाजे घेतलेली असून त्यात काही बदल असू शकतो.

| अ.नं. | वर्तमानपत्राचे नांव | आवृत्ती | शासकीय दर (चौ.सें.मी.) | व्यावसायीक दर (चौ.सें.मी.) अंदाजे |
|---|---|---|---|---|
| १ | टाइम्स ऑफ इंडीया | मुंबई | ९५ | ४७८५ |
| | | पुणे | ४५ | १९९५ |
| | | नागपूर | २३ | २९० |
| २ | इंडीयन एक्सप्रेस | मुंबई | २४ | १५८० |
| | | पुणे | ३० | ८०० |
| ३ | महाराष्ट्र टाईम्स | मुंबई | ५० | १३५० |
| ४ | लोकसत्ता | मुंबई | ४० | २८१० |
| | | पुणे | २२ | ३९० |
| | | अहमदनगर | १४ | १६० |
| ५ | सकाळ | मुबई | ३० | १९५ |
| | | पुणे | ६२ | १०४० |
| | | कोल्हापूर | ३३ | ३२५ |
| | | सातारा | २३ | ८२ |
| | | नाशिक | २८ | १२६ |
| | | औरंगाबाद | ३० | २९३ |
| | | नागपूर | २७ | १८२ |
| ६ | लोकमत | मुंबई | ३३ | ७५० |
| | | कोल्हापूर | २८ | ५०० |
| | | पुणे | ३६ | ९०० |
| | | सोलापूर | २३ | २३० |
| | | नाशिक | २७ | ३६५ |
| | | जळगांव | ३१ | ४१० |
| | | अहमदनगर | २३ | १३५ |
| | | औरंगाबाद | ४७ | ६६५ |
| | | अकोला | २८ | १८५ |
| | | नागपूर | ४० | ६६५ |
| ७ | दिव्य मराठी | औरंगाबाद | २५ | १२० |
| | | नाशिक | २४ | ११५ |
| | | जळगांव | २२ | १०५ |
| ८ | सामना | मुंबई | ३० | ३७० |
| | | पुणे | २४ | १०० |
| | | औरंगाबाद | १९ | १०० |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ९ | पुण्यनगरी | मुंबई | २२ | ३५० |
| | | पुणे | २५ | २०० |
| | | नाशिक | २७ | २५० |
| | | औरंगाबाद | ३० | ३२० |
| | | नागपूर | ३० | १८० |
| | | जळगांव | २२ | १८० |
| १० | पुढारी | मुंबई | ३३ | २७० |
| | | पुणे | ४२ | ३७० |
| | | कोल्हापूर | ३८ | ३७० |
| | | सातारा | २५ | १४० |
| | | अहमदनगर | १८ | ७० |
| ११ | नवभारत टाईम्स | मुंबई | ३१ | १००० |
| | | नागपूर | ३४ | १२२० |
| १२ | गांवकरी | नाशिक | २८ | ७५ |
| | | अहमदनगर | ८ | २० |
| १३ | सार्वमत | अहमदनगर | १७ | ८४ |
| १४ | देशदुत | नाशिक | २० | १०० |
| | | अहमदनगर | १९ | ८४ |
| | | जळगांव | २० | १०० |
| १५ | केसरी | अहमदनगर | १० | ७० |

तसेच याबाबत सिध्दीविनायक देवस्थान मुंबई यांचेकडे विचारणा केली असता सिध्दीविनायक देवस्थानचे उपकार्यकारी अधिकारी श्री.जाधव साहेब यांनी सिध्दीविनायक देवस्थानच्या प्रसिध्दीस देण्यात येणा-या जाहिराती शासकीय दराने प्रसिध्दीस देण्यात येत असल्याचे सांगितले.

**मागणी-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) च्या प्रसिध्द करावयाच्या जाहिराती महत्वाच्या वर्तमान पत्रात प्रसिध्द करणेबाबत.

**विभागाचा स्पष्ट अभिप्राय–**

१) श्री.संजय भास्कर काळे, कोपरगांव यांनी दिनांक०२.०७.२०१२ रोजीचे पत्रात, “श्री साईबाबा संस्थान शिर्डी सन २००४ मध्ये राज्य शासनाने अधिनियमाव्दारे आपल्या नियंत्रणात घेतले. शासनाच्या विधी व न्याय विभाग संस्थावर कारभार पहाण्यासाठी, कारभार चालवण्यासाठी विश्वस्त मंडळाची नियुक्ती करते. श्री साईबाबा संस्थान विविध वृत्तपत्रात आपल्या जाहिराती देत असते. सदरच्या जाहिरातीवर लक्षावधी रुपयांचा खर्च होतो. सदर जाहिराती या सरकारी दराने देणे संस्थानवर बंधणकारक आहे.” असे कळविले होते. श्री.काळे यांनी दिलेले पत्राचे अनुषंगाने मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक १५.०९.२०१२ रोजीचे सभेत झालेल्या निर्णयानुसार श्री साईबाबा संस्थानच्या जाहिराती शासकीय दराने प्रसिध्दीसाठी देण्यात येतात.

२) श्रीसाईबाबा संस्थानच्या प्रसिध्द करण्यात येणा-या ई-निविदा सुचना व इतर जाहिराती शासनाचे www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर तसेच संस्थानच्या www.sai.org.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येतात.

३) श्री साईबाबा संस्थानच्या माहिती व जनसंपर्क महासंचालनालयामार्फत प्रसिध्दीस देण्यात येणा-या जाहिराती दै.हिंदुस्थान टाइम्स, दै.फ्री प्रेस जनरल, दै.द.हितवाद, दै.सामना टाइम्स, दै.डि.एन.ए., दै.मिड-डे, दै.दिव्य मराठी, दै.सामना, दै.पुण्यनगरी, दै.पुढारी, दै.प्रहार, दै.संध्याकाळ, दै.संध्यानंद, दै.नवाकाळ, दै.आपला वार्ताहर आदि महत्वाची दैनिके प्रसिध्द करतात. मात्र श्री साईबाबा संस्थानच्या माहिती व जनसंपर्क महासंचालनालयामार्फत प्रसिध्दीस देण्यात येणा-या जाहिराती टाइम्स ग्रुप, एक्सप्रेस ग्रुप, दै.लोकमत व दै.सकाळ आदि दैनिके प्रसिध्द करीत नसल्याने जाहिरातीस पुरवठादारांचा योग्य प्रतिसाद मिळत नसल्याने बहुतेक जाहिरातींचे रि-टेंडर करावे लागत असल्याचे संस्थानच्या विविध विभागांच्या विभाग प्रमुखांनी मौखिक रित्या कळविले आहे.

४) याबाबत सिध्दीविनायक देवस्थान मुंबई यांचेकडे विचारणा केली असता सिध्दीविनायक देवस्थानचे उपकार्यकारी अधिकारी श्री.जाधव साहेब यांनी सिध्दीविनायक देवस्थानच्या प्रसिध्दीस देण्यात येणा-या जाहिराती शासकीय दराने प्रसिध्दीस देण्यात येत असल्याचे सांगितले.

५) श्री साईबाबा संस्थानच्या जाहिराती दिनांक २४.०९.२०१२ पासून शासकीय दराने प्रसिध्दीस देण्यास सुरुवात झाली. तथापि, संस्थानच्या विविध विभागांच्या काही महत्वाच्या जाहिराती संबंधीत विभागांच्या मागणीनुसार मा.व्यवस्थापन समितीचे मान्यतेने जाहिरात प्रसिध्द करण्यासाठी येणा-या खर्चास मान्यता घेवून वर्तमानपत्रांच्या स्थानिक प्रतिनिधींमार्फत व्यावसायीक (खाजगी) दराने आवश्यक असलेल्या वर्तमान पत्रामध्ये प्रसिध्दीसाठी देण्यात आलेल्या आहेत.

६) श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) च्या विविध विभागांसाठी मागील सुमारे १० वर्षात मालाचा पुरवठा करणा-या पुरवठादारांची माहिती संबंधीत विभागाने संकलीत करावी. तसेच संबंधीत मालाचा पुरवठा करणारे राज्यातील व देशातील पुरवठा दारांची यादी, ई-मेल संकलीत करुन जाहिरात प्रसिध्दीबाबत संबंधीतास ईमेल अथवा दुरध्वनीवरुन माहिती दिल्यास पुरवठादारांचा चांगला प्रतिसाद मिळेल असे वाटते.

तरी उपरोक्त प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.६१९** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा संस्थानच्या विविध जाहिराती शासकीय दराने दिल्या जात असल्यामुळे या जाहिराती ब दर्जाच्या वृत्तपत्रामध्ये प्रसिध्द होतात व त्यांना पुरवठादारांचा योग्य प्रतिसाद मिळत नाही. त्यामुळे बहुतेक जाहिराती फेरप्रसिध्द कराव्या लागत आहे व करावयाच्या कामासाठी जास्त कालावधी लागतो. सबब संस्थानच्या विविध जाहिराती देशपातळीवर प्रसिध्द झाल्यास, जास्तीत जास्त पुरवठाधारकांचा चांगला प्रतिसाद मिळून स्पर्धात्मक दर प्राप्तहातील, तसेच नामांकित/ दर्जेदार कंपन्यांच्या सेवा मिळतील, यासाठी यापुढे संस्थानच्या जाहिराती व्यावसायिक दराने देणेबाबत मागदर्शन/मान्यता घेणेकामी प्रस्ताव विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडे सादर करणेत यावा.** (कार्यवाही- जनसंपर्क अधिकारी)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०६** **मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक २६.०६.२०१४ चे निर्णयानुसार डॉ.कुमार यांनी निर्मिती केलेल्या श्री साईबाबांच्या समाधी स्थानाचे १० छायाचित्र अल्बम सर्वसामान्य साईभक्तांना सोडतीव्दारे देणेबाबत.**

**प्रस्ताव-** **अधिनियम २००४ मधील तरतूद-** महाराष्ट्र शासनाने पुनर्घटीत केलेल्या श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) चे अधिनियमात "समितीची कर्तव्य व अधिकारी" या शिर्षकाखाली अधिनियिम नंबर १७ (१) मध्ये "राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधीन राहून संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, मंदिरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मिक विधी पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे, भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे आणि या अधिनियमान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालवावयाचा आहे, ती उद्दिष्टे साध्य करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे, ही समितीची कर्तव्य असतील." अशी तरतूद करण्यात आलेली आहे.

**व्यवस्थापन समितीचा ठराव क्रमांक –** मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक २६.०६.२०१४ चे सभेतील निर्णय क्रमांक ५३७ व मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक २५.०९.२०१४ चे सभेतील निर्णय क्रमांक ८१८.

**प्रस्ताविक–** मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक २६.०६.२०१४ रोजीचे सभेत, "संस्थानला रुपये ५,००,०००/- मात्र किंवा त्यापेक्षा जास्त स्वरुपात देणगी देणा-या देणगीदार साईभक्तांना डॉ. कुमार यांनी निर्मिती केलेल्या श्री साईबाबांच्या समाधी स्थानाचे छायाचित्र अल्बम भेट म्हणून देण्यात यावेत व त्यांची नोंद ठेवणेत यावी. तसेच, त्यापैकी १० अल्बम सोडतीव्दारे सर्वसामान्य साईभक्तांना देण्यात यावे." असा निर्णय झालेला आहे. उपरोक्त निर्णयान्वये जनसंपर्क विभागाकडे असलेले १३४ अल्बमपैकी काही अल्बम देणगीदार साईभक्तांना देण्यात आले आहेत. मात्र संदर्भ क्र.२ अन्वये मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक २५.०९.२०१४ रोजीचे सभेत सोडतीव्दारे सर्वसामान्य साईभक्तांना १० अल्बम देणेबाबत विषय सादर केला होता परंतु सदर विषयावरील चर्चा त्यावेळी पुढे ढकलण्यात आली. उपरोक्त विषयाबाबतची कार्यवाही पुर्ण होणेसाठी १०

अल्बम सोडतीव्दारे सर्वसामान्य साईभक्तांना द्यावे लागणार आहे. याबाबत मा.कार्यकारी अधिकारी साहेब यांचेशी सदरचा विषय फेर सादर करणेबाबत चर्चा झालेली आहे.

श्री गुरुपौर्णिमा उत्सव-२०१६ निमित्ताने डॉ.कुमार यांनी निर्मिती केलेल्या श्री साईबाबांच्या समाधी स्थानाचे १० छायाचित्र अल्बम सर्वसामान्य साईभक्तांना सोडतीव्दारे देणेबाबत सदरच विषय सादर करण्यात आला होता. या कालावधीत सदरच्या विषयावर मा. व्यवस्थापन समितीचे सभेत चर्चा न झाल्याने अगामी येणा-या श्री पुण्यतिथी उत्सव-२०१६ उत्सवात सदरचे अल्बम देता येतील.

**मागणी-** डॉ.कुमार यांनी निर्मिती केलेल्या श्री साईबाबांच्या समाधी स्थानाचे १० छायाचित्र अल्बम सर्वसामान्य साईभक्तांना सोडतीव्दारे देणेबाबत.

**विभागाचा स्पष्ट अभिप्राय–** डॉ.कुमार यांनी निर्मिती केलेल्या श्री साईबाबांच्या समाधी स्थानाचे १० छायाचित्र अल्बम श्री पुण्यतिथी उत्सव-२०१६ चे मुख्य दिवशी सामान्य दर्शन रांगेतून काकड आरतीसाठी येणा-या पहिल्या १० साईभक्तांना मा. व्यवस्थापन समितीचे सदस्य/अधिकारी यांचे उपस्थित/ भेट म्हणून ( एका कुटूंबातील ०१ व्यक्तीस) देता येतील. यासाठी संरक्षण विभागाचे कर्मचा-या मार्फत श्री पुण्यतिथी उत्सव-२०१६ चे मुख्य दिवशी सामान्य दर्शन रांगेतून काकड आरतीसाठी येणा-या पहिल्या १० साईभक्तांची नावे घेणेबाबत संबंधीतांना कळविता येईल असे मत आहे.

तरी उपरोक्त प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.६२०** **यावर सविस्तर चर्चा होऊन, डॉ.कुमार यांनी निर्मिती केलेल्या श्री साईबाबांच्या समाधी स्थानाचे छायाचित्रांचे १० अल्बम सर्वसामान्य साईभक्तांना सोडतीव्दारे देणेबाबत पुर्वी झालेला निर्णय रद्द करणेत आला व सदरहू १० अल्बम संस्थानला जास्तीत जास्त देणगी दिलेल्या १० दानशुर साईभक्तांना देण्यात यावे, असे ठरले.** (कार्यवाही- जनसंपर्क अधिकारी)

---

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.०७** **साईभक्तांना मार्गदर्शनाकरिता संस्थानचे संकेतस्थळ www.sai.org.in ही वेबसाईट अद्ययावतीकरण व मोबाईल ॲप्लीकेशन विकसित करणेबाबत.**

**निर्णय क्र.६२१** विषयांकीत कामांसाठी दि.०१.०९.२०१६ रोजी शिर्डी विविध नामांकित कंपन्यांचे सादरीकरण ठेवणेत आलेले असल्यामुळे सदरहू विषय तुर्त स्थगित ठेवणेत आले. (कार्यवाही- माहिती तंत्रज्ञान विभागप्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.०८** **साईटेक प्रकल्पाअंतर्गत करावयाचे कॉग्नीझंट टॅक्नॉलॉजी, पुणे यांचे पेमेंटबाबत.**

**निर्णय क्र.६२२** साईटेक प्रणालाअंतर्गत कॉग्नीझंट टॅक्नॉलॉजी, पुणे यांनी आजतागायत केलेल्या कामाचे दि.०१/०९/२०१६ रोजी सादरीकरण ठेवणेत आलेले असल्यामुळे सदरहु विषय तुर्त स्थगित ठेवणेत आला.

(कार्यवाही- माहिती तंत्रज्ञान विभागप्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.०९** **साठा संपत आलेल्या संस्थान निर्मित सीडी व डिव्हीडीचे पुनर्निर्मिती विहित पध्दतीने ई- निविदा मागवून करणेस व त्याकामी येणा-या खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** **अधिनियम तरतुद–** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम २००४ कलम नं.१७ ठ मध्ये खालीलप्रमाणे तरतुद आहे.

"श्री साईबाबांचे जीवन त्यांचे कार्य, त्यांच्या लीला व त्यांची शिकवण याबाबतच्या उपयुक्त माहितीचा प्रचार –प्रसार करील आणि साहित्य ग्रंथालय चालवील व त्याचा विस्तार करील"

**प्रस्ताविक-** श्री साईबाबांच्या शिकवणूकीचा प्रचार प्रसार करण्याच्या उद्देशाने श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी चे वतीने श्री साईबाबा आरती- मराठी (ओडिओ, व्हिडीओ, डिव्हिडी- ०३ प्रकारात उपलब्ध आहेत.) व श्री साईचरित्रातील अध्याय पठण प्रकारात मराठी, तेलगू व तामिळ भाषेत ओडिओ डिव्हीडी साईभक्तांना किफायतशिर किंमतीला विक्री केल्या जातात.

मा. व्यवस्थापन समितीचे दि.१०.०१.२००८ चे सभेतील निर्णयानुसार सोनी डीएडीसी मॅन्युफॅक्चरिंग इंडिया लि. प्रा.लि., मुंबई यांचेकडून दरपत्रकाची मागणी करुन त्यांचे दरपत्रक मा. व्यवस्थापन समितीचे सभेत मान्य करण्यात येऊन सी.डींची निर्मिती करण्यात आली आहे.

संस्थानमार्फत ई निविदा पध्दत सुरु करण्यात आली असल्याने संस्थानला अनेक प्रकारचे नवीन निर्मितीधारक सोनी कंपनीपेक्षा कमी दरात सीडींची निर्मिती चांगल्या प्रकारे देवू शकतात त्यामुळे सोनी डीएडीसी मॅन्युपॅक्चरींग इंडिया प्रा.लि. मुंबई यांचेकडून सीडीची निर्मिती करुन घेण्यापेक्षा ई निविदा मागवाव्यात असा निर्णय मा. व्यवस्थापन समितीचे दि.०२.०४.२०१६ रोजीच्या सभेतील विषय नं. ३१ निर्णय क्र. २३० अन्वये मान्यता मिळालेली आहे.

तातडीचे परिपत्रक जा. नं. एसएसएस/वशी-०४/१७१५/२०१६ दि. ०२.०८.२०१६ अन्वये विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई यांचे दि२८.०७.२०१६ रोजीची अधिसूचना जारी केलेने श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ नुसार श्री साईबाबा संस्थान व्यवस्थापन समितीचे गठन करण्यात आलेले आहे त्यानुसार मा. उच्च न्यायालयाची मान्यता घेणेकामी दाखल केलेले सिव्हील अर्ज मागे (withdraw) घेणे आहे. पुनश्च नवनियुक्त मा.व्यवस्थापन समिती पुढे साठा संपत आलेल्या संस्थान निर्मित सीडी व डिव्हीडीचे पुनर्निर्मिती विहित पध्दतीने ई- निविदा मागवून करणेस व पुनर्निर्मिती कामी येणा-या खर्चास मान्यतेचा विषय मंजूरीसाठी सादर करणे आहे.

**प्रस्ताव:-** सर्व साधारण एक वर्ष पुरेल एवढया प्रतींची निर्मिती केली जाते.जाहिरात प्रसिध्द करणे, ई – निविदा मागविणे, प्राप्त ई– निविदा उघडणे याबाबतची कार्यवाही मा. व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णयानुसार करण्यात येते.

दि.३१.०७.२०१६ अखेर शिल्लक साठा व विक्री संख्या लक्षात घेता नवीन पुनरनिर्मितीकामी ओडिओ सीडी/ व्हिसीडी व डीव्हीडीचा सुधारित प्रस्ताव तपशिल खालील प्रमाणे.

| अ.नं. | तपशिल | सध्याचा शिल्लक साठा दिनांक ३१.०७.२०१६ | वार्षिक विक्री | नवीन निर्मिती संख्या | मागिल मंजूर दर (सर्व करांसह) | अंदाजे निर्मिती दर सर्व करांसह खर्च | अंदाजे खर्च एकूण रक्कम | संस्थान विक्री किंमत रुपये. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | गुरुपाठाचे अभंग ऑडीओ सी.डी.(दोन सी.डी.चा संच) | ०१ | ३००० | **३०००** | ३८.०५ | ४०/- | १,२०,०००/- | ५०/- |
| ०२ | साईबाबा ग्रेट संत ऑफ शिर्डी (सीडी रोम) (एक सीडीचा संच) | १६९७ | ३००० | **४०००** | २५.८९ | ४०/- | १,६०,०००/- | ५०/- |
| ०३ | श्री साईबाबा आरती व्हिसीडी (दोन सीडींचा संच) | १५६ | ६००० | **८०००** | ३८.३३ | ५०/- | ४,००,०००/- | ७५/- |
| ०४ | श्री साईबाबा आरती डिव्हिडी (एक सीडीचा संच) | ०२ | ९००० | **१००००** | ४८.०८ | ५५/- | ५,५५,०००/- | १००/- |
| ०५ | श्री साई सतचरित तेलगू एमपी३ (२ सी.डी.चा संच) | ६३ | ९००० | **१००००** | ६२.७० | ७०/- | ७,००,०००/- | ८०/- |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ०६ | श्री साई सच्चरित सार हिंदी दोहावली (३ सी.डी.चा संच) | २८६४ | ४००० | ४००० | ६४.८३ | ७०/- | २,८०,०००/- | ९०/- |
| ०७ | श्री साई मंदिरातील आरती एमपी३ (१ सीडीचा संच) | ३२९ | ९००० | १०००० | १९.३२ | २५/- | २,५०,०००/- | ३०/- |
| ०८ | श्री साई चरित्र तामिळ ऑडीओ एमपी३ (एक सीडीचा संच) | ०० | ९००० | १०००० | ३८.०५ | ४५/- | ४,५०,०००/- | ५०/- |
| | | | | | | एकूण रु. | **२९,१५,०००/-** | |

**विभागाची मागणी/ स्पष्ट अभिप्रायः-** प्रस्तावित छपाईकामी विहित पध्दतीने वृतपत्रात जाहिरात प्रसिध्द करुन, ई निविदा मागवून, निम्नतम दराने निर्मितीचा कार्यादेश देणेत येईल. याकामी अंदाजे रक्कम रुपये. २९,१५,०००/- मात्र खर्च अपेक्षित आहे. प्रस्तावास मा.व्यवस्थापन समितीचे सभेत मान्यता मिळालेनंतर, विहीत पध्दतीने ई- निविदा मागवून निर्मितीची कार्यवाही करण्यात येईल.

सन २०१६-१७ चे अंदाजपत्रकात सीडी निर्मितीसाठी रक्कम रुपये. २०,००,०००/- मात्रचा खर्चास तरतूद आहे परंतू प्रस्ताविक सिडी निर्मीतीकामी अंदाजे रुपये. १०,००,०००/- मात्रचा जादा खर्च अपेक्षीत आहे. सदर जादा अंदाजपत्रीय तरतूदीपेक्षा प्रस्ताविक सीडी निर्मीतीकामी खर्च रुपये. १०,००,०००/- मान्यता घ्यावी लागणार आहे. एक वर्ष पुरेल एवढया सिडी निर्मीतीकामी अंदाजे खर्च रु.२९,१५,०००/- (अक्षरी रुपये. एकोणतीस लाख पंधरा हजार मात्र.) चे खर्च येणार आहे.

अंदाजपत्रकातील तरतूद खर्च रुपये. २०,००,०००/- आहे + वाढीव खर्च रक्कम रुपये. १०,००,०००/- एकूण रुपये. ३०,००,०००/- उक्त कामासाठीचा निर्मीती खर्च करता येईल. सदर सीडीची विक्री केली जात असल्याने खर्चाची भरपाई विक्रीतून होत असते.

सबब प्रस्तावित सीडी निर्मितीकामी खालील बाबींवर निर्णय होणेकामी सदरचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे ठेवणेस मान्यतेसाठी सादर.

१) सिडी निर्मीतीकामी येणा-या अंदाजे रु.२९,१५,०००/- (अक्षरी रुपये एकोणतीस लाख पंधरा हजार) मात्रचे खर्चास मान्यता असावी.
२) सिडी निर्मीतीकामी सन २०१६-२०१७ साठीचा अंदाजपत्रकीय तरतुद वाढीव खर्च रक्कम रुपये.१०,००,०००/- करणेस मान्यता असावी. (अंदाजपत्रकीय तरतूद खर्च रुपये. २० लाख ऐवजी रुपये. ३० लाख करणेस)
३) जनसंपर्क कार्यालयाव्दारा वृतपत्रात जाहिरात प्रसिध्द करणेकामी येणा-या योग्य त्या खर्चास मान्यता असावी.
४) संस्थान संकेतस्थाळावर निविदा प्रसिध्द करणेस मान्यता असावी.
५) विहीत पध्दतीने ई – निविदा मागवून सीडी निर्मितीची कार्यवाही करणेस मान्यता असावी.

सबब प्रस्तावित सिडी पुर्ननिर्मीतीकामी विहित पध्दतीने ई- निविद मागवून व त्याकामी येणा-या खर्चास मान्यता मिळणेस व मा. व्यवस्थापन समितीचे सभेत निर्णयार्थ सादर करावयाच्या टिपणीवर स्वाक्षरी होणेस विनंती.

**निर्णय क्र.६२३** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेल्या संस्थान निर्मित सीडी व डिव्हीडींचा साठा संपत आलेला असल्याने त्यांची पुनर्निर्मिती करणेसाठी विहित पध्दतीने ई- निविदा मागविणेस व त्याकामी येणाऱ्या रु.२९,१५,०००/- मात्रचे खर्चास तसेच सीडी निर्मितीकामी सन २०१६-१७ साठीच्या अंदाजपत्रकीय तरतुदीमध्ये रु१०,००,०००/- मात्र वाढ करणेस मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, प्रकाशने विभाग)

---

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.१०** **कनकुरी साठवण तलाव येथील साठवण तलाव क्र.०१ व ०३ करीता नव्याने तयार करण्यात आलेल्या पंपरुमकरीता तसेच मे.महिंद्रा ॲण्ड महिंद्रा लि, नाशिक यांचेकडून देणगी स्वरुपात नव्याने तयार करण्यात आलेल्या साठवण तलावाचे पंपरुमकरीता केबल टाकणे कामाबाबत मा.त्रीसदस्य समितीने दि.१४-०६-२०१६ चे सभेत मान्य केलेल्या विषय नं.३४ निर्णय क्र.३५६ नुसार मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेणेबाबत अट रद्द होणेबाबत.**

**प्रस्ताव-** अधिनियम २००४ मधील तरतूद क्र.२१-१ (क) नुसार समितीकडून विश्वस्तव्यवस्था निधीचा नियोग पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही एक प्रयोजनासाठी करण्यात येईल :-

(क). मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन.

वरील अधिनियमास अनुसरुन खालीलप्रमाणे प्रस्ताव सादर करीत आहोत.

कनकुरी साठवण तलाव येथील साठवण तलाव क्र.०१ व ०३ करीता नव्याने तयार करण्यात आलेल्या पंपरुमकरीता तसेच मे.महिंद्रा ॲण्ड महिंद्रा लि., नाशिक यांचेकडून देणगी स्वरुपात नव्याने तयार करण्यात आलेल्या साठवण तलावाचे पंपरुमकरीता केबल टाकणे कामाबाबत मा.त्रीसदस्य समितीसमोर मान्यतेसाठी प्रस्ताव सादर करण्यात आला होता. हा प्रस्ताव व त्यावर झालेला निर्णय पुढीलप्रमाणे.

पाणी पुरवठा विभागामार्फत संस्थानचे तीनही साठवण तलावास कॅनव्हास प्रुफींग करणेत येत आहे. सदरचे काम करतेवेळी साठवण तलाव क्र.०१ व ०३ करीता नव्याने पंपरुम तयार करण्यात आलेले असून प्रत्येक पंपरुममध्ये १५ एच.पी.क्षमतेच्या इलेक्ट्रीक मोटारी बसविण्यात येणार आहे.

तसेच संस्थानचे मौजे कनकुरी येथील गट नं.१२१ मधील जागेत मे.महिंद्रा ॲण्ड महिंद्रा लि., नाशिक यांचेकडून देणगी स्वरुपात संस्थानकरीता नव्याने ३६ एम.एल.क्षमतेच्या साठवण तलावाची निर्मिती करुन देण्यात येत असून सदरच्या साठवण तलावाचे काम पुर्ण झाल्यानंतर त्याठिकाणच्या पंपरुममध्ये पंप बसविण्यात येणार आहे. याकरीता उपरोक्त दोन्ही ठिकाणच्या पंपरुमकरीता आर.सी.सी.ह्युम पाईपमधुन योग्य क्ष मतेच्या केबल टाकून मिळणेकरीता पाणी पुरवठा विभाग यांनी पत्रान्वये विद्युत विभागास कळविले आहे.

त्यानंतर दिनांक ०४-०५-२०१६ रोजी कनकुरी साठवण तलाव येथे समक्ष जाऊन पाहणी करुन सदरच्या कामाची मोजमापे घेतलेली आहेत. परंतु याकरीता आवश्यक असलेली केबल तसेच आर.सी.सी.ह्युम पाईप आपणाकडे नसल्याने सदरचे काम हे बाहेरील ठेकेदार यांचेकडुन करुन घ्यावे लागणार आहे. त्याकरीता कराव्या लागणा-या विद्युतीकरण कामाचा खर्च शासनमान्य CSR (सन २०१३-२०१४) प्रमाणे तयार केलेला असून त्याचा तपशील खालीलप्रमाणे :-

| Sr.No. | C.S.R. | DESCRIPTION | Qty. | Rate. Rs | Amount. Rs |
|---|---|---|---|---|---|
| 01) | 7-1-17 | Supplying, erecting & terminating PVC armoured cable 3½ core 25 sq mm aluminium conductor with continuous 5.48 sq mm (12 SWG) G.I. earth wire complete erected with glands & lugs, on wall/trusses/pole or laid in provided trench/ pipe as per specification no. CB-LT/AL | 400 Mtr. | 241.50 | 0,96,600.00 |
| 02) | 7-1-21 | Supplying, erecting & terminating PVC armoured cable 3½ core 95 sq mm aluminium conductor with continuous 8.35 sq mm (10 SWG) G.I. earth wire complete erected with glands & lugs, on wall/trusses/pole or laid in provided trench/ pipe as per specification no. CB-LT/AL | 1000 Mtr. | 618.45 | 6,18,450.00 |
| 03) | 7-7-3 | Supplying & erecting Flange type brass cable glands for 3½ core 25 sq mm for PVC armoured cable as per specification No. CB-GL | 10 Nos. | 78.75 | 0,00,787.50 |
| 04) | 7-7-7 | Supplying & erecting Flange type brass cable glands for 3½ core 95 sq mm for PVC armoured cable as per specification No. CB-GL | 20Nos. | 176.40 | 0,03,528.00 |
| 05) | 7-10-2 | Supplying & erecting crimping type aluminium lugs for cable 25 sq mm complete as per specification No. CBCL/AL | 40 Nos | 6.30 | 0,00,252.00 |
| 06) | 7-10-6 | Supplying & erecting crimping type aluminium lugs for cable 95 sq mm complete as per specification No. CBCL/AL | 80 Nos | 17.85 | 0,00,428.40 |
| 07) | Non DSR | Providing and construction (including excavation) brick masonry inspection cable chamber 600mm x 600 mm x 750mm internal side size with 75 mm thick RCC cover, filling screened sand and smooth internal plaster etc including watering, streaking joint on exposed faces, rocking at joint on exposed faces and watering complete and clearing the site by removing debris & making the site good. | 42 Nos. | 6,000.00 | 2,52,000.00 |
| 08) | Non DSR | Supplying and erecting Outdoor Stand Mounted Feeder Pillar for Street Light Panel with 63 Amp. TPN MCCB incomer and Four nos. of Copper Busbars,500V,100Amp for outgoing and provision for termination of Incoming minimum 25 sq.mm & outgoing minimum 25 & 16 sq.mm cables complete erected in min. 14 gauge CRCA sheet box with supporting angle, self lock, gasket ang slating top erected on CC foundation in an approved manner. | 01 No. | 30,000.00 | 0,30,000.00 |
| 09) | 7-6-7 | Supplying & laying (including excavation) 25 cm dia RCC Hume pipe of standard thickness at required depth up to 90 cms. below road / ground surface, for covering provided cable & necessary back filling with light ramming to make the road/ground surface as it was (Except bitumen carpet). | 800 Mtr. | 788.55 | 6,30,840.00 |
| 10) | 9-1-5 | Supply, Installation, Testing and commissioning of UL Certified / CPRI Tested Maintenance Free Earthing comprising of electrode of 17.2 mm diameter low Carbon Steel with 250 micron Molecular Copper Bonded Earthing Rod of Length 3m along with 25 kg Carbon Based environment friendly back fill Ground Enhancing compound required to fill up the excavated earth with required quantity as per specification no. EA-MOBI | 04 Nos. | 15,764.70 | 0,63,058.80 |
| 11) | 9-2-4 | Supplying and erecting Annealed bare copper wire of high purity of different size used for earthing on wall with necessary copper clamps fixed on wall / cable / conduit with screws in an approved manner. | 25 Kgs. | 930.30 | 0,23,257.50 |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 12) | Non DSR | Supplying and erecting Stand/Wall Mounted main distributions panel with 14 gauge CRCA sheet complete with powder coating, 50sq.mm. clip-on terminal for outgoing cable connection, required size of bus bar for incoming cable connection, incoming ang outgoing chamber with required size of bus bar, self locking, Voltmeter, Ampere meter, selector switch for voltmeter & Amp. meter, KWH meter erected on CC foundation. Containing the following items.<br>01). 250 Amp. 4 pole MCCB for incomer -01 no.<br>02). 63 Amp. 4 pole MCCB for outgoing -03 nos.<br>03). 32 Amp. 4 pole MCCB for outgoing -02 nos.<br>04). Automatic star/delta starter for 15 H.P. with ON/OFF indicator and Amp. Meter -02 nos.<br>05). Automatic star/delta starter for 10 H.P. with ON/OFF indicator and Amp. Meter -02 nos.<br>06). Indicator for main supply & every main switch | 03 Nos. | 145000.00 | 4,35,000.00 |
| 13) | 7-1-15 | Supplying, erecting & terminating PVC armoured cable 4 core 10 sq mm aluminium conductor with continuous 5.48sq.mm (12 SWG) G.I. earth wire complete erected with glands & lugs, on wall/trusses/pole or laid in provided trench/ pipe as per specification no. CB-LT/AL | 400 Mtr. | 179.55 | 0,71,820.00 |
| 14) | 7-10-2 | Supplying & erecting crimping type aluminium lugs for cable upto 16 sq mm complete as per specification No. CBCL/AL | 16 Nos | 6.30 | 0,00,100.80 |
| 15) | 8-3-14 | Providing & erecting 7 m high (clear height) galvanised OCTAGONAL pole with foundation bolts having bottom of 130 mm A/F, top 70 mm A/F, 4 poles 40 Amp. MCB for connection on provided foundation as per specification No.OHPL/OPL. | 12 Nos. | 13696.20 | 1,64,354.40 |
| 16) | 16-3-8 | Providing & casting of M- 20 grade reinforced cement concrete (RCC) foundation suitable for 6m to 8m high octagonal /conical G.I. pole considering the safe soil bearing capacity at site as 10 T/sq m at 1.5 m depth including supply of steel, concrete, excavation and fixing provided nut bolts with the help of template as per design in an approved manner. | 12 Nos. | 6319.95 | 0,75,839.40 |
| 17) | 2-8-19 | Supplying and erecting street light fitting suitable for 250W metal halide lamp complete with accessories on provided bracket as per specification no. FG-ODF/GSL | 12 Nos. | 4744.95 | 0,56,939.40 |
| 18) | 2-1-46 | Supplying and erecting Metal Halied lamp double ended 230V,250 W . | 12 Nos. | 1141.35 | 0,13,696.20 |
| | | | | **Total Rs.:-** | **25,37,952.00** |

उपरोक्तप्रमाणे कनकुरी साठवण तलाव येथील साठवण तलाव क्र.०१ व ०३ करीता नव्याने तयार करण्यात आलेल्या पंपरुमकरीता तसेच मे.महिंद्रा ॲण्ड महिंद्रा लि., नाशिक यांचेकडून देणगी स्वरुपात नव्याने तयार करण्यात आलेल्या साठवण तलावाचे पंपरुमकरीता आर.सी.सी.ह्युम पाईपमधून केबल टाकणेचे कामाकरीता अंदाजे रक्कम रुपये २५,३७,९५२/- (अक्षरी रुपये पंचवीस लाख सदोतीस हजार नऊशे बावन मात्र) इतका खर्च अपेक्षित आहे. सदरील खर्चास व बाहेरील विद्युत ठेकेदार यांचेकडून ई-निविदा मागविणेकामी वर्तमानपत्रात जाहिरात देऊन तसेच संस्थानचे वेबसाईटवर जाहिरात अपलोड करुन ई-निविदा मागविणेकरीता सदर प्रस्ताव मा.त्रीसदस्य समितीसमोर मान्यतेसाठी सादर करण्यात आलेला होता. त्यावर झालेला निर्णय पुढीलप्रमाणे.

निर्णय क्र.३५६ यावर सविस्तर चर्चा होऊन, कनकुरी साठवण तलाव येथील साठवण तलाव क्र.०१ व ०३ करीता नव्याने तयार करण्यात आलेल्या पंपरुमकरीता तसेच मे.महिंद्रा ॲण्ड महिंद्रा लि., नाशिक यांचेकडून देणगी स्वरुपात नव्याने तयार करण्यात आलेल्या साठवण तलावाचे पंपरुमकरीता आर.सी.सी.ह्युम पाईपमधून केबल टाकणेचे कामाकरीता प्रस्तावात नमूद केलेप्रमाणे साहित्य खरेदी करणेसाठी विविध पद्धतीने वर्तमानपत्रात व संस्थानचे संकेस्थळावर जाहिरात प्रसिद्ध करणेत येऊन, ई-निविदाची मागणी करणेस व त्याकामी येणा-या अंदाजे रु. २५,३७,९५२/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली. परंतू सदरहु काम विभागांतर्गत करुन घेणेत यावे

तसेच याकामी येणा-या खर्चास मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेणेत यावी व मा.खंडपीठाच्या आदेशाप्रमाणे पुढील कार्यवाही करणेत यावी असे ठरले.

परंतू आता दि.२८-०६-२०१६ रोजी मा.व्यवस्थापन समितीची नियुक्ती महाराष्ट्र शासनामार्फत झालेली असल्याने आता उच्च न्यायालयाची परवानगीची आवश्यकता लागणार नसल्याने कनकुरी साठवण तलाव येथील साठवण तलाव क्र.०१ व ०३ करीता नव्याने तयार करण्यात आलेल्या पंपरुमकरीता तसेच मे.महिंद्रा ॲण्ड महिंद्रा लि., नाशिक यांचेकडून देणगी स्वरुपात नव्याने तयार करण्यात आलेल्या साठवण तलावाचे पंपरुमकरीता आर.सी.सी.ह्युम पाईपमधून केबल टाकणेचे कामाकरीता झालेल्या निर्णयातील सदरहु काम विभागांतर्गत करुन घेणेची अट तसेच या प्रस्तावास मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची परवानगी घेणेबाबतची अट अशा दोन्ही अटी रद्द होणेस व सदर प्रस्तावास मान्यता मिळावी, ही विनंती.

**निर्णय क्र.६२४** **यावर सविस्तर चर्चा होऊन, कनकुरी साठवण तलाव येथील साठवण तलाव क्र.०१ व ०३ करीता नव्याने तयार करण्यात आलेल्या पंपरुमकरीता तसेच मे.महिंद्रा ॲण्ड महिंद्रा लि, नाशिक यांचेकडून देणगी स्वरुपात नव्याने तयार करण्यात आलेल्या साठवण तलावाचे पंपरुमकरीता केबल टाकणेच्या कामाबाबत मा.त्रीसदस्य समितीच्या दि.१४-०६-२०१६ रोजीचे सभेतील निर्णय क्र.३५६ मधील मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेणेबाबत अट रद्दकरणेत येऊन, पुढील कार्यवाही त्वरीत करणेत यावी, असे ठरले.** (कार्यवाही- विद्युत विभागप्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.११** **संस्थान संचलित श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालयामधील विद्यार्थिनींसाठी बससेवा सुरु करणेबाबत.**

**प्रस्ताव-** **अधिनियम-२००४ मधील तरतुद-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिडी अधिनियम, २००४ मधील कलम १७ (२) (झ) मध्ये सर्व साधारणपणे विश्वस्तव्यवस्थेची मालमत्ता व तिचे कामकाज यांचे योग्य प्रकारे व्यवस्थापन, देखभाल व प्रशासन करण्याच्या प्रयोजनांसाठी आवश्यक असतील अशा सर्व गोष्टी करील, असे नमुद आहे.

**प्रास्ताविक-** उपरोक्त विषयांस अनुसरुन, यापुर्वी मा.ना.श्री राधाकृष्ण विखे पाटील, विरोधी पक्ष नेतायांचेकडेसशिर्डी शहर आणि परिसरातील स्थानिक ग्रामस्थांनी /कर्मचा-यांनी विविध प्रश्नांबाबत मागण्या केलेल्या आहेत. पैकी, अ.नं.०२ ने श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालय मधिल मुलींसाठी बससेवा सुरु करणे बाबत मागणी केलेली आहे.

त्यानुसार, संस्थानचे श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालय मधील विद्यार्थीनीकरीता नवीन ०९ स्कुलबस खरेदी करणे किंवा स्कुलबस सुविधा पुरविण्याचे काम ट्रॅव्हलर कॉन्ट्रॅक्टर मार्फत आऊटसोर्सींग पध्दतीने (भाडोत्री बसेस) घेणे बाबतचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर करण्यात आला होता.

दि.१६/०२/२०१६ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय क्र.८६ नुसार, ज्या-ज्या गांवामध्ये श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालयातील मुलींसाठी बससेवा सुरु करावयाचे प्रस्तावीत आहे. त्या गावांमध्ये महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाची बस सुविधा नसलेबाबत महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाकडून लेखी माहिती घ्यावी व अशी बससेवा उपलब्ध नसलेने संस्थानची बससेवा सुरु करणे बाबत त्या ठिकाणच्या ग्रामपंचायतीचा ठराव घेण्यात यावा व त्यासह सविस्तर प्रस्ताव पुढील शैक्षणिक वर्ष सुरु करणेपुर्वी सभेपुढे फेरसादर करणेत यावा, असे ठरले.

उपरोक्त निर्णयानुसार इकडील जा.नं.एसएसएस/वाहन/६९५४/२०१६ दिनांक १७/०३/२०१६ रोजीचे पत्रान्वये, श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालय मधील मुलींसाठी महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाची बससेवा उपलब्ध नसलेचा ग्रामपंचायतीचा ठराव करणे बाबत नगर-मनमाडरोड वरील सावळीविहीर, निमगांव, निघोज, राहाता ही गावे वगळुन परिसरातील ०१) अस्तगांव, ०२) पिंपळस ३) साकुरी ४) नांदुर्खी खु. ५) नांदुर्खी बु. ६) डो-हाळे ७) को-हाळे ८) काकडी, ९) केलवड १०) मनेवाडी ११) वेस १२) वाकळी १३) कनकुरी १४) न.पा.वाडी १५) पिंपळवाडी १६) पुणतांबा १७) रुई/ कोहकी या ग्रामपंचायतींना पत्र देण्यात आले होते. त्यापैकी आजतागायत पुणतांबा, न.पा.वाडी व रुई या ग्रामपंचायतीचे ठराव प्राप्त झालेले आहे.

तसेच इकडील जा.नं.एसएसएस/वाहन/५२२/२०१६ दि.०६/०५/२०१६ अन्वये मा.आगार व्यवस्थापक, महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ, कोपरगांव आगार यांना उपरोक्तगावांमध्ये म.रा.प.महामंडळाची बससेवा बाबतची माहिति मिळणे कामी पत्र देण्यात आले होते. त्यानुसार आगार व्यवस्थापक, कोपरगांव यांनी त्यांचे जा.क्र.रा.प./ आ.व्य.का/ कोपर-३२६ दि.१०/०५/२०१६ अन्वये अस्तगांव, शिंगवे, पुणतांबा, सोनेवाडी या गावांमध्ये बससेवा सुरु असले बाबत कळविलेले आहेत. तसेच नांदुर्खी बु., नांदुर्खी खु., कनकुरी, डो-हाळे,को-हाळे, मनेवाडी, काकडी, साकुरी, पिंपळस, एकरुखे, पिंपळवाडी, रुई, कोहकी, न.पा.वाडी, वेस, वाळकी, केलवड या गांवामध्ये बससेवा नसलेबाबत कळविलेले आहे.

अखिल भारतीय विद्यार्थी परिषद, शिर्डी शहर यांनी दिनांक२७ ऑगष्ट, २०१६ चे निवेदनान्वये कनिष्ठ महाविद्यालयाकडील मुलींना बस सेवा उपलब्ध करुन देणेचे कळविलेले आहे.

**विभागाचा स्पष्ट अभिप्राय:-** श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालय यांनी सन-२०१६-१७ करीता स्कुलबस सुविधाकरीता गाव निहाय विद्यार्थीनी संख्या खालील प्रमाणे कळविलेले आहे.

| अ.नं. | गाव | संख्या | अ.नं. | गाव | संख्या | अ.नं. | गाव | संख्या |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | शिर्डी | २५२ | १० | पिंपळस | २ | १९ | सावळीविहीर खु. | १६ |
| २ | नांदुर्खी खु. | १५ | ११ | अस्तगांव | ५ | २० | निघोज | ३५ |
| ३ | नांदुर्खी बु. | २९ | १२ | पिंपळवाडी | ६० | २१ | निमगांव | ४३ |
| ४ | कनकुरी | १८ | १३ | बिरेगांव बन | ६ | २२ | सोनेवाडी | २ |
| ५ | डो-हाळे | ३६ | १४ | रुई | ३२ | २३ | न.पा.वाडी | ८ |
| ६ | को-हाळे | ७ | १५ | शिंगवे | २ | २४ | निमगांववाडी | १० |
| ७ | काकडी | १ | १६ | पुणतांबा | २ | २५ | निमशेवाडी | ७ |
| ८ | साकुरी | १७ | १७ | कोऱ्हकी | ४ | | **एकुण** | **६६६** |
| ९ | राहाता | १७ | १८ | सावळीविहीर बु. | ४० | | | |

**अ) संस्थानमार्फत,श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालयाच्या मुलींकरीता स्कुल बसेस सेवा द्यावयाची झाल्यास-**

१) सदरचे ज्युनिअर कॉलेज सकाळी १०.०० ते सायं.०५.०० या वेळेत असल्यामुळे सर्व मुलींना एकाच वेळेस शाळेमध्ये घेवुन यावे लागेल व परत घरी सोडावेलागेल. त्याकामी उपरोक्त मुलींची संख्या विचारात घेता शिर्डी व परिसरातील मुली बसचा वापर करणार नाही असे गृहीत धरुन नवीन ०६ बसेस (५४+२ सिटर) खरेदी करणे आवश्यक आहे. सदर कामी प्रति बस अंदाजे रु.२२,००,०००/- प्रमाणे एकुण बसेस करीता रु.१,३२,००,०००/- इतका खर्च येईल.

२) प्रति बसकरीता ०१ वाहन चालक व ०१ मतदनीस या प्रमाणे एकुण ०६ बसेस करीता ०६ वाहन चालक व ०६ मदतनीस कर्मचारी उपलब्ध करुन द्यावे लागतील, त्यानुसार या सेवेसाठी ०१ वाहन चालकाचे प्रति महा वेतन रु.२०,०००/- व मदतनीस कर्मचारी प्रतिमहा वेतन रु.१५,०००/- प्रमाणे ०६ बसेस करीता प्रतिमहा रु.२,१०,०००/- प्रमाणे रु.२५,२०,०००/- इतका वार्षिक वेतन खर्च अपेक्षीत आहे.

३) ०६ बसेस करीता प्रति दिन अंदाजे १८०कि.मी. अंतराकरीता ७० लिटर डिझेल X अंदाजे रु.५५/- प्रति लिटरप्रमाणे रु.३,८५०/- प्रति दिवस याप्रमाणे वार्षिक (२३० दिवसाकरीता) अंदाजे रु.८,८५,५००/- मात्र इंधन खर्च अपेक्षीत आहे.

४) ०६बसेसचे दुरुस्ती व देखभाल खर्च- प्रति बस रु.६०,०००/- प्रमाणे ०६ बसेस करीता रु.३,६०,०००/- खर्च अपेक्षीत आहे.

५) सर्व बसेसची किंमत व विद्याथीनी संख्या (५४+२) नुसार विमा करणे करीता अंदाजे प्रति बस फी रु.९०,०००/- X ६ प्रमाणे रु.५,४०,०००/- खर्च येतील.

६) RTO कार्यालयाचे प्रचलित नियमानुसार, इयत्ता दहावी पेक्षा पुढील वर्गाकरीता टॅक्ससाठी प्रति सिट रु.१९००/- प्रमाणे X ५४ सिट करीता रु.१,०२,६००/- प्रति बस प्रमाणे ६ बसेस करीता एकुण रक्कम रु.६,१५,६००/- खर्च येईल. याकरीता सदरच्या बसेस कनिष्ठ महाविद्यालयाचे नावावर रजिष्ट्रेशन कराव्या लागतील, याकामी कनिष्ठ महाविद्यालयाचे नोंदणी प्रमाणपत्र जोडणे आवश्यक राहिल.

उपरोक्त अ.नं.०१ ते ०६ करीता खालील प्रमाणे एकुण खर्च अपेक्षीत आहे.

| अ.नं. | तपशिल | भांडवली खर्च (रु.) | अंदाजे वार्षिक खर्च |
|---|---|---|---|
| ०१ | नवीन ०६ बसेस खरेदी खर्च | १,३२,००,०००.०० | २६,४०,०००.००<br>(२०% घसारा) |
| ०२ | कर्मचारी वेतन खर्च (वार्षिक) | --- | २५,२०,०००.०० |
| ०३ | इंधन खर्च (वार्षिक) | --- | ८,८५,५००.०० |
| ०४ | दुरुस्ती व देखभाल खर्च (वार्षिक) | --- | ३,६०,०००.०० |
| ०५ | विमा खर्च(वार्षिक) | --- | ५,४०,०००.०० |
| ०६ | RTO टॅक्स खर्च(वार्षिक) | --- | १,०२,६००.०० |
| | **एकुण अंदाजे खर्च** | **१,३२,००,०००.००** | **७०,४८,१००.००** |

**ब) भाडोत्री बसेस उपलब्ध करुन द्यावयाचे झाल्यास-**

सध्या प्रायोगिक तत्वावर श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालयातील मुलींना ने-आण करणे कामी स्कुलबस सुविधा पुरविण्या चे काम ट्रॅव्हलर कॉन्ट्रॅक्टर मार्फत आऊट सोर्सींग पध्दतीने (भाडोत्री बसेस)ई-निविदा काढुन देता येईल. सदर कामी प्रति दिनी (५२ सिटर) बसेससाठी प्रति बस / प्रति दिन रु.७,०००/- प्रमाणे शिर्डी

व्यतिरीक्त बाहेरगांवावरुन येणा-या मुलींसाठी ०६ बसेससाठी २३० शालेयदिवसांसाठी (प्रति वर्षी) अंदाजे एकुण रु.९६,६०,०००/- मात्रखर्च अपेक्षीत आहे.

**क) बस थांबे:-**

०१) **शिर्डी व नगर-मनमाड रस्त्यावरील गांवे** वगळुन इतर गावातील मुलींना बससेवा संस्थान मार्फत द्यावयाची असल्यास खालील प्रमाणे रुट / बस थांबे करावे लागतील.

**तक्ता क्रमांक ०१**

| अ.नं. | ठिकाण | जाणे+ येणे अंतर कि.मी. (आणणे + सोडणे) | संख्या | एकुण | प्रस्तावित बस शुल्कनुसार जमा होणारी अंदाजित रक्कम (०३X०४X२३० शालेय दिवस ) | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| **०१** | **०२** | **०३** | **०४** | **०५** | **०६** | **०७** |
| ०१ | पिंपळवाडी | १८+१८=३६ | ६० | | ५,९६,१६०/- | नपावाडी+ पुणतांबा+ शिंगवे येथील मुलींना पिंपळवाडी येथे बोलवावे लागेल. |
| | शिंगवे-२ + नपावाडी-८ + पुणतांबा-२ | | १२ | ७२ | | |
| ०२ | रुई | २१+२१=४२ | ३२ | | ३,०९,१२०/- | कोहकी येथील मुलांना दत्त मंदीर स्टॉप येथे बोलवावे लागेल. |
| | कोहकी (दत्त मंदिर) | २३+२३=४६ | ०४ | ३६ | ०,४२,३२०/- | |
| ०३ | नांदुर्खी बु. | २४+२४=४८ | २९ | | ३,२०,१६०/- | काकडी येथील ०१ मुलगी को-हाळे येथे बोलवावे लागेल. |
| | नांदुर्खी खु. | २६+२६=५६ | १५ | ५१ | १,९३,२००/- | |
| | को-हाळे | ३६+३६=७२ | ०७ | | १,१५,९२०/- | |
| ०४ | डो-हाळे | २४+२४=४८ | ३६ | | ३,९७,४४०/- | |
| | कनकुरी | १८+१८=३६ | १८ | ५४ | १,४९,०४०/- | |
| | | **एकुण** | **२१३** | **२१३** | **२१,२३,२६०/-** | |

०२) **शिर्डी, निमगांव व निघोज व्यतिरीक्त** इतर सर्व ठिकाणचे मुलींना संस्थान बस देणेचे असल्यास खालील प्रमाणे रुट / बस थांबे करावे लागतील.

**तक्ता क्रमांक ०२**

| अ.नं. | ठिकाणी | जाणे+ येणे अंतर कि.मी. (आणणे + सोडणे) | संख्या | एकुण | प्रस्तावित बस शुल्कनुसार जमा होणारी अंदाजित रक्कम (०३X०४X२३०शालेय दिवस ) | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| **०१** | **०२** | **०३** | **०४** | **०५** | **०६** | **०७** |
| ०१ | पिंपळवाडी | १८+१८=३६ | ६० | | ५,९६,१६०/- | नपावाडी+ पुणतांबा+ शिंगवे येथील मुलींना पिंपळवाडी येथे बोलवावे लागेल. |
| | शिंगवे-२+नपावाडी-८+ पुणतांबा-२ | | १२ | ७२ | | |
| ०२ | रुई | २१+२१=४२ | ३२ | | ३,०९,१२०/- | कोहकी येथील मुलांना दत्त मंदीर स्टॅप येथे बोलवावे लागेल. |
| | कोहकी (दत्त मंदिर) | २३+२३=४६ | ०४ | ३६ | ०,४२,३२०/- | |
| ०३ | सावळीविहीर खु. | १६+१६=३२ | ४० | | २,९४,४००/- | |
| | सावळीविहीर बु. | १७+१७=३४ | १६ | ५६ | १,२५,१२०/- | |
| ०४ | नांदुर्खी खु. | २६+२६=५६ | १५ | | १,९३,२००/- | काकडी येथील ०१ मुलगी को-हाळे येथे बोलवावे लागेल. |
| | नांदुर्खी बु. | २४+२४=४८ | २९ | | ३,२०,१६०/- | |
| | को-हाळे | ३६+३६=७२ | ०७ | ५१ | १,१५,९२०/- | |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ०५ | कनकुरी | १८+१८=३६ | १८ | | १,४९,०४०/- | |
| | डो-हाळे | २४+२४=४८ | ३६ | ५४ | ३,९७,४४०/- | |
| ०६ | राहाता | १९+१९=३८ | १७ | ४१ | १,४८,५८०/- | साकुरी येथील मुली नगर-मनमाड रोडवरुन घेता येतील व सोडता येतील. |
| | साकुरी | १७+१७=३४ | २४ | | १,८७,६८०/- | |
| | | **एकुण** | **३१०** | **३१०** | **२८,७९,१४०/-** | |

**०३)** कनिष्ठ महाविद्यालयाकडे सध्या **एकुण ६६६** मुली शिक्षण घेत असलेचे विद्यालयाकडुन कळविण्यात आलेले आहे. या सर्व मुलींना संस्थान मार्फत / भाडोत्री बस सेवा उपलब्ध करुन द्यावयाचे असल्यास **एकुण १३ (५२ सिटर) बसेस** लागतील त्यामुळे बसेस खरेदी व इतर अनुषंगीक खर्चात उपरोक्त अ / ब मधील खर्चाचे प्रमाणात त्यानुसार वाढ होईल.

**ड) मुलींकडून घ्यावयाचे फी बाबतः-**

महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ (एस.टी.) मधील प्रवाशांकडून सध्या एक रुपया प्रति कि.मी. पेक्षा भाडे आकारले जाते. तसेच प्रति तिकीट एक रुपया अधिभार घेण्यात येतो.

श्री साईबाबा संस्थानचे कनिष्ठ महाविद्यालयाकडील विद्यार्थीकरीता बससेवा उपलब्ध करुन दिल्यास येणारा खर्च विचारात घेता सवलतीच्या दरात उपरोक्त बस थांब्यानुसार व प्रत्यक्ष होणा-या प्रवासानुसार,प्रति कि.मी. एक रुपया (प्रति दिवसा प्रमाणे) एकुण शालेय २३० दिवसा करीता (वार्षिक) बस शुल्क वसुल करता येईल, असे मत आहे.

उपरोक्त प्रस्तावाचे अनुषंगाने, खाली नमुद केलेल्या बाबींवर निर्णय होणे आवश्यक आहे -

०१. श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालयातील मुलींसाठी संस्थान मार्फत बससेवा उपलब्ध करुन देणे अथवा भाडोत्री वाहनांमार्फत बससेवा उपलब्ध करुन देणे.

०२. परिच्छेद क मधील तक्ता क्रमांक १ अथवा तक्ता क्रमांक २ अथवा अ.नं. ०३ पैकी कोणत्या गावातील मुलींना बससेवा उपलब्ध करुन देणे.

०३. परिच्छेद ड प्रमाणे बस प्रवास शुल्क आकारणे.

उपरोक्त प्रस्तावावर निर्णय होणेस तसेच वर नमुद केलेप्रमाणे संस्थानमार्फत बससेवा उपलब्ध करुन द्यावयाची झाल्यास, बस खरेदीकामी किंवा भाडोत्री घेणेकामी ई-निविदा प्रक्रिया विहित पध्दतीने राबविणेस तसेच याकामी येणारे सर्वसमावेशक अनुषंगिक खर्चास मान्यता मिळणेकामी, सदरचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे विचारार्थ सादर.

**निर्णय क्र.६२५** **यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थान संचलित श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालयामधील विद्यार्थिनींसाठी बससेवा सुरु करावी, असा धोरणात्मक निर्णय समितीने घेतला. तसेच प्रायोगिक तत्वावर श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालयातील मुलींना ने-आण करणेकामी स्कुलबस सुविधा पुरविण्याचे काम ट्रॅव्हलर कॉन्ट्रॅक्टर मार्फत आऊट सोर्सिंग पध्दतीने (भाडोत्री बसेस) करणेत यावे. यासाठी विहीत पध्दतीने ई-निविदा मागविणेस व त्याकामी येणाऱ्या अनुशंगीक खर्चास मान्यता देण्यात आली. विद्यार्थिनींकडून महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ यांचे नियमाप्रमाणे शुल्क आकाराणेत यावे व यासाठी येणाऱ्या खर्चाची उर्वरित रक्कम संस्थानमार्फत अदा करणेत यावी, असे ठरले.**

**तसेच दरम्यानचे कालावधीमध्ये श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालयामधील विद्यार्थिनींसाठी महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ हे बस सेवा पुरविणेस तयार आहेत का? याचीही विचारणा करणेत यावी.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, वाहन विभाग/ प्र.प्राचार्य, कनिष्ठ महाविद्यालय)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१२** **ध्वनिक्षेपण विभागातील साऊंड सिस्टीम यंत्रणा अद्यावत करणेकामी Sound & Audio System Consultant ची नेमणूक करणेस व याकामी येणा-या खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** **अधिनियम २००४ मधील तरतुद:- ०१.** २१ (ग) भक्तांना मंदिरात देवतेच्या दर्शनासाठी व प्रार्थनेसाठी किंवा धार्मिक सेवा किंवा समारंभ करण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे. **०२.** महाराष्ट्र शासन अधिनियम नंबर १४/२००४ चे १७ (२) मधील (त्र) नुसार

**प्रास्ताविक:-** ध्वनिक्षेपण विभागामार्फत मंदिरामध्ये भुपाळी, श्रींच्या चारही आरत्या, विष्णू सहस्त्रनाम, मनाचे श्लोक, श्री साईनाथ स्तवनमंजिरी, साईमंत्र, श्री साई सच्चरित्र, गुरूपाठ इ. कार्यक्रम दैनंदिन प्रसारीत होत

असतात. सदर कार्यक्रमाचे ऑडीओ प्रसारण मंदिर व मंदिर परीसरात तसेच टाटास्काय DTH द्वारे तसेच संस्थानच्या "Live Darshan" वेबसाईटवर संपुर्ण देशात व परदेशात प्रसारीत केले जाते.

मंदिर परीसरातील व मुख्य ध्वनिकक्ष कंट्रोल रूम मधील ध्वनिक्षेपण विभागामार्फत कार्यरत असलेली Sound & Audio System हि सन-१९९५ साली कार्यान्वीत केलेली असून, सदर मशिनरी जवळपास २१ वर्षांची झालेली असून ती तांत्रीकदृष्टया कालबाह्य झालेली आहे. तसेच संस्थानचे विविध विभागातील उदा. दर्शन रांगेतील, मंदिर परीसरातील, प्रसादालय, हॉस्पीटले इ. ठिकाणांची Public Announsment system व त्यासाठी स्थापीत असलेली कंट्रोल रुम, सत्यनारायण हॉल मधील स्पिकर, साई अतिथीगृह येथील सभागृह व लेंडीबागेतील साईनिवास सभागृह येथील माईक सिस्टीम, द्वारावती इमारतीसमोरील बगीचातील म्युझिक सिस्टीम, शैक्षणिक संकुले, भक्तनिवास इ. ठिकाणाची Sound & Audio System व्यवस्था देखील नविन Digital तंत्रज्ञानाच्या आधारे अद्यावत करणे अत्यावश्यक आहे.

सध्याची कार्यरत व कालबाह्य असलेल्या यंत्रणेतील मशिनरींचे स्पेअर पार्ट्स सद्यस्थितीत बाजारामध्ये उपलब्ध होत नसल्याने नविन अद्यावत Digital तंत्रज्ञानाच्या आधारे Sound & Audio System अद्यावत होणे अत्यावश्यक आहे.

तसेच मंदिर परीसर व शिर्डी परीसरात कायमस्वरुपी Public Address System बाबत दि.०६.०२.२०१६ रोजीचे पत्रान्वये शताब्दी कक्ष विभागास कळविणेत आले आहे. तसेच याबाबत TCE यांना ई-मेलद्वारे इकडील विभागाचे कामकाजाचे Scope of Work बाबत विचारणा केली असता, त्यांनी त्यांचा अभिप्राय दि.११.०८.२०१६ रोजी कळविले आहे. सदर TCE यांचे ई-मेलचे अवलोकन करता, त्यांचे Scope मध्ये उपरोक्त नमुद केलेल्या ठिकाणाचे Sound & Audio System बाबत समावेश नसल्याने उपरोक्त नमुद केलेल्या ठिकाणी सद्यस्थितीत कार्यरत व तांत्रीक दृष्टया कालबाह्य झालेली Sound & Audio System श्रींचे महाशताब्दी महोत्सवाचे निमीत्ताने अद्यावत करणे अत्यावश्यक आहे.

त्यामुळे नविन Digital तंत्रज्ञानाच्या आधारे Sound & Audio System अद्यावत होणेकामी Sound & Audio क्षेत्रातील सल्लागाराची नेमणूक संस्थानचे विहीत पद्धतीने करणे आवश्यक असून Sound & Audio क्षेत्रातील सल्लागारचे कामकाजाचे स्वरुप Scope of Work पुढीलप्रमाणे आहे.

1. Current As-Is assessment of existing Sansthan Sound and Public Address System Setup of all Locations.
2. Study in detailed requirements and suggestion to sansthan for an entire new & latest technology in Sound and Public Address System, if necessary.
3. Checking & Marking of existing cable networks of Sound and Public Address System in details and create schematic layout diagram.
4. Determine zones and fixture of locations for deployment of speakers to improve voice clarity & quality.
5. Determine two way communication at various locations in case of Emergency for security & prompt response system during such a events.
6. Create DPR and present a power point presentation demo to Senior Management of SSST.
7. On the basis of review of presentation & demo, create a detail tender documents (RFP) Bid Formulation, for a New Sound and Public Address System as per sansthan rules (online etc.,).
8. After floating E-tender, attending pre-bid meet and preparing responses to pre-bid queries to proposed works in Bidder meeting in presence of SSST officials.
9. Submission of Technical bid evaluation report to SSST.
10. Evaluation of commercial bids.
11. After selection of final vendor, creating LOI & agreement for work schedule & AMC.
12. Technical verification and checking of goods supplied by successful bidder.
13. Monitoring & evaluation of each stage of the projects and till the final successful implementation of the project including technical discussion if required with the vendor or any issue raised during the project.

**14.** At each stages of project, the consultant should verify and approve the payment of the bill.

**15.** Consultant should submit a list of clients where similar work has been implemented and should be familiar with the best global brands of the industry.

**16.** Works completion Certificate must be issued to SSST to handovers the entire system to SSST by bidder after completion of the project.

उपरोक्त नमुद Scope of Work संस्थानचे तांत्रीक सल्लागार श्री विजय नायडू यांचेकडून तपासून घेण्यात आला असून, त्यांचा याकामी दि.११.०८.२०१६ रोजीचे ई-मेल अन्वये अभिप्राय घेण्यात आलेला आहे. उपरोक्त प्रस्तावित Scope of Work मध्ये नमुद केलेप्रमाणे मुद्दा क्र.क्र.११ व १६ नुसार नियुक्त केलेल्या अधिकृत सल्लागाराने कामकाज पुर्ण केलेनंतर त्यांना खालील तपशिलाप्रमाणे सदर कामाचे बील अदा करता येईल.

| Sr.No. | Activities Completed by Appointed Consultant | Consultant Payment Break-up in terms % |
|---|---|---|
| **01** | After selection of final vendor, creating LOI & agreement for work schedule & AMC. | 50 % (In Advance) |
| **02** | Works completion Certificate must be issued to SSST to handovers the entire system to SSST by bidder after completion of the project. | 50 % (After Submission of Work Completion Certificate to SSST) |

**मागणी:-** सन-२०१८ सालच्या श्रींचे महाशताब्दी महोत्सवाच्या निमीत्ताने होणारी श्री साई भक्तांची संभाव्य गर्दी व त्याकामीचे नियोजनासाठी TCE यांचे Scope चे व्यतिरीक्त प्रास्ताविकेत नमुद केलेप्रमाणे ध्वनिक्षेपण विभागाची सध्याची मंदिर, मंदिर परीसर, मुख्य ध्वनिकक्ष कंट्रोल रूम व संस्थानचे विविध विभागात सद्यस्थितीत कार्यरत व तांत्रीक दृष्टया कालबाह्य झालेली Sound & Audio System श्रींचे महाशताब्दी महोत्सवाचे निमीत्ताने अद्यावत करणे अत्यावश्यक आहे.

सदर नविन Digital तंत्रज्ञानाच्या आधारे Sound & Audio System अद्यावत होणेकामी Sound & Audio क्षेत्रातील सल्लागाराची नेमणूक करणे आवश्यक असून सदरकामीचा उपरोक्त SOW संस्थानचे माहिती तंत्रज्ञान व जनसंपर्क विभागामार्फत संस्थानचे अधिकृत संकेतस्थळावर व वर्तमान पत्रामध्ये जाहिरात प्रसिद्ध करुन कोटेशन मागवून त्यातील निम्नतम दरधारकास प्रास्ताविकेत नमुद केलेल्या Scope of Work नुसार Appointment of Consultant for Sound & Audio System कामी कार्यादेश देता येईल, असे नम्र मत आहे.

**संस्थान अधिनियम/ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशिर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान :-** तांत्रिक व आर्थिक

**विभागाचा अभिप्राय/स्पष्ट मत:-** उपरोक्त प्रास्ताविकेत व मागणीमध्ये नमुद केलेप्रमाणे सन-२०१८ सालच्या श्रींचे महाशताब्दी महोत्सवाच्या निमीत्ताने ध्वनिक्षेपण विभागाची सध्याची मंदिर, मंदिर परीसर, मुख्य ध्वनीकक्ष कंट्रोल रूम व संस्थानचे विविध विभागात सद्यस्थितीत कार्यरत व तांत्रीक दृष्टया कालबाह्य झालेली Sound & Audio System श्रींचे महाशताब्दी महोत्सवाचे निमीत्ताने अद्यावत करणे अत्यावश्यक आहे.

सदर नविन Digital तंत्रज्ञानाच्या आधारे Sound & Audio System अद्यावत होणेकामी Sound & Audio क्षेत्रातील सल्लागाराची नेमणूक करणेस व यासाठी येणा-या एकत्रीत अंदाजे रक्कम रुपये २,८०,०००/- (अक्षरी रक्कम रुपये दोन लाख ऐंशी हजार मात्र) चे खर्चास तसेच सल्लागारास त्यांचे कामाचे बील प्रास्ताविकेत नमुद केलेले Milestone नुसार कामकाज पुर्ण केलेनंतर अदा करणेस मान्यता मिळणेकामी सदरचा विषय मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सविनय सादर.

**निर्णय क्र.६२६** **यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली. परंतु नेमणूक करणेत येणाऱ्या सल्लागारास बिलाची ५०% रक्कम आगाऊ न देता त्यांचे काम पुर्ण झालेनंतर संपुर्ण रक्कम अदा करणेत यावी, असे ठरले.** (कार्यवाही- ध्वनिक्षेपण विभागप्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१३** **श्री साईबाबा संस्थानमध्ये सेवेकरीता सेवेकरी नेमणेबाबत.**

**प्रस्ताव-** दि.३१ जुलै २०१६ रोजी मा. अध्यक्ष महोदय, यांचे अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकितील चर्चेच्यावेळी श्री गजानन महाराज संस्थान, शेगांव यांचे धर्तीवर संस्थानमध्ये सेवेक-यांची नेमणूक करण्याबाबतचे संकल्पनेचा विचार करणेबाबत सुचना देण्यात आली आहे. तसेच दि. १६-०६-२०१६ रोजीचे मा. व्यवस्थापन समितीचे बैठकित मा. व्यवस्थापन समितीने श्री क्षेत्र गजानन महाराज देवस्थान, शेगांव धर्तीवर सेवेकरी उपक्रम राबविणेचा निर्णय घेतला आहे. तसे जाहिर आवाहनही विविध दैनिकांमधून करण्यात आलेले असल्याने संस्थानचे कामगार विभागामध्ये सेवेकरी म्हणून नाव नोंदविणेकरीता साईभक्त येत आहेत. सदर साईभक्तांची सेवेकरी म्हणून सेवा घेण्याकरीता त्यांची व्यक्तिगत माहीती असलेला फॉर्म भरुन त्यासोबत आवश्यक ते कागदपत्र जोडून फॉर्म संस्थानकडे सादर करणेस या साईभक्तांना सुचित करण्यात आले आहे. सदरचे फॉर्म सध्या कामगार विभागाकडून येणारे इच्छित सेवेक-यांना वाटप करण्यात येत आहे.

यापूर्वि तत्कालीन मा. अध्यक्ष यांचे आदेशानुसार गुरुवार दि. ३१.०१.२०१३ ते ०२.०२.२०१३ पर्यंत श्री गजानन महाराज देवस्थान, शेगांव यांच्या विविध उपक्रमांची माहिती घेणेसाठी डॉ. यशवंत माने, तत्कालीन उपकार्यकरी अधिकारी यांचे समवेत खालीलप्रमाणे अधिकारी, कार्यालय अधिक्षक व प्रतिनिधी गेले होते.

| अ.न | कर्मचा-याचे नाव | तत्कालीन विभाग | तत्कालीन हुद्दा |
|---|---|---|---|
| ०१ | श्री. बी. डी. साबळे | प्रशासन शाखा | प्रशासकिय अधिकरी |
| ०२ | डॉ. एम. के. पठारे | साईनाथ रुग्णालय | प्र. वैद्यकिय अधिक्षक |
| ०३ | श्री. एम. जे. यादव | जनसंपर्क कार्यालय | जनसंपर्क अधिकारी |
| ०४ | श्री . यु. पी. गोंदकर | श्री साईप्रसादालय विभाग | कार्यालय अधिक्षक |
| ०५ | श्री. एस.एम. जोरी | बांधकाम विभाग | शाखा अभियंता |
| ०६ | श्री. व्ही. एम. शिवगजे | कनिष्ठ महावद्यालय | प्र. प्राचार्य |
| ०७ | श्री. एस.एम. पाटणी | संरक्षण विभाग | सुरक्षा निरक्षक |
| ०८ | श्री. एन. पी .निकम | आरोग्य विभाग | वरिष्ठ लिपीक |
| ०९ | श्री. पी.के. कोते | कामगार विभाग | वरिष्ठ लिपीक |
| १०. | श्री. के. पी. सदाफळ | साईबाबा भक्तनिवासस्थान | लिपीक – टंकलेखक |
| ११. | श्री. टी . आर. पवार | ध्वनिक्षेपण विभाग | मदतनिस |

त्यावेळी सदर कर्मचा-यांनी श्री क्षेत्र गजानन महाराज देवस्थानाच्या कामकाजाच्या पध्दतीची माहिती घेतली. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

**सेवेकरी / सेवाधारी**

श्री गजानन महाराज देवस्थान शेगाव या ठिकाणी संस्थानचे दैनंदिन कामकाज पाहाणेसाठी माहीती अधिकारी, कर्मचारी नियुक्त केलेले नाहीत. त्याऐवजी श्रध्दा, भक्ती व सेवेच्या माध्यमातून सेवेकरी / सेवाधारी यांचेव्दारे संस्थानचे दैनंदिन कामकाज पाहिले जाते. श्री गजानन महाराज असल्यापासून ही सेवेकरी / सेवाधारी परंपरा अखंडपणे चालू आहे ही परंपरा हेच या संस्थानचे वैशिष्ठ आहे. हे सेवेकरी भक्तांना दैवत मानतात व त्यांना विनम्र सेवा देतात.

**सेवेकरी – निवड पध्दती**

बुलढाणा व अकोला जिल्हातील व शेगाव जवळच्या १०० किलो मिटर आतील तीनशे खेडयातील शेतक-यांच्या मुलांची या कामी निवड केली जाते निवड करतांना एका खेडयातून साधारणपणे २५ व्यक्तींना घेतले जाते. त्यांचा रहिवाशी दाखला व वर्तणुकीबाबत पोलीस पाटील यांचा दाखला घेण्यात येतो. त्याबाबतची माहिती खालीलप्रमाणे आहे.

| अ.नं | सेवा | तपशिल |
|---|---|---|
| ०१ | सेवेकरी संख्या | ७५०० |
| ०२ | सेवेचा कालावधी | महिन्यातून फक्त ०५ दिवस |
| ०३ | जादा गर्दी झाल्यास सेवेकरी कसे घेतात | आवश्यकतेनुसार सेवेकरी दुध्वनीव्दार बोलाविले जातात. |
| ०४ | सेवेक-यांना दिल्या जाणा-या सुविधा | सेवेला येताना स्वखर्चाने येतात व आल्यावर त्यांना येणेचे एस.टी. भाडे दिले जाते. जातांना देवस्थानचे गाडीचे सेवेक-यांना त्यांचे गावी पोहोच केले जाते. दोन ड्रेस, दोन वेळचा चहा, एक संस्थेच्या गाडीने प्रत्येक सेवेक-याच्या घरपोहोच केले जाते. |

| | | |
|---|---|---|
| ०५ | मदत | वैद्यकिय मदत<br>शैक्षणिक मदत<br>वार्षिक अन्नधान्य रुपाने मदत ः- दोन पोते गहू, २५ किलो तांदुळ, २५ किलो तुरदाळ २५ किलो हरबरा दाळ हे साहित्य प्रसादरुपाने संस्थेच्या गाडीने प्रत्येक सेवेक-याच्या घरपोहच केले जाते. |
| ०६. | कामाचा कालावधी वेळ | ८ ते १० तास सेवा . |
| ०७. | सुट्टया | आवश्यकतेनुसार सुट्टया दिल्या जातात. |
| ०८. | वैद्यकिय तपासणी | ६ महिन्यातून एकदा वैद्यकिय तपासणी केली जाते. |
| ०९. | शिक्षण | कुठलिही अट नाही. |
| १०. | व्यसन | विडी, तंबाखु, पान, सुपारी, गुटखा, दारु आदी कोणतेही व्यसन नको. |

**सेवाधारी – सेवाधारी निवड पध्दती**

श्री गजानन महाराज देवस्थान शेगाव यांचेकडे सेवाधारी निवड पध्दतीची माहिती खालीलप्रमाणे आहे.

| **अ.नं.** | **सेवा** | **तपशिल** |
|---|---|---|
| ०१ | सेवाधारी संख्या | ३००० |
| ०२ | सेवेचा कालावधी | पुर्ण महिन्याचा |
| ०३ | सेवेक-याना दिल्या जाणा-या सुविधा | सेवेला येताना सेवेकरी स्वखर्चाने येतात व आल्यावर त्यांना येणेचे एसटी भाडे दिले जाते. जातांना देवस्थानचे गाडीने सेवेक-यांना त्यांचे गावी पोहोच केले जाते. दोन ड्रेस दोन वेळचा चहा, एक वेळचा नाष्टा, देवस्थानचे रुममध्ये राहण्याची हॉलमध्ये सुविधा |
| ०४ | मदत | वैदयकिय मदत<br>शक्षणीक मदत |
| ०५ | कामाचा कालावधी वेळ | ८ ते १० तास व कामाचे स्वरुप बधून |
| ०६ | सुट्टया | आवश्यकते नुसार सुट्टया दिल्या जातात |
| ०७ | वैद्यकिय तपासणी | ६ महीन्यातून एकदा वैद्यकीय तपासणी केली जाते. |
| ०८ | मानधन | सेवाधारी यांचा सेवेचा कालावधी व कामाचे स्वरुप बघून रुपये ३०००/-, ४०००/-, ५०००/-, ६०००/-, ७०००/- प्रती महिना मानधनरुपी प्रसाद दिला जातो. |

सदर महितीचे आधारे श्री साईबाबा संस्थानकरीता सेवेकरी नेमणूक प्रस्ताव दि. ३०.०६.२०१३ रोजीचे सभेत सादर करण्यात आला होता परंतू त्यावेळी सदर विषयावरिल चर्चा पुढे ढकलणेत आली व सदर विषय पुन्हा सभेपूढे सादर करण्यात आलेला नाही.

आता श्री साईबाबा संस्थानकरीता सेवेकरी नेमणेकरीता नाव नोंदणी पुन्हा मा. अध्यक्ष साे यांनी आवाहन केलेले आहे. याबाबत दि. १८-०८-२०१६ रोजीचे गांवकरी, पुढारी, लोकमत केसरी तसेच दि. १९-०८-२०१६ रोजीचे प्रभात, पुण्यनगरी या वर्तमानपत्रामध्ये बातम्या प्रसिध्द झालेल्या आहेत. श्री साईबाबांचे दर्शनाकरीता शिर्डीमध्ये येणारे भाविकांची संख्या दिवसेंदिवस वाढत असल्याने संस्थानला नेहमीच मनुष्यबळ कमी पडत असते. त्यामुळे श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिरडी) येथे सदरचा उपक्रम सुरु केल्यास निश्चित उपयोग होईल. सदरचा उपक्रम सुरु करतांना सेवेकरी नेमणूकीबाबत खालील प्रमाणे कार्यवाही करता येईल असे मत आहे.

**१.** सेवेक-यांनी त्यांचे पूर्ण नाव, पत्ता, शिक्षण, अनुभव, आजार, संपर्कासाठीचे क्रमांक, जवळचे नातेवाईक पत्ता इत्यादी माहिती फॉर्म भरुन त्यासोबत मेडीकल फीटनेस सर्टिफीकेट, तहसिलदार यांनी दिलेला रहिवासी दाखला, गावाचे सरपंच/ पोलीस पाटील यांनी दिलेला वर्तनुकीबाबतचा दाखला, शैक्षणिक पात्रता कागदपत्रे, अनुभव, प्रमाणपत्रे इत्यादी कागदपत्रे जमा करुन घेता येईल. त्यामुळे निरोगी, निर्व्यसनी तसेच चारित्रवान सेवेकरी करण्यासाठी उपलब्ध होतील.

२. सेवेक-यांनी अर्ज सादर केल्यानंतर संस्थानचे प्रशासकिय अधिकारी (कामगार अधिकारी) यांचेमार्फत येणा-या सर्व अर्जांची पडताळणी करुन पात्र सेवेक-यांची निवड करुन त्यांची यादी तयार करता येईल.

३. प्रत्येक सहा महिन्यानंतर या कालावधीत येणारे नविन अर्जांची छाननी करुन जास्तीतजास्त साईभक्तांना सेवा देण्याची संधी उपलब्ध होईल अशाप्रकारे पात्र सेवेक-यांची अद्यावत यादी तयार करता येईल.

४. सेवेक-याला त्यांचे शैक्षणिक पात्रता, शाररीक क्षमता व अनुभव यानुसार संस्थानचे विविध विभागात सेवा करण्याची संधी दिली जाईल.

५. सेवेक-यांला प्रत्येक महिन्यातून कमीत कमी ०५ दिवस व जास्तीत जास्त फक्त १० दिवस सेवा देणे बंधनकारक असेल.

६. सेवेक-याचा डयुटीचा कालावधी ०८ तासांचा असेल त्यामध्ये सेवाक-याची शारिरीक क्षमता यांनुसार कामाचा कालावधी कमी जास्त करता येईल.

७. संस्थानचे श्री साईबाबा रुग्णालयामध्ये ६ महिन्यातून एकदा वैद्यकीय तपसणी करुन घेणे बंधनकारक राहिल असेल.

८. दैनंदिन सेवेच्या व्यतिरिक्त उत्सव कालावधीत किंवा जास्त गर्दीचे कालावधीत गरजेनुसार सेवेक-यांना दुध्वनी करुन बालावून घेतले जाईल.

९. सेवेक-यांना त्यांचे मागणीनुसार सुट्टया देण्यात येतील.

१०. सेवेक-यांना संस्थानमार्फत ओळखपत्र् देण्यात येईल. तसेच एक सेवा कार्ड देण्यात येईल त्यावर सेवेक-यांचे सेवेक-यांचे सेवेची दिनांक व त्यादिनांकास करण्यात येणारे सेवेचे ठिकाण व स्वरुप यांची नोंद ठेवता येईल सदरचे कार्ड सेवेच्या कालावधीत सेवाक-या सोबत असेल.

११. सेवेक-यांना संस्थानचे कामकाजात हस्तक्षेप करता येणार नाही व संस्थान नियमांचे पालन करावे लागेल.

१२. सेवेकरी यांचेकडून काही गैरवर्तन झाल्यास त्यास सेवेकरी म्हणून सेवा बंद करण्यात येईल.

१३. सेवेक-यांचा सफेद नेहरु शर्ट, कुर्ता तसेच टोपी अशा प्रकारचा गणवेश संस्थानचे वतीने दोन गणवेश देता येतील.

१४. सेवेक-याची सेवेच्या कालावधीदरम्यान निवासाची सोय साईधर्मशाळा इमारतीमध्ये, दोन वेळचे जेवणाची श्री साईप्रसादालयामध्ये तसेच दोन वेळ चहाची व्यवस्था कॅन्टीन विभागामार्फत विनामुल्य करता येईल.

तसेच सेवेच्या कालावधीमध्ये सेवेकरी आजारी पडल्यास त्यास संस्थानचे श्री साईनाथ रुग्णालय व आवश्यकता असल्यास श्री साईबाबा हॉस्पीटलमध्ये वैद्यकीय सुविधा विनामुल्य देता येईल.

१५. नेमूण दिलेल्या विभागात / ठिकाणी विनातक्रार सेवा करावी लागेल. ठरावीक ठिकाणीच सेवा मिळणेबाबतचा आग्रह सेवेकरी यांना धरता येणार नाही.

१६. सेवेक-यांना सेवा देतांना सेवेशी संबंधित विभागाचे विभागप्रमुख यांचे नियंत्रणाखाली काम करावे लागेल.

१७. प्रत्येक महिन्यात सेवेकरी यांना दिलेले ओळखपत्र् व सेवाकार्ड त्या महिन्यातील त्यांची डयुटी संपल्यानंतर जमा करावे लागेल व पुन्हामहिन्यात डयुटीवर आल्यानंतर सदर सेवेक-यास जमा केलेले ओळखपत्र व सेवाकार्ड पुन्हा देण्यात येईल.

१८. सेवेक-यांस येण्याजाण्याचे खर्चापोटी व मानधन म्हणून प्रतिमाह १०० रुपये देता येईल. परंतू मानधन प्राप्त करणेसाठी किमान त्या महिन्यात ०५ दिवस सेवा देणे आवश्यक राहिल.

१९. सेवेक-यांस अर्जाची पडताळणी, सेवेक-यांची नेमणूक, सेवेक-यांना दयावयाचे गणवेश व ओळखपत्र, सेवा कार्ड, सेवेक-यांचे संबधी इतर कार्यालयीन कामकाज करणेकरीता लिपीक संवर्गातील कर्मचा-याची नेमणूक आस्थापना विभागामार्फत करता येईल.

तरी उपरोक्त प्रस्तावावर चर्चा होऊन निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.६२७** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा संस्थानमध्ये सेवेकरीता सेवेकरी नेमणेसाठी प्रस्तावामध्ये नमुद केलेप्रमाणे कार्यवाही करणेस मान्यता देण्यात आली.**

**तसेच समिती सदस्यांनी शेगाव येथे भेट देऊन, तेथील सेवेकऱ्यांच्या बाबतीतील पहाणी करावी, असे ठरले.** (कार्यवाही- कामगार अधिकारी)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१४** **श्री साईबाबा संस्थान कंत्राटी कर्मचाऱ्यांना समान कामासाठी समान वेतन व शासनाने जाहिर केलेला महागाई भत्ता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** मा.खा.श्री सदाशिव लोखंडे, लोकसभा सदस्य सो यांचे पत्र इकडील कार्यालयास प्राप्त झाले असून,सदर पत्रात त्यांनी आपणास विनती करण्यात येते की, श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था,शिर्डी येथे २६०३ कर्मचारी हे

गेल्या १२ ते १५ वर्षापासून कंत्राटी कामगार म्हणून काम करीत आहेत. शिर्डी देवस्थानातील कंत्राटी पध्दतीने काम करणा-या कर्मचा-यांना समान कामासाठी समान वेतन व शासनाने जाहिर केलेला महागाई भत्ता हा आपल्या महाराष्ट्र शासन परिपत्रक क्र.सीएएल-०३/२०१४/प्र.क्र.०९/कामगार-१० मंत्रालय,मुंबई-३२ दि.१०.०६.२०१६ नुसार संस्थानने अदयाप दिलेला नाही. या बाबत मा.राज्यपाल श्री .विदयासागर राव साहेब यांना कर्मचा-यांच्या शिष्टमंडळासह निवेदन दिलेले होते. तसेच मा.मुख्यमंत्री श्रीयुत देवेंद्रजी फडणवीस साहेब यांच्याकडे कर्मचा-यांच्या शिष्टमंडळासह तीन ते चार वेळा भेट घेवून निवेदन देवून चर्चा केलेली आहे तसेच मा.ना.श्री रणजित पाटील साहेब,मा.ना.सुधिर मनगुंटीवार साहेब, तसेच प्रधान सचिव साहेब यांच्याशी अनेक वेळा निवेदन देवून, प्रत्यक्ष भेटून चर्चा केलेली आहे. परंतू शिर्डी संस्थान कंत्राटी कर्मचा-यांना अदयापपर्यंत समान कामासाठी समान वेतन व शासनाने जाहिर केलेला महागाई भत्ता मिळालेली नाही.

यासाठी शिर्डी संस्थानच्या कंत्राटी कर्मचा-यांनी दि.२८/१० ते ३०/१०/२०१५ पर्यंत शिर्डी येथे उपोषण केले होते. तदनंतर मी स्वत: हा सदर प्रश्न मार्गी लावण्यासाइी व कर्मचा-यांना न्याय मिळण्यासाइी दि.०८.०२.२०१६ ते ०९.०२.२०१६ पर्यंत सर्व कंत्राटी कर्मचा-यांसह आझाद मैदान ,मुंबई येथे उपोषण केले होते. तदनंतर मा.मुख्यमंत्री साहेब यांचेशी चर्चा केल्या नंतर सदरचा प्रश्न लवकरात लवकर मार्गी लावण्याचे आश्वासन मुख्यमंत्री महोदयांनी दिले होते. परंतू अदयापपर्यंत शिर्डी कंत्राटी समान कामासाठी समान वेतन व शासनाने जाहिर केलेला महागाई भत्ता मिळालेला नाही.

शिर्डी कंत्राटी कर्मचा-यांना समान कामासाठी समान वेतन व महागाई भत्ता देण्याबाबत मा.कामगार आयुक्त यांच्याशीही मी स्वत: चर्चा केलेली आहे. तेही याप्रश्नी सकारात्मक निर्णय घेण्यास तयार आहेत.

मा.मुख्यमंत्री श्री देवेंद्रजी फडणवीस साहेब यांनी मागील महिन्यात असे आश्वासन दिले होते की, लवकरच संस्थानच्या विश्वस्तांची निवड होणार आहे. तदनंर सदरच्या प्रश्नावर विश्वस्तच निर्णय घेण्यास सक्षम राहतील व सदर प्रश्नाबाबत तेच निर्णय घेतील.

आज दि.२८.०८.२०१६ रोजी कर्मचा-यांचे प्रतिनिधींनी माझी भेट घेवून मला पुन्हा सोबतचे निवेदन दिले असून, त्यांनी त्यात नमूद केलेले आहे की, दि.३०.०९.२०१६ पर्यंत वरील प्रश्नाबाबत विश्वस्तांनी निर्णय न घेतल्यास आम्ही दि.०१.१०.२०१६ पासून आम्ही संस्थानच्या कार्यालयासमोर आमरण उपोषण करणार आहोत. त्यात सर्व कंत्राटी कर्मचारी सहभागी होणार आहेत.

तरी आपणांस विनंती करण्यात येते आहे की, मी सदरच्या प्रश्नासाठी गेल्या १ वर्षापासून सर्व स्तरांवर पाठपुरावा व प्रयत्न करुनही सकारात्मक निर्णय झालेला नाही. म्हणून मलाही सर्व कंत्राटी कर्मचा-यांसोबत दि.३०.०९.२०१६ पर्यंत सदर प्रश्नी सकारात्मक निर्णय न झाल्यास दि.०१.१०.२०१६ पासून उपोषणास बसावे लागेल.

आपणांस विनंती की, शिर्डी संस्थान कंत्राटी कर्मचा-यांना समान कामासाठी समान वेतन व शासनाने जाहिर केलेला महागाई भत्ता देण्याबाबत दि.३०.०९.२०१६ पर्यंत निर्णय घ्यावा ,ही विनंती असे नमूद केलेले आहे.

सदर प्रकरणाबाबत वस्तूस्थिती खालील प्रमाणे आहे.-

०१) श्री साईबाबा संस्थान असंघटीत कंत्राटी कर्मचारी संघटना, शिर्डी यांचे समानकाम समान वेतना बाबत सहाय्यक कामगार आयुक्त, अहमदनगर यांचेकडील पत्र जा.क्र.सकाआ/नगर/किवेब/२३०३ दि.०६-०४-२०१५ अन्वये इकडील कार्यालयास पत्र प्राप्त झालेले होते. त्यात- त्यांनी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी येथील कंत्राटी कामगारांना कंत्राटी कामगार अधिनियम, १९७० अन्वये वेतन व महागाई भत्ता मिळणेबाबत श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी येथील कंत्राटी कामगार संघटनेच्या प्रितिनिधीत्व करणा-या कामगार संघटनेने कंत्राटी कामगार व नियमित कामगार हे समान स्वरूपाचे काम करीत असल्याने त्यांचे पगारामध्ये खुपच तफावत असल्याने कंत्राटी कामगार अधिनियमाच्या तरतुदीनुसार समान कामासाठी समान वेतन याचा अवलंब करण्यात येऊन त्यांना नियमित कामगाराप्रमाणे वेतन मिळवुन दयावे अशी मागणी करणेत आलेली होती.

०२) त्यावर सदर प्रकरणी चर्चा करून, मार्ग काढण्यासाठी दि.१०-०४-२०१५ रोजी सकाळी ११.३० वा.सहाय्यक कामगार आयुक्त ,अहमदनगर यांचे कार्यालयात बैठक आयोजित करणेत आलेली होती. सदर बैठकिस प्रशासकीय अधिकारी (कामगार विभाग) व प्र.कामगार अधिकारी उपस्थित होते. बैठकीदरम्यान सदर संघटनेचे दि.२३-०२-२०१५ रोजीचे पत्र संस्थानला प्राप्त झाले नसलेबाबत सांगितले. मा.सहाय्यक कामगार आयुक्त यांनी सदर पत्राची प्रत संस्थानला देणेबाबत संघटनेचे प्रतिनिधींना सांगितले. त्यांनतर सहाय्यक कामगार आयुक्त यांनी संस्थान प्रतिनिधी यांना तुम्ही तुमचे लेखी म्हणने दि.२४-०४-२०१५ रोजी सादर करावे असे निर्देश दिले होते.

त्यानुसार संस्थानमार्फत ॲडव्होकेट श्री.अशोकराव पाटील, अहमदनगर यांचे सल्ल्याप्रमाणे दि.२४-०४-२०१५ रोजी खालील नमूद प्रमाणे सहाय्यक कामगार आयुक्त,अहमदनगर यांना लेखी म्हणने समक्ष सादर करण्यात आले आहे.

उदयोग, उर्जा, कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील दि२८ सप्टेंबर-२०१० रोजीचे मुळ किमान वेतन दराबाबत अधिसुचनेस अनुसरून किमान वेतन अधिनियम, १९४८ अंतर्गत शॉप ॲन्ड कमर्शियल इस्टॅब्लीशमेंन्ट झोन नं.०३ या अनुसुचित उदयोगातील किमान वेतन दरास अनुसरून मुळवेतन व मा.कामगार आयुक्त, मुंबई यांचेकडील दि०५-०२-२०१५ रोजीचे नोटीफिकेशन नुसार स्पेशल अलौन्सप्रमाणे सध्या किमान वेतनदर कंत्राटी कामगारांना देण्यात येत आहे. तसेच महाराष्ट्र शासन यांचेकडुन किमान वेतन अधिनियम नुसार मुळ किमान वेतन दरात होणारी वाढ व कामगार आयुक्त, मुंबई यांचेकडुन वेळोवेळी स्पेशल अलौन्स दरामध्ये होणारी वाढ देणेत येवुन कंत्राटदारामार्फत् कामकरीत असलेले सर्व कंत्राटी अकुशल, कुशल व सुरक्षा कर्मचा-यांना नियमानुसार सुधारीत किमान वेतन दराप्रमाणे वेतन देणेत येते. त्यामुळे संस्थानमध्ये कंत्राटदारामार्फत काम करीत असलेल्या कंत्राटी कामगारांना महाराष्ट्र शासन, उदयोग, उर्जा व कामगार विभाग शासन परिपत्रक क्रमांक सीएलए-०३-२०१४ पत्र क्र.९५/ कामगार-१०, मंत्रालय,मुंबई यांचेकडील दि.१०.०६.२०१४ रोजीचे शासन परिपत्रकानुसार वेतन देणेचा प्रश्नच निर्माण होत नाही.

तसेच आम्ही असे नमुद करू ईच्छितो की, संस्थानच्या हजेरी पटावरील कायम कामगारांचे कामगाचे स्वरूप व कंत्राटी कामगारांचे कामाचे स्वरूप हे पुर्णतः भिन्न असुन, त्या कामाच्या स्वरूपात व पध्दतीत कुठेही समानता नाही. संस्थानने कंत्राटी कामगार कायदयाच्या तरतुदीचे पुर्णपणे पालन केलेले असुन कंत्राटी पध्दतीने केलेली सर्वच कामे हे नैमत्तीक व नियमित असतील असे नाही. ब-याच वेळा कंत्राटी कामगारांच्या संख्येत कामाच्या उपलब्धतेनुसार कमी जास्त बदल होतो.

मा.सर्वेच्च न्यायालयाने समान काम समान दाम या तत्वासाठी विविध नियम ठरवुन दिलेले आहे. त्यानुसार काम करण्यासाठी लागणारा अनुभव, शैक्षणिक पात्रता, कामाचे कौशल्य इत्यादी गोष्टी अतिशय महत्वाच्या ठरतात. कंत्राटी कामगार व नियमित कामगार वरील नियमामध्ये देखील कुठेही बसत नाही. त्यामुळे प्रस्तुत विवाद हा औद्योगिक विवाद होऊ शकणार नाही. सबब, श्री साईबाबा संस्थान असंघटीत कंत्राटी कर्मचारी संघटना शिर्डी यांचे दि.२३-०२-२०१५ चे पत्रान्वये करण्यात आलेली मागणी अमान्य करण्यात येऊन् सदर प्रकरण निकाली काढणेत यावे ही विनंती करण्यात आलेली होती.

०२) तदनंतर श्री साईबाबा संस्थान असंघटीत कंत्राटी कर्मचारी संघटना यांनी पुन्हा दि.२२.१०.२०१५ रोजी समान काम समान वेतन दयावे अन्यथा दि.२८.१०.२०१५ पासून शांततेच्या मार्गाने आमरण उपोषणास बसणार असले बाबत पत्र सादर केले होते. तसेच सदर उपोषणा बाबत महाराष्ट्र शासन यांनी पत्र क्र.संकीर्ण-२०१५/ ७३७/ प्र.क्र. १४४/ का.१६ विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुबई दि.१९.१०.२०१५ चे पत्राने कंत्राटी कर्मचारी उपोषणाबाबत आपल्या स्तरावर करण्यात आलेल्या कार्यवाहीबाबत सदयस्थितीबाबतचा अहवाल शासनास सादर करावा असे कळविलेले होते.

०३) तदनंतर श्री साईबाबा संस्थान असघटीत कंत्राटी कर्मचारी संघटना यांना इकडील पत्र क्र.जा.नं. एसएसएस/ वशी७ए/ ४१८०/२०१५ दि.२७.१०.२०१५ अन्वये समान काम समान वेतना बाबतचा विषय त्रिसदस्य समिती सभेसमोर देणेकामी सादर करणयात आलेला असून आपण उपोषणास बसू नये बाबत संस्थानकडून कळविणेत आलेले होते.

०४) तरीही दि.२८.१०.२०१५ पासून श्री साईबाबा संस्थान असंघटीत कंत्राटी कर्मचारी संघटना यांनी उपोषण सुरु केले होते.

०५) तदनंतर कंत्राटी कर्मचारी समान काम समान वेतना बाबत दि.२७.१०.२०१५ रोजीचे मा.त्रिसदस्य समिती सभेमध्ये प्रस्ताव सादर करण्यात आला होता.मा.त्रिसदस्य समिती सभेमध्ये त्यावर चर्चा होऊन त्याबाबत प्रस्ताव विधी व न्याय विभाग, मंत्रालय,मुंबई यांचेकडे पाठविणेबाबत निर्णय झाला होता.तसेच विधी व न्याय विभागाचे पुढील आदेश प्राप्त झाले नंतर मा.उच्च न्यायालय, खंडपीड,औरंगाबाद यांचे मान्यतेनुसार पुढील कार्यवाही करणेत येईल बाबत लेखी निर्णय झालेने इकडील जा.नं.एसएसएस/वशी७ए/४१८८/२०१५ दि.२८.१०.२०१५ अन्वये सदर संघटनेचे प्रतिनिधी यांना कळविणेत आलेले होते.

०६) त्यानंतर मा.त्रिसदस्य समिती सभेच्या निर्णय क्र.४१२ नुसार महाराष्ट्र शासन उदयोग उर्जा व कामगार विभाग यांचेकडील १०.०६.२०१४ रोजीच्या परिपत्रका नुसार संस्थान मध्ये कार्यरत असलेल्या कंत्राटी कामगारांना समान काम समान वेतन देणे बाबत विधी व न्याय विभाग यांचे अभिप्राय घेण्यात यावे असा ठराव मंजूर करण्यात आला होता.

त्यानुसार संस्थानकडून मा.प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, मंत्रालय मुंबई यांना जा.नं.एसएसएस / वशी7ए/ ४२५१/२०१५ रोजीच्या पत्रान्वये प्रस्ताव पाठविणेत विधी व न्याय विभाग यांचेकडून मार्गदर्शन मागविण्यात आलेले आहे. परंतु अदयापे पावेतो विधी व न्याय विभागाकडून संस्थानला लेखी अभिप्राय प्राप्त झालेला नाही.

०७) त्यानंतर रोजी मा.सहाय्यक कामगार आयुक्त, अहमदनगर यांचे कडील जा.क्र.सकाआ/ अ.नगर / किवेनि/१८७७/२०१६ दि.२२.०८.२०१६ रोजीचे पत्र इकडील कार्यालयास प्राप्त झाले होते. सदर पत्रात असंघटीत कामगार संघटना शिर्डी यांचे समान काम समान वेतनाचे पत्र प्राप्त झालेने समान काम समान वेतन बाबत चर्चेतून तोडगा काढण्यासाठी दि.२५.०८.२०१६ रोजी कामगार आयुक्त कार्यालयात बैठक आयोजित केली असलेबाबत कळविलेने सदर बैठकीकामी उप कार्यकारी अधिकारी व पूर.कामगार अधिकारी हे उपस्थित होते. सदर बैठकित कंत्राटी कामगार यांना समान काम समान वेतन देणे बाबतचा शासनास पाठविलेल्या प्रस्तावावर संस्थान तर्फे पाठपुरावा करणेत यावा असे त्यांनी सूचना दिलेल्या आहे.

०८) त्यानुसार कंत्राटदारा मार्फत श्री साईबाबा संस्थानला पुरवि णेत येणा-या अकुशल, कुशल व सुरक्षा कंत्राटी कामगारांना सदर परिपत्रकान्वये वेतन देणे संदर्भात लेखी अभीप्राय मिळणेस विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई यांना फेर पत्र देण्यात येत आहे त्याबाबत कार्यवाही चालू आहे.

तरी लोकसभा सदस्य, मा.खा.श्री. सदाशिव लोखंडे यांचे दि.२८.०८.२०१६ रोजीचे पत्रावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.६२८** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा संस्थान कंत्राटी कर्मचाऱ्यांना समान कामासाठी समान वेतन व शासनाने जाहिर केलेला महागाई भत्ता मिळणेबाबतचा प्रस्ताव यापुर्वीच शासनास सादर केलेला असून शासन स्तरावर प्रलंबीत असल्यामुळे उपरोक्त विषय तुर्त स्थगित ठेवणेत यावा, असे ठरले.**

(कार्यवाही- कामगार अधिकारी)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१५** **मा.नगराध्यक्षा, शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांचे दि.२२.०८.२०१६ रोजीचे पत्रातील सहा मुद्यांबाबत**

**प्रस्ताव-** सौ.अनिताताई जगताप, नगराध्यक्षा तथा विश्वस्त यांनी दि.२२.०८.२०१६ रोजीचे पत्रातील श्री साईबाबा संस्थानच्या येणा-या सभेत खालील विषय घ्यावेत या बाबत खालील मुद्याप्रमाणे पव वजा सुचना केलेल्या आहेत.

१. **कंत्राटी कर्मचा-यांना संस्थान सेवेत नियमीत करणे-** याबाबतचा प्रस्ताव संस्थानचे कामगार विभागाकडून विधी व न्याय विभाग मंत्रालय मुंबई-३२ यांचेकडे पाठविलेला असून, सदरचा प्रस्ताव शासन स्तरावर प्रलंबीत आहे. शासनाकडून मंजुरी मिळालेनंतर पुढील कार्यवाही करणे उचित होईल.

२. **संपूर्ण शिर्डी शहरात सीसीटीव्ही कॅमेरे बसविणे-** याबाबत श्री साईबाबा महासमाधी शताब्दी सोहळा निमित्त डी.पी.आर.मध्ये संपूर्ण शिर्डी शहरासाठी सीसीटीव्ही कॅमेरे बसविणेचे प्रस्तावीत आहेत. त्यासाठी संस्थानमार्फत सीसीटीव्ही विभागाकडून कंन्सलटंट सल्लागार नेमणूकीबाबतची कार्यवाही चालू आहे.

३. **संपूर्ण शिर्डी शहराची साईबाबा संस्थान मार्फत साफसफाई करणे-** याबाबत मा.व्यवस्थापन समिती सभा दि.०२.०४.२०१६ रोजीचे सभेतील निर्णय क्र.२६० नुसार संस्थान आरोग्य विभागामार्फत मे.जय भवानी एन्टरप्राईजेस, लेबर व सिक्युरिटी कॉन्ट्रॅक्टर,कॅम्प-शिर्डी यांचेकडील शिर्डी नगरपंचायत हद्दीतील रस्ते साफ-सफाईचे कामासाठी ४० अकुशल कंत्राटी कर्मचारी प्रथम दि.०१.०४.२०१५ ते दि.३१.०३.२०१६ या कालावधीसाठी पुरविणेत आलेले होते. तदनंतर शिर्डी नगरपंचायत हद्दीतील नगर-मनमाड रोड,लक्ष्मीनगर ते साईआश्रम ०१ पर्यंत दोनही बाजू आणि पिंपळवाडी रोड, मनोजकुमार पथ, नगर-मनमाड रोड ते साईनाथ मंगल कार्यालय पर्यंत साफसफाई करणेकामी दि.०१.०४.२०१६ ते दि.३१.०३.२०१७ अखेर प्रतिदिनी ४० अकुशल कंत्राटी कर्मचारी मुदतवाढ देवून, शिर्डी नगरपंचायत यांना साफसफाईचे कामासाठी पुरविणेत आलेले आहेत.

४. **कंत्राटी कर्मचारी व त्यांचे कुटूंबीयांना कायम कर्मचाऱ्यांप्रमाणे मोफत आरोग्य सेवा देणे-** याबाबत संस्थानमार्फत संस्थानचे दोनही हॉस्पीटलकडे कंत्राटी कर्मचारी व त्यांचे कुटूंबीयांना मोफत आरोग्य सेवाआजतागायत देणेत येत आहे.

५. **साई समाधी शताब्दीकरीता येणा-या साईभक्तांच्या कम्युनिकेशनसाठी बीएसएनएल चे नीवन टॉवर संस्थानचे जागेत बसविणे-** याबाबत बीएसएनएल विभागाने साई समाधी शताब्दीकरीता साईभक्तांच्या कम्युनिकेशनसाठी नवीन टॉवर बसविणेबाबत डी.पी.आर.मध्ये प्रस्तावीत/ समाविष्ठ केलेले आहे.

६. **संतनगर आरक्षण क्रमांक ३९ चे आरक्षण रद्द करावे-** संनगर आरक्षण क्र.३९ बाबत मालमत्ता विभागाकडून सदर कार्यवाही चालू असून, सदरची बाब न्यायप्रविष्ठ आहे. याबाबत श्री कृष्णा विश्वनाथ वालझाडे, नायब तहसिलदार व श्री बाळासाहेब नाथा जाधव, मोजणीदार यांचेकडून पुर्तता करुन कार्यवाही करणेत येत आहे.

वरीलप्रमाणे अ.नं.०१ ते ०६ मुद्यां संदर्भात सौ.अनिताताई विजयराव जगताप,नगराध्यक्षा तथा विश्वस्त यांनी कळविलेप्रमाणे सदर विषय संस्थानचे व्यवस्थापन समितीचे सभेपुढे निर्णयार्थ् सादर.

**निर्णय क्र.६२९** **यावर सविस्तर चर्चा होऊन, मा.नगराध्यक्षा, शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांचे दि.२२.०८.२०१६ रोजीचे पत्रातील मुद्दयांचे व त्याबाबतीत संस्थानने केलेल्या कार्यवाहीचे अवलोकन करण्यात येऊन, त्यास मान्यता देण्यात आली. तसेच सदरहू पत्र दप्तरी दाखल करणेत यावे, असे ठरले.**

**तसेच शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांना जे ४० कंत्राटी कर्मचारी पुरविले जातात. त्यांचेवर शिर्डी नगरपंचायतीने पर्यवेक्षण करावे व सदरहु कर्मचा-यांच्या उपस्थितीबाबत शिर्डी नगरपंचायत,शिर्डी यांचेकडून मासीक लेखी अहवाल आल्यानंतरच सदरहु कर्मचारी पुरविणा-या ठेकेदाराचे बील अदा करणेत यावे. अशा सुचना केल्या.** (कार्यवाही- प्रशासकीय अधिकारी कक्ष/ कामगार अधिकारी)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१६** **मा.नगराध्यक्षा, शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांचे दि.२९.०८.२०१६ रोजीचे पत्रातील मागणीबाबत.**

**प्रस्ताव-** सौ.अनिताताई जगताप, नगराध्यक्षा तथा विश्वस्त यांनी दि.२९.०८.२०१६ रोजीचे पवात श्री साईबाबा संस्थानचे येणा-या सभेत राहाता तालुका भूमापन कार्यालयास शिर्डीतील भूसंपादनाच्या कामा करीता ई.टी.एस.मशीन इलेक्ट्रॉनीक टोटल स्टेशन तसेच उपअधिक्षक, भुमिअभिलेख या पदाचे एक अधिकारी पद शासनाने प्रतिनियुक्तीवर साईबाबा संस्थानकडे देण्यात यावे. तसेच मोजणीसाठी पाच कर्मचा-यांची नियुक्ती करावी. यामुळे शिर्डीतील रस्त्यांचे भुसंपादनाचे काम व श्री साईबाबा संस्थानच्या अभिलेखाचे काम जलदगतीने करणे शक्य होईल. तसेच शिर्डी नगरपंचायतीस अतिक्रमण काढणेसाठी एक गाडी दयावी असे नमूद केले आहे.

वरील नमूद केलेल्या पवानुसार संस्थानचे मालमत्ता विभागाकडे श्री कृष्णा विश्वनाथ वालझाडे, नायब तहसिलदार व श्री बाळासाहेब नाथा जाधव, मोजणीदार यांना एकवित मानधनावर यांची नेमणूक केलेली आहे त्यांचेमार्फत संस्थानचे मालमत्ते संबंधीत विविध कामे करुन घेणेत येत आहेत.

तरी सौ.अनिताताई विजयराव जगताप, नगराध्यक्षा तथा विश्वस्त, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांनी श्री साईबाबा संस्थानचे सभेमध्ये सदरचा विषय घेणे बाबत विनंती केलेली आहे. तरी सदरचा विषय मा.व्यवस्थापन समितीचे सभेमध्ये निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.६३०** **यावर सविस्तर चर्चा होऊन, मा.नगराध्यक्षा, शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांनी दि.२९.०८.२०१६ रोजीचे पत्रान्वये प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे मागण्या केलेल्या आहेत, त्यापैकी विधी व न्याय विभाग, यांचे मान्यतेने शिर्डी, नगरपंचायत, शिर्डी यांना अतिक्रमण काढणेसाठी एक मोठे वाहन देणेबाबतची कार्यवाही करणेत यावी, असे ठरले.** (कार्यवाही- प्रशासकीय अधिकारी कक्ष/ प्र.अधिक्षक, वाहन विभाग)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१७** **जिल्हा सैनिक कार्यालय यांना सशस्त्र सेना ध्वजदिन निधी संकलनासाठी आर्थिक मदतीबाबत.**

**प्रस्ताव-** मा.जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय,अहमदनगर यांनी संदर्भांकीत पत्राने सशस्त्र सेना ध्वजदिन २०१५ निधी संकलनास आर्थिक अनुदान मिळणेबाबत खालीलप्रमाणे विनंती केलेली आहे.

" मातृभुमिच्या संरक्षणाबरोबर देशातंर्गत उद्भवणा-या कायदा व सुव्यवस्था विषयक समस्या, भुकंप, महापूर अपघात या सारख्या असंख्य आपत्तीत दुर्देवी नागरीकांच्या सहाय्याला तत्परतेने व समर्थपणे धावून केलेल्या बहुमोल कामगिरीचा विसर भारतीयांना कधीही पडणार नाही. भारतीय सरहद्दीवर तसेच देशातंर्गत मोहिमेमध्ये दरवर्षी अनेक सैनिक वीरगती प्राप्त होतात.तसेच असंख्य जखमी व अपंगही होतात. त्यांचे ऋुण आपणा सर्वांवर आहे. त्याच बरोबर त्यांच्या कुटुंबीयांची जबाबदारी ही आपणावर आहे. आपण देशात सुरक्षित

आहेत, याचे श्रेय सीमेवर हुतात्म स्विकारलेल्या हजारो शहिदांना व आजही प्राणपणाने लढणा-या वीरसैनिकांना द्यावे लागेल.

या सैनिकांनी केलेल्या बलिदानाबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी ७, डिसेंबर हा दिवस सर्वत्र ध्वजदिन म्हणून साजरा करण्यात येऊन ध्वजदिन निधी संकलीत करण्यात येतो. सदर निधीचा विनियोग युध्दात शहीद होणा-या वीरांच्या व अपंगत्व आलेल्या सैनिकांच्या कुटूंबांकरीता कल्याणकारी योजना राबविण्यासाठी आणि पुनर्वसनासाठी केला जातो. महाराष्ट्र शासनाकडून अहमदनगर जिल्हयास या वर्षीचे उद्दीष्ट रू.१,५७,३०,०००/- ठरवून देण्यात आलेले आहे. सदरचे उद्दीष्ट पुर्ततेसाठी श्री साईबाबा संस्थानकडून रू.३१,००,०००/- मात्र(अक्षरी रूपये एकतीस लाख) आर्थिक मदत मिळणेबाबत उद्दीष्ट दिलेले असून शिर्डी या पवित्र भूमितून जिल्हयातील शहीद जवानांच्या अवलंबीतांचे कल्याणार्थ सढळ हाताने मदत करणेबाबत मागणी केली आहे.

**अधिनियमातील तरतूद:-** सन २००४ चा अधिनियम क्र.१७ (२) (ण) मानव जातीचे कल्याण करणा-या किंवा मानवाला आपत्तीमध्ये सहाय्य करणा-या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल. तसेच अधिनियम क्र.१७(६) चे तरतूदीस अधिन राहून, समितीला या अधिनियमाखालील आपली कर्तव्ये व कामे पार पाडण्यासाठी आवश्यक ते सर्व अधिकार असतील, अशी तरतूद आहे.

**मागील वर्षीची कार्यवाही:-** मागील सशस्त्र सेना ध्वजदिन निधी संकलनकामी मा.व्यवस्थापन समितीचे दि.०८.१०.२०१५ रोजीचे सभेतील निर्णय क्र.३७० ने अधिनियमातील तरतूदीनुसार मागील वर्षाप्रमाणे कर्मचा-यांकडून रक्कम कपात करून जमा होणारी रक्कम व उर्वरीत संस्थानची रक्कम असे रूपये २१लाख जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय, अहमदनगर यांना देण्यास मान्यता दिलेली होती.

मा.व्यवस्थापन समितीचे मान्यतेनुसार मागील वर्षी अधिकारी व कर्मचारी यांचेकडून खालीलप्रमाणे रक्कम त्यांचे वेतनातून कपात करण्यात आलेली होती.

| **अ.नं.** | **वेतन बॅन्ड** | **एकूण अधिकारी / कर्मचारी** |
|---|---|---|
| ०१ | प्रति नियुक्तीवरील शासकीय अधिकारी | ०३ |
| ०२ | १५६००-३९१०० | ९४ |
| ०३ | प्रति नियुक्तीवरील शासकीय अधिकारी ९३००-३४८०० | ०१ |
| ०४ | ९३००-३४८०० | ४०२ |
| ०५ | ५२००-२०२०० | ७५० |
| ०६ | ४६५०-१७४०० | ०५ |
| ०७ | ४४४०-७४४० | ८८९ |
| ०८ | ४५००/- (फिक्स पे) | ०१ |
| ०९ | ५००० (फिक्स पे) | ०२ |
| १० | ६००० (फिक्स पे) | ०५ |
| ११ | ११,००० (फिक्स पे) | १३ |
| १२ | १२,००० (फिक्स पे) | ०१ |
| १३ | २१,००० (फिक्स पे) | ०१ |
| | **एकूण कर्मचारी संख्या -२१६७** | **कर्मचारी वसूली रक्कम रू. २,८८,७७०.००** |

वरील तक्त्यात दर्शविलेप्रमाणे मागील वर्षी श्री साईबाबा संस्थान कर्मचा-याकडून रक्कम कपात करून रू.२,८८,७७०/ एवढी रक्कम जमा झालेली होती व उर्वरीत संस्थानची रक्कम रू. १८,११,२३०.०० /- असे एकूण रू.२१ लाख रक्कमेचा स्टेट बॅंक ऑफ इंडिया शाखा शिर्डी चेक नं.१) ५३७६७२, ने रू.७ लाख, २) चेक नं.५३७६७३ ने रू.७ लाख, ३) चेक नं.५३७६७४ ने रू.७ लाख दि.१०.१२.२०१५ ने तीन धनाकर्षाद्वारे एकूण २१ लाख रूपये जिल्हा कल्याण कार्यालय, अहमदनगर यांना देण्यात आलेले आहे.

यावर्षी संदर्भीय पत्रान्वये रक्कम रू.३१लाखाची मागणी करण्यात आलेली असून संस्थान कर्मचारी यांचे पगारातून कपात करून जमा होणारी रक्कम रू. २,८२,१३५.००/- खालील तक्त्यात दर्शविलेप्रमाणे आहे.

| अ.नं. | वेतन बॅन्ड | एकूण अधिकारी / कर्मचारी | प्रतिअधिकारी/ कर्मचारी वसूली | वसूली रक्कम |
|---|---|---|---|---|
| ०१ | प्रति नियुक्तीवरील शासकीय अधिकारी १५६००-३९१०० | ०३ | ३०० | ९००.०० |
| ०२ | १५६००-३९१०० | ८९ | ३०० | २६,७००.०० |
| ०३ | प्रति नियुक्तीवरील शासकीय अधिकारी ९३००-३४८०० | ०१ | २४० | २४०.०० |
| ०४ | ९३००-३४८०० | ३९८ | २४० | ९५,५२०.०० |
| ०५ | ५२००-२०२०० | ७२३ | १२५ | ९०३७५.०० |
| ०६ | ४६५०-१७४०० | ०५ | १०० | ५००.०० |
| ०७ | ४४४०-७४४० | ८८१ | ७५ | ६६,०७५.०० |
| ०८ | ४५००/- (फिक्स पे) | ०१ | २५ | २५.०० |
| ०९ | ५००० (फिक्स पे) | ०२ | २५ | ५०.०० |
| १० | ६००० (फिक्स पे) | ०५ | ७० | ३५०.०० |
| ११ | ११,००० (फिक्स पे) | १३ | १०० | १,३००.०० |
| १२ | १२,००० (फिक्स पे) | ०१ | १०० | १००.०० |
| | **एकूण कर्मचारी संख्या -२१२२** | | **कर्मचारी वसूली रक्कम रू. २,८२,१३५.००** | |

उपरोक्त तक्त्यातील कर्मचारी वसूली एकूण रक्कम रू.२,८२,१३५.०० व संस्थानकडून देय होणारी उर्वरीत रक्कम रू.२८,१७,८६५.०० अशी एकूण रक्कम रु ३१,००,०००/- मा.जिल्हाधिकारी कार्यालय अ.नगर यांचेकडे जिल्हा सैनिक कल्याण निधीसाठी देता येईल.

अ) सन २००४ चा अधिनियम क्र.१७ (२) (ण) मानव जातीचे कल्याण करणा-या किंवा मानवाला आपत्तीमध्ये सहाय्य करणा-या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल. तसेच अधिनियम क्र.१७(६) चे तरतूदीस अधिन राहून, समितीला या अधिनियमाखालील आपली कर्तव्ये व कामे पार पाडण्यासाठी आवश्यक ते सर्व अधिकार असतील, अशी तरतूद आहे.

**विभागाचा अभिप्रायः-** उपरोक्त **“अ”** स अधिन राहून संस्थान कर्मचारी पगारातून वसूली केलेली रक्कम रू. २,८२,१३५/- व संस्थानकडून देय होणारी उर्वरीत रक्कम रू. २८,१७,८६५/- अशी एकूण ३१,००,०००/- मात्र मा.जिल्हाधिकारी कार्यालय अ. नगर यांचेकडे जिल्हा सैनिक कल्याण निधीसाठी देता येईल, परंतु त्यास शासनाची मान्यता घेणे आवश्यक असल्याने सदर प्रस्ताव विधी व न्याय विभागाकडे पाठविणेस व मा. व्यवस्थापन मंडळाचे मान्यतेसाठी सविनय सादर.

**निर्णय क्र.६३१** **यावर सविस्तर चर्चा होऊन, जिल्हा सैनिक कार्यालय यांना सशस्त्र सेना ध्वजदिन निधी संकलनासाठी आर्थिक मदत देणेबाबतच्या उपरोक्त प्रसतावास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- मुख्यलेखाधिकारी)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१८** **एम.आर.आय. मशिनचे वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट करणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री. साईबाबा हॉस्पिटलचे रेडीओलॉजी विभागाकरीता पुरवठा आदेश क्र. 15895/2006, दि.13/11/06 अन्वये मे. सिमेन्स लि. मुंबई, यांचेकडून Magnetom Avanto मशीन एकुण रू. 5,05,00,000/- इतक्या रकमेत खरेदी करण्यात आले आहे. सदरचे मशिन दि. 1/06/07 रोजी कार्यान्वित करण्यात आलेले आहे. कंपनीने मशीनकरीता दिलेला दोन वर्षाचा वॉरंटी कालावधी दि. 31/05/2009 रोजी संपला आहे. सदर मशिनची दि. 31/03/2016 ची घसारा वजा किंमत रू. 28,43,832.48 इतकी आहे. सदर मशीन खरेदी करतेवेळी झालेला ठराव, कंपनीसोबत करण्यात आलेले ॲग्रीमेंट आणि कंपनीस दिलेल्या पुरवठा आदेशातील अटीनुसार पुढील कालावधीतील दुरूस्ती व देखभालीकरीता वाषिर्क CMC (Comprehensive Maintenance Contract) करणेबाबत खालीलप्रमाणे निर्णय झालेला आहे

'मशिनचा वॉरंटी कालावधी दोन वर्षाचा असून तो संपुष्टात आल्यानंतर कंपनीकडे CMC कॉम्प्रेहेन्सीव मेंटेनन्स सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट करण्यात यावे. तसेच याकामी कंपनीस पहिल्या वर्षी 20 लाख रूपये व त्यानंतर पुढील प्रत्येक वर्षास 20 लाख अधिक 5 टक्के याप्रमाणे दरवर्षी 5 टक्के वाढ करून सदर CMC साठी आगाऊ रक्कम देण्यात यावी आणि सर्व्हीस टॅक्स वेगळा देण्यात यावा असे ठरले आहे.'

वरील अटीनुसार आजपावेतो मे. सिमेन्स हेल्थकेअर मुंबई यांचेकडे दरवर्षी सदर मशिनचे कॉम्प्रेहेन्सीव मेंटेनन्स सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट करीता करणेत आलेला खर्च, मशिनचे दुरूस्ती करीता कंपनीने वापरलेल्या स्पेअर पार्टस् ची अंदाजे किंमत आणि सदर मशिनवर आजपावेतो तपासणी करणेत आलेल्या पेशंटची संख्या इ. वर्षनिहाय माहीती खालीलप्रमाणे आहे.

| Sr. No. | Period | CMC Amount in Rs. | Cost of Spare parts replaced by Co. (Approx. in Rs. ) | Total no. of Patients Done |
|---|---|---|---|---|
| 1 | 01/06/2009 to 31/05/2010 | 22,06,000/- | 31,000,00/- | 5,530 |
| 2 | 01/06/2010 to 31/05/2011 | 23,16,300/- | 10,000,00/- | 10,673 |
| 3 | 01/06/2011 to 31/05/2012 | 24,32,115/- | 13,000,00/- | 11,694 |
| 4 | 01/06/2012 to 31/05/2013 | 26,04,008/- (Increase in Service Tax 10.36 to 12.36%) | 43,11,222/- | 13,050 |
| 5 | 01/06/2013 to 31/05/2014 | 27,31,486/- | 23,62,500/- | 13,449 |
| 6 | 01/06/2014 to 31/05/2015 | 28,68,060/- | 4,75,605.31/- | 13,244 |
| 7 | 01/06/2015 to 31/05/2016 | 30,68,819/- (Increase in Service Tax 12.36 to 14.5%) | 80,18,000/- | 11,826 |
| | **Total Amount in Rs.** | **1,82,26,788/-** | **2,08,65,099.67** | **79,466** |

सदर कालावधीत कंपनीचे इंजिनिअर वर्षातून 4 नियमित भेटी देणार असून जेव्हा जेव्हा मशिन नादुरूस्त होईल तेव्हा तेव्हा येऊन दुरुस्ती व देखभाल आणि आवश्यकतेनुसार सॉफ्टवेअर/हार्डवेअर सेफ्टी अपडेट करणार आहेत. वरील कॉन्ट्रॅक्टमध्ये मशिनचे हेलीयम गॅस रिफीलींग व कोल्ड हेड यासारख्या महागडया पार्टसह सर्व स्पेअर पार्टचा तसेच मशिनसोबत पुरविण्यात आलेल्या यु.पी.एस, चिलर प्लांट यांची देखील सर्व स्पेअर पार्टसह दुरूस्ती व देखभाल करत आहेत. परंतु यु.पी.एस. बॅटरीज या कंझ्युमेबल्स असल्यामुळे समाविष्ट नाहीत. त्यासाठी कंपनीने पत्र क्र. West/H IM/MRI/May 16/4345/R1 Dtd. 03/06/2016 (रूग्णालये प्राप्त दि. 08/06/2016) अन्वये दि. 01/06/2016 ते दि. 31/05/2017 या कालावधीसाठी MRI मशीनचे कॉम्प्रेहेन्सीव्ह वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट करणेकरीता सर्व करांसहीत एकुण रु. 32,36,332/- (अक्षरी रु. बत्तीस लाख छत्तीस हजार तीनशे बत्तीस मात्र) इतक्या रक्कमेचा CMC करीता करारनामा पाठविला आहे आणि एकुण रक्कमेची आगाउ मागणी केलेली आहे.

शासन निर्देशानुसार सर्व सेवा दरांवर कृषी विकास सेस हा नवीन टॅक्स 0.5% इतका लागु झाल्यामुळे CMC च्या एकुण रकमेत वाढ झाली आहे.

मशीन खरेदी करतेवेळी कंपनीसोबत करण्यात आलेले ॲग्रीमेंट नुसार-कंपनीने 98% अपटाईम दिला असून मशिन दुरूस्ती करीता जर कंपनीमुळे एका वेळेस एकूण 5 दिवसांपेक्षा अधिक काळ लागला तर प्रतिदिवस रू.7500/-इतका दंड संस्थान कंपनीस आकारते.

कंपनीने मागील वर्षी 4 नियमीत भेटी व तातडीच्या दुरुस्ती व देखभालीकरीता एकुण 39 वेळा भेटी देउन संपूर्ण एक वर्षांत अंदाजे रु 80,18000/- इतक्या रकमेचे स्पेअर पार्ट बदलले आहेत (संदर्भ:परीशिष्ट "अ"). सदर स्पेअर पार्टची साठा रजिष्टरवर नोंद घेण्यात आलेली आहे. वापरलेले जुने स्पेअर पार्ट कंपनीस गेट पास अन्वये परत करणेत आले आहेत.

एम.आर.आय.मशिन नियमित वापरात असून दररोज अंदाजे 35 रूग्णांची तपासणी करण्यात येते. यानुसार सदर मशीनवर दरवर्षी अंदाजे 11,826/- पेशंटचे एम.आर.आय. स्कॅन होत आहे. (संदर्भ:परीशिष्ट "ब") त्याकरीता सदरचे मशीन नेहमी अद्यावत ठेवणे आवश्यक आहे.

दि. 12/01/2014 रोजी मानवीय चुकीमुळे ऑक्सीजन सिलेंडर एम.आर.आय. मशिनवर आदळुन चिकटले होते. सदर अपघातामुळे मशिनचे काही स्पेअर पार्ट (Funnel, Funnel lower, Rubber seal & Avanto Set of design ring) तुटलेले आहेत. सदर पार्टस हे मानवीय चुकीमुळे खराब झालेले असल्यामुळे कंपनी CMC मध्ये बदलुन देणार नाही असे कंपनीने कळविले आहे. नवीन स्पेअर पार्ट करीता कंपनीने पत्र क्र. HIM-EST-012014-014, Dt. 14/01/2014अन्वये सर्व करांसहीत एकुण रू. 23,34,173/- इतक्या रकमेचे कोटेशन पाठविले आहे. परंतु मा. वैद्यकिय संचालक, रेडीओलॉजिस्ट, कंपनी सर्व्हीस मॅनेजर श्री. पटेल यांचे सोबत दि. 03/02/2014 रोजी झालेल्या प्रत्यक्ष चर्चेअंती, सदर स्पेअर पार्ट तुटलेले असुन परंतु त्यामुळे मशिन बंद पडलेले नाही त्यामुळे सदर स्पेअर पार्ट बदलणेत आलेले नाहीत असा निर्णय घेणेत आला. तसेच सदर स्पेअर पार्ट कंपनीकडुन मोफत बदलुन मिळणेकरीता इकडील पत्र क्र. 1164, दि. 27/02/2014 अन्वये विनंती करण्यात आली आहे.

सदर CAMC करीता रु. 25000/- पेक्षा अधिक खर्च येणार असून मशिन खरेदी करते वेळेस झालेल्या ॲग्रीमेंटनुसार कंपनीने सदर रक्कमेची आगाउ मागणी केलेली आहे.

सद्यस्थितीत मशिन व्यवस्थित काम देत आहे. सदर मशिनची दि. 31/03/2016 ची घसारा वजा किंमत रू. 28,43,832.48/- इतकी आहे. पुढील काळात ते व्यवस्थित कार्यान्वित राहणे कामी तसेच मागील सात वर्षात कंपनीस अदा केलेली रक्कम व त्यांनी केलेला अंदाजे खर्च या बाबींचा विचार करता संस्थानला सद्यस्थितीत मशिनचे कॉम्प्रेहेन्सीव्ह वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट करणे फायदेशीर राहील. कारण जसजसे मशिन जुने होत जाते तसतसे दुरूस्तीचा खर्च देखील वाढत जातो.

सदर वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्टबाबत खालील बाबींचा विचार होणे आवश्यक आहे असे नम्र मत आहे.

1) MRI मशिन 9 वर्षापासून नियमित वापरात असल्यामुळे त्याची नेहमी नियमित व तातडीची दुरूस्ती व देखभाल करणे अत्यावश्यक असते. यापुढील काळात मशिन वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट मध्ये नसल्यास व एम.आर.आय. मशिनची जर दुरूस्ती व देखभाल वेळेत न झाल्यामुळे मशिन नादुरुस्त होउन काही महागडे स्पेअर पार्टस् (उदा. हेलीयम गॅस रिफीलींग व कोल्ड हेड, यु.पी.एस. व चिलर प्लॉट) बदलणे आवश्यक असतील अशा वेळी सर्व्हीस चार्जेस व स्पेअर पार्टस्चे खर्चास मान्यता घेणेकरीता विविध पार्टस्करीता वेगवेगळे स्वतंत्र प्रस्ताव आवश्यकतेनुसार वेळावेळी सादर करणे प्रस्तावित पद्धतीनुसार आवश्यक राहील. तसेच प्रस्ताव सादर करून प्रत्यक्षात मान्यता मिळून तदनंतर पुरवठाधारकास कार्यादेश देणेस व प्रत्यक्षात दुरूस्तीस अंदाजे तीन महिन्यांचा किंवा अनिश्चित कालावधी लागू शकतो. दरम्यानच्या मशिन नादुरूस्त असण्याच्या कालावधीमध्ये अत्यवस्थ रूग्णांना अत्यावश्यक सेवा देणे शक्य होणार नाही.

2) तसेच सदर प्रकारे वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट केलेले नसताना मशिन्सची दुरूस्ती करणेस संस्थानला वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्टच्या रकमेपेक्षा (सर्व्हीस चार्जेस व स्पेअर पार्टस्चा) अधिक खर्च येउ शकतो.

वरील सर्व बाबींचे अवलोकन करून एम.आर.आय. मशिनचे वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्टसाठीचा खर्च देखील नियमित खर्च असल्यामुळे मा. व्यवस्थापन समितीने मा. उच्च न्यायालयापुढे पुनर्मान्यतेसाठी सादर न करता मागील तीन वर्षांपासून दरवर्षी सदर नियमित खर्चास मान्यता दिली आहे.

सदर CMC चा खर्च हा नियमीत दुरूस्ती व देखभालीचा खर्च असल्यामूळे त्यास शासनाची मान्यता घेणेची आवश्यकता नाही.

सदर MRI मशिनचा आजपावेतो 9 वर्षांचा वापर झाला असून सदर मशिनचा वापरायोग्य कालावधी (As per WHO Guidelines अंदाजे 8 वर्ष ) देखील संपला आहे. पुरवठाधारक कंपनीने दि. 03/08/2016 चे इ-मेल अन्वये मे 2017 पर्यंत कंपनी स्पेअरपार्टसचा पुरवठा करुन दुरूस्ती व देखभाल करणार असल्याचे कळविले आहे. त्यामुळे रुग्णालय विभागाच्या खरेदी विभागामार्फत जुने मशिन परत देउन (Buyback) नवीन अद्यावत मशिन खरेदीसाठी प्रस्ताव सादर करणेत आला आहे. सदर खरेदीची कार्यवाही (मान्यता, निवीदा, निर्णय, पुरवठा आदेश इ.) पूर्ण होईपर्यंत सध्याचे मशिन वापरायोग्य ठेवणे गरजेचे आहे. त्याकरीता सदर मशिनचे कंपनीकडे कॉम्प्रेहेन्सीव्ह वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट करणे आवश्यक आहे.

तरी MRI मशीनचे मे. सिमेन्स हेल्थकेअर प्रा.ली. मुंबई यांचेकडे दि. 01/06/2016 ते दि. 31/05/2017 या कालावधीसाठी कॉम्प्रेहेन्सीव्ह वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट करणेकरीता त्यांनी दिलेल्या एकुण **रु. 32,36,332/-** इतक्या रक्कमेबाबत कंपनी प्रतिनिधीशी प्रत्यक्ष चर्चा करून दर निश्चित करणेस व त्यासाठी येणाऱ्या खर्चास (मुळ रक्कम अधिक प्रत्यक्ष करार करतेवेळी असलेले करांचे दरानुसार) तसेच दर निश्चितीनंतर CMC चे एकुण रकमेपैकी 50% रक्कम सहा महिन्यांनंतर व उर्वरीत 50 % रक्कम वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट कालावधी पुर्ण झालेनंतर अदा करणेस मान्यता असावी.

**निर्णय क्र.६३२** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा हॉस्पिटलसाठी नवीन अद्ययावत एम.आर.आय. मशिन खरेदी करणेत यावे. तसेच जुन्या एम.आर.आय. मशिनचे वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट न करता त्याची दुरुस्ती-देखभाल विभागांतर्गत करुन घेण्यात यावी, असे ठरले.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१९** **सी.टी. स्कॅन (64 Slice) मशिनचे वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट करणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा हॉस्पिटलचे रेडीओलॉजी विभागात मे. सिमेन्स लि. मुंबई या कंपनीचे Somatom Sensation 64 CT Scanner हे मशीन पुरवठा आदेश क्र. 2833/2005, दि. 15/03/2005 अन्वये एकुण रू. 3,98,37,835/- इतक्या रकमेत खरेदी करण्यात आले असुन सदर मशिन करीता कंपनीने दिलेला एक वर्षाचा वॉरंटी कालावधी दि.16/07/2006 रोजी पूर्ण झालेला आहे. सदर सि. टी. स्कॅन मशिनची दि. 31/03/2016 रोजी घसारा वजा किंमत रू. 16,82,556.38/- इतकी आहे. सदर मशीन खरेदी करतेवेळी मा. व्यवस्थापन समितीच्या दि. 16/02/2005 च्या सभेतील निर्णय क्र. 95 अन्वये पुढील कालावधीतील सि. टी. स्कॅन मशिनसह खरेदी करण्यात आलेल्या सर्व ॲक्सेसरीजसह (Medrad Pressure Injector, Colour Printer, 150 KVA Stabilizer) यांचे दुरुस्ती व देखभालीकरीता वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट CMC (Comprehensive Maintenance Contract) करणेबाबत निर्णय झालेला आहे. त्यानुसार कंपनीस देण्यात आलेल्या दि. 15/03/2005 च्या पुरवठा आदेशातील अ.क्र.15 अन्वये-

Comprehensive Maintenance Contract (CMC) price for the second year is Rs.30 Lacs. For subsequent years the escalation of 5% will be applicable. The service tax will be extra.

The CMC includes even the Tube of the CT. Under this contract all parts & labor will be given free of cost. Payment for CMC to be done at start of each year after the demand of company.

मे. सिमेन्स लि.,मुंबई,यांचेशी पुरवठा आदेशानुसार वॉरंटी कालावधी संपलेनंतर आजपावेतो दहा वर्षात CMC चा करार करून वरील निर्णयाप्रमाणे रक्कम अदा करण्यात आली आहे.

आजपावेतो मे. सिमेन्स लि. मुंबई यांचेकडे दरवर्षी सदर मशिनचे कॉम्प्रेहेन्सीव्ह वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट करीता करणेत आलेला खर्च, मशीन दूरूस्ती करीता कंपनीने वापरलेल्या स्पेअर पार्टस् ची अंदाजे किंमत आणि सदर मशिनवर आजपावेतो तपासणी करणेत आलेल्या पेशंटची संख्या इ.वर्षनिहाय माहीती खालीलप्रमाणे आहे.

| Sr. No. | CAMC Period | Amount Incl. of all Taxes in Rs. | Approx. Cost of Spare Parts in Rs. (replaced by Company in CAMC) | Total No. of Patients Done |
|---|---|---|---|---|
| 1 | 17/07/06 to 16/07/07 | 33,67,200.00 | 15,39,540.00 | 4919 |
| 2 | 17/07/07 to 16/07/08 | 35,39,340.00 | 89,596.00 | 7163 |
| 3 | 17/07/08 to 16/07/09 | 37,16,307.00 | 57,00,000.00 | 7684 |
| 4 | 17/07/09 to 16/07/10 | 38,30,581.00 | 74,00,000.00 | 9303 |
| 5 | 17/07/10 to 16/07/11 | 40,22,110.00 | 91,00,000.00 | 10662 |
| 6 | 17/07/11 to 16/07/12 | 42,23,216.00 | 65,00,000.00 | 11044 |
| 7 | 17/07/12 to 16/07/13 | 45,17,195.00 (Increase in Service Tax 10.36 to 12.36%) | 60,89,673.00 | 9,306 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 8 | 17/07/13 to 16/07/14 | 47,00,452.00 | 66,41,000.00 | 9,441 |
| 9 | 17/07/14 to 16/07/15 | 48,97,623.00 | 87,69,473.44 | 7,827 |
| 10 | 17/07/15 to 16/07/16 | 51,42,504.00 (Increase in Service Tax 12.36 to 14.5%) | 56,89,000.00 | 9,526 |
| | **Total** | **3,19,16,401.00** | **5,75,18,282.44** | **86,885** |

मागिल वर्षी सदर मशिनचे वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट एकूण रू. 51,42,504/-(+5% वाढ व सर्व्हीस टॅक्स 12.36 % सह) इतक्या रकमेत पुरवठाधारक कंपनीसोबत करण्यात आले होते. सदर कालावधीत नियमीत व तातडीच्या दुरुस्ती व देखभालीकरीता एकुण 34 वेळा भेटी देउन मागील एक वर्षांत अंदाजे रु. 56,89,000/- इतक्या रकमेचे स्पेअर पार्ट कंपनीने बदलले आहेत.

सी.टी. स्कॅन मशिन नियमित वापरात असून दररोज अंदाजे 26 रूग्णांची तपासणी करण्यात येते. यानुसार सदर मशीनवर मागील वर्षी एकुण 9,526 पेशंटचे सी. टी. स्कॅन करण्यात आले आहे.

सध्या दि. 17/07/2016 ते दि. 16/07/2017 या कालावधीसाठी CT Scan मशीनचे CMC करणेकरीता करारनाम्यानुसार मे. सिमेन्स ली. मुंबई यांनी (+5% वाढ व सर्व्हीस टॅक्स 15 % सह) एकुण रू. 55,26,498/- इतक्या रक्कमेची मागणी केलेली आहे. कंपनीने त्यानुसार करारनामा पाठविला आहे. कंपनीने वरील पुरवठा आदेशातील अटीनुसार CMC करणेसाठी एकूण 100 % रक्कमेची आगाउ मागणी केलेली आहे.

सदर कालावधीमध्ये कंपनी इंजिनीअर एकुण 4 वेळा सर्व मशिन्सची नियमित सर्व्हीसींग करून मशिन ब्रेकडाऊनचे वेळी दुरूस्ती करीता आवश्यक असणारे सर्व स्पेअर पार्ट (एक्स-रे टयुबसह) बदलणार आहेत आणि त्याकरीता आवश्यक तितक्या वेळा भेटी देणार आहेत. सॉफ्टवेअर व सेफ्टी अपडेट प्रत्येकी 3 वेळा करणार आहेत.

सद्यस्थितीत मशिन व्यवस्थित काम देत आहे. पुढील काळात ते व्यवस्थित कार्यान्वित राहणे कामी तसेच मागील दहा वर्षात कंपनीस अदा केलेली रक्कम, कंपनीने दुरूस्तीसाठी केलेला अंदाजे खर्च व सदर मशिनवर तपासणी करणेत आलेले रुग्णांची संख्या या बाबींचा विचार करता संस्थानला सद्यस्थितीत मशिनचे कॉम्प्रेहेन्सीव्ह वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट करणे जास्त फायदेशीर राहील. कारण जसजसे मशिन जुने होत जाते तसतसे दुरूस्तीचा खर्च देखील वाढत जातो.

सदर वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्टबाबत खालील बाबींचा विचार होणे आवश्यक आहे असे नम्र मत आहे.

1) CT Scan मशिन 10 वर्षापेक्षा अधिक काळापासून नियमित वापरात असल्यामुळे त्यांची नेहमी नियमित व तातडीची दुरूस्ती व देखभाल करणे अत्यावश्यक असते. सदर प्रकारे वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट केलेले नसताना जेव्हा मशिन नादुरूस्त होईल तेंव्हा मा. व्यवस्थापन समिती पुढे दुरूस्तीच्या खर्चास मान्यतेसाठी प्रस्ताव सादर करून प्रत्यक्षात मान्यता मिळून तदनंतर पुरवठाधारकास कार्यादेश देणेस अंदाजे तीन महिन्यांचा किंवा अनिश्चित कालावधी लागू शकतो. तसेच सदर काळात मशिन वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट मध्ये नसल्यामुळे वरील मशिन्सची जर दुरूस्ती व देखभाल वेळेत न झाल्यामुळे मशिन नादुरुस्त होउन काही महागडे स्पेअर पार्टस् (उदा. एक्स-रे टयुब-किंमत-रु.46 लाख, डिटेक्टर मॉडयुल-रु.60लाख, ई-बॉक्स-रु.17 लाख इ.) बदलणे आवश्यक असतील अशा वेळी सर्व्हीस चार्जेस व स्पेअर पार्टस्चे खर्चास मान्यता घेणेकरीता प्रत्येक वेळी विविध पार्टस् करीता वेगवेगळे स्वतंत्र प्रस्ताव आवश्यकतेनुसार सादर करणे प्रस्तावित पद्धतीनुसार आवश्यक राहील. तसेच त्यास मान्यता मिळून कंपनीस कार्यादेश किंवा पुरवठा आदेश देउन प्रत्यक्षात मशिनची दुरूस्ती करणेस अधिक कालावधी लागू शकतो. दरम्यानच्या मशिन नादुरूस्त असण्याच्या कालावधीमध्ये अत्यवस्थ रूग्णांना अत्यावश्यक सेवा देणे शक्य होणार नाही.

2) तसेच सदर प्रकारे वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट केलेले नसताना मशिन्सची दुरूस्ती करणेस संस्थानला वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्टच्या रकमेपेक्षा (सर्व्हीस चार्जेस व स्पेअर पार्टस्चा) अधिक खर्च येउ शकतो.

सदर CT Scan मशिनचा आजपावेतो 11 वर्षांचा वापर झाला असून सदर मशिनचा वापरायोग्य कालावधी (As per WHO Guidelines अंदाजे 8 वर्ष ) देखील संपला आहे. परंतू पुरवठाधारक कंपनीने दि.03/08/2016 चे पत्रान्वये डिसेंबर 2019 पर्यंत कंपनी स्पेअरपार्टसचा पुरवठा करुन दुरूस्ती व देखभाल करणार असल्याचे कळविले आहे. तसेच सध्या सदर मशिन वारंवार नादुरूस्त होण्याचे प्रमाण देखील वाढले आहे त्यामुळे रुग्णालय विभागाच्या खरेदी विभागामार्फत जुने मशिन परत देउन (Buyback) नवीन अद्यावत मशिन खरेदीसाठी प्रस्ताव सादर करणेत आला आहे. सदर खरेदीची कार्यवाही (मान्यता, निवीदा, निर्णय, पुरवठा आदेश

इ.) पूर्ण होईपर्यंत सध्याचे मशिन वापरायोग्य ठेवणे गरजेचे आहे. त्याकरीता सदर मशिनचे कंपनीकडे कॉम्प्रेहेन्सीव्ह वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट करणे आवश्यक आहे.

तरी CT Scan मशीनचे मे. सिमेन्स हेल्थकेअर प्रा.ली. मुंबई यांचेकडे दि. 17/07/2016 ते दि. 16/07/2017 या कालावधीसाठी कॉम्प्रेहेन्सीव्ह वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट करणेकरीता त्यांनी दिलेल्या एकुण रु.55,26,498/- इतक्या रक्कमेबाबत कंपनी प्रतिनिधीशी प्रत्यक्ष चर्चा करून दर निश्चित करणेस व त्यासाठी येणाऱ्या खर्चास (मुळ रक्कम अधिक प्रत्यक्ष करार करतेवेळी असलेले करांचे दरानुसार) तसेच CMC चे एकुण रकमेपैकी 50% रक्कम सहा महिन्यांनंतर व उर्वरीत 50 % रक्कम वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट कालावधी पुर्ण झालेनंतर अदा करणेस मान्यता असावी.

**निर्णय क्र.६३३** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा हॉस्पिटलसाठी नवीन अद्ययावत सी.टी. स्कॅन (64 Slice) मशिन खरेदी करणेत यावे. तसेच जुन्या सी.टी. स्कॅन (64 Slice) मशिनचे वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट न करता त्याची दुरुस्ती-देखभाल विभागांतर्गत करुन घेण्यात यावी, असे ठरले.**

(कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

-----------------------------------------------------------------------------------------------------------------------------

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.२०** **श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये कार्यान्वित असणाऱ्या संगणकीय प्रणालीचे नवीन टेंडर प्रोसेस होईपर्यंत या प्रणालीचे मेन्टनन्स कॉट्रॅक्ट AMC/ On Site Support सध्या आहे त्याच कंपनीस देणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा हॉस्पिटल मध्ये वाढती रुग्णसंख्या बघता रुग्णांना जलदगतीने सेवा मिळावी याकरिता सन २००५ साली M/s Sofscript Systemand Services Ltd, Mumbai यांचे कडून रु ७,५०,००० /- किमतीस संगणकीय प्रणाली खरेदी करण्यात आली होती .खरेदी केलेली संगणकीय प्रणाली सन २००७ मध्ये कार्यान्वित करण्यात आली आहे. त्यामध्ये सद्यस्थितीत सदर प्रणाली बिलिंग, मेडिकल स्टोअर, फायनान्स, रीसेप्शन, लॅब अश्या विभागात सध्या कार्यान्वित आहे. ज्या त्या विभागाचे मागणी अथवा सूचनेनुसार सदर संगणकीय प्रणालीमध्ये M/s Sofscript System and Services Ltd, Mumbai यांचे कडून त्याकाळात काही बदल अथवा दुरुस्त्या करार झालेप्रमाणे करून घेण्यात येत होत्या.

परंतु गेले काही दिवस सदर संगणकीय प्रणाली मध्ये मोठ्या प्रमाणात अडी-अडचणी निर्माण होत आहेत. त्यामुळे बाहेरून येणाऱ्या रुग्णांना व कर्मचार्यांना मोठ्या प्रमाणावर त्रास सहन करावा लागत आहे. संगणकीय प्रणाली मध्ये वारंवार निर्माण होणाऱ्या अडी-अडचणीसाठी M/s Sofscript System and Services Ltd, Mumbai यांचे प्रतिनिधी श्री निखिल ठाकुर यांना संपर्क करण्यात आला आणि त्यांना या कामी शिर्डी येथे आपला इंजिनियर पाठविणेस विनंती करण्यात आली होती. त्यांनी आपला प्रतींनिधी पाठवत असल्याचे मान्य केले आणि याकामी श्री निखिल ठाकुर यांनी शिर्डी येथे Sofscript कंपनीचा इंजिनियर येऊन संगणकीय प्रणालीस येणाऱ्या अडी-अडचणीचे निवारण करून देईल असे सांगण्यात आले. त्यानंतर पाठविण्यात येणाऱ्या कंपनीच्या प्रतिनिधिचे मानधन व राहण्याची विनामूल्य सोय याबाबत त्यांचे कडून सांगण्यात आले त्याप्रमाणे संदर्भ क्र.३ ने HIMS प्रणाली बाबतच्या अडचणी सोडविणे कामी M/s Sofscript System and Services Ltd, Mumbai यांचा इंजिनियर शिर्डी येथे बोलविणेस व त्यासाठी लागणाऱ्या खर्चास मा. कार्यकारी अधिकारी साहेब यांची मान्यता घेऊन त्यांना दिनांक१९.०८.२०१६ रोजी दोन दिवसांकारिता बोलविण्यात आले M/s Sofscript System and Services Ltd, Mumbai यांचे इंजिनियर श्री प्रफुल्ल वानखेडे व ई.डी.पी. विभागाच्या सर्व कर्मचाऱ्यांनी २ दिवस पूर्ण वेळ काम करून सदर संगणकीय प्रणालीस निर्माण होणाऱ्या अडी-अडचणीचे निरसन करण्यात आले. सदर प्रणाली दुरूस्ती व देखभालीच्या काळात बंद राहून बाहेरून येणाऱ्या रुग्णाचे हाल होऊ नये याची काळजी घेऊन त्याबाबत इंजिनियर कडून Database व Application सर्व्हर बाबत कार्यवाही करून घेण्यात आली. बिलिंग काऊंटर व इतर ठिकाणी संगणकीय प्रणाली कार्यान्वित असलेल्या विभागाचे कर्मचाऱ्यांना पूर्वी पेक्षा संगणकीय प्रणाली मध्ये काही सुधार झाले बाबत विचारले असता निर्माण होणाऱ्या अडी-अडचणी बऱ्याच प्रमाणावर कमी झालेचे त्यांचे कडून सांगण्यात आले त्याबाबतचा अहवाल संगणकीय प्रणाली वापरत असणाऱ्या संबंधित विभागांकडून मागविण्यात आला आहे

सध्या स्थितीत कार्यरत असणारी संगणके, संगणकीय साहित्य व संगणकीय कार्य प्रणाली ही आजच्या नवीन तंत्रज्ञानाचे तुलणेनुसार कालबाह्य झालेली आहे. त्यास अनुसरून, श्री साईबाबा हॉस्पिटल व साईनाथ हॉस्पिटल साठी नव्याने प्रणाली बनवीणे कामी व्यवस्थापन समितीचे सभेत श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालये आत्याधुनिक संगणकीकृत करणेकामी साहित्य खरेदी करणेबाबत दिनांक १६.०२.२०१६ रोजीच्या मा.

व्यवस्थापन समितीच्या सभेचा मंजूर ठराव विषय क्रमांक १०७ व निर्णय क्रमांक १८२ नुसार खलील प्रमाणे निर्णय झालेला आहे–

“यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयाचे दैनंदिन कामकाज सुरळीत चालावे या करिता प्रस्तावात नमूद केलेप्रमाणे आत्याधुनिक संगणक , हार्डवेअर साहित्य, नेटवर्किंग, RF साहित्य, अत्याधुनिक संगणकीय साहित्य तसेच अत्याधुनिक (HMIS), PACS System, Anti Virus प्रणाली इत्यादि खरेदी कामी विहित पद्धतीने ई-निविदा मागवीणेस व याकामी येणाऱ्या अंदाजे रु. ३,५०,००,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.

तसेच याकामी येणाऱ्या खर्चास मान्यता घेणेसाठी संस्थान वकिलामार्फत मा. मुंबई उच्चा न्यायालयाचे औरंगाबाद खंडपिठा मध्ये अर्ज दाखल करण्यात यावा व मा. खंडपीठाचे आदेशानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी असे ठरले.

उपरोक्त ठरावानुसार सदरचे खर्चास मान्यता मिळणेकामी संस्थानचे विधी विभागामार्फत मा. उच्च न्यायालयात सिव्हील अॅप्लीकेशन नं. ५५०६/२०१६ दि. २०/०४/२०१६ रोजी मा. उच्च न्यायालयात दाखल केले आहे.

परंतु, दिनांक २८.०७.२०१६ रोजी शासनाने संस्थानचे व्यवस्थापनाचे कामकाज पाहणेकमी मा. विश्वस्थ मंडळाची नियुक्ती केलेली आहे. त्यामुळे मा. उच्च न्यायालयात दाखल केलेले उपरोक्त सिविल अर्ज मागे घेणेबाबत दिनांक ०७.०८.२०१६ रोजीचे व्यवस्थापन समितिचे सभेत मा. उच्च न्यायालयात दाखल केलेले सिविल अर्ज मागे घेणेबाबत निर्णय झालेला असून संबंधित प्रस्ताव मागे घेणेची कार्यवाही विधी विभागामार्फत चालू आहे. सदरची कार्यवाही पूर्ण होणेकामी व सदरचा विषय पुन्हा मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर करुन टेंडर प्रोसेस होवून आदेश देणेस बराच कालावधी लागणार आहे. त्यामुळे नवीन संगणक प्रणाली अत्त्याधुनीकरण बाबतच्या प्रस्ताव करणेच्या मंजुरीस विलंब होऊ शकतो. त्यामुळे सदर प्रक्रिया पूर्ण होई पावेतो सध्या कार्यरत असणारी प्रणालीचे देखील वेळोवेळी मेंटेनन्स करणे गरजेचे आहे. जेणेकरून निर्माण होणाऱ्या अडी अडचणींमुळे रुग्णांना कुठल्याही प्रकारचा त्रास होणार नाही याची काळजी घेणे गरजेचे आहे.

M/s Sofscript System and Services Ltd, Mumbai यांनी शिर्डी येथे दिनांक१२ जुलै, २०१६ रोजी सध्या कार्यरत असणाऱ्या प्रणाली करिता Upgradation व Maintenance कॉंट्रॅक्ट बाबत प्रस्ताव सदर केलेला आहे. सदर प्रस्तावाचे अनुषंगाने संगणकीय प्रणालीचे Upgradation करणेकरिता सर्व संगणकीय यंत्रणा जसे Hardware, Network, Operating Systems असे इत्यादि बादल करावे लागणार आहे. त्यामुळे Upgradation बाबतीत विचार करता उपरोक्त नमूद ३.५० कोटी चे प्रस्ताव मंजूर झालेस सबब Sofscript कंपनी त्या प्रक्रियेत सहभाग घेऊ शकते. त्यामुळे त्यांच्या Maintenance Contract बाबत विचार करता त्यांनी सदर प्रस्तावात सदध्या कार्यरत असणाऱ्या प्रणाली साठी खालील प्रमाणे खर्च कळविलेला आहे. –

**1. Standard AMC Fee For Maintenance Service**

| Payment Option | Amount (Rs.) | Payment Terms |
|---|---|---|
| **Payments for 4 Months** | **Rs. 2,50,000/-** | **Amount Paid on or before effective date.** |

**2. Fee for Chargeable Services**

| **Service Type** | **Fees (Rs.)** | **Travelling** |
|---|---|---|
| **Onsite Support by Consultant from Sofscript** | **Rs. 7,200/- Per Person Per Day** | **Not Included in the Fee** |
| **Onsite Support by Senior Consultant/ Project Incharge/ Project Co-ordinator from Sofscript** | **Rs. 13,500/- Per Person Per Day** | **Not included in the Fee** |

तरी, श्री साईनाथ रुग्णालय व श्री साईबाबा हॉस्पिटल या दोन्ही हॉस्पिटल करिता नवीन संगणक, संगणकीय साहित्य व संगणकीय प्रणाली आत्याधुनिक करणेकामी प्रलंबित असलेला प्रस्तावास मंजूरी मिळून सर्व प्रक्रिया पूर्ण होई पर्यंत सध्या श्री साईबाबा हॉस्पिटल येथे कार्यान्वित असणारी M/s Sofscript System and

Services Ltd, Mumbai यांची HIMS संगणकीय प्रणालीचे वेळोवेळी मेंटेनन्स करणेकामी त्यांनी सादर केलेल्या दिनांक १२ जुलै, २०१६ रोजीच्या संगणकीय प्रणालीचे Maintenance Contract चा विचार करुन सदर प्रस्तावाबाबत M/s Sofscript System and Services Ltd, Mumbai यांचेशी चर्चा वाटाघाटी करणेकामी त्यांना समक्ष बोलावून मा.वयवस्थापन समितीचे सभेपुढे सादर करुन निर्णय घेणेचे मान्यतेसाठी व संगणकीय प्रणालीच्या AMC अथवा On Site Support करीता त्याकामी येणाऱ्या खर्चास मान्यता मिळणेचे निर्णयार्थ सविनय सादर.

**निर्णय क्र.६३४** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईनाथ व श्री साईबाबा या दोन्ही हॉस्पिटल करिता नवीन संगणक, संगणकीय साहित्य व संगणकीय प्रणाली विहीत पध्दतीने अत्याधुनीक करणेची प्रक्रिया पुर्ण होईपर्यंत प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे ४ महिने कालावधीसाठी, सध्या श्री साईबाबा हॉस्पिटल येथे कार्यान्वित असलेल्या संगणकीय प्रणालीचे मेंटेनन्स M/s Sofscript System and Services Ltd, Mumbai यांचेकडून करुन घेणेस व याकामी येणाऱ्या रु.२,५०,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

------------------------------------------------------------------------------------------------------------------------------

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.२१** **श्री साई सृष्टी प्रकल्प उभारणेबाबत.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतुद:** खालीलप्रमाणे आहे.

अ) कलम १७ (समितीची कर्तव्ये व अधिकार) -पोटकलम(२)खंड(ठ)- समिती श्री साईबाबांचे जीवन, त्यांचे कार्य, त्यांच्या लीला व शिकवण याबाबतच्या उपयुक्त माहितीचा प्रचार व प्रसार करील आणि श्री साई साहित्य ग्रंथालय चालवील व त्याचा विस्तार करील;

ब) समितीकडून कलम २१ (विश्वस्त निधीचा विनियोग) -

१. पोटकलम (१) खंड (ङ) - श्री साईबाबांच्या शिकवणीचा प्रचार करणे;

२. पोटकलम (१) खंड (झ)-विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांचा विकास करणे आणि विश्वस्तव्यवस्थेच्या प्रयोजनांसाठी स्थावर किंवा जंगम मालमत्तांचे संपादन करणे;

**मा. व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय :**

१. दिनांक ०५/१२/२०१० निर्णय क्र. १००४(०४)

२. दिनांक २६/०३/२०११ निर्णय क्र. २०१

३. दिनांक २८/१२/२०१५ निर्णय क्र. ६५३

**प्रस्तावना:** श्री साईबाबांचे दर्शनासाठी शिर्डीत येणा-या साईभक्तांना गर्दीचे प्रमाणात अनेक सोयीसुविधा मंदिर परिसरात पुरविण्यात आलेल्या असुन आणखी वाढीव सुविधा पुरविणेसाठी दर्शनरांग व अनुषंगिक व्यवस्था निर्माण करणे प्रस्तावीत आहे. सध्या समाधीचे दर्शन घेवून बाहेर पडणा-या साईभक्तांची मोठया प्रमाणात गर्दी मंदिर परिसरात असते. या गर्दीत दर्शन घेवू इच्छिणा-या भक्तांची भर पडतच असते. यासाठी मंदिर परिसरातील भक्तांची गर्दी अन्यत्र वळविणे आवश्यक आहे. शिर्डीत येणा-या साईभक्तांसाठी नविन आकर्षण केंद्र निर्माण करणे व भक्तांना विरंगुळा मिळणेबरोबरच श्री साईबाबांचे जीवन, त्यांचे कार्य, त्यांच्या लीला व शिकवण याबाबत माहीती देणेचे दृष्टीने संस्थानमार्फत साईगार्डन थिमपार्क लेजरशो करणे प्रस्तावीत आहे. तसेच श्री साई सच्चरित ग्रंथातील प्रसंगावर आधारीत चलचित्र स्वरुपातील देखावे लाईट व साऊंड इफेक्टसह सादर करणेसाठी 'साईसृष्टी' प्रकल्प प्रस्तावीत आहे. या कामांमध्ये सिव्हील वर्क, इटेरियर व लॅन्डस्केपिंग वर्क, मुर्त्या, ग्रंथालय, योगा, म्युझियम, उपहारगृह, स्वच्छतागृह, इटेलिजंट लाईटींग व इलेक्ट्रीकल कामे इत्यादी कामांचा समावेश आहे.

**प्रस्ताव:** मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक ०५/१२/२०१० रोजी झालेल्या बैठकीत मौजे रुई येथील बक्षिसपत्राने मिळालेल्या उर्वरीत जमिनीत साईसृष्टी प्रकल्प उभारणेत यावा. त्यासाठी प्रसिध्द कलानेपथ्यकार श्री. नितिन देसाई यांची नेमणूक करण्यात यावी. याकामी श्री. नितिन देसाई यांचेशी संपर्क साधुन साईसृष्टी उभारणेसाठी प्रकल्प अहवाल तयार करुन घेणेची कार्यवाही करणेत यावी असे ठरले. त्यानुसार दिनांक २६/०३/२०११ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे प्रसिध्द कलानेपथ्यकार श्री.नितिन देसाई यांनी उपस्थित राहून सदरहु प्रकल्पाचे सादरीकरण केले. त्यातील ठळक बाबी खालीलप्रमाणे–

१. श्री साईबाबांची मोठी प्रतिमा उभारण्यात येईल. सदर प्रतिमा ०५ ते १० कि.मी. अंतरावरून दिसू शकेल.

२. साईसृष्टी प्रकल्पासाठी अंदाजे २५ एकर जमिन उपलब्ध व्हावी. त्यापैकी ०५ एकर जमिनींमध्ये आवश्यक इमारती असतील.

३. साधारणत: ०२ वर्षात प्रकल्प पूर्ण होवून ०६ वर्षात संपूर्ण खर्च वसूल होईल.

४. विशेषत: अमेरिका व भारतातून शिल्पकृती घडवेणसाठी कलाकार येतील.

५. साईसृष्टी ठेवण्यात येणा-या मुर्त्या मेणात (Wax) घडविण्यात येतील.

६. या प्रकल्पास १२ तासात ४० हजार पर्यटक भेट देवू शकतील.

७. या प्रकल्पामध्ये जीवंत सादरीकरणांतर्गत श्री साईची पालखी/ मिरवणूक दररोज दिवसातून एकदा स्थानिक कलाकारांच्या माध्यमातून साकारणेत येईल.

८. विषयांकीत प्रकल्पास अंदाजे खर्च रु.३५ कोटी येईल.

या सादरीकरणास सदस्यांनी पसंती दिली व त्यावर सविस्तर चर्चा होवून निर्णय क्र.२०१ अन्वये खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आला.

*“.. प्रसिद्ध कलानेपथ्यकार श्री. नितीन देसाई, मुंबई यांनी शिर्डी येथे साईसृष्टी प्रकल्प उभारणेसाठी उपरोक्त सादरीकरणावर सविस्तर चर्चा करणेत येवून, साईसृष्टी प्रकल्पासाठी श्री. नितीन देसाई, मुंबई यांची/त्यांचे संस्थेची प्रकल्प सल्लागार म्हणून नेमणूक करणेत यावी असे ठरले.*

*श्री.देसाई यांचेशी चर्चा करून, विषयांकीत प्रकल्पासाठी त्यांनी देवू केलेल्या सेवेचा Scope of work ठरविणेत यावा. या Scope of work मध्ये प्रामुख्याने, विषयांकीत प्रकल्पाचे डिझाईन व ड्रॉईंज तयार करणे, प्रकल्पाचे विविध बाबींसाठी निविदा तयार करून देणे, निविदेप्रमाणे कार्यादेश बहाल करणेस सहाय्य करणे, प्रकल्प उभारणीची सुरुवात करून ती अंतिम होईपर्यंत, विविध बाबींची अंमलबजावणी करणे, कामाचे दैनंदिन पर्यवेक्षण करणे, प्रकल्प खर्चाचे पृथ्थकरण करून खर्चाचे प्रमाणपत्र देणे, काही विशेष बाबी, जसे मुर्त्या तयार करणे, साउंड इफेक्ट्स, लाईटींग आदी कामासाठी एजन्सीज नेमणे, प्रकल्प उभारणीसाठी संस्थान व ठेकेदार यांचेत समन्वय साधून प्रकल्प पुर्णत्वास नेणे आदि बाबींचा समावेश असावा.*

*सदरहु सल्लासेवा आर्कीटेक्ट, स्ट्रक्चरल इंजिनियर व प्रकल्प व्यवस्थापन सेवेसह सर्वसमावेशक असावा व त्यासाठी संस्थानचे तांत्रिक मनुष्यबळ वापरू नये. श्री.नितीन देसाई, मुंबई किंवा त्यांच्या अखत्यारीतील ते नामनिर्देशित करतील त्या संस्थेस प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणून सेवा पुरविणेसाठी एकूण प्रकल्प खर्चाच्या ०६ टक्के अधिक सेवाकर अतिरिक्त याप्रमाणे सल्लागार शुल्क आदा करावे असे ठरले.”*

मौजे रुई येथिल सदरहु क्षेत्र हरित क्षेत्रातून (Green zone) वगळून श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचे विविध सार्वजनिक/निमसार्वजनिक उपक्रमांचे वापरासाठी रहिवास क्षेत्रात समाविष्ट करणेसाठी दि.२८/१२/२०१०चे पत्रान्वये शासनास प्रस्ताव सादर करण्यात आला असुन, त्यास अद्याप मान्यता मिळालेली नाही.

श्री साईबाबांच्या महासमाधिस सन २०१८ मध्ये १०० वर्ष पूर्ण होणार आहेत. त्या निमीत्त श्री साईबाबा संस्थानमार्फत श्री साईबाबा महासमाधि शताब्दी वर्ष दि.०१/१०/२०१७ ते दि. १८/१०/२०१८ (विजयादशमी) अखेर साजरे करणेत येणार आहे. महासमाधि शतक महोत्सवी वर्षाचे काळात सुमारे चार कोटी भक्त श्री साईबाबांचे दर्शनार्थ येतील असा अंदाज आहे त्यासाठी शिर्डी शहर व परिसरातील पायाभूत सुविधांमध्ये मोठ्या प्रमाणावर सुधारणा करणे व नविन प्रकल्प उभारणे आवश्यक आहे. याकरीता कृती आराखडा तयार करणेसाठी महाराष्ट्र शासन, विधी व न्याय विभाग, शासन निर्णय क्रमांक सासंवि-२०१३/प्र.क्र.०१/का.१६ दि.२२/१०/२०१३अन्वये मा. मुख्यमंत्री महोदय, महाराष्ट्र राज्य यांचे अध्यक्षतेखाली अंतिम कृती आराखडा तयार करण्यासाठी समिती गठीत केलेली आहे. या समितीची बैठक शुक्रवार दि. ११/१२/२०१५ रोजी विधान भवन, नागपूर येथे मा. ना. श्री. देवेंद्र फडणवीस, मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे अध्यक्षतेखाली संपन्न झाली आहे. वर नमूद केलेप्रमाणे कृती आराखडा समितीचे बैठकीत उपरोक्त विषयाबाबत सादरीकरण करणेत आलेले आहे.

याबाबत मा.त्रिसदस्य समितीचे दिनांक २८/१२/२०१५ रोजीचे सभेत सदरहु प्रकल्प मौजे निमगाव को. येथिल गट नं.१९८, १९९,२०० व २०१ मधील प्रस्तावीत साई गार्डनमधिल उर्वरीत जागेत उभारणेस व त्यासाठी श्री. नितिन देसाई यांची सल्लागार म्हणून नेमणूक करणेबाबत प्रस्ताव सादर करणेत आला. त्यावर त्रिसदस्य समितीचे निर्णय क्रमांक ६५३ अन्वये खालीलप्रमाणे ठरले आहे.

*“.. यावर सविस्तर चर्चा होवून असे ठरले की प्रस्तावीत प्रकल्पात प्रामुख्याने श्री साई सच्चरीत ग्रंथातील प्रसंगावर आधारीत देखावे तसेच मुर्त्या उभारणे अशा कलात्मक स्वरुपाच्या कामांचा समावेश*

*असल्यामुळे तत्कालीन व्यवस्थापन समितीने या प्रकल्पासाठी सल्लागार म्हणून चित्रपट सृष्टीतील आघाडीचे व सुप्रसिद्ध कला नेपथ्थकार श्री.नितिन देसाई यांची नेमणूक केलेली आहे. तरी आता प्रस्तावीत प्रकल्प साईगार्डनमधील जागेत करणेसाठी श्री.नितिन देसाई यांचेकडून आराखडा व अंदाजपत्रक तयार करून त्यानुसार येणा-या अनुषंगिक खर्चास मा. उच्च न्यायालयाची मान्यता घेण्यात यावी."*

या प्रकल्पासाठी खालीलप्रमाणे खर्च अपेक्षित आहे.

| अ.नं. | तपशिल | अंदाजे खर्चाची रक्कम रु. |
|---|---|---|
| ०१ | सिव्हील वर्क –आर.सी.सी., बांधकाम, पलॅस्टर, दरवाजे, खिडक्या, रेलिंग,वॉल पॅनेल्स, फॉल्स सिलींग, पोर्टल पॅनेल्स, रुफींग पॅनेल्स इ. | ६,०३,३०,०३०/- |
| ०२ | इटेरियर वर्क - पॅनेल्स, रेलिंग,स्टेज, स्टॅच्युज, टेक्श्चर्ड वॉल्स इ. | १५,६१,२८,७००/- |
| ०३ | लॅन्डस्केपिंग वर्क - ॲनिमल स्टॅच्युज,पेव्हींग टाईल्स,लॉन्स, ट्रीज,पार्कींग इ. | ४,४०,००,०००/- |
| ०४ | मिसेलिनियस वर्क - ग्रंथालय, योगा, म्युझियम, उपहारगृह, स्वच्छतागृह, कंपाउंड वॉल, इटेलिजंट लाईटींग व इलेक्ट्रीकल कामे तसेच सुरक्षाव्यवस्था इ. | ५,०६,३५,४००- |
| | एकूण रु. | ३१,१०,९४,१३०/- |
| | कॉन्टींजन्सीज – १० % | ३,११,०९,४१३/- |
| | कन्सल्टन्सी चार्जेस - ६ % | १,८६,६५,६४८/- |
| | अंदाजे एकूण खर्च रु. | **३६,०८,६९,१९१/-** |

तरी उपरोक्त तपशिलाप्रमाणे येणारे अंदाजे रु.३६.०९ कोटी खर्चास मान्यता मिळणेसाठी सविनय सादर.

**निर्णय क्र.६३५** **आजचे सभेत श्री साई सृष्टी प्रकल्पासाठीचे सल्लागार व कला, नेपथ्यकार श्री.नितिन देसाई, मुंबई हे उपस्थित होते. त्यांनी सभेस श्री साईसृष्टीचे सादरीकरण दाखविले व पुढीलप्रमाणे माहिती दिली.**

**बाबांच्या समाधी शताब्दी निमित्ताने साईसृष्टी बनविणेत येणार असून या प्रकल्पाचे कार्यक्रम व्यवस्थापन ते स्वत: विनामुल्य करणार आहेत. यामध्ये बाबांची भव्य अशी १०० फुट उंचीची बाबांची मुर्ती राहील व बाजुला वेगवेगळया ५२ गॅलऱ्यांमध्ये साईसच्चरीत्र अध्यायामधील ५२ प्रकारचे हालते देखावे राहतील. त्यामुळे साईभक्तांना दृश्यस्वरुपात बाबांचे चरित्र समजणार आहे तसेच बाबांच्या जीवनावर ५२ भागांची छोटया पडद्यावरील मालिकाही निर्माण करण्याचा माणस आहे. साईसृष्टीमध्ये मोठे स्टेज राहील व त्यावर वर्षभर वेगवेगळया नामांकित कलाकारांचे लाईव्ह कार्यक्रम राहतील. सर्व साईसृष्टी पहाण्यासाठी भक्तांना कमीत कमी २ तास व जास्तीत जास्त २ दिवसही वेळ लागेल. बाबा भिक्षा मागत असत, या संकल्पनेमधून देशाच्या कानाकोपऱ्यातून समाधी शताब्दी निमित्ताने बाबांचा रथ शिर्डीसाठी निघेल. समाधी शताब्दी निमित्ताने समाधी शताब्दीसाठी ब्रँड ॲम्बसेडर नेमण्यात येईल, इ.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन समितीने असे ठरले की, श्री साईबाबांच्या महासमाधी शताब्दी वर्षाचे श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सव, २०१७-२०१८, असे संबोधण्यात यावे व या नावाचा लोगो तयार करणेत यावा, त्या लोगोवर पृथ्वी व मंदिरामधील बाबांचा (मुर्तीचा) फोटो व त्यावर चोहोबाजुंने चांदण्यांच्या स्वरुपात उठावदार प्रकाश टाकणेत यावा**

**समाधी शताब्दी वर्षाची जागतिक पातळीवर प्रसिध्दी देण्यासाठी ब्रॅण्ड ॲम्बीसिडर म्हणून जेष्ठ सिने अभिनेता अमिताभ बच्चन यांना विचारणा करण्यात यावी, ते साईबाबांचे भक्तही आहेत. तसेच दक्षिण भारतीय सिने अभिनेते रजनीकांत, नागार्जुन, बाहुबली फेम प्रभास हे व इतर साईभक्त सिनेअभिनेते कि जे विनामुल्य सेवा देतील त्यांना विचारना करण्यात यावी.**

**बाबांच्या समाधी शताब्दी निमित्ताने साईसृष्टी स्मारक कायमस्वरुपीचे बनविणेत यावे. त्यामध्ये श्री.नितिन देसाई यांनी नमुद केलेप्रमाणे बाबांची १०० फुटी मुर्ती, विविध देखावे व लहान मुलांसाठीटेलीस्कोप गॅलरीव्दारे स्टार्स पहाण्याची व्यवस्थाही ठेवण्यात यावी. बाबांनी आयुष्यभर गोर-गरीब तसेच रोग्यांची सेवा केलेली होती. त्यामुळे सदरहू साईसृष्टीमध्ये बाबांनी लोकांच्या केलेल्या सेवेच्या बाबतीतील देखावे ठेवावेत. तसेच बाबांच्या जीवनावर ५२ भागांची सिरीयल तयार करणेसाठी मोठया देणगीदार साईभक्तांची प्रायोजक म्हणून नेमणूक करणेसाठी संस्थानचे अधिकृत संकेत स्थळावर प्रसिध्दी देण्यात यावी.**

**तसेच सदरहू साईसृष्टी उभारणीकामी येणाऱ्या अंदाजे रु.३६.०९ कोटी मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.२२ समन्वय अधिकारी नेमणूक करणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीचे वतीने साईबाबांचे दर्शनासाठी येणा-या साईभक्तांना विविध सेवा-सुविधा पुरविणेत येतात. दिवसेंदिवस शिर्डी येणा-या भक्तांची लक्षणीय वाढ तसेच सन २०१८ मध्ये साईबाबांचे समाधीला १०० वर्ष पुर्ण होत असल्याने भक्तांच्या सेवा-सुविधेसाठी विविध प्रकल्प संस्थान प्रशासनाने हाती घेतले आहेत. उदा.संस्थान रुग्णालयाचे विस्तारीकरण करुन अद्ययावत तंत्रज्ञानाचा वापर करणे, पाणी पुरवठा योजना, साई गार्डन प्रकल्प, लेझर शो, शिर्डी शहराचे घनकचरा व्यवस्थापन, नागरी पायाभुत व मुलभूत सुविधा निर्माण करणे, शैक्षणिक संस्थांचा विकास करणे संस्थान चालवित असलेली रग्णालय यांचे सक्षमीकरण यासारखी संस्थानची कामे भक्तांचे सुविधेसाठी विहित वेळेत पूर्ण करणे व त्यांचेव्यवस्थापन सक्षमपणे होणेसाठी शासकीय / निमशासकीय सेवेतील सेवानिवृत्त अधिकारी यांची समन्वयक अधिकारी म्हणून एकत्रित मानधनावर नेमणूक करणे आवश्यक आहे. तरी खालील नमुद क्षेत्रातील कामकाजाचा अनुभव व त्यामधील शैक्षणिक पात्रता धारण केलेल्या उमेदवाराची नेमणूक करता येईल.

अ) सार्वजनिक रुग्णालय व आरोग्य सेवा
ब) परिवहन सेवा
क) शहराचे घनकचरा व्यवस्थापन
ड) नागरी पायाभूत व मूलभूत सुविधा व त्यांचे नियोजन व व्यवस्थापन
इ) शैक्षणिक कामकाज
ई) पाणी पुरवठा योजना

वरील क्षेत्रातील शासकीय / निमशासकीय सेवेतील कामाचा अनुभव व शैक्षणिक पात्रता धारण केलेल्या उमेदवाराची Walk in Interview द्वारे रु.५०,०००/- इतक्या एकत्रित मानधानावर नेमणूक करता येईल. तसेच त्यांचे शिर्डी भेटीचे वेळी त्यांना वाहन, भोजन, निवासव्यवस्था तसेच दर्शन व आरती इत्यादी सुविधा विनामुल्य संस्थानमार्फत पुरविता येईल.

तरी सदरचे विषयावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.६३६ यावर सविस्तर चर्चा होऊन, समन्वय अधिकारी या पदासाठी शासकीय/निमशासकीय सेवेतील कामाचा अनुभव व शैक्षणिक पात्रता धारण केलेल्या उमेदवाराची थेट मुलाखतीव्दारे (Walk in Interview) नेमणूक करणेकामी शासकीय दराने वर्तमानपत्रात जाहिरात देणेस व त्याकामी येणा-या खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, सामान्य प्रशासन)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.२३ मा.विश्वस्तांच्या सुचनांबाबत**

**निर्णय क्र.६३७ मा.विश्वस्तांनी आजचे सभेत खालीलप्रमाणे सुचना मांडल्या त्या मान्य करण्यात आल्या.**

**(१)** व्यवस्थापन समितीने आजचे सभेत संस्थानच्या शिर्डी व मुंबई येथे होणाऱ्या व्यवस्थापन समिती सभांसाठी अध्यक्ष, उपाध्यक्ष व सदस्यांना देण्यात येणारा दैनिक भत्ता न घेण्याचा धोरणात्मक निर्णय घेतला. सदस्यांनी मागणी केल्यास त्यांना सभेसाठी तसेच संस्थान कामासाठी जाणे-येणेचा प्रत्यक्ष खर्च अथवा शक्य झाल्यास त्यासाठीची वाहन व्यवस्था संस्थानमार्फत करणेत यावी. तसेच सदस्य स्वत: अथवा त्यांचे कुटूंबीय शिर्डी येथे आल्यास त्यांच्या निवासाची संस्थानमार्फत विनामुल्य व्यवस्था करण्यात यावी.

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, सभाकामकाज विभागप्रमुख/ प्र.अधिक्षक, साईप्रसाद निवासस्थान/ प्र.अधिक्षक, वाहन विभाग)

---

**(२)** संस्थानचे कामकाज जलद गतीने चाचलावे व झालेल्या निर्णयांवर तातडीने कार्यवाही व्हावी, याकरिता, यापुढे मा.अध्यक्ष महोदय यांनी सभेचे इतिवृत्त अंतीम केल्यानंतर, लगेचच संबंधीत विभागांना त्याच्या प्रती पुढील कार्यवाहीसाठी देण्यात याव्यात. (कार्यवाही- प्र.अधिक्षक, सभाकामकाज विभाग)

---

**(३)** आजचे सभेत मे.लेजर व्हिजन लि., हाँगकाँग यांचे प्रतिनिधी उपस्थित होते, त्यांनी श्री साईबाबा मल्टीमिडीया थिमपार्क प्रकल्पाचे सभेसमोर सादरीकरण केले. समितीने त्यांचेबरोबर लेझर शोच्या सादरीकरणाबाबत चर्चा केली असता, सिव्हील वर्कचे काम अपुर्ण असल्यामुळे मे.लेजर व्हिजन लि., हाँगकाँग यांना पुढील काम करता येणे शक्य नाही, असे समितीच्या निदर्शनास आले. समितीने सदरहू प्रकल्पावर किती/ काय काम केले आहे व

त्यांना आत्तापर्यंत किती रक्कम देण्यात आलेली आहे तसेच करारानुसार सध्या किती रक्कम द्यावयाची आहे, याची माहिति घेतली.

यावर सविस्तर चर्चा होऊन, मा.उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार याकामी तज्ञांची चौकशी समिती तयार केलेली आहे. ही तज्ञ समिती मा.उच्च न्यायालयामध्ये आपला अहवाल सादर करणार असून त्यानंतर मा.उच्च न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे पुढील कार्यवाही करणेत यावी, असे ठरले.

(कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**(४)** संस्थानचे विक्री स्टॉल्स (सोने-चांदीचे नाणी, कापडकोठी, बुकस्टॉल) समाधी मंदिराच्या लगत असावेत, जेणेकरुन दर्शन करुन आलेल्या साईभक्तांना खरेदी करता येईल.

(कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख/ मालमत्ता विभागप्रमुख)

---

**(५)** सध्याची दर्शन हॉलमधील रांगा पुर्व-पश्चिम अशा असल्यामुळे फक्त उत्तर बाजुच्या रांगेतील भक्तांनाच खेळती हवा मिळते, या रांगांचा आढावा घेऊन उत्तर-दक्षिण अशा बनवता येतील का, याबाबचा अभ्यासपुर्वक प्रस्ताव सभेसमोर सादर करणेत यावा. (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख/ मेकॅनिकल विभागप्रमुख)

---

**(६)** संस्थानमधील कायम/ कंत्राटी कर्मचाऱ्यांचे वेतनासाठी स्वतंत्र निधी ठेवण्यात यावा, या निधीच्या व्याजातून वेतन अदा करता येईल, तसेच तिरुपती देवस्थानच्या ठिकाणी यासाठी काय करतात, या सर्व बाबींचा अभ्यास करुन तौलानिक प्रस्ताव सभेसमोर सादर करणेत यावा.

(कार्यवाही- मुख्यलेखाधिकारी, प्र.अधिक्षक, सामान्य प्रशासन)

---

**(७)** संस्थानमधील कर्मऱ्यांनी वेळेवर डयुटीवर हजर रहावे यासाठी कायम/ कंत्राटी तसेच आऊटसोर्स या सर्व कर्मचाऱ्यांच्या आगमन-निर्गमन वेळेसाठी बायो-मेट्रिक सिस्टीम बसविणेत यावी, याबाबत ठेकेदारांना कळविणेत यावे व पाठपुरावा करणेत यावा. (कार्यवाही- कामगार अधिकारी)

---

**(८)** जास्त गर्दीचे कालावधीमध्ये साईभक्तांच्या सोयीसाठी दर्शन रांगेमध्ये पिण्याच्या पाणी उपलब्ध करुन देण्यात यावे. (कार्यवाही- प्र.अधिक्षक, कॅन्टीन विभाग)

---

**(९)** समाधी मंदिरातील सर्व खोल्यांमध्ये सीसी.टी.व्ही. कॅमेरे बसविणेत यावे.

(कार्यवाही- सी.सी.टी.व्ही. कंट्रोल सेलप्रमुख)

---

**(१०)** समाधी मंदिर व इतर आस्थापनाविषयक सुरक्षा यंत्रणांच्या सुरक्षेबाबत सविस्तर प्रस्ताव सभेसमोर सादर करणेत यावा. (कार्यवाही- संरक्षण विभागप्रमुख)

---

**(११)** आजचे सभेत प्र.वैद्यकिय संचालक, श्री साईबाबा हॉस्पिटल यांनी हॉस्पिटलच्या दैनंदिन कामामध्ये येणाऱ्या अडचणी व त्यावरील उपाययोजनांबाबत समितीसमोर चर्चा केली. समितीने त्यांची नोंद घेतली.

संस्थान हॉस्पिटलमध्ये रुग्णांना ॲडमीट करणेसाठी बेडची कमतरता आहे, याकरिता श्री साईनाथ रुग्णालयाचे शेजारी असलेली प्रसादालयाची कॅन्टीन बंद करणेत येऊन, तेथे श्री साईनाथ रुग्णालयाचे विस्तारीकरण करणेत यावे. तसेच श्री साईनाथ हायस्कुलची जागा ताब्यात घेणेची कार्यवाही चालू असून, सदरहू जागा ताब्यात मिळाल्यानंतर त्याजागी श्री साईबाबा हॉस्पिटलचे विस्तारीकरण करण्यात यावे.

तसेच मागील सभेमध्ये चर्चा झालेप्रमाणे संस्थान निलंबीत डॉ.बजाज व डॉ.वर्मा यांच्या प्रकरणाची सखोल माहिती समितीस अवगत व्हावी, यासाठी समितीतील सर्वश्री मोहन जयकर, प्रताप भोसले व सचिन तांबे या सदस्यांना लेखी पत्र देण्यात यावे व त्यांनी डॉ.बजाज व डॉ.वर्मा यांचे प्रकरणाबाबतची माहिती घेऊन, सर्वंकश अहवाल व्यवस्थापन समितीसमोर सादर करावा. (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**(१२)** श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सव- २०१७-१८ ची तयारी करणेकामी, दर्शनासाठी येणाऱ्या साईभक्तांची सख्या माहिती असणे आवश्यक असल्याने यावर्षी श्री साईबाबा पुण्यतिथी उत्सव- २०१६ मध्ये श्रींचे दर्शनासाठी येणाऱ्या भक्तांच्या संख्येची गणना करणेत यावी. (कार्यवाही- संरक्षण विभागप्रमुख)

---

**(१३)** श्री साईप्रसादालयमध्ये जास्तप्रमाणात खरकटे अन्न पडलेले दिसून येते, ही प्रसाद भोजनाची पुर्ण्पणे नासाडी टाळण्यासाठी (Ziro Westage) तेथे प्रयोगिक तत्वावर स्वयं:सेवी भोजन (बुफे पध्दत) सुरु करणेबाबत सर्वांगीन अभ्यास करुन प्रस्ताव समीतीसमोर सादर करणेत यावा. (कार्यवाही-प्र.अधिक्षक, प्रसादालय विभाग)

---

**(१४)** श्री साईबाबा संस्थानच्या शैक्षणिक संकुलाकडील बऱ्याचश्या मशिनरी/साहित्य नादुरुस्त झाल्याचे दिसून येते. याकरीता शैक्षणिक संकुलाकडील नादुरुस्त मशिनरी/साहित्य नव्याने खरेदी करणेसाठी ऑडीट करणेत यावे व तसा प्रस्ताव समीतीसमोर सादर करणेत यावा.

(कार्यवाही-प्राचार्य, आय.टी.आय,/प्र.प्राचार्य,क.महा./ प्राचार्य, इं.मि. स्कुल/ प्राचार्या, कन्याविद्यामंदिर)

---

**(१५)** संस्थानसाठी किराणामाल अथवा इतर ज्या साहित्यांच्या नमुन्यांची लॅब तपासणी करण्यात येते अशा लॅब तपासण्यांचा अहवाल सभेसमोर सादर करण्यात यावा. (कार्यवाही- प्र.अधिक्षक, खरेदी विभाग)

---

**(१६)** अपोलो मेडिकल स्टोअर बाबत वेळोवेळी अनेक तक्रारी येत आहेत, याकरीता सदरहु मेडिकल स्टोअर संस्थानमार्फत चालविणेबाबतचा प्रस्ताव सभेसमोर सादर करणेत यावा. (कार्यवाही- वैद्यकीय संचालक)

---

**(१७)** शिर्डी नगरपंचायत व श्री साईबाबा संस्थान यांचा एकत्रित घनकचऱ्याचा प्रकल्प राबविणेचा प्रस्ताव सभेसमोर सादर करणेत यावा. (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**(१८)** श्री साईबाबांनी त्यांच्या हयातीत अनेक रुग्णांची सेवा सुश्रुषा करुन त्यांच्या व्याधी ब-या केलेल्या आहेत. श्री साईबाबांनी केलेले हे रुग्णसेवेचे कार्य श्री साईबाबा संस्थानने अविरत पणे सुरु ठेवलेले आहे. आजमितीस शिर्डीमध्ये संस्थानमार्फत श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयामार्फत ही सेवा उपलबध करुन देण्यात येत आहे.

तथापी राज्यातील ग्रामीण व दुर्गम भागातील अधिकाधिक रुग्णांपर्यत तातडीने वैद्यकीय सेवा पोहचविणेसाठी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी व दानशुर साईभक्त यांचे संयुक्त विद्यमाने राज्यातील विविध भागातील स्वयंसेवी संस्थांना रुग्णवाहीका उपलब्ध करुन देण्याचा उपक्रम सुरु करण्याचा व्यवस्थापन समितीचा मानस आहे. सदरचा उपक्रम सुरु करण्यासाठी ५०० रुग्णवाहीका (Ambulance) खरेदी कराव्या लागतील. या रुग्णवाहीकांच्या खरेदीसाठी रुग्णवाहीका प्रकल्प राबविणा-या स्वयंसेवी संस्थानी त्यासाठीची २५ टक्के रक्कम भरावी व उर्वरीत ७५ टक्के रक्कम दानशुर देणगीदार साईभक्तांच्या देणगीमधून उपलबध करावयाची आहे. याकरीता या उपक्रमासाठी देणगीदार साईभक्त आपल्या आई-वडीलांच्या स्मृती पित्यार्थ अथवा इतर कार्यानिमीत्त देणगी देऊ शकतात. अशा प्रकारे देणगीदारांना आवाहन करण्यात यावे. या सर्व रुग्णवाहीका साई ॲम्बुलन्स या नावाने महाराष्ट्रभर चालतील व त्यांचे संचालन स्वयंसेवी संस्थांमार्फत होईल. अशा प्रकारे कार्यवाही करण्यात यावी. (कार्यवाही- वैद्यकीय संचालक/ जनसंपर्क अधिकारी)

---

वरील निर्णय क्र.५८२ ते ६३७ सर्वानुमते घेण्यात आले.

यानंतर व्यवस्थापन समितीची पुढील सभा दि.१९.०९.२०१६ रोजी सकाळी ११.०० वाजता शिर्डी कार्यालयात होईल, असे मा.अध्यक्ष महोदय यांनी जाहीर केले व सायंकाळी ०७.०० वाजता सभा समाप्तीची घोषणा करण्यात आली.

| | |
|---|---|
| स्वाक्षरित/- | स्वाक्षरित/- |
| (बाजीराव शिंदे) | (सुरेश हावरे) |
| कार्यकारी अधिकारी | अध्यक्ष |

**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी**